॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# इंग्लंडला पडलेला पेंच.

ना० एम. डी. पी. वेब, सी. आय. इ.,
कराची चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष
ह्यांच्या

**BRITAIN'S DILEMMA.**

ह्या पुस्तकाचें भाषांतर.

---

प्रकाशक
पी. व्ही. दाते, मॅनेजर, पी. व्ही. दाते आणि मंडळी,
शुक्रवारपेठ, पुणें.

---

इ. स. १९१३.

---

( सर्व हक्क प्रकाशकांनीं आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )

---

किंमत १ रुपया.

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत रा. नटेश अप्पाजी द्रवीड यांनीं
छापिलें, व पी. व्ही. दाते म्यानजर पी. व्ही. दाते आणि मंडळी,
शुक्रवार पेठ, पुणें, यांनीं पुणें येथें प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना.

हिंदुस्थानांतील लोकांना आपलें हित कशांत आहे, व आपलें अहित कशापासून होईल-अर्थात् आपणांस काय हवें-हें चांगलें समजत असतें. पण ज्यांच्या हातून तें मिळावयाचें त्यांना आपलें म्हणणें समजेल, पटेल व ठसेल अशा रीतीनें कसें मांडलें जाईल याचीच मुख्य अडचण असते. मनांतील विचार निश्चित व कल्पना-विशद असल्यामुळें आपला अभिप्राय व्यक्त करण्यास योग्य शब्द कसे सांपडतील ही कांहीं अडचण नव्हे. पण निश्चित व विशद अशा शब्दांचाही ठसा मनावर उमटविण्यास ऐकणाराच्या मनांत बोलणारासंबंधीं अनुकूल ग्रह असावा लागतो. एरव्हीं बोलणें सौम्य असलें तर तें मऊपणाचें लक्षण व कडक असलें तर फाजीलपणाचें लक्षण असें म्हणून कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें तें फोल होण्याचा प्रसंग येतो.

पण हिंदी लोकांनीं जें बोलावयाचें तेंच बोलणारा जर कोणी इंग्रज भेटला, तर एकदम सर्वच मनु पालटतो. इंग्रज बोलतो म्हणून त्याला महत्व आपोआप येतें. तो सौम्य शब्दांनीं बोलला तर तो त्याचा विनय व भारदस्तपणा ठरतो व कडक बोलला तर तें केवळ त्याच्या निःस्पृही व प्रामाणिक अशा स्वभावाचें, अर्थात् इंग्रज लोक ज्या प्रकारचें शील आपलें आहे असें मानतात त्याचें, दर्शक मानलें जातें. राजकीय विषयांवर सर वुइल्यम वेडरबर्नपासून हाइंडमनसाहेबांपर्यंत इंग्रज लोक जें जें लिहितात त्यांतील विचार हिंदी लोकांच्या लेखांत येत नसतील असें नाहीं. पण राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें त्यांचा सजातीय इंग्रज जें बोलेल तें हिंदी लोकांच्या बोलण्यापेक्षां अधिक वजनदार व महत्वाचें ठरत असतें. म्हणून या लोकांच्या बोलण्याला सरकार जें महत्व देतें त्याच्या दसपट महत्व इकडील लोकांनीं दिल्यास आश्चर्य नाहीं.

हिंदी लोकांच्या राजकीय गाऱ्हाण्यासंबंधानें वेडरबर्न, ह्यूम, कॉटन वगैरे इंग्रज लोकांनीं चर्चा करून ज्या प्रकारची मदत केली त्या प्रकारची मदत हिंदुस्थानच्या

सांपत्तिक कारभारासंबंधानें करण्यास निदान सुरुवातीला तरी कोणी इंग्रज हवाच होता; व या बाबतींतलें श्रेय कराची चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष व मुंबई कायदे कौन्सिलाचे सभासद एम्. डी. पी. वेब, सी. आय ई., यांनींच प्रथम मिळविलें असें म्हटलें पाहिजे. कराचीचे एक व्यापारी या नात्यानें तें बंदर व शहर पुढें यावें, त्याची भरभराट व्हावी, म्हणून चळवळ करून त्यांनीं आपलें विचार-स्वातंत्र्य पूर्वीपासूनच प्रगट केलेलें होतें. परंतु हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीसंबंधानें विशेषतः हिंदुस्थानांतील सोनेंरुपें व चलनी नाणें यांसंबंधानें केवळ हिंदुस्थानच्या फायद्याच्या दृष्टीनें त्यांनीं अलीकडे विवेचन करण्यास सुरुवात केल्यापासून त्यांच्या मतस्वातंत्र्यास खऱ्या सहानुभूतीची जोड मिळून त्यांचे उद्गार हिंदी लोकांस विशेष हृदयंगम व प्रिय असे वाटूं लागले आहेत. पण वर सांगितलेल्या कारणाकरितां स्वकीय व सजातीय मनुष्य बोलतो म्हणून इंग्रज लोकांच्या मनावरही त्या बोलण्याचा परिणाम होऊं लागला आहे. मि. वेब यांनीं ‘ स्वदेशी चळवळ, ’ ‘ हिंदुस्थान व साम्राज्य ’ या नांवाचीं पुस्तकें लिहिलेलीं असून त्यांत सांपत्तिक विषयासंबंधानें हिंदी लोकांचें जें म्हणणें आहे त्याचें त्यांनीं समर्थनच केलें आहे. प्रस्तुतच्या पुस्तकांतही साधारणतः तोच विषय आहे. पण त्यांतल्या-त्यांत हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटराच्या हातीं हिंदुस्थानच्या सर्व सरकारी पैशाच्या देवघेवीवर व अदलाबदलीवर अनियंत्रित सत्ता असल्यामुळें हिंदुस्थानचें नुकसान कसें होतें हें त्यांनीं स्पष्टपणें दाखविलें आहे. पुढें दिलेली नुसती विषयानुक्रमणिका वाचणारास देखील मि. वेब यांच्या प्रमेयाचा खुलासा व प्रमाणाचा तपशील सहज मिळण्यासारखा असल्यामुळें त्याचा सारांशही या प्रस्तावनेंत देण्याचें कारण नाहीं. इतकेंच सांगितलें असतां पुरें होणार आहे कीं, मि. वेब हे इतर युरोपियन व्यापाऱ्यांप्रमाणें हिंदुस्थानांत व्यापार करून पैसा मिळविण्याकरितां आलेले एक व्यापारी असतांही हिंदुस्थानचें राष्ट्रीय हित—निदान पैशाच्या दृष्टीनें तरी—कशांत आहे हें पाहण्याची आणि या बाबतींतले आपले विचार निर्भिडपणें बोलून दाखविण्याची पात्रता व धैर्य त्यांच्या अंगीं आहे हें त्यांना अत्यंत भूषणास्पद होय. प्रस्तुत विषय मि. वेब यांनीं निर्भिडपणें पुढें मांडल्यामुळेंच हल्लीं विलायतेंत फायनॅन्स कमिशन बसून त्याची चर्चा सुरू झाली आहे असें म्हटलें पाहिजे. या चौकशींतून हितकर असें कांहीं निष्पन्न झालें तर त्याचें बरेंच श्रेय मि. वेब यांना द्यावें लागेल.

सदर पुस्तकांतील विषयासंबंधानें फुटकळ चर्चा हिंदुस्थानांत वर्तमानपत्रांच्या द्वारें मधून मधून झाली आहे. व मि. वेब यांचें मुख्य प्रमेय काय असावें याविषयीं

मराठी वाचकवर्गासही मुळींच कल्पना नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. तथापि-प्रस्तुतसारख्या महत्वाच्या विषयाचा सुव्यवस्थित व पद्धतशीर असा अभ्यास करणारास मि. वेब यांचे जितके अधिक लेख एके ठिकाणीं वाचावयास मिळतील तितकें अधिक चांगलें हें उघड आहे. व याकरितां आमच्या एका स्नेह्यांनीं ' ब्रिटन्स डायलेमा ' या नांवाच्या मि. वेब यांच्या पुस्तकाचें हें भाषांतर प्रसिद्ध केलें आहे. ह्या विद्यार्थिवर्गावर त्यांचा उपकारच म्हटला पाहिजे. मूळ पुस्तकांतील विषय महत्वाचा व किंचित् भानगडीचा असल्यामुळें मि. वेब यांच्या पुस्तकांतील तुटक आधार घेऊन लिहिण्यापेक्षां त्यांच्या समग्र पुस्तकाचें सरळ व सुबोध भाषांतर करण्याची कल्पना कोणासही खचित अधिक ग्राह्य वाटेल. मि. वेब यांची विचार-सरणी सरळ असल्यामुळें वाचकांस विषय नीट समजून त्याची गोडी लागेल यांत शंका नाहीं. आपला इतर व्यवसाय संभाळून निर्विकार मनानें व पद्धतशीररीतीनें देशस्थितीच्या एका बाबतींत भाषांतरकर्त्यानें लक्ष घालून आपल्या शेंकडों देशबांधवांजवळ एरव्हीं नसलेलें साधन ह्या भाषांतरद्वारां उपलब्ध करून देऊन या विषयाचा अभ्यास करणाऱ्यांस चांगली मदत केली यावद्दल त्याचे आभार मानून हीं प्रस्तावना पुरी करतों.

न० चिं० केळकर.

# अनुक्रमणिका.

## भाग १ पेंच.

इंग्लंडला पडलेला भयंकर पेंच—सोन्याची विलक्षण पैदास किमती वाढवीत आहे, ठराविक रोजमुरा मिळविणारांवर भारी संकटें आणीत आहे, आणि मजूर लोकांचा असंतोष व संप यांना उत्तेजन देत आहे—त्याचबरोबर हिंदुस्थानांतून सोन्याची मोठी मागणी होत असल्यानें लंडनमध्यें पैसा अधिक महाग होण्याचें भय पडून फडनिर्साखातें व व्यापार हीं अडचणींत येऊं पहात आहेत—इतकें असूनही सोनें पुष्कळ बाहेर न गेलें तर किंमती अशाच वाढत राहणार आणि मजूर लोकांची अस्वस्थता व संप यांना उत्तेजन मिळून परिणामीं सर्व लोकांचें फार नुकसान होणार आहे—अशा स्थितींत काय करावयास पाहिजे.

## भाग २ अडचणींतून निघण्याचा चुकीचा उपाय.

पेंचाचा आणखी जास्त खुलासा—धातूचा पैसा फार झाल्यामुळें पूर्वी सतराव्या शतकांत व एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकाळींही किंमती वाढल्या होत्या—अडचण काढून टाकण्याच्या तजविजी—सोन्याचा वाढता खप आणि मागणी—सोन्याच्या राजकीय व व्यापारी ठेवी—सोन्याचा खप करणारा हिंदुस्थान—हिंदुस्थानानें सन १८५०–६० सालीं अडचणीपासून बचाव केला—जगांतील फाजील सोन्याचा उपयोग करून हिंदुस्थान फिरून बचाव करूं शकेल—परंतु लंडनांतून सोनें फार जाऊं लागलें तर कटमितीच्या व्याजाचे दर वाढून व्यापाराला धोका येईल, या भीतीमुळें लंडनची पैशाची पेठ हिंदुस्थानानें फार सोनें घेऊं नये म्हणून हरकत करते—दुर्दैवानें हिंदुस्थाननें आपल्या हक्काचें सोनें घेऊं नये ह्या चुकीच्या धोरणाचें इंडिया ऑफिसानें अवलंबन केलें आहे आणि आपल्या गरजांपेक्षां फार जास्त नगद हिंदुस्थानांतून काढून घेतली आहे—ही भयंकर लाजिरवाणी गोष्ट झाली आहे.

## भाग ३ आरोप.

इंडिया ऑफिसानें हिंदुस्थानांतून गरज नसतांना ३ कोटी पौंडांवर रक्कम काढून घेऊन साहजिक रीतीनें जो सोन्याचा प्रवाह हिंदुस्थानांत आला असता तो बंद पाडला आहे, असा इंडिया ऑफिसावर आरोप आहे—हिंदी कागदीचलनाच्या ठेवींतून काढलेला पैसा—सोन्याच्या प्रमाणाची ठेव—हिंदुस्थानसरकारच्या चलाऊ नगदी शिलका—कांहीं जरूर नसतां इंडिया ऑफिसाजवळ असलेली १७९५३९९५ पौंडांची नगद शिल्लक—हिंदुस्थानांतील बँकांचा व्याजाचा दर ५ टक्यांवर असतांना इंडिया ऑफिसानें गुप्तपणें लंडनांतील ऋणकोंना अडीच टक्यांनीं दिलेलें कर्ज—हिंदुस्थानचा इतका मोठा पैसा जवळ असूनही इंडिया ऑफिसानें लंडनांत सरासरी ३ टक्यांनीं काढलेलें कर्ज; हा इतका मोठा पैसा लंडनांत उपयोगास आणण्याचें चांगलें साधन नसल्यानें ता इंडिया ऑफिसानें तेथें गुप्तपणें अडीच टक्यांनीं व्याजीं दिला आहे—यासंबंधानें जबाबदार व्यक्ती.

## भाग ४ आरोपाचा खुलासा.

कॅनडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका व हिंदुस्थान यांच्याप्रीत्यर्थ विलायतेंत होणारा खर्च ( होम चार्जेस )–हा खर्च कसा दिला जातो–इतर सर्व वसाहतींपासून हिंदुस्थान निराळा आहे—स्टेट सेक्रेटरी हिंदुस्थानच्या तिजोऱ्यांवर काढलेल्या आपल्या हुंड्यांचे दर आठवड्यास लिलांव कां करतो—हिंदी टांकसाळी १८९३ सालीं बंद केल्या—नव्या शर्ती—स्टेट सेक्रेटरी हल्लीं जो पैसा काढीत आहे त्या-संबंधानें कालमानाचा विपर्यय—हिंदी टांकसाळी अजूनही बंद आहेत—एक भयंकर चूक—खुल्या टांकसाळीचें तत्त्व—हिंदुस्थानांत खुली टांकसाळ नसल्यानें होत असलेले पैशाचे अद्भुत प्रकार—इंडिया ऑफिसावरच्या आरोपांची पुनरुक्ति-लंडनांत पैशाचें काय झालें आहे—फायदा मिळत असलेल्या कांहीं बँका.

## भाग ५ हिंदुस्थानांतील बचावाचे साक्षीदार.

मि. एच्. एफ्. हॉवर्ड, आय्. सी. एस्., कलकत्ता—सर गाय फ्लीटवुड वुइ-ल्सन—सर एडवर्ड बेकर—सर अर्नेस्ट केबल यांनीं दिलेली इशारत—ह्या सर्व कृत्यांसंबंधानें स्टेट सेक्रेटरी जबाबदार— मोठाल्या नगदी शिलका असणें हें उघड

उघड चुकीचें आणि उथळपट्टीचें आहे—एक कोटी सत्तर लक्ष पौंड शिल्लक मोठी काय ?—लंगडी सबब.

## भाग ६ इंग्लंडमधले बचावाचे साक्षीदार.

दी फायनॅन्सिअल टाईम्स—दी स्टेटिस्ट—केंब्रिजचा प्रोफेसर जे. एम्. कीन्स—जुन्या अंगरख्याचा वाद —मेसर्स सॅम्युअल मॉंटेग आणि कंपनी—चुका आणि चुकीचीं विधानें, " आभास " आणि " गैरव्यवस्थितपणा—कित्येक दिलेलीं उदाहरणें—नामदार ई. सॅम्युअल मॉंटेग, एम्. पी., पार्लमेंटमधल अंडर सेक्रेटरी—पार्लमेंटरी कायद्याचीं उदाहरणें देतांना होत असलेला निष्काळजीपणा—" दोन्ही पार्लमेंटाच्या हाऊसेसना सादर केलेला एक सरकारी रिपोर्ट आहे, त्यांत आलेला प्रत्यक्ष गैरसमज. "

## भाग ७ समारोप.

इंडिया ऑफिसवरच्या आरोपाची स्पष्टता—खुल्या टांकसाळीच्या हक्काला हिंदुस्थानाला मुकविण्याच्या आरोपाला चांगलें उत्तर नाहीं—सोन्याचें प्रमाण व कागदी चलन यांच्या ठेवींपैकीं मोठाल्या रकमांचा दुरुपयोग करण्यासंबंधाच्या आरोपाचा जो बचाव आहे त्यांत युद्धाच्या धोक्याचा उल्लेख किंवा विचार नाहीं, आणि म्हणून तो दोषी आहे—ज्या धोक्यांपासून हिंदुस्थानचें रक्षण करणें इंडिया ऑफिसचें कर्तव्य आहे, त्या धोक्यांत इंडिया ऑफिस हिंदुस्थानाला व्यर्थ आणून टाकीत आहे एक कोटि पौंडांच्या चलाऊ नगदी शिलका भलतीकडे लावण्याच्या आरोपाला मुळींच बचाव नाहीं—सर जेम्स बिग्बीची टीका—निकाल.

## भाग ८ हिंदी चलनकमिटीचा १८९९ चा रिपोर्ट अमलांत आणण्याचीं कारणें.

कमिटीच्या शिफारसी—या शिफारशींकडे प्रत्येक बाजूनें होत असलेलें दुर्लक्ष—या दुर्लक्षाचा परिणाम हिंदुस्थानांत येणारा सोन्याचा जो स्वाभाविक प्रवाह तो अडला जाऊन कालावधीवर गेला आहे, व त्याच्या मार्गांत अडथळे आले आहेत—हिंदुस्थानाला सोनें नको या धोरणाचा खुलासा—लंडनची पैशाची ठेव—तेथील लहानशी सोन्याची ठेव—स्वतःचें रक्षण करण्यासंबंधाची तिला

लागलेली काळजी—युद्धाचा धोका—पहिल्या दर्जाच्या राष्ट्राशीं युद्धाचा प्रसंग आला तर काय होईल ?—हिंदुस्थानाला सोनें घेण्याचा प्रतिबंध कसा होतो— लंडनच्या सोन्याच्या ठेवी वाढविण्यासंबंधीं तेथील चेंबर ऑफ कॉमर्सच्या शिफारशी—जगांतील सोन्याची पैदास—दुसऱ्या राष्ट्रांतलि सोन्याच्या ठेवी—हिंदुस्थानावर आपण काढलेल्या हुंडया विकण्याची अतःपर स्टेट सेक्रेटरीला अवश्यकता राहिली नाहीं—सोन्याला हिंदुस्थानांत येण्यास उत्तेजन दिलें पाहिजे—या धोरणापासून हिंदुस्थानास होणारे फायदे—ग्रेट-ब्रिटनला होणारे फायदे—अन्य फायदे.

## भाग ९ आजवर झालेली प्रगति

कराची चेंबर ऑफ कॉमर्सनें केलेली तजवीज—मुंबई, रंगून, कानपूर, दिल्ली, टयुटिकोरीन यांनीं या कामांत दिलेलें सहाय्य—मद्रास व कलकत्ता तटस्थ—या बाबीचा विचार अजून होत आहे—एकंदर स्थितीचा गोषवारा—कराची चेंबर ऑफ कॉमर्सच्या चेअरमननें १९१२ च्या मार्चांत केलेल्या भाषणांतील उतारा.

## भाग १० ब्रिटनच्या मजबुतीचा पाया.

नीतीचे प्रश्न बाजूस ठेवून—हिंदुस्थानांत सोन्याचा प्रवाह येण्याचें दिनावधीवर टाकण्याचें इंडिया ऑफिसचें धोरण अयोग्य व निरर्थक आहे, कारण शेवटीं सोन्याच्या मोठमोठ्या रकमा हिंदुस्थानांत आल्यावांचून रहाणार नाहींत.—शिवाय हिंदुस्थानांत सोनें येऊं न देण्याच्या धोरणामुळें इंग्लंडांत किंमती आणखी जास्त चढूं पहात आहेत आणि यामुळें संप, मजूर लोकांची आणीबाणीची वेळ व अर्थशास्त्रदृष्टया होणारे मोठे तोटे यांना उत्तेजन मिळत आहे.—उत्तम मार्ग म्हटला म्हणजे हिंदुस्थानांत सोन्याचा प्रवाह येण्यास उत्तेजन देणें—यामुळें लंडनमधले कटमितीचे दर जर चढूं लागले तर दुसऱ्या ठिकाणचे दर याही पेक्षां चढतील—पण सुरक्षितता, खात्री व नेकी यांचा फायदा इंग्लंडला नेहमीं राहील; इंग्लडंची जी आज श्रेष्ठ पत आहे त्याचीं कारणें सोन्याच्या ठेवींपेक्षां या गोष्टीच आहेत—कसेंही झालें तरी सोनेरी किनोरीच्या हामी किंमतींत आणखी जास्त उतरल्या पाहिजेत—हें नुकसान भरून येण्यासारखें आहे— येणारा प्रलय—तो कसा टाळतां येईल.

# इंग्लंडला पडलेला पेंच.

# उपोद्घात.

जगांतील सोन्याची पैदास दिवसेंदिवस अधिक होत आहे. आणि त्या मानानें सोन्याची किंमत कमी होऊन मालाच्या किंमती वाढत आहेत ह्या वाढत्या महागाईमुळें मजुरांच्या संपाचा सुकाळ झाला आहे. सोन्याची पैदास कमी करावी तर तें शक्य नाहीं, आणि देशांत अधिक झालेल्या सोन्याचा खप करावा ह्मटलें तर व्याजाचा दर वाढून आणि सरकारी नोटींचे भाव उतरत जाऊन हजारों लोकांचे नुकसान होणार; अशा ह्या दुहेरी पेंचांत इंग्लंड सांपडलें आहे. त्यांतून त्यानें पार कसें पडावें ह्या प्रश्नाचा ह्या पुस्तकांत प्रमुखत्वेंकरून विचार केला आहे. ह्या प्रश्नाचा हिंदुस्थानांतील लोकांशीं वास्तविक प्रत्यक्ष संबंध कांहींच नाहीं. तथापि, इंग्लंडनें ह्या पेंचांतून कसें सुटावें असा विचार पडून लंडनमधील प्रमुख व्यापाऱ्यांनीं व पेढीवाल्यांनीं जें धोरण ठरविलें, तें हिंदुस्थानच्या दुर्दैवानें हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीस पटलें आणि त्यानें आपला सर्व व्यवहार त्या धोरणास अनुसरून चालविला. हें धोरण ह्मणजे अर्थात् हिंदुस्थानांत होतां होईल तों सोनें येऊं द्यावयाचें नाहीं, आणि हिंदुस्थानांतील गंगाजळी ठेव, चलनी नोटांची ठेव, व इतर चालू नगदी शिलका विलायतेंत नेऊन तेथल्या व्यापाऱ्यांस त्यांचा हलक्या व्याजाच्या दरानें वापरूं द्यावयाच्या हें होय. ह्या धोरणाचा स्वाभाविकपणेंच हिंदुस्थानावर अनिष्ट परिणाम झाला. फौलर कमिटीनें सोन्याचें नाणें पाडण्याविषयीं केलेली शिफारस तशीच राहिली; विलायतेंत स्टेट सेक्रेटरीकडे जो कोणी सोनें आणून देईल त्यास हिंदुस्थानांत चांदीचे रुपये पाडून द्यावयाचा सपाटा सुरू झाल्यामुळें येथें चांदीच्या कृत्रिम किंमतीच्या नाण्यांची बेसुमार वाढ झाली,

आणि ह्या वाढीमुळें, आधींच इतर कारणांनीं वाढत चाललेल्या महागाईंत भर पडली. मालाच्या किमती वाढल्यानें प्रारंभीं कांहीं दिवस व्यापार वाढत जातो, त्याप्रमाणें तो वाढला; परंतु चांदीच्या नाण्याच्या वाढीमुळें देशांत महागाई झाली तरी ब्यांकांतून रोकड शिलका जरूरीपुरत्या जेमतेमच असल्यानें व्याजाचा दर कांहीं उतरेना. हिंदी व्यापाऱ्यांस पैशाची अशी चणचण भासत असून विलायतेंतील व्यापाऱ्यांस मात्र हिंदी लोकांच्या येथून नेलेल्या ठेवींतील व नगदी शिलकांतील रुपये दोन अडीच टक्के व्याजानें वापरावयास मिळतात,हें पाहून येथील व्यापाऱ्यांचें पित्त खवळलें;आणि कराचीच्या युरोपियन व्यापारमंडळाचे अध्यक्ष मि. वेब ह्यांनीं प्रथमतः मुंबईच्या टाइम्स पत्रांत ह्या विषयाची चर्चा सुरू केली. त्यानंतर लवकरच लंडनच्या टाइम्स पत्रांतूनही तीच गर्जना सुरू झाली आणि पार्लमेंटांत स्टेट सेक्रेटरीवर प्रश्नांचा वर्षाव होऊं लागला. तेव्हां अखेरीस ह्या प्रश्नाची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमण्याचें प्रधानमंडळानें कबूल केलें. हल्लींच्या फायनॅन्स कमिशनची अशी ही पूर्वपरंपरा आहे आणि तिचें बरेंच श्रेय ना. वेब ह्यांच्या लेखांनाच आहे. ह्या फायनॅन्स कमिशनच्या बैठकी सध्यां चालू असून त्याचे अध्यक्ष प्रसिद्ध मुत्सद्दी आस्टिन चेंबर्लेन हे आहेत. ह्या कमिशनपुढें आजपर्यंत ज्या प्रख्यात तज्ज्ञांच्या साक्षी झाल्या त्यांत ना. वेब ह्यांची साक्ष होऊन त्यांचें सबंध मुद्देसूद टांचणच पुराव्यांत दाखल केलें आहे. अतःपर हिंदी चलन कोणत्या धोरणावर असावें ह्मणजे ब्रिटिश साम्राज्याचें व त्याबरोबर गरीब बिचाऱ्या हिंदुस्थानाचें कल्याण झाल्याशिवाय राहणार नाहीं, यासंबंधीं ह्या टांचणांत सुचविलेले उपाय व विचार खरोखरीच मनन करण्याजोगे व अमलांत आणण्याजोगे आहेत.

ह्याचकरितां सध्यांच्या प्रसंगीं त्यांच्या विचारसरणीची पूर्ण माहिती होण्याला आणि इंडिया ऑफिसचे अधिकारी लंडनमधील पेढीवाल्यांच्या कच्छपीं लागल्यानें बिचाऱ्या हिंदुस्थानचें कसें नुकसान होत आहे तें समजण्याला, अवश्यक ह्मणून त्यांच्याच ‘ ब्रिटन्स डायलेमा ’ ( इंग्लंडला पडलेला पेंच ) ह्या पुस्तकाचें भाषांतर प्रसिद्ध करण्याचें मनांत आणिलें. ना. वेब ह्यांस त्यासंबंधीं परवानगी विचारतां त्यांनीं ती मोठ्या खुषीनें दिली त्याबद्दल भाषांतरकर्ता त्यांचा अत्यंत आभारी आहे.

पुस्तकांतील विषय अर्थशास्त्रसंबंधीं असून ह्या शास्त्रांतील परिभाषा अद्यापि निश्चित झालेली नाहीं. ह्या कारणास्तव कित्येक ठिकाणीं कन्सोल्स (Consols) वगैरेसारखे शब्द तसेच ठेवणें भाग पडलें. Gilt-edged securities सारख्या कांहीं शब्दांचें मराठींत रूपांतर ("सोनेरी किनारीचीं जामीनपत्रें")असें करण्याचा प्रयत्न केला आहे. हे शब्द परिचयाचे होईपर्यंत चमत्कारिक वाटतात खरे; परंतु असल्या कांहीं तरी नवीन शब्दांची भर भाषेंत घातलीच पाहिजे, त्याशिवाय भाषा अडून राहून तिची वाढ होणार नाही. आतां प्रस्तुत पुस्तकांत योजलेल्या शब्दाऐवजीं दुसरे समर्पक व नीटस शब्द ठरवितां येणार नाहींत असें नाहीं. परंतु तसे शब्द जोंपर्यंत कोणीं प्रचारात आणिले नाहींत तापर्यंत सुचलेल्या शब्दांवरच काम भागविणें जरूर पडलें.

ना. वेच ह्यानीं आपल्या पुस्तकाला आठ पुरवण्या जोडिल्या आहेत. त्या पुरवण्यांत त्यांनीं पुस्तकांतील विषयांपैकीं कांहीं प्रश्नांवर वेळोवेळीं लिहिलेले लेख आहेत, कांहीं कमिशनचे रिपोर्ट आहेत आणि हिंदुस्थानांतील नाण्याचा कायदा सुधारण्याविषयीं त्यांनीं योजलेल्या बिलाचा एक मसुदाही आहे. परंतु ह्या सर्व पुरवण्यांची प्रस्तुतचा विषय समजण्याला तितकी जरूरी नाहीं, व कांहींत तर पुस्तकांतील विचारसरणीची द्विरुक्तिच असल्यानें त्यांतल्या महत्वाच्या दोनच पुरवण्यांचें तेवढें भाषांतर केलें आहे. तिसरी पुरवणी मूळ पुस्तकांतली नसून, तें पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर ता. ३० जून १९१३ रोजीं हिंदी ठेवींपैकीं किती रकमा विलायतेंत नेलेल्या आहेत त्यांची माहिती पार्लमेंटला सादर करण्यांत आली तिजवरून घेतली आहे इंडिया ऑफिसच्या कामाचा इतका बभ्रा झाला आणि त्याची चौकशी करण्याकरितां कमिशनदेखील नेमिलें; तथापि पूर्वीची पद्धति तशीच चालू असल्याचे त्या पुरवणीवरून सिद्ध होतें.

असो. सध्यां हा महत्वाचा विषय वादाकरितां पुढें आला असून त्याची कमिशनमार्फत चौकशी चालू असल्यामुळें हिंदी लोकांची बाजू सर्वांस समजणें इष्ट आहे; परंतु आपली बाजू पुढें मांडण्याला ना. वेचसारखे तज्ज्ञ मिळाल्यानें स्वतःच्या भाषेंत कोणतेंही मत न देतां त्यांचीच विचारसरणी लोकांपुढें मांडल्यास तो जास्त निरुत्तर पुरावा मानला जाईल असें वाटल्यावरून हा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या वाचनानें हिंदी चलनी नाण्याचा

घोंटाळा आणि इंग्लंडला पडलेला पेंच ह्या दोन्ही विषयांची माहिती होईल. ज्यांना ब्रिटनच्या पेंचाशीं कांहीं कर्तव्य नसून केवळ हिंदुस्थानची सांप्रतची चलनीपद्धति किती द्राविडी प्राणायामाची आहे, आणि हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें पाडण्याची अवश्यकता किती आहे, व इंडिया ऑफिसच्या कारभारामुळें हिंदी व्यापाऱ्यांचें कसें नुकसान होत आहे, एवढेंच समजून घ्यावयाचें असेल, त्यांनीं पहिला व चवथा खंड गाळून नुसता दुसरा व तिसरा खंड वाचला तरी काम भागेल.

असो. ह्या पुस्तकाचे वाचनानें प्रस्तुतच्या महत्वाच्या प्रश्नाचें साधारण स्वरूप जरी वाचकांस कळलें, आणि त्या विषयाची साग्र माहिती करून घेण्याची जिज्ञासा त्यांचे मनांत उद्भवली तरी हा केलेला प्रयत्न निष्फळ झाला नाहीं असें समजून भाषान्तरकार तेवढ्यांतच समाधान मानून घेण्यास तयार आहे. अखेरीस ज्या जगन्नियंत्याच्या कृपेनें हा प्रयत्न तडीस गेला त्याचे अंतःकरण पूर्वक आभार मानून हा उपोद्घात पुरा करितों.

श्रावण शु० ५,<br>शक १८३५.

भाषान्तरकार.

# चलनी नाण्याचा वाद.

## खंड पहिला.

### ग्रेटब्रिटनमधली तारंबळ.

## भाग १.

### पेंच.

हल्लीं, ब्रिटिश राज्याच्या इतिहासांत आजपर्यंत कधींही उत्पन्न न झालेल्या एक प्रकारच्या पेंचांत ब्रिटन देशाचा व्यापार आणि कडणिशी खातें येऊन पडलीं आहेत. इकडे पहावें तर मजूर-वर्गाच्या त्रासानें देशांतले उद्योगधंदे—व म्हणून एकंदर प्रगति—कुंठित झाले आहेत. आणि ही स्थिति देशांत सोन्याचा पूर झाला म्हणजे यावयाचीच. कारण सोन्याची चंगळ झाली म्हणजे मालाच्या किंमती चढावयाच्या आणि त्याबरोबर देशभर मजुरांचा खास रोज-मुरा मोलांत कमी व्हावयाचा; आणि दुसरीकडे लंडन येथील ज्या थोडक्याशा राखून ठेविलेल्या सोन्याच्या सांऊयाच्या कांट्याच्या नाजूक तोलावर आज ग्रेटब्रिटनच्या प्रचंड व्यापाराची पत अवलंबून आहे त्यांतून आम्हांला सोनें मिळावें अशी हिंदुस्थानची आणि पूर्वेकडील इतर देशांची स्वाभाविक मागणी उत्पन्न झाली आहे, आणि या

मागणीमुळें कटमितीच्या व्याजाचे दर फार वाढून देशांतला व्यापार आणि फडणिशी खातें प्रत्येक दिवशीं धोक्यांत येऊन पडत आहेत.

प्रथमदर्शनीं हिंदुस्थानच्या राज्याची भरभराट, आणि सोन्याच्या नाण्यांची त्याची मागणी, ह्या गोष्टी ग्रेटब्रिटनमध्यें आणि सर्व जगभर अभिनंदन करण्याजोग्या आहेत असें वाटेल. कारण, ही भरभराट म्हणजे विपुल हंगाम, विक्रीसाठीं आणि देशांतरास पाठविण्यासाठीं उत्पन्न होणाऱ्या मालाच्या राशी, लोहमार्गानें आणि आगबोटींनें होणारा विस्तीर्ण व्यापार, आणि व्यापारी, उदीम आगबोटींचे मालक, सावकार वगैरे सर्वांना मिळणारा किफायतशीर आणि वाढता धंदा. परंतु थोडासा आणखी विचार केला म्हणजे असें आढळून येईल कीं, जगांत लंडन हें जरी सोन्याची मुख्य पेठ होऊन बसलें आहे तरी हिंदुस्थानच्या मागणीमुळें—आणि ही मागणी वर्षाच्या बऱ्याच भागांत आठवड्याची पांच लाख पौंडांवर सहज जाण्याचा संभव आहे—तेथील सोन्याच्या सांठ्याची समतः बहुशः ढांसळलीच पाहिजे; आणि प्रचलित कटमितीच्या व्याजाचे दर वाढून पैसा आणि पत ह्यांच्या रोजच्या देवघेवीच्या व्यापारावर ह्या गोष्टींचा परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. लंडनचा सोन्याचा सांठा अशा तऱ्हेनें रिकामा होऊं नये म्हणून इंग्लंडच्या बँकेला दुसऱ्या मोठमोठ्या सोन्याच्या ठिकाणांहून सोनें आपल्या देशांकडे वळविण्यासाठीं सरकारी कटमितीच्या व्याजाचा दर वाढविणें अवश्य होईल. परंतु व्याजाचा दर वाढविल्यानें लंडन शहरांत दुसऱ्या चढाओढ करणाऱ्या ठिकाणांपेक्षां पैसा अधिक महाग होईल. ( आणि तसें झालें म्हणजे लंडन शहरांतले व्यापारधंदे

दुसरीकडे घालविले जावयाचेच ) एवढ्यानेंच थांबणार नाहीं तर व्यापारी लोकसंख्येच्या शेंकडा ९९ लोक जे आज उसनवार पुंजीवर व्यापार करीत आहेत त्या सर्वांना उसन्या पुंजीवर व्याज अधिक द्यावें लागेल. म्हणजे त्यांची प्राप्ति कमी होईल; अगर त्यांनीं जर मालाच्या ठराविक किंमती वाढविल्या, तर नव्या नव्या धंद्याकरितां जगाशीं जी चढाओढ चालली आहे त्या चढाओढींत आपल्याला अडचणींत पाडून घेतल्याप्रमाणें होईल. शिवाय, लंडनहून जें सोनें हिंदुस्थानांत येतें तें परत लंडनांत क्वचितच जातें, अथवा मुळींच जात नाहीं. आतांपर्यंतचा तरी निदान लंडनचा असा अनुभव आहे. तेव्हां अधिक सोन्यासंबंधाच्या हिंदुस्थानच्या वाढत्या मागणीचा प्रतिबंध करण्याचीं कांहीं साधनें असलीं पाहिजेत असें दिसतें.

आणि इतकें असूनही जगांतील सोन्याच्या खाणींचें दरसालचें उत्पन्न हल्लींइतक्या अतर्क्य प्रमाणावर येऊन पोहोंचलें आहे कीं, त्या धातूची किंमत म्हणजे विकत घेण्याची तिची शक्ति एकसारखी कमी कमी होत चालली आहे. मालाच्या किंमती सर्वत्र वाढत आहेत; आणि खाणींत जसजसा स्क्रू अधिक खोल जाईल तसतशी ज्यांची अल्प कमाई केवळ प्राण वांचविण्यापुरतीच असते ( म्हणजे सरासरी एकचतुर्थांश राष्ट्र ) त्यांची स्थिति दिवसेंदिवस अधिक अडचणीची व्हावयाची हें उघड आहे. अशा स्थितींत असंतुष्ट लोकांच्या प्रचंड समुदायांत राष्ट्रीय हाहाःकार उडण्यासाठीं एखादी ठिणगी पुरेशी होईल यांत नवल काय ? आणि जरी हा वणवा तात्पुरता विझवितां आला तरी रोजमुऱ्यापेक्षां जास्त वेगानें जोंपर्यंत मालाच्या किंमती वाढत जातील—आणि पैशाची किंमत एकसारखी कमी झाली म्हणजे हें प्रमाण अपरिहार्य आहे असा अनुभव आहे—

तोंपर्यंत ठराविक रोजमुरा मिळविणारे लाखों लोक आपली स्थिति सुधारतील आणि समाधानानें व सुबत्तेंत रहातील हा संभव फार कमी. नुकताच जो कोळशाच्या खाणींतल्या मजुरांनीं संप केला होता त्याप्रीत्यर्थ एक कोटि पौंड ( स्टर्लिंग ) खर्च झाले. मालाच्या किंमती याहीपेक्षां वाढत गेल्या तर अशाच प्रकारच्या अनेक अड-चणींचा हा नुसता आरंभ आहे. उद्योगाच्या दुसऱ्या बाबतींत थोडक्याच काळांत संप झाल्याशिवाय खचित रहाणार नाहींत. अशा प्रकारच्या संपांना प्राधान्येंकरून प्रोत्साहन देणारी स्थिति– म्हणजे हल्लींच सोन्याचें विलक्षण उत्पन्न–हिच्यावर जर दाब बस-णार नाहीं, किंवा ही जर निर्बल केली नाहीं, तर ते संप आणि त्यांच्यापासून होणारे तोटे व दैन्यावस्था हीं देशांत कायम होऊन बसतील व अंगीं धीरें धीरें तीं जडून जातील.

सोन्याच्या पडत्या किंमतीस जर कांहीं आळा पडावयाचा असेल–म्हणजे मालाच्या सर्वसाधारण किंमती ज्या आज वाढत आहेत त्या कमी होण्याकरितां, आणि वाढत्या किंमतीपासून उत्पन्न होणारी मजुरांची असंतुष्टता, संप, आणि असंख्य व्यापारी हितसंबं-धांचे पैशाच्या दृष्टीनें होणारे तोटे, हें बंद होण्यासाठीं जर उघड उपाय योजावयाचा असेल तर शक्य तितक्या उपायांनीं ह्या मौल्यवान् धातूचा जास्त उपयोग होऊन ती जास्त खर्च झाली पाहिजे. सुदै-वानें, हिंदुस्थानच्या राज्याची विपुल भरभराट आणि विकत घेण्याची त्याची प्रतिवर्षीं वाढणारी शक्ति हिच्यायोगें हा उपाय तेव्हांच अमलांत येणार आहे. तर मग हिंदुस्थानाला जितक्या सोन्याची अवश्यकता आहे तितकें त्याला दिलें पाहिजे.

परंतु ह्या कामांत लंडन शहराची पंचाईत फिरून येतेच. जर हिंदुस्थानानें क्रोडोपौंड सोनें लंडनाहून आपणाकडे खेंचण्यास आरंभ केला तर ह्या पिंवळ्या धातूचा लहानसा सांठा जो आज ग्रेटब्रिटनमध्यें आहे त्याचें रक्षण करण्यासाठीं व तो कायम ठेवण्यासाठीं कटामितीच्या व्याजाचे दर वाढविले पाहिजेत. आणि असें झालें म्हणजे इंग्लंडच्या व्यापाऱ्यांचें व सावकारांचें नुकसान आणि अडचण होणार. उलटपक्षीं, हिंदुस्थानांतल्या नगद शिलके-पैकीं कांहीं भाग लंडनास आणून किंवा हिंदुस्थानच्या लोकांना गिन्यांच्या ऐवजीं रुपये देऊन त्या देशाची सोन्याची मागणी जर कमी केली, आणि तिला उत्तेजन दिलें नाहीं, तर खाणींतून प्रतिवर्षीं येणाऱ्या सोन्याच्या वाढत्या पुरानें मालाच्या किंमती आणखी खास वाढणार आणि यायोगें सट्ट्याचे व्यवहार वाढून पैशाची स्थिति मोठ्या संकटांत येऊन पडण्यापर्यंत पाळी येण्याचा संभव आहे; आणि ठराविक रोजमुरा मिळविणाऱ्या लाखों लोकांची रोजमुरा वाढण्या-संबंधाची एकजुटीनें केलेली ओरड जास्त झाल्याशिवाय खचित रहाणार नाहीं. परिणामीं मजूरलोकांची आणीबाणीची वेळ यावयाची, संप वाढावयाचे, आणि भांडवलवाल्यांचे, मजुरांचे, व त्याबरोबर सर्व राष्ट्राचें, जबरदस्त नुकसान व्हावयाचें.

या दोन गोष्टींतून कोणती अधिक श्रेयस्कर आहे ? हा पेंच असा आहे कीं, त्यांतून सुटका नसून धीरानें त्याला तोंड दिलेंच पाहिजे. आणि हें जितक्या लवकरच होईल तितकें बरें. जगांतील एकंदर सोन्याच्या उत्पन्नासंबंधानें आणि ह्या धातूच्या हिंदुस्थानच्या मागणी-संबंधानें हल्लींच्या हडेलहाप्पीच्या धोरणाचे अपरिहार्य परिणाम आधींच हिंदुस्थानांत व इंग्लंडांत दृष्टोत्पत्तीस येत आहेत; आणि हे

परिणाम आतांपर्यंत अत्यंत शोचनीय झाले आहेत याबद्दल या विषयाकडे काळजीपूर्वक लक्ष देणारांपैकीं कोणालाही संशय रहाणार नाहीं. ही स्थिति सुधारण्याचा प्रयत्न केला नाहीं तर आणखी वाईट परिणाम घडून येतील.

म्हणून ह्या स्थितीचें जरा जास्त सविस्तर रीतीनें निरीक्षण केल्यास बरें.

---

# भाग २.

## अडचणींतून बाहेर पडण्याचा चुकीचा मार्ग.

आपल्या देशांतले लाखों मजूरलोक कोणत्या अडचणी सोशीत आहेत, ही गोष्ट ब्रिटिश इतिहासांतल्या कोणत्याही काळांत राष्ट्रीय-मनोदेवता हल्लीं आहे त्यापेक्षां जास्त तीव्रतेनें जाणून नव्हती, किंवा सुधारणेचे व्यावहारिक उपाय योजून ह्या अडचणी अधिक कळकळीनें हलक्या करण्याच्या फिकिरींत नव्हती. तथापि जो कोणी ब्रिटिश उद्योगधंद्यांच्या मोठमोठ्या खाणींचीं व कारखान्यांचीं ठिकाणें पाहील किंवा अत्यंत विस्तृत व प्रख्यात शहरांतील गोरगरीबांच्या रहाण्याच्या जागांचें निरीक्षण करील त्याला, सुधारणेला अजून किती वाव आहे याचा संशय रहाणार नाहीं. आतां आपली सामाजिक, औद्योगिक व राजकीय स्थिति सुधारण्यासाटीं पुष्कळ माणसें समर्थ व तत्पर असतात ही गोष्ट खरी आहे; तथापि त्याबरोबरच आपल्या राष्ट्रीय जीवितांत असा एक भाग आहे—हा भाग

बाकीच्या सर्वांपेक्षां बहुतकरून अधिक महत्वाचा असतो—कीं त्याच्याकडे आपल्या देशांतील बहुतेक लोक फारच थोडें लक्ष देतात किंवा त्याच्याकडे अगदींच दुर्लक्ष करतात. आणि अशी स्थिति असूनही ह्या भागांत सध्यांच्या प्रसंगीं असा कांहीं फेरबदल होत चालला आहे कीं, त्यायोगें बाकीच्या बाजूंनीं जी चांगली सुधारणा होत आहे ती बिघडण्याचा संभव आहे. हा भाग म्हणजे राष्ट्राच्या पैशाचें विकत घेण्याचें व किंमती मोजण्याचें काम. या मोठ्या विकत घेणाऱ्या व किंमती मोजणाऱ्या यंत्राची, आणि त्याबरोबर आज उसनवार घेतलेला पैसा कालांतरानें किती प्रमाणानें परत करावयाचा त्या प्रमाणाची स्थिरता होतां होईल तों कायम ठेवणें, ही गोष्ट किती महत्वाची आहे हें स्पष्टपणें समजण्यासाठीं एक गोष्ट लक्षांत घेणें अवश्य आहे. ती ही कीं, वस्तुतः आपला रोजचा प्रत्येक व्यवहार—म्हणजे खानगी, सार्वजनिक, स्वतःचा, मंडळीं-तला, राष्ट्रीय किंवा राज्यसंबंधीं—प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष—पैशाच्या मदतीनें चालला आहे; आणि त्याबरोबर हेंही ध्यानीं आणलें पाहिजे कीं, पैशाच्या किंमतींत ( म्हणजे विकत घेण्याच्या त्याच्या सामर्थ्यांत ) यत्किंचित् फेरबदल झाला तर त्याचा परिणाम कमी अधिक उग्रतेनें राज्यांतील प्रत्येक व्यक्तीवर झालाच पाहिजे. आज जर एकदम अरेरावी हुकुमानें पॉइंट माप प्रचलित असलेल्या प्रमाणाच्या तीनचतुर्थांशाइतकें केलें, किंवा यार्डाचें प्रमाण ४६, ५६, अगर ६६ इंचपर्यंत वाढविलें तर लोकांवर एक वेळ कमी अन्याय होतील आणि ते इतके उग्रही होणार नाहींत; परंतु एका पौंडाची विकत घेण्याची शक्ति जी आज २० शिलिंग आहे ती जर समजा कीं, फक्त १५ शिलिंगांपर्यंत आणली तर लोकांवर अन्याय अधिक होऊन ते त्यांना अधिक

जाचतील. इतकें असूनही वस्तुस्थिति अशी आहे कीं, थोडे वर्षांपूर्वी १५ शिलिंगांची जेवढी किंमत होती तेवढीच फक्त आज एका पौंडाची येते. आपल्या नगद पौंडाची विकत घेण्याची शक्ति गेल्या १५ वर्षांत वास्तविक चौथाईनें कमी झाली आहे. शिवाय ही कमतरता अशीच पुढें चालेल हें मानण्यास सबळ कारणें आहेत. अत्यंत जहाल सोशिआलिस्ट वर्गानें आजपर्यंत मनांतही न आणलेली क्रांति घडवून आणणाऱ्या चळवळीचा, आपल्या पैशाच्या मापांत जी आज विद्रूपता येत आहे त्या घडामोडींनें नुसता आरंभ झाला आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. खरोखर ही चळवळ सहज ध्यानांत येण्यासारख्या त्वरेनें फैलावेल तर सांचलेल्या द्रव्याचे पुष्कळ प्रकार अवश्य नाहींसे होतील, आणि ते इतक्या पूर्ण तऱ्हेनें कीं या संबंधाचा कितीही जबर कायदा केला तरी त्याच्यानें तसें होणें नाहीं. अशा प्रकारें पैशाच्या किंमती कमी झाल्या म्हणजे त्याबरोबर हेंही सांगितलें पाहिजे कीं, गोरगरीबांच्या श्रमाचा मोबदलाही त्यांच्या हातीं टिकावयाचा नाहीं. कारण अशा परिस्थितींत नेहमीं किंमती आधीं रोजमुऱ्याच्या वाढतात. आणि एकीकडे आपली प्राप्ति वाढून बाहेरून दिसणारी सुस्थिति, तर दुसरीकडे त्या प्राप्तीपेक्षांही खर्च जास्त जलद वाढून त्या सुस्थितीची निघणारी कसर, या दुष्ट फसगतीस आपण बळी पडत आहोंत असें मजूरवर्गाला वाटणार. एका बाजूनें जें मिळविलें तें दुसऱ्या बाजूनें नाहींसें होणार. आणि याचा परिणाम असा होणार कीं, लाखों मजुरांना मदत करून त्यांची स्थिति सुधारण्याचा प्रत्येक बाजूनें प्रयत्न होत असतांही, आपण आज त्यांना जसें दारिद्र्यावस्थेंत, अवनत स्थितींत आणि माग-

सलेले पहात आहोंत तसेच ते निरुपायानें रहाणार, कारण त्यांना ऐपत नसणार.

परंतु कोणी असा प्रश्न करील कीं, आपलें गोंडस ब्रिटिश पौंडाचें नाणें किंमतींत कमी कां झालें आहे ? आणि तें आणखी कमी होईल अशी भीति बाळगण्याचीं तरी कोणतीं कारणें घडून येत आहेत? याचें उत्तर सोपें आहे. या जगांतील प्रत्येक वस्तूप्रमाणें सोन्यालाही पुरवठा आणि खप यांचे नियम—निराळ्या रीतींनें व निराळ्या अंशानें का होईना—पण लागावयाचेच; म्हणजे सोन्याचा खप वाढला तर बाकीच्या गोष्टी बरोबर असल्यास त्याची किंमत वाढली पाहिजे, आणि पुरवठा वाढल्यास त्याची किंमत कमी झाली पाहिजे. गेल्या अर्ध शतकांत वस्तुतः जगांतील प्रत्येक मोठ्या राष्ट्रानें आपलें मुख्य चलनी नाणें रुप्याचें होतें त्याऐवजीं अधिक मौल्यवान् पिंवळ्या धातूचें केलें, व यामुळें सोन्याचा खप फार वाढला आहे. उलटपक्षीं, इंग्लंडांत आणि दुसऱ्या कित्येक पाश्चिमात्य देशांत, सावकारी पेढ्या, चेक, हुंड्या आणि पतीच्या सर्व तऱ्हेच्या सवलती, यांची एकसारखी वाढ होत गेल्यानें सोन्याच्या उपयोगांत फार मोठी काटकसर करण्यांत आली आहे. सध्यांच्या काळांत, सोन्याचें नाणें पाडून घेण्याकरितां टांकसाळी खुल्या असल्यानें खाणींतून निघणाऱ्या नव्या सोन्याच्या प्रत्येक औंसाची किंमत आधींच उपयोगांत असलेल्या सोन्याच्या नाण्यांच्या विकत घेण्याच्या शक्तीवरून ठरत असते. त्याचबरोबर हेंही ध्यानांत घेतलें पाहिजे कीं, मनुष्यमात्राच्या जवळच्या प्रत्यक्ष उपयोगांत असलेल्या, नाणें पाडलेल्या व बिननाण्याच्या सोन्याच्या रकमेशीं आज चलनी असलेल्या सोन्याच्या पैशांच्या विकत घेण्याच्या शक्तीचा स्पष्ट संबंध आहे. ( हा संबंध गाणितशास्त्रानें तंतोतंत ठरविणें

कठिण आहे हें खरें आहे.) ही रक्कम नेमकी किती आहे हें कोणालाही निश्चयानें सांगतां येणार नाहीं, किंवा सध्यां आपल्याला ह्या रकमेचा अंदाज करण्याची जरूरीही नाहीं. इतकें सांगितलें म्हणजे पुरें आहे कीं, गेल्या थोड्या वर्षांमध्यें जगांतल्या खाणींतल्या नव्या सोन्याच्या पैदाशींनें सर्वांला अगदीं दिपवून टाकलें आहे. शिवाय, ही पैदास वाढण्याचा प्रत्येक बाजूनें संभव आहे. अशा प्रकारें मोठमोठ्या सुधारलेल्या व्यापारी व अधिकाराच्या राज्यांतून या मौल्यवान् धातूचा अद्वितीय पूर वहात असतांना तिचा चोहोंकडे जास्त खप होत असूनही, तिची किंमत सर्व जगभर एकसारखी कमी होत आहे व तिची विकत घेण्याची शक्ति आटून राहिली आहे, किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे सोन्यानें मोजावयाच्या सर्वसाधारण किंमती सर्वत्र वाढत आहेत याचें कोणालाही आश्चर्य वाटणार नाहीं.

हीच स्थिति आणि बरोबर हेच परिणाम यापूर्वीं घडून आले आहेत. सोळाव्या शतकाच्या मधल्या काळांत दक्षिण अमेरिकेंत व मेक्सिकोंत रुप्याच्या विलक्षण मोठ्या खाणी शोधून काढल्या. ही बहुमोल धातु अटलांटिक महासागराच्या पलीकडे पाठविली जाऊन धीरें धीरें ती यूरोपखंडाच्या चलनी नाण्यांत येऊन मिळाली, आणि परिणाम असा झाला कीं, पैशाची विकत घेण्याची शक्ति मनस्वी कमी झाली. सन १७९८ सालांत रॉयल सोसायटीसाठीं लिहिलेल्या निबंधांत सर जॉर्ज एव्हिलिन यांनीं असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला कीं, सन १५५० पासून सन १७९५ पर्यंत किंमतींची मर्यादा शेंकडा ४०० पासून ५०० पर्यंत वाढली. त्यांनीं काढलेल्या सिद्धांतांवर जरी हॅलॅम आदिकरून लोकांनीं जबर टीका केली आहे तरी या काळांत किंमती निदान दुपटीनें तरी वाढल्या

( दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे आपलें नाण्याचें मोल निदान अर्ध्यानें कमी झालें ) यांत तिळमात्र संशय नाहीं. यांतील बरीच वाढ पोटोसाय येथील खाणींचा शोध लागल्यापासून शंभर वर्षांच्या आंतच झाली.

गेल्या शतकाच्या पहिल्या अर्ध्यांत—म्हणजे जेव्हां जगांतील खाणींतून सोन्यारुप्याच्या बऱ्याच कमी झालेल्या पैदाशींचे इतके परिणाम झाले कीं, ग्रेटब्रिटननें अव्वल प्रतीच्या चलनी नाण्यांतून रुपेरी नाणें काढून टाकलें—किंमती फार भयंकर कमी झाल्या; मिस्टर सॉरबेकच्या मताप्रमाणें शेंकडा पंचेचाळिसांवर आणि जॉव्हॉन्सच्या मताप्रमाणें शेंकडा जवळ जवळ साठ टक्के कमी झाल्या—यानंतर कॅलिफोर्निया व ऑस्ट्रेलिया येथील सोन्याच्या अद्भुत खाणी शोधून काढल्या, व त्याचे परिणाम ताबडतोब दिसूं लागले. किंमती तेव्हांच पालटून त्यांची वाढ सुरू झाली. या वाढीचीं चिन्हें जवळ जवळ ७५ सालापर्यंत दिसत होतीं. आपल्या पैशाच्या मापाची कमतरता प्रथम प्रथम फार ध्यानांत येण्याजोगी झाली; म्हणजे सन १८४९ आणि १८५७ या दरम्यान पौंडाची किंमत सरासरी २५ टक्क्यांनीं कमी झाली. यानंतर अंशतः किंमत सांवरली खरी; परंतु त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या सोन्याच्या व पैशाच्या किंमतीवर खाणींतून काढलेल्या वाढत्या पैदाशीचे कैक वर्षेंपावेतों विशेष परिणाम झाले यांत संशय नाहीं; म्हणजे त्याची विकत घेण्याची व मापण्याची शक्ति भयंकर कमी होऊन, रोजमुरा, पेन्शन आणि अशाच प्रकारच्या ठराविक मिळकतींवर अवलंबून असलेल्या वर्गांवर त्या मानानें अन्याय झाले.

कॅलिफोर्निया व ऑस्ट्रेलिया येथील खाणींतून आलेली सोन्याची लाट जरी आपल्या बापजाद्यांना चकित करून टाकणारी होती, तरी आजच्या काळांत सुधारलेल्या देशांतून आस्ते आस्ते या मौल्यवान् धातूचा जो मोठा पूर पसरत चालला आहे, त्या मानानें ही लाट वास्तविक कांहींच नव्हे. १९ व्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत सोन्याची वार्षिक पैदास सरासरीनें फक्त ३१५०००० पौंड होती. यानंतर पूर्वी कधींही माहीत नसलेले अत्यंत अद्भुत शोध लागले; नंतरच्या दहा वर्षांची सोन्याची पैदास स्थूलमानानें खालीं लिहिल्याप्रमाणें होती.

| साल. | पौंड. |
|---|---|
| १८५१ | १६६००००० |
| १८५२ | ३६५५०००० |
| १८५३ | ३१०९०००० |
| १८५४ | २५४९०००० |
| १८५५ | २७०१०००० |
| १८५६ | २९५२०००० |
| १८५७ | २६६५०७०० |
| १८५८ | २४९३०००० |
| १८५९ | २४९७०००० |
| १८६० | २३८५०००० |

पुष्कळ लोकांच्या झुंडीच्या झुंडी आपलीं घरेंदारें सोडून सोन्याच्या खाणींकडे धांव घेऊं लागल्या, इतरांनीं पैशाच्या अपरिहार्य दिसणाऱ्या क्रांतीमुळें घोर अनर्थ होऊन सामाजिक घोंटाळा उडेल असें भाकित केलें. याप्रमाणें सर्व जग गडबडून जाऊन वेडें होऊन

गेलें. याचा आपल्यास विस्मय वाटण्याचें कारण नाहीं. असें असतांही, गेल्या दहा वर्षांच्या सोन्याच्या पैदाशीपुढें ही पैदास कांहींच नव्हती. गेल्या दहा वर्षांच्या पैदाशीचे आंकडे खालीलप्रमाणें आहेत.

| साल. | पौंड. |
| --- | --- |
| १९०२ | ६०८६१००० |
| १९०३ | ६६६५०००० |
| १९०४ | ७०६८८००० |
| १९०५ | ७६६७५००० |
| १९०६ | ८२५६१००० |
| १९०७ | ८४१०४००० |
| १९०८ | ११४५०००० |
| १९०९ | १३०००००० |
| १९१० | १६०००००० |
| १९११ | १७०००००० |

म्हणजे जगांतल्या सोन्याच्या सांठ्यांत गेल्या दहा वर्षांत ८० कोटी पौंडांवर नव्या सोन्याची भर पडली. सन १८५१ ते १८६० पर्यंत ही भर २६ कोटी ७० लक्षच होती. याचा शेवट कोठें लागणार व आपली काय स्थिति होणार ?

पैसा आणि किंमत यांच्या मर्यादेमध्यें परस्पर काय संबंध आहे याचा साधकबाधक विचार गेल्या १०० वर्षांत कैक लोकांनीं केला आहे. या विषयावर तज्ज्ञ लोकांनीं अनुभवशीर ज्ञानाचा केवढा सांठा उत्पन्न करून ठेविला आहे हें जाणण्याकरितां त्या

लोकांचीं नांवें नमूद केलीं म्हणजे पुरें आहे. ते लोक म्हणजे जेकब, टूक, न्यूमार्क, केर्न्स, मॅकलाक्, रिकार्डो, चिव्होलियर, बॅगेहॉट, जिव्हान्स, गिफिन; त्यांचेबरोबर, लेक्सिस रॉजर्स, वॉकर, निकल्सन, फॉक्सवेल, मारशॉल, प्राइस, हे विश्वविद्यालयांतील अध्यापक व डॉक्टर सॉटबीर आणि मिस्टर सॉरबेकसारखे सूचिपत्रांचे प्रवीण. १९ व्या शतकाच्या आरंभापर्यंत हा संबंध हल्लींच्या मानानें फार निकट होता, यांत संशय नाहीं. तसा तो आजमितीस हिंदुस्थानांत व पूर्वेकडील इतर भागांत आहे; कारण तेथें धातूचें चलन हें विक्रीचें मुख्य साधन आहे, यापलीकडे तेथील लोकांची प्रगति फार क्वचितच गेली असेल, परंतु पेढ्यांची वाढ झाल्याकारणानें आणि पतीचें जाळें पसरून त्यावर व्यापार चालविण्याच्या हजारों करामतींमुळें—ज्या करामती हल्लींच्या काळांत आपल्या अंगवळणीं पडल्या आहेत,–किंमतींच्या मर्यादा आणि धातूच्या चलनी पैशाची रक्कम यांच्या मधला संबंध बराच दिसेनासा झाला आहे. इतका कीं, हल्लींच्या काळांत या वादांतील मुख्य भाग धातूचें चलन नसून पतच आहे, या कल्पनेचे पुरस्कर्ते कित्येक सांपडतील. अतिपूर्णतेस आलेल्या राज्यांतून विक्रीचें साधन आणि विकत घेतलेली वस्तु यांच्या मधलें नातें ठरविणें अत्यंत कठीण आहे, हें उघड आहे. तरी पण हें नातें आहे यांत संशय नाहीं. हें नातें जुळविणारी सांखळी बॅगेहॉट, गिफिन इत्यादि लोकांनीं सिद्ध केल्याप्रमाणें पेढ्यांमधून राखून ठेविलेल्या रकमेंत सांपडतें. स्टेटिस्ट पत्रानें आपल्या तारीख २१ जानेवारी सन १९११ च्या अंकांत एक कोष्टक प्रसिद्ध केलें होतें. या कोष्टकावरून असें दिसतें कीं, जगांतील प्रमुख पेढ्यांतून व पेढ्यांप्रमाणेंच उपयोग होत असलेल्या

सरकारी तिजोऱ्यांतून राखून ठेविलेली एकंदर सोन्याची रक्कम जी डिसेंबर ३१ सन १९०० रोजीं ५००२६७००० पौंड होती ती डिसेंबर ३१ सन १९१० रोजीं ८८६४४७००० पौंडांपर्यंत वाढली–म्हणजे ही वाढ शेंकडा ७७ वर झाली. ही सोन्याची राखून ठेविलेली वाढलेली रक्कम पतीचा किती मोठा फैलाव झाला आहे हें दाखवितें. म्हणजे किंमतींच्या मर्यादा ठरविणारा मुख्य भाग पत आहे असें मानलें, किंवा प्रत्यक्ष उपयोगांत असलेला धातूचा पैसा मानला, तरी सध्यां किंमतींचा ऊत ( म्हणजे पैशाच्या विकत घेण्याच्या शक्तीचा ऱ्हास ) अपरिहार्य दिसत आहे. वस्तुतः हा किंमतींचा ऊत आजमितीस प्रत्यक्ष येऊन राहिला आहे ही गोष्ट एकॉनमिस्ट व इतर अधिकारी पत्रांनीं नियमानें प्रसिद्ध केलेल्या सूचिपत्रांतल्या आंकड्यांवरून स्पष्ट तऱ्हेनें सिद्ध होत आहे. हल्लीं प्रतिवर्षीं निघणारी सोन्याची पैदास अपूर्व झाली असल्यामुळें, व ही अद्भुत पैदास विशेष कमी होण्याचीं कोणतींही कारणें दिसत नसल्यामुळें, सोन्याच्या किंमतीचा ऱ्हास असाच होत जाणार हें निर्विवाद आहे. फिरून तोच प्रश्न उद्भवतो कीं, किंमती मोजण्याच्या आपल्या सार्वजनिक मापाची किंमत कमी होणें कोठें थांबणार ? व आपली पुढें काय स्थिति होणार ?

आपल्या देशांतल्या भांडवलवाल्यांच्या व मालमत्तावाल्यांच्या धनाची किंमत कमी होऊन ठराविक मजुरी मिळविणाऱ्या वर्गाच्या—आणि हा वर्ग एकंदर लोकसंख्येचा बराच मोठा भाग आहे––सांपत्तिक प्रगतीला व सामाजिक सुधारणेला वाव मिळणार नाहीं. हा प्रसंग विलक्षण कठीण असल्यानें, हल्लीं आपल्याला अजीबाद बुडवूं पहाणाऱ्या, सोन्याच्या पुराचे

परिणाम टाळण्यासाठीं कोणतें धोरण उत्तम याचा विचार केला असतां बरें होईल. तात्त्विकदृष्ट्या दोन मार्ग खुले आहेत— म्हणजे खप वाढवावयाचा किंवा पुरवठा कमी करावयाचा. परंतु व्यावहारिकदृष्ट्या आपल्याला पहिल्याचाच फक्त प्रयत्न करतां येण्यासारखा आहे; कारण जगांतील नव्या सोन्यापैकीं जरी शेंकडा पंचावन्नावर सोनें ब्रिटिश साम्राज्याच्या हद्दींमध्यें सांपडतें तरी, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, ऱ्होडेशिया, हिंदुस्थान, कॅनडा आणि ब्रिटिश अमलाखालचे समुद्रापलीकडचे अन्य मुलूख येथील सोन्याच्या खाणींच्या वाढीला आळा घालणें म्हणजे व्यावहारिक युक्तीबाहेरचें काम आहे; मग सोन्याच्या पुराचे वाटेल ते परिणाम झाले तरी हरकत नाहीं. एकट्या वुइट वॉटरस्टँडच्या अद्भुत प्रदेशांतील मुख्य खडकांतून दोन अब्ज पौंडांवर सोनें आहे हें सिद्ध करून दाखविल्याचें बहुतकरून सर्वांना माहीत नाहीं. ट्रान्स-वालच्या व ऱ्होडेशियाच्या इतर भागांतून आणखी किती सोनें सांपडेल याचा अंदाज एक ईश्वरालाच माहीत. सर्व प्रदेश खनिज द्रव्यानें फार भरलेला आहे. तसेंच ऑस्ट्रेलिया व मध्य एशिया येथील सर्व प्रदेश अजून खोदला गेलाच नाहीं; ( म्हणजे सोन्याच्या खाणी आणखी पुष्कळ सांपडण्याची शक्यता बरीच आहे ). अशा स्थितींत पुरवठा कमी करण्याचें कोणत्याही रीतीनें आपल्या हातांत नसल्यानें काटकसरीच्या दुसऱ्या उपायाचेंच फक्त अवलंबन केल्याशिवाय गत्यं-तर नाहीं—म्हणजे ही मौल्यवान् धातु जास्त उपयोगांत आणून तिचा खप वाढविणें. सुदैवानें या बाजूनें अशी कांहीं शक्कल आपल्याला लढवितां येण्यासारखी आहे कीं, तिच्यायोगें आज आपल्या किंमती मोजण्याच्या सार्वजनिक मापामध्यें जी कमतरता होऊन राहिली

आहे ती सर्व जरी नाहीं तरी कांहीं प्रमाणानें सुधारेल. म्हणजे लोकमताचा पाठिंबा मिळाल्यावर खुद्द सरकारला इंग्लंडमध्यें आणि साम्राज्याच्या इतर भागांतून सोन्याचा पुष्कळ अधिक उपयोग करतां येईल, इतकेंच नाहीं तर जे लोक पैशाची देवघेव करतात व राष्ट्राचा नगदी पैसा घेऊन तो सुरक्षित ठेवितात, त्यांच्या जिम्मेवारीच्या बोजाच्या मानानें हल्लीं जेवढी धातूची हमी देण्याचा प्रघात आहे त्यापेक्षां जास्त धातूची हमी लोकांना देण्यास भाग पाडणारा कायदा सरकारला अंमलांत आणतां येईल. यायोगानें सोन्याचा खप निःसंशय बराच वाढवितां येण्यासारखा असून त्यापासून लोकांचा बराच फायदा होईल.

वर दर्शविलेल्या उपायाची अशी एक समाधानकारक बाजू आहे कीं, तो अगदीं निराळीं कारणें लावून पुष्कळ देशभक्तांनीं व नांवाजलेल्या विचारी लोकांनीं नेटानें सुचविलेल्या उपायाशीं तंतोतंत जुळतो. लढाईच्या कामासाठीं राखून ठेविलेल्या अशा एखाद्या विपुल सोन्याच्या संचयाची राजनीतिदृष्ट्या किती जरूरी आहे या प्रश्नाकडे पृथ्वीवरील सर्व मोठमोठ्या राष्ट्रांत आपण एकटेच जाणूनबुजून कानाडोळा करीत आहों. जर्मनी, रशिया, फ्रान्स आणि इतर देशांत राजकीय कामासाठीं राखून ठेविलेले अवाढव्य संचय आहेत; आपण आपल्या लढाईच्या शक्तीची भिस्त सर्वथैव खाजगी हितसंबंधांवर ठेवतों, आणि एखाद्या राष्ट्रीय संकटाचे वेळीं पैशाची जिम्मेवारी मोठमोठ्या पेढ्या व धनिक लोक आपल्या बरोबरीनें उचलतील या आशेवर बसतों. हें तर ते त्यांच्यानें होईल तेवढें खात्रीनें करतीलच, आणि त्याचा त्यांना मोबदलाही मिळेल. दोन वर्षांमागें मँचेस्टर येथें आणि गेल्या वर्षी फिरून लंडन चेम्बर ऑफ

कॉमर्सपुढें मि. एड्गर क्रॅमंड यांनीं फार जोरानें प्रतिपादन केल्याप्रमाणें लढाईचे वेळीं आपल्या साम्राज्यसंरक्षणाचा जितका महत्वाचा भाग, आरमार व फौज यांची तयारी हा आहे, तितकाच महत्वाचा पैशाची तयारी पण आहे. तर ह्या अत्यंत महत्वाच्या भागासंबंधानें आपण हयगय कां करावी ? या बाबतींत नेपोलियननें केलेल्या चुकांचा फायदा घेऊन व याखेरीज सध्यांच्या काळांत मनांत आणल्यास सर्वांना प्राप्त होणारें सद्यःस्थितीचें ज्ञान मिळवून आपल्या शत्रूंना सोन्याच्या खानगी संचयावर फार भयंकर हल्ला करण्याचें काम जड वाटणार नाहीं, आणि यामुळें ज्या वेळेस आपला सर्व पैसा व सर्व हुषारी आपल्याजवळ असावयास पाहिजे, त्याच वेळेस हे शत्रू आपणांस त्रास देऊन आपला घोंटाळा उडवून देणार. अशा शत्रूंच्या तडाख्यांत आपण कां सांपडावें ? हा हल्ला फसल्यास या भावी हल्लेवाल्यांची स्थिति आपल्याला अत्यंत वाईट करून टाकतां येईल असें कोणी म्हणेल तर तें म्हणणें कोणत्याही हल्ल्याला लागू करतां येईल. पैशावरच्या हल्ल्याला तसेंच आरमारावरच्या व सैन्यावरच्या हल्ल्यालाही तें म्हणणें लागू पडेल. शिवाय आणखी असाही वाद पुढें आणण्यांत येतो कीं, सरकारनें राजकीय कामासाठीं असा एखादा विशिष्ट संचय निर्माण केला तर त्याचा उपयोग उद्योगधंद्याकडे झाल्याशिवाय रहाणार नाहीं. तसा उपयोग न करूं देणें फार कठिण जाईल. असें जरी मानलें तरी ही गोष्ट सरकारच्या प्राबल्यावर व अधिकाऱ्यांवर अवलंबून राहील. कांहीं झालें तरी राजकीय संकटांकरितां खास आपला म्हणून एखादा मोठा सोन्याचा संचय सरकारानें निदान दोन सबळ कारणांसाठीं तरी करून ठेवावा.

त्याचप्रमाणें सरकारनें आपल्या व्यापारी जबाबदाऱ्यांकरितां म्हणून सोन्याचा दुसरा संचय कां करून ठेवावा याचींही कारणें आहेत. पोस्ट ऑफिस व ट्रस्टी सेव्हिंग बँकांच्या जिम्मेदारीसाठीं सरकारापाशीं तीन लाख पौंडांच्या अपुऱ्या ठेवीशिवाय वस्तुतः आज कोणताही सांठा नाहीं. आणि ही स्थिति असूनही ठेव ठेवणारांचें एकंदर देणें त्यांच्याकरितां राखून ठेविलेली सरकारी शिल्लक सोडून वीस कोटी पौंडांवर आहे. साम्राज्यसंरक्षणाप्रमाणें याही बाबतींत खानगी सावकार फुकट आपल्याला मदत करतील, व संकटाचे वेळीं आपल्या नगदी पैशाच्या पिशव्या खोलतील असें सरकारला वाटतें; पण हे सावकार आपला मारवाडी कावा वाटेल तितका केल्याखेरीज सोडणार नाहींत. ( कारण ह्या सावकारांनीं आपल्याला मोफत मदत करावी असा आपला हक्क नाहीं हें उघड आहे. ) सरकारी सेव्हिंग बँकांवर मागण्यावर मागण्या येऊं लागल्यास पैशाच्या पेठेची अवश्य फार गैरसोय होणार.

इंग्लंडच्या बँकेंत आणि दुसऱ्या खानगी बँकांतून व सावकारी पेढ्यांतून हल्लीं सोन्याच्या राखून ठेविलेल्या शिलका किती अपुऱ्या आहेत हें ध्यानीं आणलें तर आपल्या स्वतःच्या राजकीय कामासाठीं व व्यापारानिमित्त एकीकडे काढून ठेवावयाच्या सोन्याच्या शिलकांसंबंधानें सरकारचें वर्तन वर दर्शविल्यापेक्षांही जास्त भयंकर आहे असें दिसेल. जीव्हान्स व बॅगेहॉट यांच्या वेळेपासून आजतागाईत प्रत्येक अर्थशास्त्रवेत्ता या सोन्याच्या ठेवींच्या अपुरतेपणाबद्दल राष्ट्राला ताकीद देत आला आहे. टाइम्सपासून तों थेट खालपर्यंत, राजकीय विषयांवरील प्रत्येक प्रकारच्या मतांच्या वर्तमानपत्रांनीं ब्रिटिश राज्यांतील एकंदर बँकांच्या प्रचलित बोजांच्या मानानें

इंग्लंडच्या बँकेची सोन्याची ठेव किती अपुरी आहे हें जोरानें पुढें मांडलें आहे. ब्रिटिश राज्यांतील असोसिएटेड चेम्बर ऑफ कॉमर्सच्या मार्फत व्यापारी लोकांनीं याच विषयावर फिरून फिरून टकळी लाविली आहे, परंतु वस्तुतः त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. राजनीतिज्ञ लोकही या ओरडींत सामील झाले आहेत. उदाहरणार्थ, १९०६ सालीं मे महिन्यांत लंडन येथील पेढीवाल्यांच्या एका मेजवानीचे प्रसंगीं चॅन्सेलर ऑफ एक्स्चेकर असतांना मि० ॲस्क्विथ म्हणाले कीं, सोन्याच्या ठेवीसंबंधाच्या ह्या प्रश्नाचें महत्व दिवसानुदिवस जास्त वाढत जाणार. आणि त्या वेळींही त्यांचें सर्व लक्ष तिकडेच गुंतून राहिलें होतें. माजी लॉर्ड गास्चेन यांनीं १९०६ च्या जुलै महिन्यांत पेढीवाल्यांच्या मेजवानीच्या दुसऱ्या एका प्रसंगीं असें म्हटलें होतें कीं, " आपल्यावरचे कर्जाचे बोजे आज जबरदस्त प्रमाणावर गेले आहेत आणि आपल्याजवळ असलेला सोन्याचा सांठा इतर कोणत्याही देशापेक्षां कमी आहे. ही स्थिति समाधानकारक नाहीं. अशा प्रकारचें मतैक्य असूनही या बाबतींत कांहीं एक करण्यांत आलें नाहीं. या गोष्टीला एकच उपाय म्हटला म्हणजे लोकांच्या नगदी शिलकांवर व संचयावर व्यापार करणारांना आपल्यावरच्या बोजांच्या मानानें सोन्याची एखादी ठराविक ठेव बाजूला काढून ठेवण्यास भाग पडणारा कायदा. यायोगानें सोन्याचे मोठमोठाले खानगी सांठे सांचून ते संकटाचे वेळीं कामास येतील. प्रत्येक वर्षाच्या अखेरीला जेव्हां हिशेब प्रसिद्ध होतात तेव्हां इंग्लंडच्या बँकेंत आमच्या शिलकी किती मोठ्या आहेत हें लोकांना दाखविण्यासाठींच केवळ प्रत्येक डिसेंबरच्या शेवटल्या आठवड्यांत थोडे दिवसांकरितां त्याच बँकेपासून अप्रत्यक्ष

रीतीनें तीन कोटी पौंड कर्ज काढण्याची जी कांहीं बँकांची अप्रामाणिक चाल सध्यां पडली आहे ती एकदांची सुटेल. कायद्यानें घालून दिलेल्या मर्यादेपर्यंत प्रत्येक बँकेची नगदी शिलक आहे किंवा नाहीं हें लोक स्वतःच पाहूं लागतील.

तेव्हां सोन्याचा अधिक खप होण्याचे हे नवीन तीन मार्ग आपल्यापुढें आहेत. यांच्यायोगें राष्ट्राच्या बळकटींत राजनीतिदृष्ट्या तसेंच सांपत्तिकदृष्ट्या बरीच मोठी भर पडण्यासारखी आहे; आणि आपल्या पैशाच्या मापामध्यें होत असलेल्या ज्या मोठ्या कमतरतेचें आज आपल्याला भय वाटून राहिलें आहे तीही, थोड्या अंशानें का होईना, सुधारेल. सरकार जर हें सोनें जास्त उपयोगांत आणण्याचें धोरण साम्राज्याच्या इतर भागास लागू करील तर सोन्याला आणखी मागणी खात्रीपूर्वक उत्पन्न होऊन ती फार जास्त परिणामकारक झाल्याशिवाय राहणार नाहीं; आणि सध्यांच्या चौकशीचा विषय म्हणजे सोन्याच्या किंमतींतली कमतरता, ती या एकट्या मागणीनेंच सर्वस्वी भरून येण्याचा संभव आहे. यासंबंधांत आपल्याला मार्ग दर्शविण्यासाठीं गतकालाचा अनुभव आपल्यापुढें आहे; आणि तो अनुभव आपल्या सध्यांच्या स्थितींत बरोबर लागू पडून हल्लींचा सोन्याचा प्रश्न सोडविण्याच्या कामांत आपल्याला अमोल्य होणार आहे. जेव्हां गेल्या शतकाच्या मधल्या काळांत कॅलिफोर्निया व ऑस्ट्रेलिया येथील खाणींतून सोन्याचा पूर सर्व पृथ्वीवर वाहूं लागला तेव्हां त्या काळच्या अर्थशास्त्रवेत्त्यांना आणि विद्वान् मंडळ्यांना अशी धास्ती पडली कीं, या पुरानें सोन्याची किंमत अतिशय खालावणार आणि त्यायोगें देशांतली मालमत्ता व संचित द्रव्य नाहींसें होऊन पाश्चिमात्य राष्ट्रें घोंटाळ्यांत

पडणार. यासंबंधांत शिव्हेलियर, कॉब्डेन, जीव्हॉन्स इत्यादि लोकांचे लेख व व्याख्यानें प्रसिद्धच आहेत. परंतु अर्थशास्त्रवेत्त्यांनीं केलेलीं हीं उद्वेगजनक भाकितें खरीं ठरलीं नाहीत. कारण जरी सोन्याच्या किंमतींत बराच ध्यानांत येण्यासारखा कमीपणा उत्पन्न झाला तरी त्याला लवकर आळा बसला. त्या वेळचे उत्तम उत्तम अर्थशास्त्रवेत्ते आपल्या भाकितांत कसे फसले याची आजपर्यंत बरीच वाटाघाट झाली आहे. त्यांचे सिद्धांत बिनचूक असून ज्या गोष्टी-वरून ते काढले होते त्याही बहुतेक खऱ्या होत्या. परंतु पुढें असें आढळून आलें कीं, दोन तीन गोष्टींचें महत्व शिव्हेलियरआदि-करून लोकांच्या लक्षांत बरोबर आलें नव्हतें. यांपैकीं पहिली गोष्ट नव्या पुरवठ्याच्या मानानें आधींच अस्तित्वांत असलेला पैशाचा सांठा. दुसरी, अमेरिका व ऑस्ट्रेलिया या देशांच्या शीघ्रप्रगतीमुळें उत्पन्न झालेला पैशाचा वाढता खप. तिसरी व सर्वांत महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे यासंबंधांतली हिंदुस्थान देशाची स्थिति. सोन्याच्या त्वरेनें खालावत चाललेल्या किंमतीनें भिऊन जाऊन हिंदुस्थान-सरकारनें तारीख २२ डिसेंबर १८५२ रोजीं एक फर्मान काढलें आणि आपल्या तिजोरींत सोन्याच्या मोहरा अत:पर घेण्याचें नाकारलें. सरकारच्या या वर्तनामुळें हिंदी लोकांना आपलें मुख्य नाणें चांदीचेंच पत्करणें भाग पडलें. मौल्यवान् धातूंच्या पुरवठ्याचें, किंमतींच्या मर्यादेवर काय परिणाम होतात हें ठरविण्याचें महत्वाचें प्राचीनकाळापासूनचें साधन म्हणजे पूर्वेकडील देशांतून होत असलेला त्या धातूंचा खप हें होय. (हें प्राचीनकाळापासूनचें तत्त्व आहे.) शिपायांचें बंड मोडल्यानंतर हिंदुस्थानचा व्यापार फार लवकर वाढला आणि संयुक्त संस्थानांच्या लढाईंत अमेरिकेन कापसाची

जी तूट पडली तिच्यामुळें हिंदी कापसाचा खप वाढून व्यापारांत हिंदुस्थानचें जबर घेणें निघत चाललें. यामुळें चांदी हिंदुस्थानांत कल्पनेबाहेर आली, इतकी कीं, मुंबईच्या चेंबर ऑफ कॉमर्सला १८६४ सालीं अशी धास्ती पडली कीं, " हिंदुस्थान देशाकडे येत असलेला चांदीचा ओघ जर असाच चालला तर दुसऱ्या सर्व राष्ट्रांच्या चांदीच्या नाण्यांच्या इयत्ता नाहींशा झाल्याशिवाय रहाणार नाहींत. " वस्तुतः हिंदुस्थानच्या मागण्या पुरविण्यासाठीं युरोपमधून जो अतोनात पैसा गेला त्यामुळें कॅलिफोर्निया आणि ऑस्ट्रेलिया येथील खाणींतून युरोपांत वहात असलेल्या पैशाच्या पुराचे परिणाम फारच कमी झाले. तात्पर्य, अमेरिका व ऑस्ट्रेलिया येथील खाणींतल्या अतोनात पैदाशीमुळें सोनें किंमतींत अगदींच खालावणार असें जें वरील अर्थशास्त्रवेत्त्यांना खास वाटत होतें त्यांत त्यांचा साधारण अंदाज कां चुकला हें पूर्वेकडे होत असलेल्या, धातूच्या पैशाच्या, आकस्मिक व जबर खपावरून स्पष्ट होतें.

या खपाच्या अभावीं किंमती मोजण्याच्या सार्वजनिक मापांत जी कमतरता झाली असती, व जिच्यामुळें पश्चिमेकडील पुष्कळ लोकांची स्थिति लुली होऊन गेली असती, तिला आळा घालून हिंदुस्थानानें पन्नास वर्षांपूर्वी युरोपला ज्याप्रमाणें वांचविलें त्याप्रमाणें आतांही, तशाच प्रकारची कमतरता फिरून उत्पन्न होण्याची भीति पडली असतांना, सध्यां येऊन राहिलेल्या सोन्याच्या पुरांतून बराच मोठा भाग आपल्याकडे खेंचून हिंदुस्थान आपला बचाव फिरून करूं शकेल. दैवाच्या विपरीत गतीनें हिंदुस्थानांत सरकारला १८९०–९१–९२ सालीं आपल्या चलनांत—आणि या वेळीं हें चलन चांदीचें होतें—बराच कमीपणा येण्याची फिरून धास्ती वाटून,

लंडन येथील तज्ज्ञ लोकांच्या कमिटीच्या ( हर्शेल कमिटी ) जोरावर सन १८९३ सालीं, पूर्वी लोकांना नाणें पाडून घेण्याकरितां खुल्या असलेल्या टांकसाळी एकदम बंद करण्यांत आल्या. सोन्याची इयत्ता ठरवून बनेल तर सोन्याचें चलन करण्याचें त्या वेळीं ठरलें. ही तजवीज शहाणपणाची होईल किंवा नाहीं यासंबंधानें हिंदी लोकांचें एकमत त्या वेळीं मुळींच नव्हतें; परंतु पुढें ज्या गोष्टी घडून आल्या—म्हणजे विशेषतः हिंदुस्थानच्या ठेवींची आणि चलनाची जी कायमची गैरव्यवस्था होत गेली व लंडनच्या पैशाच्या पेठेच्या गरजांपुढें हिंदुस्थानचे हितसंबंध नेहमींच गौण होत गेले—त्यामुळें हिंदुस्थानच्या लोकांना पूर्वी ठरल्याप्रमाणें सोन्याचें चलन जितक्या लवकर प्रत्यक्ष अमलांत येईल तितकें चांगलें असें वाटलें. सोन्याची इयत्ता ठरविल्यामुळें सांचत असलेल्या शिलकेपैकीं बराचसा भाग हिंदुस्थानांत सोन्याच्या रूपानें ठेवावा अशी त्या देशांतल्या सर्व चेंबर्स ऑफ कॉमर्स एकमतानें मागणी करीत आहेत. आणि सर विठ्ठलदास थॅकर्सेसारख्या व्यापारांत हुषार व नांवजलेल्या सभासदानें कलकत्त्यांत वरिष्ठ कायदेकौन्सिलपुढें अशी सूचना आणली आहे कीं, इंग्रजी पौंडाहून लहान लहान किंमतीचीं सोन्याचीं निराळींच हिंदी नाणीं हिंदुस्थानांत पाडून सोन्याच्या खपास उत्तेजन द्यावें. कौन्सिलचे फडणीस सर गाय फ्लीटवुड वुइल्सन यांनीं या सूचनेचा अत्यंत काळजीपूर्वक विचार करण्याचें फार शहाणपणानें वचन दिलें आहे.

आजमितीस सोन्याचा पूर इतका मोठा येऊन राहिला आहे कीं, सर्व जगाला त्याची भीति पडली आहे. या पुराचे प्राथमिक परिणाम आधींच दृष्टोत्पत्तीस आले आहेत. त्या धातूच्या किंमतीची

कमतरता जाणवेल अशा तऱ्हेची झाली आहे. त्याबरोबर आपलें पैशाचें नाणेंही किंमतींत उतरलें आहे. यामुळें राज्यांतील गोरगरिबांवर दुष्ट परिणाम होण्याचा संभव आहे. अशा स्थितींत हिंदुस्थानच्या पैशाचें प्रमाण सोन्याचें असून येथील चलनही सोन्याचें असावें याबद्दल सरकारची अनुकूलताही आहे, इतकेंच नाहीं तर थोडे वर्षांपूर्वीं गिन्या चलनांत आणण्याची खटपट सरकार होईल तेवढी प्रत्यक्ष करीत होतें. या सर्व गोष्टी ध्यानांत आणल्या तर कोणाला वाटेल कीं, ही हिंदुस्थानची सध्यांची सोन्याची मागणी पाहून इंडिया ऑफिसचे अधिकारी मोठे खुष होत असतील. परंतु इंडिया ऑफिस पडलें लंडन शहरीं. ज्या विद्वान् अनुभवी लोकांच्या सल्ल्यानें स्टेट सेक्रेटरी या कामांत चालणार (उदाहरणार्थ, सर फेलिक्स शस्टर, हल्लीं बॅरन इंचेप झालेले सर जेम्स मॅके, मि. लॉरेन्सकरी) त्यांचा ओढा लंडनच्या कांहीं मोठ्या बँकांकडे. अशा स्थितींत, लंडनचें वातावरण, विचाराची दिशा, जवळचे हितसंबंध, व लंडनच्या पैशाच्या पेठेच्या दिवसानुदिवस वाढणाऱ्या गरजा या गोष्टींचे परिणाम, स्टट सेक्रेटरीच्या मनावर उत्तम मार्ग ठरविण्याचे कामीं अधिक होणार; हिंदुस्थानांतील निरनिराळ्या लोकांच्या, दूरच्या व म्हणून कमी वजनदार अशा मागण्यांकडे त्यांचें इतकें लक्ष जाणार नाहीं. याशिवाय, स्टेटिस्टसारख्या एका विशिष्ट दर्जाच्या, सावकारी वर्तमानपत्रांनीं या एकंदर विषयाचा—म्हणजे हिंदुस्थानास लागलेल्या या नव्या सोन्याच्या भूकेचा—वाद चालविला तो इतक्या कळकळीनें व स्पष्ट तऱ्हेनें कीं, त्यावरून लंडन येथील प्रमुख सावकारांच्या मनाचा कल कोणीकडे आहे याचा संशय रहाणार नाहीं. उदाहरणार्थ, स्टेटिस्ट पत्रानें तारीख १५ एप्रिल १९११ च्या अंकांत असें

लिहिलें होतें कीं, "गेल्या वर्षी हिंदी लोकांनीं सरासरी एक कोटि ऐशीं लक्ष पौंड सोनें आपल्या देशांत नेलें, हें तर वाईट झालेंच; परंतु सोन्याचें चलन करण्याच्या हेतूनें त्यांना आणखी सोनें नेण्यास उत्तेजन देणें म्हणजे वेडेपणाची कमाल झाली म्हणावयाची." स्टेटिस्टनें सर गाय फ्लीटवुड वुइल्सनचे या बाजूचे प्रयत्न 'वेडे चार' ठरवून त्याचा इतक्या जोरानें निषेध कां केला आहे हें खालील अर्थपूर्ण उताऱ्यावरून दिसेल. तो उतारा जशाचा तसाच दिला आहे: "इंडियन करन्सी कामिटीनें केलेल्या शिफारसी अंमलांत आणून हिंदुस्थानांत सोन्याचें चलन स्थापण्याचें हें हिंदी सरकारचें धोरण हिंदुस्थानला अतिशय नुकसानकारक होणार आहे, इतकेंच नाहीं तर बाकीच्या देशांनासुद्धां मोठी पंचाईत येऊन पडणार आहे. गेल्या वर्षी हिंदुस्थानांत व्यापाराकरितां, लोकांच्या डागडागिन्यांकरितां आणि संचयाकरितां म्हणून सरासरी एक कोटि ऐशीं लक्ष पौंड सोनें आलें. हा प्रकार असाच चालून हिंदुस्थानांत चलनाप्रीत्यर्थ सोन्याचा अतिशय मोठा सांठा येऊन पडला तर युरोप आणि अमेरिका येथील पैशाच्या पेठांची काय गत होईल ? दुसऱ्या देशांच्या हिताकडे लक्ष देणें हिंदी सरकारला भाग नाहीं, ही गोष्ट आम्हांला मान्य आहे. तथापि, हिंदी सरकारची सत्ता संयुक्त ब्रिटनवर अवलंबून असल्याकारणानें, त्या सरकारानें हिंदुस्थानच्या हितदृष्ट्या खरोखर जरूर असल्याशिवाय, ब्रिटिश राज्याला अपायकारक होईल असें कोणतेंही कृत्य करूं नये. परंतु, चलनी नाणें, व्यापार, डागडागिने आणि संचय यांसाठीं प्रतिवर्षी कदाचित् पांच कोटींपासून दहा कोटी पौंड सोनें हिंदुस्थानांत जिरून जाईल असें धोरण जर हिंदी सरकार अंमलांत आणील तर त्यांत ब्रिटिश राज्याचें

उघड उघड नुकसान आहे. अजून सोन्याच्या चलनांचें नांवही नसतां हिंदुस्थानानें नुसत्या व्यापाराकरितां आणि संचयासाठीं म्हणून एकाच वर्षांत सुमारें एक कोटि ऐशीं लक्ष पौंड सोनें देऊन बसावें ही कांहीं लहानसान गोष्ट नव्हे. तो देश असेंच करीत राहिला तर त्याचा परिणाम युरोपच्या पैशाच्या पेटेवर निःसंशय झाला पाहिजे. आतां संयुक्त संस्थानांनीं शहाणपणा करून आपलें चलन सुधारलें आणि सांठलेल्या सोन्यापैकीं बराच भाग बाहेर जाऊं दिला तर गोष्ट निराळी. ''

या उताऱ्यांत पेंचाची एकच बाजू आपणाला दिसते. दुसरी बाजू म्हणजे जगांतील खाणींतून सोन्याची पैदास इतकी प्रचंड होऊन राहिली आहे कीं, त्यापासून सर्व जगाचीं पैशाचीं मापें खालावून संप, सोशिॲलिझम, सिंडिकॅलिझम वगैरे संकटांना वाव मिळाव-याचा. या बाजूकडे आपण पूर्ण दुर्लक्ष करतों. दुर्दैवानें त्या वेळीं चुकीच्या सल्ल्याचाच जय झाला; आणि लॉर्ड मोर्लेला आपल्या इंडिया ऑफिसचें वजन व सत्ता लंडन येथील एका विशिष्ट सांप्रदायाच्या सावकारांच्या हातीं द्यावी लागली; या सावकारांनीं आपल्या तात्कालिक स्वार्थाकडेच फक्त लक्ष देऊन असें ठरविलें कीं, सोन्याचा कितीही मोठा पूर येणार असला तरी हिंदुस्थानांतही मौल्यवान् धातू जाण्याचें शक्य तितकें बंदच केलें पाहिजे. या पुरांतील एक थेंबही त्या देशांत जास्त जाऊं देतां कामा नये. हिंदुस्थानांतील जेवढी म्हणून सरकारी पुंजी सोयीनें इंडिया ऑफिसच्या हातीं लागेल तेवढी सर्व लंडनास एकसारखी आणवून त्यांनीं आपला हा हेतु साध्य केला. ह्या पुंजीवर इंडिया ऑफिसचा कांहीं हक्क होता किंवा नव्हता, अगर इंडिया ऑफिसला तिचा कांहीं उपयोग होता

कीं नव्हता, या विचारांकडे कोणीं बिलकुल लक्ष दिलें नाहीं, अथवा दिलें असल्यास ते विचार मुकाट्यानें बाजूला ठेवून दिले. हिंदुस्थान-च्या राष्ट्रीय कर्जाच्या बाकीची विल्हेवाट हिंदुस्थानांत गिन्या आणून लाविता आली असती व तशा प्रकारें ती लावावयास पाहिजे होती. तसें न होतां उलट हिंदी सरकारची पुंजी हिंदुस्थानाहून लंडनास आणून त्या बाकींत तात्पुरता फेरबदल होत होता आणि यामुळें लंडनकरितां त्या वेळेपुरती सोन्याची बचत राहून ती लंडनच्या पैशाच्या पेठेच्या आणखी उपयोगीं पडत होती, एवढेंच इंडिया ऑफिसला पाहिजे होतें.

अशा शोचनीय तऱ्हेनें लंडनच्या पैशाच्या पेठेंतील कांहीं लोकांच्या तात्पुरत्या सावकारी गरजा भागविण्याकडे हिंदी सरका-रच्या एका मोठ्या खात्याचा उपयोग केल्यानें एक अपूर्व शरमेची गोष्ट आज हिंदुस्थानासंबंधीं होऊन राहिली आहे. हा विषय इतका महत्वाचा आहे कीं, त्याचा विचार मुद्दाम झालाच पाहिजे.

**खंड पहिला**
**समाप्त.**

# खंड दुसरा.

## इंडिया ऑफिससंबंधानें एक शरमेची गोष्ट.

" सोन्याची यत्ता ठरविल्यानें जी बचत पडली आहे ती वगळतां स्टेट सेक्रेटरीच्या नांवावर तारीख ८ मार्च सन १९१२ रोजीं संध्याकाळीं १७९५३९९५ पौंड १८ शिलिंग ३ पेन्स इतकी नगदी रोकड शिल्लक जमा होती. " ( लंडन येथें हिंदी सरकारची नगदी शिल्लक किती आहे या हाउस ऑफ कॉमन्समध्यें कर्नल सी. ई. येट यांनीं विचारलेल्या प्रश्नास ता. ११ मार्च सन १९१२ रोजीं मि. सॅम्युअल मॅन्टेग यानीं दिलेलें उत्तर. )

## भाग ३.

### आरोप.

गेल्या थोड्या वर्षांत इंडिया ऑफिसच्या कामाची अशी कांहीं स्थिति झाली आहे कीं, तिच्यामुळें ग्रेट ब्रिटनच्या ताब्यांतील पूर्वेकडील मोठ्या देशाची राज्यव्यवस्था कशी चालली आहे हें बारकाईनें पहाणारांना अत्यंत काळजी उत्पन्न झाली आहे. स्पष्ट सांगाव-

याचें म्हणजे हिंदी लोकांच्या व हिंदी सरकारच्या मालमत्तेपैकीं बऱ्याच मोठ्या पैशाच्या रकमांचा दुरुपयोग केल्याचा आरोप इंडिया ऑफिसवर आलेला आहे आणि हिंदुस्थानांतून कित्येक बाजूंनीं—व त्यांतल्यात्यांत महत्वाची बाजू जी साधारणतः मानण्यांत आली आहे—म्हणजे खुद्द हिंदी सरकारकडून—यासंबंधानें एकसारख्या तक्रारी येत असतांही अशी स्थिति झाली आहे.

ज्या रकमांचा इंडिया ऑफिसकडून दुरुपयोग झालेला आहे असें म्हणणें आहे, त्या रकमा ह्या आहेत:—

( १ ) हिंदी चलनांतील कागदी नोटांप्रीत्यर्थ काढून ठेविलेली शिल्लक. या शिलकेपैकीं ऐशीं लक्ष पौंडांवर शिल्लक कारण नसतांना हिंदुस्थानांतून लंडन येथें नेण्यांत आली आहे.

( २ ) हिंदी नाण्याचें प्रमाण सोन्यांत ठरवून टाकल्यानें राहिलेली बचत. वर्तमानपत्रांकडून व चेम्बर्स ऑफ कॉमर्सकडून तक्रारी येत असतांही या बचतेंतून एक कोटि सत्तर लक्ष पौंडांवर बचत हिंदुस्थानांतून लंडनास नेण्यांत आली आहे.

( ३ ) हिंदी सरकारचा खर्च जाऊन प्रतिवर्षी रहाणाऱ्या नगदी शिलका. यांपैकीं हिंदी तिजोऱ्यांतून एकंदर एक कोटि पौंड किंवा जास्तच काढून ते विलायतच्या तिजोरींत इंग्लंड बँकेच्या खात्यांत घातले आहेत आणि नंतर एकएका वेळेला लाखों पौंड, कांहीं तारण घेऊन, कांहीं तारणाशिवाय, लंडनच्या कांहीं ठराविक संयुक्त पुंजीच्या बँकांना व शहाजोग समजल्या जाणाऱ्या दुसऱ्या ऋणकोंना, हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत आलें असतें त्यापेक्षां फारच कमी व्याजानें, उसनवार दिले आहेत.

हिंदुस्थानची सांपत्तिक व व्यापारी स्थिति सुधारण्याकरितां जे लोक साक्षात् प्रयत्न करीत आहेत, त्यांचें व कर देणाऱ्या सर्वसाधारण हिंदी रयतेचें प्रत्यक्ष नुकसान करून हिंदुस्थानांतून या अवाढव्य हिंदी पैशाच्या रकमा लंडनास नेण्यांत येत आहेत; त्यामुळें हिंदुस्थानचा एकंदर तोटा होऊन राहिला आहे. कारण, ब्रिटिश राज्याला जींत पडावें लागेल अशा एखाद्या मोठ्या युरोपियन लढाईची आणि त्यामुळें होणाऱ्या अपरिहार्य, पैशाच्या घोंटाळ्याची, मुळीं कल्पनाच मनांत आणिली नाहीं तर, सोन्याचें प्रमाण ठरविल्यानें रहाणाऱ्या बचतीचा कांहीं भाग लंडन येथें उपयोगांत आणणें न्यायाचें होईल असें जरी मानतां आलें तरी वस्तुतः सर्वच बचतीसंबंधानें असें म्हणतां यावयाचें नाहीं. या बचतीचा शेंकडा ९५ वर भाग लंडन येथें नेऊन ब्रिटिश वसाहतींच्या तारणावर व्याजीं लावावयाचा म्हणजे युरोपच्या सध्यांच्या राजकीय स्थितीच्या दृष्टीनें हिंदुस्थानास धोक्यांत घालणें होय. हें अगदीं गैरवाजवी असून ह्यापासून आपल्या जिम्मेवर टाकलेल्या देशाचें रक्षण करणें स्टेट सेक्रेटरीचें कर्तव्य आहे. परंतु तें करण्यास तो चुकला आहे असा त्याच्यावर आरोप आहे.

आतां कागदी नोटांप्रीत्यर्थ काढून ठेविलेल्या शिलकेसंबंधानें विचार करावयाचा म्हणजे हें स्पष्ट आहे कीं, ज्याअर्थी ह्या नोटा फक्त हिंदुस्थानांतच चालतात, व लंडन येथें त्यांची देवघेव करतां येत नाहीं, त्याअर्थी त्यांच्याप्रीत्यर्थ काढून ठेविलेल्या पैशाच्या शिलकेची जरूरी लंडनांत नसून फक्त हिंदुस्थानांतच लागणार. तर मग या शिलकेपैकीं ऐशीं लक्ष पौंड लंडनास कां न्यावयाचे ? हिंदुस्थानांत चालणाऱ्या नोटांप्रीत्यर्थची शिल्लक लंडनमध्यें ठेवावयाची म्हणजे

इंग्लंडांत-चालणाऱ्या कागदी नोटांप्रीत्यर्थची इंग्लंड बँकेंत असणारी शिल्लक कलकत्त्यास, अगर मॉंट्रील अगर सिड्ने येथें ठेवण्यासारखेंच आहे. या शिलकेंपैकीं बराचसा भाग निर्भयपणें व्याजीं लावितां येतो असा जर अनुभव आहे तर तो लंडनपेक्षां हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतच व्याजीं लावावा हें उघड आहे. हिंदी सरकारच्या प्रॉमिसरी नोटा आणि त्यांसारखेच दुसरे हिंदी सरकारच्या हमीवर काढलेले कागद नेहमीं हिंदुस्थानांतच मिळतात. शिवाय, सरकारनें मुद्दाम ठेविलेल्या पैशांवर चांगलें व्याज देऊन त्याप्रीत्यर्थ सरकारपाशीं योग्य तारण ठेवण्यास हिंदुस्थानांतील मोठमोठाल्या बँका अगदीं एका पायावर तयार होतील. अशा तऱ्हेनें पैसा व्याजीं लाविल्यानें हिंदुस्थानचा अत्यंत फायदा होऊन, दुसऱ्या कामांत लावण्यासाठीं खानगी पुंज्या मोकळ्या होतील. ह्या फायद्याकडे दुर्लक्ष करून, हिंदुस्थानास फार जरूर असलेला पैसा त्या देशांतून काढून, कमी फायद्याच्या शर्तीवर लंडनच्या पैशाच्या पेठेंत कां अडकवून ठेवावा किंवा व्याजीं लावावा ?

हिंदी सरकारचा खर्च जाऊन प्रतिवर्षी रहाणाऱ्या शिलकांच्या उपयोगाची गोष्ट याहींपेक्षां जोरदार आहे. प्रथमतः हिंदी सरकारचें उत्पन्न जर अशा तऱ्हेनें आकारलें जातें कीं पन्नास लाखांपासून दीड कोटी पौंड तिजोरींत व्यर्थ पडून रहातात तर हिंदुस्थानावर कराचें ओझें अधिक लादलें जातें हें अगदीं उघड आहे. एवढ्यानेंच हिंदी सरकारची जमाखर्चाची व्यवस्था वाईट असून ती ताबडतोब सुधारली पाहिजे असें स्पष्ट होतें. तथापि, खर्चाच्या अंदाजपत्रकासंबंधानें अत्यंत काळजी घेऊनही जर हिशेबाअंतीं शिल्लक रहाते व हिंदी सरकारला तिची ताबडतोब जरूरी नसते तर, हिंदुस्थानाला

न्यायाचा मार्ग म्हटला म्हणजे त्या देशांतच ती शिल्लक व्याजीं लाविली पाहिजे; ती शिल्लक लंडनास नेऊन तेथें संयुक्त पुंजीच्या बँकांना, दलालांना, पैशाच्या पेढ्यांना, शेटसावकारांना आणि दुसऱ्या लोकांना गुप्तपणें, हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या व्याजाच्या दरापेक्षां कमी दरानें द्यावयाची हा न्याय नव्हे. हे लोक प्रत्यक्ष हिंदुस्थानच्या फायद्याकरितां ह्या पैशाचा उपयोग करतील किंवा न करतील ह्याचा नेम नाहीं; पण बहुश: तसा उपयोग करणारच नाहींत. या बाबीसंबंधाचें आपलें कर्तव्य फार जरूरीचें आहे. कारण सर्व जगाला माहीत आहे कीं, हिंदुस्थानाला आज जी अत्यंत जरूरी आहे ती त्या देशांतील अनुपमेय नैसर्गिक फायदे वाढविण्यासाठीं लागणाऱ्या अधिक पुंजीची. शिवाय, विलायतेंतील अव्वल दर्जाचे ऋणको साधारणत: देतात त्यापेक्षां जास्त व्याज, उसनवार पुंजीवर हिंदुस्थान देण्यास राजी आहे. आणि इतकें असूनही या उघड उघड गोष्टीकडे इंडिया ऑफिसनें दुर्लक्ष करून हिंदी सरकारच्या नगदी शिलकांपैकीं लाखों, क्रोडो पौंड लंडनास नेले आहेत. ह्याप्रमाणें दुर्दैवी हिंदुस्थानावर हा दुहेरी अन्याय केल्याचा इंडिया ऑफिसवर आरोप आहे.

स्टेट सेक्रेटरींच्या हातांत असलेल्या हिंदी सरकारच्या नगदी शिलका तपासल्या म्हणजे इंडिया ऑफिसांत कोठें तरी फार भयंकर घोंटाळा आहे हें तेव्हांच समजेल. ग्रेटब्रिटनमध्यें चॅन्सेलर ऑफ दी एक्स्चेकर हा आपल्या जमाखर्चाची साधारणत: अशी व्यवस्था लावतो कीं, तो वारंवार " शहर " लंडनच्या लोकांच्या लाखों पौंडांच्या कर्जांत असतो. त्याला वारंवार लंडन शहरच्या लोकांचें लाखों पौंडांचें देणें असतें. ( मि. लॉइड जॉर्जनें वाजवीपेक्षां

फाजील काढलेल्या हुंड्या नुकत्याच एक कोटी तीस लक्ष पौंडांसारख्या प्रचंड रकमेपर्यंत पोहोंचल्या व यांपैकीं स्टेट सेक्रेटरीनें हिंदुस्थानच्या पैशांतून पंचेचाळीस लक्ष पौंड त्याला उसनवार दिले. ) आतां या जमाखर्चाच्या पद्धतीशीं स्टेट सेक्रेटरीच्या पद्धतीची तुलना केल्यास असें आढळून येईल कीं, आपल्या जमाखर्चाची व्यवस्था कर्जाची पाळी येण्यासारखी न ठेवतां स्टेट सेक्रेटरी याचे अगदीं उलट जाऊन आपल्या तिजोरींत हिंदी सरकारच्या इतक्या मोठाल्या नगदी रकमा ठेवीत असतो कीं, हिंदी लोकांच्या मनांत त्यासंबंधानें भयंकर शंका उत्पन्न होते. खालीं दिलेल्या प्रत्येक वर्षाच्या अखेरीस म्हणजे डिसेंबर ता. ३१ रोजीं इंडिया ऑफिसच्या हातांत हिंदी सरकारच्या येणेंप्रमाणें शिलका होत्या.

| | | पौंड. |
|---|---|---|
| नगदी शिलक डिसेंबर ता. ३१। | १९०७ | ४६०७२६६ |
| ,, | १९०८ | ७९८३८९८ |
| ,, | १९०९ | १२७९१०९० |
| ,, | १९१० | १६६१७२४५ |
| ,, | १९११ | १५२९२६३८ |
| ,, मार्च ता. ८ | १९१२ | १७९५३९९५ |

इतिहासांतल्या कोणत्याही काळांत, पृथ्वीवरील कोणत्याही देशांत, कोणत्याही सरकारी अधिकाऱ्यानें ( अगर खानगी व्यक्तींनें तरी ) एवढ्याला नगदी शिलका कधीं तरी ठेविल्या होत्या काय ?

हिंदुस्थानांतील इलाख्याच्या बँकांचे—म्हणजे बंगाल बँक, मुंबई बँक आणि मद्रास बँक—सरकारी व्याजाचे दर ४ किंवा ५ टक्क्यांच्या खालीं क्वचितच जातात, आणि व्यापाराच्या गर्दीच्या दिवसांत—म्हणजे हिंवाळ्यांत सरकारी दर ७ अगर ८ टक्केपर्यंत वाढतात. या दरांची, इंडिया ऑफिसनें हिंदी सरकारच्या नगदी शिलका लंडनांत ज्या व्याजानें उसनवार दिल्या आहेत त्यांच्याशीं तुलना करा. मार्च ता. २२ सन १९१२ रोजीं कलकत्त्याच्या वरिष्ठ कायदे कौन्सिलांत विचारलेल्या एका प्रश्नास हिंदी सरकारनें जबाब दिला कीं, १९११ च्या डिसेंबरच्या ३१ तारखेला इंडिया ऑफिसनें " पसंती " च्या बँकांना हमी घेतल्याशिवाय ३७१५००० पौंड उसनवार दिले होते, आणि पसंतीच्या ऋणकोंना ( लॉर्ड मोर्ले यांनीं वर्णन केल्याप्रमाणें उत्तम पत असलेल्या पेढ्यांना ) हमी घेऊन १०६५९००० पौंड दिले होते. शिवाय, आणखी असेंही सांगण्यांत आलें कीं, ता. ३१ मार्च १९१२ रोजीं संपणाऱ्या वर्षांत हमी घेऊन " पसंती " च्या ऋणकोंना दिलेल्या कर्जाचें सरासरीचें व्याज २·६० टक्के होतें आणि " पसंती "च्या बँकांत अनामत ठेविलेल्या रकमेचें सरासरी व्याज २·४३ टक्के होतें. हिंदुस्थानास या पैशाची अत्यंत जरूरी असून तेथें व्याजही जास्त आलें असतें आणि एकंदर हिंदुस्थानचा पुष्कळ फायदा झाला असता. अशा देशांतून इंडिया ऑफिसनें पैसा काढून तो पैसा लंडनांत फार कमी व्याजानें ( म्हणजे फक्त २½ टक्के ) दिला आहे. यामुळें कर देणाऱ्या सर्वसाधारण हिंदी रयतेची गैरसोय व नुकसानी झाली आहे.

इंडिया ऑफिसच्या फडनिशीखात्याची ही चमत्कारिक खटपट इतकें करूनही थांबत नाहीं. वर निर्दिष्ट केलेल्या वरिष्ठ कायदे कौन्सिलच्या बैठकींत मुंबईचे ना. आर्मस्ट्रॉंग यांनीं चौकशी केली कीं, " चालू फडनिशी वर्षांत चलाऊ कर्ज किती काढलें होतें तें व त्यांतून फेडलें किती ?" हिंदी सरकारनें जबाब दिला कीं, " चालू सालांत नवीन चलाऊ कर्ज काढलें नसून फक्त ४५ लक्ष पौंडांचीं बिलें ( हुंड्या ) नवीन करून दिलीं, फेड पांच लाखांची झाली आणि चालू सालांत नवीन करून दिलेल्या हिंदी बिलांवर ( हुंड्यांवर ) व्याज २·९७ टक्के होतें." सोप्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे एकीकडून स्टेट सेक्रेटरी हिंदी सरकारची लाखों पौंडांची नगदी शिल्लक घेऊन लंडन शहरच्या ऋणकोंना सरासरी २½ टक्क्यांनीं उसनवार देतो आणि दुसरीकडून त्याच पैशाच्या पेठेंत वस्तुतः आपणच दिलेला पैसा सरासरी ३ टक्क्यांनीं उसनवार घेतो. या व्यवहारानें हिंदी लोकांचें आणि हिंदी सरकारचें कल्याण कसें होतें हें समजण्यास कठिण आहे.

या सर्व पैशाच्या व्यवहाराबद्दल कोण जबाबदार आहे ? सन १८९३ सालीं हिंदी टांकसाळी लोकांना बंद केल्यापासून हिंदी सरकारच्या व इंडिया ऑफिसच्या चलन आणि जमाखर्च यासंबंधाच्या धोरणावर हिंदुस्थानांत विरुद्ध टीकेचा एकसारखा भडिमार होऊन राहिला आहे ही गोष्ट जरी खरी आहे, तरी अशा प्रकारचे व्यवहार लॉर्ड मोर्ले अधिकारारूढ होईपर्यंत कोणी केले नव्हते. हे व्यवहार घडून येत असल्यामुळें हिंदी जमाखर्चाचें व चलनाचें धोरण हल्लीं हिंदुस्थानच्या हिताकरितां नसून लंडनच्या पैशाच्या पेठेंतील कांहीं ठराविक वर्गाच्या फायद्याकरितां आहे असा समज त्या

देशांत उत्पन्न झाला आहे. लॉर्ड मोर्लेंच्या अंगीं असलेल्या मोठे-मोठाल्या गुणांमध्यें पैशाच्या व जमाखर्चाच्या बाबींत त्यांना विशेष गम्य आहे असें कोणीही आजपर्यंत म्हणण्यास धजला नाहीं; आणि फडनिशीसारख्या गहन विषयांत विशेष बुद्धि असल्याबद्दल खुद्द लॉर्ड मोर्ले छातीवर हात देऊन सांगण्यास तयार होणार नाहींत. तेव्हां अशा स्थितींत त्याच्यासारख्या दुसऱ्या एखाद्या स्टेट सेक्रेटरींनें जें केलें असतें तेंच त्यांनीं केलें. इंडिया ऑफिसच्या फडनिशी खात्याचे कायमचे मुख्य मि. लिऑनेल ॲब्रहॅम, सी. डी. यांच्या मदतीला त्यांनीं जमाखर्चाच्या व व्यापारी बाबींत विशेष चाणाक्ष असलेले आपल्या स्वतःच्या कौन्सिलमधले दोन गृहस्थ दिले—सर फेलिक्स शूस्टर, बॅरोनेट, इंडिया कौन्सिलचे उपाध्यक्ष, युनिअन ऑफ लंडन व स्मिथ बँकेचे गव्हर्नर; आणि सर जेम्स मॅके ( हल्लीं बॅरन इंचेप ) ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचे डायरेक्टर. कलकत्त्यांतील करन्सी असोसिएशनचे मूळचे प्रमुख यांनीं हिंदी चलनपद्धतींतील चांदीला गचांडी देऊन सोन्याचा उपयोग करण्याची अवश्यकता किती आहे हें हिंदी सरकारला आग्रहानें सांगितलें. फडनिशीच्या आणि चलनाच्या बाबींत हे तीन सभ्य गृहस्थ लॉर्ड मोर्लेंचे मुख्य उपदेशक होते. सर्व हिंदुस्थानभर आज जी स्थिति इतक्या प्रतिकूल टीकेचा विषय होऊन राहिली आहे, तिची बरीच जबाबदारी यांच्या माथीं आहे. हल्लीं लिऑनेल ॲब्रहॅम यांची दुसऱ्या जागेवर नेमणूक झाली असून कायमचे फडनिशी, चिटणीस, माजी असिस्टंट सेक्रेटरी, मि. एफ्. डब्ल्यू. न्यू मार्च हे आहेत; आणि मार्क्विस ऑफ क्र्यू हे लॉर्ड मोर्लेंच्या जागीं आले

आहेत. तेव्हां इंडिया ऑफिसची अखेरची जबाबदारी लॉर्ड क्रयू यांची आहे.

लॉर्ड क्रयू यांचे पार्लमेंटमधले अंडर सेक्रेटरी नामदार ई. सॅम्युअल मॉंटेग हे आहेत. लंडनमध्यें हल्लीं असलेल्या प्रचंड नगदी शिलकांसंबंधीं इंडिया ऑफिस काय व्यवस्था लावणार आहे? या प्रश्नास पार्लमेंटमध्यें मि. मॉंटेग कांहीं तरी माहिती देऊन एकीकडून उत्तर देतो आणि पार्लमेंटपुढें असलेल्या विषयाशीं त्या माहितीचा कांहीं एक संबंध नसतो; आणि दुसरीकडून ओल्ड ब्रॉड-स्ट्रीटचे लगडीच्या चांदीसोन्याचे प्रख्यात व्यापारी मेसर्स सॅम्युअल मॉंटेग आणि कंपनी आपल्या दर आठवड्यास निघणाऱ्या व्यापारी प्रसिद्धिपत्रांत इंडिया ऑफिसच्या फडनिशी कारवाईचें एकसारखें मंडन करतें आणि तें अशा रीतीनें कीं, त्यांत नेहमीं त्यांच्या जुन्या लपंडावीच्या युक्त्याही भरलेल्या असतात ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. या युक्त्यांनीं लोक क्वचितच फसून जातील. हिंदुस्थानांतील सर्व लोकांना हें धोरण आतां अगदीं स्पष्ट होऊन गेलें आहे.

हिंदुस्थानांतील लोकांचें आणि व्यापाऱ्यांचें नुकसान करून इंडिया ऑफिसनें लंडनच्या कांहीं ठराविक लोकांच्या फायद्याकरितां हिंदी सरकारच्या अवाढव्य रकमांचा दुरुपयोग केल्याचा आरोप याप्रमाणें थोडक्यांत सांगितला. ही असामान्य स्थिति कशी उत्पन्न झाली आहे याचा आतां आपण थोड्या बारकाईनें खुलासा करूं.

---

# भाग ४.

## आरोपाचा खुलासा.

हिंदुस्थानचे नैसर्गिक फायदे वृद्धिंगत करण्याकरितां—मुख्यतः रेल्वे व पाटबंधारे यांच्याकरितां—वेळोवेळीं त्या देशांत ग्रेटब्रिटननें मोठमोठ्या रकमांची पुंजी घातली आहे, यामुळें कानडा, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या देशांप्रमाणें तो देश ग्रेटब्रिटनचा ऋणी आहे. या कर्जावरील व्याजाचा सालीना बोजा हल्लीं सरासरी एक कोटी पौंड आहे. याशिवाय फौज आणि आरमार या खात्यांतील पेन्शनें, फर्लो रजांचे पगार, आरमाराचा खर्च, रिसाल्यांतील नोकऱ्या वगैरेप्रीत्यर्थ हिंदुस्थानाला इंग्लंडांत सुमारें चाळीस लक्ष पौंड सालीना भरावे लागतात. अंदाजें वीस लक्ष पौंड सिव्हिल सर्व्हंटांचीं पेन्शनें व रजेमधले पगार यांकरितां द्यावे लागतात. हिंदुस्थानचा आकार, लोकसंख्या आणि संपत्ति यांच्या मानानें इंग्लंडांत द्यावयाचे हे बोजे कांहीं भारी नाहींत. आणि हिंदुस्थानाला या पैशाचा मोबदला फार चांगला मिळतो हें खास.

हे सालीना कर्जाचे बोजे फेडण्याचा परिपाठांतला उत्तम मार्ग कोणता आहे ? कानडा, ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका येथील सरकारांना जे पैसे लंडनांत भरावयाचे असतात ते ते आपल्या प्रमुख बँकांमार्फत अगर हुंड्या देऊन भरतात अशी चाल आहे. यासंबंधांत मॉन्ट्रीलची बँक, ऑस्ट्रेलेशियाची बँक, दक्षिण आफ्रिकें-तील स्टँडर्ड बँक, लंडन कौंटी आणि वेस्टमिनिस्टरची बँक,

इंग्लंडची बँक आणि दुसऱ्या प्रख्यात बँका यांचा उपयोग केला जातो. अशीच तजवीज हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीनें कैक वर्षांमागें केली असती, परंतु त्यास खालील गोष्टींची नड आली.

( १ ) वरील तीन तरुण वसाहतींच्या मानानें हिंदुस्थानास इंग्लंडांत भरावयाच्या रकमा फार मोठ्या होत्या.

( २ ) कॅलिफोर्निया व ऑस्ट्रेलिया येथील सोन्याच्या मोठाल्या खाणी सांपडल्यावर, सोन्याची किंमत भयंकर कमी होणार असें जेव्हां पुष्कळांना वाटलें तेव्हां हिंदी सरकारानें भिऊन जाऊन आपलें सोन्याचें चलन ( जुनी मोहोर ) सोडलें आणि एकजात चांदीचें चलन स्थापलें; आणि यामुळें इंग्लंडचें सोन्याचें चलन व हिंदुस्थानचें चांदीचें चलन यांच्या मापांत अंतर पडून फार घोंटाळा झाला.

( ३ ) इंडिया ऑफिसला आपल्या अधिकारांबद्दल आणि हक्कांबद्दल फार अभिमान होता व तो अजून आहे. कोणत्याही बाजूनें जेथें खानगी व्यक्तींचे उद्योग इंडिया ऑफिसला किंवा खुद्द हिंदी सरकारला होणाऱ्या फायद्यांच्या आड येण्यासारखे होते तेथें त्या उद्योगांचे फायदे इंडिया ऑफिस खानगी व्यक्तींना घेऊं देत नव्हते. इंडिया ऑफिसच्या अंगीं हा स्वभाव बहुशः पूर्वीच्या ईस्ट इंडिया कंपनीपासून जडला असावा. परंतु ही कंपनी शुद्ध व्यापारी मंडळी असून आपल्या प्रजेसंबंधाच्या कर्तव्यांचा विचार करण्यापूर्वी आपल्या स्वतःच्या निरनिराळ्या उद्योगांच्या फायद्याकडे साधारणतः लक्ष पुरवीत असे.

या गोष्टीमुळें असें झालें कीं, हिंदुस्थानाला इंग्लंडांत पाठविण्याच्या पैशाचीं सर्व सूत्रें स्टेट सेक्रेटरीनें आपल्या स्वतःच्या हातांत ठेवण्याचें ठरविलें. खानगी अँग्लो-इंडियन व्यक्तींना साम्राज्याच्या इतर भागांतल्या चालीप्रमाणें तो या कामाचा हिस्सा देत नाहीं, किंवा हिंदी बँकांना अगर हिंदी सावकारांना देशांतल्यादेशांत या देवघेवीपासून जो फायदा झाला असता तो त्यांनाही घेऊं देत नाहीं. या गोष्टी स्टेट सेक्रेटरीला करतां आल्या याचें कारण हें आहे कीं, आज फार वर्षांपासून हिंदुस्थानांत अधिक माल पैदा होऊन परदेशांतून जितका माल तो देश विकत घेत असतो त्यापेक्षां फार जास्त माल त्यानें परदेशांत पाठविला आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, चांगल्या सालांत हिंदुस्थानच्या घेण्याची बाकी साधारण बरीच मोठी वाढली असून परदेशांतून मौल्यवान् धातूंचा मोठा ऐवज आणून त्या देशांत त्या बाकीचा निकाल वारंवार लावावा लागतो. हिंदुस्थानच्या परदेशी व्यापाराची अशी स्थिति असल्यामुळें हिंदी व्यापार वाढविणाऱ्या बँका व दुसरे लोक यांना हिंदी चलनाच्या पैशाच्या पुरवठ्याची हिंदुस्थानांत नेहमीं जरूरी लागते. ही जरूरी अशी असे कीं, ती हिंदी सरकाराकडून प्रतिवर्षी लंडनांत एक कोटि पन्नास लक्षांपासून एक कोटि साठ लक्षांपर्यंत पाड घेऊन स्टेट सेक्रेटरी तेव्हांच त्यापुरती भागवूं शके. कारण हिंदी सरकार एकीकडे आपल्या निरनिराळ्या तिजोऱ्यांत जमाबंदीच्या मोठमोठाल्या रकमा जमवून दुसरीकडे लंडनांत पौन्डाचें ऋण करीत असे. अशा स्थितींत हिंदी तिजोऱ्यांतून रिकामे सांठलेले रुपये स्टेट सेक्रेटरीला लंडनांत द्यावयाच्या पौन्डाऐवजीं बँकांना व दुसऱ्या लोकांना विकण्यापेक्षां दुसरा सोपा मार्ग कोणता होता ? हा व्यवहार दोघां-

नाहीं उघड उघड सोयीस्कर होण्यासारखा होता. कारण, यापासून लंडनांत म्हणजे जेथें सरकारला पैसा पाहिजे होता तेथें एक कोटि पन्नास लक्षांपासून एक कोटि साठ लक्ष पौन्ड उत्पन्न होऊन त्या ऐवजाबरोबर हिंदुस्थानच्या फालतू परदेशी व्यापारांसाठीं बँकांना व इतर लोकांना हवे असलेले रुपये हिंदुस्थानांत मिळूं शकत. आणि इंडिया ऑफिसला लंडनांत आठवड्याच्या आठवड्यास पैसा मिळाला असता तर त्या ऑफिसला आणि बँकांना आणि इतर लोकांना तें जास्त सोयींचें झाल्यावांचून राहिलें नसतें. अशा रीतींनें कलकत्ता, मुंबई आणि मद्रास येथील हिंदी तिजोऱ्यांवर इंडिया कौन्सिलनें दिलेल्या हुंड्यांचे दर बुधवारीं लिलांव होऊं लागले. हे लिलांव इंग्लंडच्या बँकेंत दर आठवड्यास आज दिवसपर्यंत होत आहेत.

हिंदुस्थानच्या इतिहासांत कांहीं काळपर्यंत म्हणजे जून सन १८९३ ( या सालांत हिंदी टांकसाळी लोकांना बंद करण्यांत आल्या ) यापूर्वींच्या वीस वर्षांच्या बऱ्याच काळांत स्टेट सेक्रेटरीच्या रुपयांचे दर आठवड्यास लंडनमध्यें लिलांव होऊन हिंदुस्थानाला संयुक्त ब्रिटिश राज्याचें जें सोन्याच्या पौंडांचें ऋण आहे त्याची तोडजोड उत्तम तऱ्हेनें लावितां येत असे यांत संशय नाहीं. याचीं कारणें अशीं आहेत. सन १८७३ सालीं फ्रँको-जर्मन लढाई संपल्यावर जर्मनींनें आपल्या चलनाचें प्रमाण चांदीचें होतें तें काढून सोन्याचेंच फक्त केलें, व जर्मनीच्या या कृत्यापासून आपला बचाव करण्यासाठीं फ्रान्स आणि लॅटिनयूनिअनमधले इतर देश यांनीं लोकांना चांदीचें नाणें पाडून घेण्यास टांकसाळी खुल्या होत्या त्या बंद केल्या. यायोगानें सोन्याची किंमत वाढूं लागून सर्वसाधारण वस्तूंच्या ( यांत

चांदीसुद्धां आली ) किंमती उतरूं लागल्या. चांदीसोन्याच्या परस्पर किंमतींमध्यें हा जो बदल झाला त्यापासून हिंदी सरकाराला फार भयंकर अडचण उत्पन्न झाली. कारण हिंदी सरकाराला आपले ‘ होमचार्जेस ’ ( इंग्लंडमध्यें हिंदुस्थानाप्रीत्यर्थ होणारा खर्च ) देण्यासाठीं जे सोन्याचे पौंड लागत ते मिळविण्याकरितां रुपये पाहिल्यापेक्षां जास्त द्यावे लागले. त्या काळांत हिंदी टांकसाळी लोकांना आपली चांदी देऊन वाटेल त्या वेळेस तिचीं नाणीं पाडून घेण्याकरितां खुल्या होत्या. आणि ज्या कोणाला रुपये पाहिजे असतील त्यानें त्या वेळच्या बाजारभावानें चांदी खरेदी करून तीं कलकत्ता अगर मुंबई येथील टांकसाळींच्या अधिकाऱ्यांकडे नेऊन द्यावी आणि आपल्याला वाटतील तेवढे रुपये पाडून घ्यावे. ह्याचा परिणाम असा झाला कीं, लोकांना नवे रुपये पाडून घेण्यासाठीं हिंदुस्थानांत पाठवावयाच्या चांदीला जी किंमत पडे त्यापेक्षां कमी किंमतींत आपल्या हिंदी तिजोऱ्यांत असलेल्या आयत्या रुपयांना ( वार्षिक उत्पन्नांतून सांठलेल्या रुपयांना ) गिऱ्हाईक मिळण्यासाठीं स्टेट सेक्रेटरीला लंडनांत ते रुपये त्यांना देणें भाग पडे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे हिंदुस्थानावर काढलेल्या आपल्या कौन्सिलच्या हुंड्याचे जे दर, आठवड्याच्या आठवड्यास असत ते सर्वस्वी लंडनांत असलेल्या चांदीच्या भावावर अवलंबून होते. रुपयांच्या होणाऱ्या या लिलांवांत बँकवाले आणि दुसरे लोक बहुतकरून बोली लावीत. त्यांना जर चांदी खरेदी करून, व ती रुपये पाडण्यासाठीं हिंदी टांकसाळींत नेऊन, सारख्या कसोटीचा एक रुपया एक शिलिंग साडेचार पेन्सांला पडूं लागला तर स्टेट सेक्रेटरीला त्या एका रुपयाऐवजीं लिलांवांत एक शिलिंग

पांच पेन्स मागणें कांहीं कामाचें नव्हतें; इतकेंच नव्हे, तर स्टेट सेक्रेटरीच्या रुपयाच्या किंमतींत एका पेन्साचा एकषोडशांशाइतका जरी फरक पडला असता तरीसुद्धां लोकांना तो नाकारणें भाग पडलें असतें.

हिंदी टांकसाळी चांदीचे रुपये पाडून घेण्याकरितां लोकांना बंद होण्यापूर्वीं पंधरा वर्षांत स्टेट सेक्रेटरीला आपल्या रुपयांची किंमत आस्ते आस्ते कमी कमी घेणें भाग कां पडलें—म्हणजे चांदीची सोन्यांतली किंमत एकसारखी कमी कां होत गेली—आणि लोकांनीं चांदी खरेदी करून व ती हिंदुस्थानांत नेऊन आपली तरतूद करून घेण्याचा प्रयत्न केला असता तर त्यांना जे भाव पडले असते त्याहीपेक्षां कमी भाव स्टेट सेक्रेटरीला बँकवाल्यापासून आणि इतर गिऱ्हाइकांपासून कां घ्यावे लागले याचा खुलासा वरील गोष्टीनें होतो.

पूर्वीच्या काळांत स्टेट सेक्रेटरीला असें कां करावें लागत होतें याचीं कारणें स्पष्ट ध्यानांत आणणें अत्यंत अवश्य आहे; कारण ज्या परिस्थितीमुळें स्टेट सेक्रेटरीचें हें कृत्य घडून येत होतें ती जरी आतां बिलकुल राहिली नाहीं तरीसुद्धां कांहीं सबब अगर कारण नसतां स्टेट सेक्रेटरी अजूनपावेतों आपल्या कौन्सिलच्या हुंड्यांच्या लिलांवाचा जुना परिपाठ तसाच चालवीत आहे, आणि होम चार्जेस ( लंडनांत भरण्याचा खर्च )-पेक्षांही फारच अधिक रुपये. बँकांना व दुसऱ्या लोकांना ज्या भावानें अन्य रीतीनें रुपये मिळूं शकतात त्यापेक्षां कमी भावानें, तो अजूनपर्यंत देत आहे. आणि या कृत्यानें हिंदी रयतेचें नुकसान करून तो आपल्याजवळच्या लोकांचा दर आठवड्यास बराच मोठा फायदा करून देत आहे.

ह्या मुद्याचा जास्त सविस्तर खुलासा केल्यास बरें पडेल. गेल्या शतकांत सन १८९१–९२ सालीं ब्रुसेल्स येथें चलनाच्या कामांत शक्य असल्यास चांदीचा जास्त उपयोग करण्याची कांहीं सोय काढण्यासाठीं एक राष्ट्राराष्ट्रांची मॉनेटरी कॉन्फरन्स भरली होती. त्या वेळीं कांहीं लोकांना असें वाटलें होतें कीं, चांदीचा मुख्यत्वें-करून उपयोग करणारांनीं जर ती धातु आणखी जास्त उपयोगांत आणतां आली तर तिची सोन्यांतली किंमत वाढेल. या बाबींत ग्रेटब्रिटनची अनास्था असल्यामुळेंच कॉन्फरन्सची एकवाक्यता झाली नाहीं. मध्यंतरीं हिंदी सरकारानें आपलें विचारयुक्त मत असें नमूद करून ठेविलें होतें कीं, अशा प्रकारचा परिणाम घडून आल्यास आपण लोकांना चांदीचीं नाणीं पाडून घेण्यास हिंदी टांक-साळी एकदम बंद करूं आणि सोन्याचें प्रमाण स्थापण्याची व्यवस्था करूं. लॉर्ड हर्शलच्या कमिटीच्या शिफारशीवरून हिंदी सरकारास आपल्या मताप्रमाणें तरतूद करण्याची परवानगी मिळाली, आणि प्राथमिक योजना म्हणून १८९३ च्या जून महिन्यांत हिंदी टांक-साळी चांदीचीं नाणीं पाडून घेण्यास लोकांना बंद केल्या. त्याच वेळीं लोकांची अशीही समजूत करून दिली कीं, सरकार एका रुपयास एक शिलिंग चार पेन्स या मानानें हिंदी टांकसाळींत सोन्याचें नाणें आणि सोनें घेईल आणि सरकाराला देण्याचा पैसा म्हणून पौंड व अर्धा पौंड त्याच भावानें घेतले जातील.

वर जें सांगितलें आहे कीं, स्टेट सेक्रेटरीची पहिली परिस्थिति राहिली नाहीं, ती अशा तऱ्हेनें होय. लोकांना हिंदी टांकसाळी बंद केल्यावर त्यांना हिंदी पैशाच्या मोठमोठाल्या रकमा मिळविण्यासाठीं दोन मार्गांशिवाय तिसरा मार्ग राहिला नाहीं. एक तर सोनें हिंदु-

स्थानांत नेऊन सरकारापासून त्या सोन्याचे एक शिलिंग चार पेन्सांस एक रुपया या भावानें रुपये घ्यावे अगर हिंदी तिजोऱ्यांवर काढलेल्या कौन्सिल हुंड्यांची स्टेट सेक्रेटरी मागेल ती किंमत ( एक शिलिंग चार पेन्स अथवा त्याच्याखालीं ) द्यावी. या कारणाकरितां त्या वेळेपासून रुपये विकण्याचें काम म्हणजे स्टेट सेक्रेटरीचा मक्ता होऊन बसलें, आणि त्याच्या खुषीला येतील तसे रुपये विकून एका रुपयास एक शिलिंग चार पेन्सपर्यंत वाटेल ती किंमत त्याला मिळूं लागली. एका रुपयाला एक शिलिंग चार पेन्सच तो घेईल असें प्रत्येकाला वाटलें; परंतु त्याचा वानवा होता. थोडे महिने गेल्यावर आपल्या एका रुपयाची किंमत एक शिलिंग चार पेन्स असून त्यापेक्षां आपण कमी घेणार नाहीं असें जाहीर करण्याऐवजीं कमींत कमी किंमतीची आपण खात्री देत नाहीं; परंतु आपल्या रुपयांच्या सर्व मागण्यांचा विचार त्यांच्या 'गुणदोषां'वरून करूं असें व्यापारी मंडळींना गंभीरपणें कळवून स्टेट सेक्रेटरीनें त्यांना चकित करून सोडलें. या अत्यंत अव्यावहारिक ( व्यवहारशून्य ) कृतीनें लोकांची त्या वेळीं पांचावर धारण बसून स्टेट सेक्रेटरीला कित्येक वर्षेंपावेतों हवे असलेले एका रुपयाला एक शिलिंग चार पेन्स पुरतेपणीं मिळेनासे झाले. कोणाला आश्चर्य वाटेल, पण स्टेट सेक्रेटरी एका रुपयास एक शिलिंग चार पेन्सपेक्षां कमी किंमतींत रुपये देण्याचें आपलें उपहासास्पद काम अजून चालवीत आहे. उदाहरणार्थ, सन १९१० च्या तारीख १८ मे पासून ऑगस्ट तारीख १० पर्यंत त्यानें एकही रुपया विकण्याची यत्किंचित् गरज नसतां सुमारें तीन कोटी रुपये ( वीस लाख पौंड ) एका रुपयास एक शिलिंग चार पेन्सांपेक्षां कमी किंमतींत लिलांव करून विकले.

अशा दोषार्ह विक्रीनें हिंदी सरकारचा पैसा लंडनांत आणून आधींच त्यांच्या हातांत असलेल्या हिंदी सरकारच्या नगदी शिलकेंत भर टाकली. स्टेट सेक्रेटरीजवळ पुढील तारखांस शिलका होत्या त्या येणेंप्रमाणें:—

| | | |
|---|---|---|
| | | पौंड. |
| मे तारीख ३१ रोजीं | ... ... | १३७५३१८९ |
| जून तारीख ३० ,, | ... ... | १४२९११८४ |
| जुलई तारीख ३१ ,, | ... ... | १३२०२७५४ |

गेल्या वर्षी याचप्रमाणें शिलकी होत्या. सन १९११ च्या मे महिन्याच्या अखेरीस स्टेट सेक्रेटरीच्या हातांत हिंदी सरकारची १८२२२४५१ पौंड—म्हणजे एक वर्ष आगाऊ हिंदुस्थानच्या होम चार्जेस ( इंग्लंडांत भरावयाचा खर्च ) देण्यापुरती शिल्लक असूनही तो रुपये, एक शिलिंग चार पेन्सांपेक्षां कमी भावानें फिरून विकीतच होता. या प्रकारच्या व्यवहारानें इंडिया ऑफिसला हिंदुस्थानचा कोणता फायदा आपण करतों असें वाटतें ?

हिंदुस्थानचें चांदीच्या प्रमाणाचें चलन काढून सोन्याच्या प्रमाणाचें चलन स्थापण्यासंबंधांत सर्वांत ढोबळ व भयंकर चूक ही झाली कीं, सोन्याचीं नाणीं वाटेल त्याला पाडून घेण्यास हिंदी टांकसाळी इंडिया ऑफिसनें खुल्या केल्या नाहींत. सत्तेच्या जोरावर झालेल्या या अयोग्य कृतीमुळें ब्रिटिश—इंडियन राज्यव्यवस्थेच्या इतिहासांत अद्वितीय, अद्भुत व बेशिस्तपणाचे पैशाचे प्रकार एकावर एक झाले आहेत. खुल्या टांकसाळींशिवाय अंमलांत आणलेली चलनाची पद्धत बिलकुल अपरिपक्व असून ती टिकण्यासाठीं दुसऱ्या एखाद्या राष्ट्राच्या योग्य व परिपूर्ण चलनपद्धतीवर अवलंबून रहावें लागतें आणि

अर्वाचीन काळांतल्या कोणत्याही चलनपद्धतीशीं अशा पद्धतीची बिलकुल बरोबरी होणार नाहीं. देशांत खुली म्हणजे लोकांना वाटेल त्या वेळेस सुलभ अशी टांकसाळ ही मुख्य व महत्वाची बाब असते, याशिवाय चलनांत असलेले धातूच्या पैशाचे परिमाणाची किंवा किंमतींच्या सर्वसाधारण मर्यादेची परिस्थित्यनुरूप आपोआप व्यवस्था लावतां येणार नाहीं. हल्लींच्या खुल्या टांकसाळीचीं खरीं कार्यें काय आहेत यासंबंधानें बराच गैरसमज झाला असल्याकारणानें या अत्यंत महत्वाच्या राष्ट्रकारखान्याच्या मुळाशीं कोणतें तत्व आहे याचा खुलासा केल्यास बरें पडेल.

किंमतीच्या सामान्य मर्यादेचा संबंध प्रत्यक्ष चलनांत असलेल्या पैशाच्या परिमाणाशीं आहे. आतां हें खरें आहे कीं, थोड्याशा धातच्या आश्रयावर प्रचंड पतीची देवघेव चालत असल्यामुळें हा संबंध हल्लींच्या दिवसांत बराच दिसेनासा झाला आहे; तथापि असा संबंध आहे हें कोणीही कबूल करील. उदाहरणार्थ, एखाद्या भागांत एकाएकीं कच्चया पैशाचें म्हणजे सोन्याचें मोठें डबोलें सांपडलें तर तेथें किंमतीच्या मानानें पैसा सवंग होऊन पैशाच्या मानानें किंमती चढतात. किंमतीच्या वाढलेल्या मर्यादेमुळें जगांतील दुसऱ्या भागांतून विकाऊ वस्तु त्या भागांत येतात म्हणजे सोनें उत्पन्न होत असलेल्या भागांत माल येऊन सोनें त्यांतून बाहेर निघतें. माल पुरविणाऱ्या देशांत ( उदाहरणार्थ, इंग्लंड म्हणजे जेथें टांकसाळ खुली असल्यामुळें सोन्याची पारख व पडताळ सहज होऊन त्याचे पौंड पाडले जातात ) मौल्यवान् धातु जशी येत जाते तशी त्या मालाच्या मानानें सोनें विपुल असल्याकारणानें त्या देशांतल्या मालाच्या सामान्य किंमतीची मर्यादा वाढते. याचा परिणाम काय होतो ?

इंग्लंडांत किंमती अधिक झाल्यामुळें दुसऱ्या देशांतून विकाऊ माल तेथें जास्त येतो आणि इंग्लंडाला आपल्या नव्या पैदा केलेल्या सोन्याचा कांहीं भाग देशांतरीं पाठविणें भाग पडतें. देशांतरीं खुल्या टांकसाळी असल्यावर त्या सोन्याचे गरज पडल्यास, माल आणणाऱ्या देशांतील कायदेशीर चलनाचे पैसे तेव्हांच पाडतां येतात. असें एकंदर हें चक्र आहे. आपल्या समोर फार स्पष्ट आणि साध्या तऱ्हेनें ठेविलेली अशी ही राष्ट्राराष्ट्रांच्या व्यापाराची कल्पना आहे, तसेंच एका देशांतून दुसऱ्या देशांत पैसा कां जावा याचें अंतिम कारणही आपल्यासमोर स्पष्ट आहे. ज्या देशांत मालाच्या किंमती कमी असतात त्या देशांतून माल जेथें किंमती अधिक आहेत तेथें जात असतो आणि धातूचा पैसा महाग मालाच्या देशांतून स्वस्त मालाच्या देशांत जातो. धातूचा पैसा जसजसा नव्या तिजोऱ्यांत येऊन पडतो तसतशा तेथल्या किंमतीच्या मर्यादा वाढतात आणि असें झालें म्हणजे फिरून किंमतींच्या मर्यादा आणि धातूच्या पैशाच्या मर्यादा यांची तोडजोड होते. ही तोडजोड सर्व जगभर सर्वकाळीं घडून येत आहे; मात्र इतकें काळजीपूर्वक ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, ही तोडजोड त्या त्या देशांच्या कोणत्याही सरकारांच्या प्रेरणेनें अगर प्रत्यक्ष मदतीनें होत नसून व्यापारी लोकांच्या खटपटीं आणि त्यांच्या गरजा यांमुळें होत असते. या कामांत सरकारचें कर्तव्य म्हणजे इतकेंच कीं, त्यांनीं नुसता अवश्य लागणारा पैशाचा कारखाना पुरवावयाचा म्हणजे सरकारी टांकसाळेची योजना करावयाची. अशी कीं, तेथें पैशाचें मुख्य प्रमाण मानली जाणारी मौल्यवान् धातु आणून, शुद्ध करून, लोकांना लागेल तसा आणि लागेल त्या वेळीं तिचा पैसा पाडून घेतां येईल.

लोकांना वाटेल त्या वेळेस चांदीचें नाणें पाडून घेण्यास हिंदी टांकसाळी बंद झाल्याबरोबर त्याच टांकसाळी वाटेल त्या वेळीं सोन्याचीं नाणीं—विशेष प्रकारचीं हिंदी सोन्याचीं नाणीं असल्यास बरें—पाडून घेण्यास लागलींच खुल्या केल्या पाहिजे होत्या. सन १८९८ सालच्या हिंदी चलन-कमिटींत नांवाजलेले लोक असून ते व्यापार व चलन या विषयांत वाकबगार होते. त्यांनीं एकमतानें अशी शिफारस केली कीं, ज्या शर्थीवर रॉयल टांकसाळीच्या ऑस्ट्रेलियांत तीन शाखा आहेत त्या शर्थीवर हिंदी टांकसाळी सोन्याचीं नाणीं वाटेल तेव्हां पाडून घेण्यास लोकांना खुल्या कराव्या, तरीसुद्धां स्टेट सेक्रेटरी हें करण्यास चुकला आणि हिंदुस्थानांत अजूनपावेतों चलनपद्धतीला अत्यंत अवश्य लागणाऱ्या गोष्टीचा अभाव आहे. या गोष्टीच्या अभावीं त्या देशाची चलनपद्धत मध्य-काळांतल्या जुन्या धर्तीवर चालत आहे. या धर्तीमुळें प्रत्येक प्रकारच्या लबाडीला व ठकबाजीला वाव मिळत असल्याकारणानें अर्थ-शास्त्रवेत्त्यांनीं त्या दोषी ठरविल्या आणि मुत्सद्यांनीं एक शतकापूर्वींच त्या काढून टाकल्या आहेत.

स्टेट सेक्रेटरी लोकांना वाटेल तेव्हां सोन्याचीं नाणीं पाडून घेण्यास हिंदी टांकसाळी खुल्या करण्यास चुकल्यामुळें हिंदी पैशाची तात्पुरती उडवाउडव, विलक्षण खटपटी आणि बेशिस्त उद्योग एकावर एक चालले आहेत; आणि या स्थितीचें उदाहरण दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या चलनाच्या इतिहासांत सांपडणार नाहीं. हिंदु-स्थानचे इंग्लंडांत भरावयाचे होमचार्जेस प्रतिवर्षी एक कोटी पन्नास लक्षांपासून एक कोटी साठलक्ष पौंडांपर्यंत झाले होते हें वर सांगि-तलें आहे; त्याचप्रमाणें वर नमूद केलेल्या कित्येक कारणांसाठीं हिंदी

तिजोऱ्यांतून सांचलेले रुपये विकून व त्याऐवजीं लंडनास सोनें घेऊन ह्या होमचार्जेसची (हिंदुस्थानच्या लंडनास भरावयाच्या खर्चाची) व्यवस्था उत्तम रीतीनें लावतां येईल असें स्टेट सेक्रेटरीनें ठरविलें. थोड्याबहुत रुपयांचा दर आठवड्यास लिलांव करून विकून टाकण्याचा हा प्रघात हिंदुस्थानांत चांदीचें प्रमाण असलेल्या काळांत अगदीं योग्य होता; परंतु हल्लीं हिंदी टांकसाळी लोकांना बंद झाल्या असूनही व आठवड्याचे लिलांव करण्याचीं कारणें आज कित्येक वर्षें नाहींशीं झालीं असूनही स्टेट सेक्रेटरीनें तो प्रघात अजून तसाच चालविला आहे. तथापि हिंदुस्थानानें आपल्या होमचार्जेसबद्दल द्यावयाच्या एक कोटी पन्नास लक्षांपासून एक कोटी साठ लक्ष पौंडांपर्यंत, त्या देशावर काढलेल्या कौन्सिलहुंड्या विकण्याची ही पद्धत चांगली कामास आली. परंतु व्यापारांत हिंदुस्थानच्या येण्याची बाकी या रकमेवर झाली तर त्याचा परिणाम काय व्हावयाचा? राहिलेल्या बाकीची व्यवस्था कशी लावावयाची? एक कोटी पन्नास लक्षांपासून एक कोटी साठ लक्ष पौंडांपर्यंतच्या फेडीसाठीं स्टेट सेक्रेटरी करीत असलेली रुपयांची विक्री पुरी पडली असती. राहिलेल्या बाकीबद्दल नेहमींचा मार्ग—जो जगांतील प्रत्येक देशानें स्वीकारला आहे—म्हटला म्हणजे लोकांना हिंदुस्थानांत सोनें आणतां येणें हा होय. परंतु हिंदुस्थानांत खुली टांकसाळ असल्याशिवाय लोकांना हिंदुस्थानांत देण्याकरितां त्या सोन्याचा पैसा कसा पाडावयाचा? हिंदी सरकाराला घेण्याचा पैसा पौंडांमध्यें घेण्यास तें सरकार राजी झालें. आणि इंग्रजी गिनी हिंदुस्थानांत चालविण्यापर्यंत त्या सरकारची मजल गेली. तथापि हिंदुस्थानच्या लोकांना अगदीं अपरिचित असलेलीं परदेशचीं सोन्याचीं नाणीं त्यांना एकदम आवडूं लागतील

अगर प्रारंभीं धान्य वगैरे हलविण्याचे कामीं विशेष उपयोगीं पडतील असें क्वचितच कोणाला वाटेल. अशा स्थितींत काय करावयास पाहिजे होतें ?

स्टेट सेक्रेटरीला लंडनास सोनें भरून बँकवाल्यांना व इतर लोकांना लागतील तसतसे रुपये कलकत्ता, मुंबई अथवा मद्रास येथें घेण्याची पद्धत त्या बँकवाल्यांना व या व्यवहाराशीं संबंध असलेल्या इतर लोकांना इतकी सोयीची व साधी होती कीं, हिंदुस्थानचे होमचार्जेस देण्याकरितां जे एक कोटी पन्नास लक्षांपासून एक कोटी साठ लक्ष पौंड लागत होते, तेवढ्यापुरतेंच इंडिया ऑफिसानें, हिंदी व्यापाऱ्यांच्या हितदृष्ट्या, थांबूं नये असें या व्यवहारापासून फायदा होत असलेल्या लोकांनीं इंडिया ऑफिसाला सांगावें, याचें आपल्याला आश्चर्य वाटावयास नको. इंडिया ऑफिसानें राष्ट्राराष्ट्रांच्या पैशाच्या व्यापाररूपी सागरांत आपलें सुकाणूं वळवून बँकवाल्यांना व इतर लोकांना—कीं ज्यांचें साधारण काम म्हटलें म्हणजे सोन्या—चांदीच्या लगडी आणि नगद ज्यां देशांत त्यांची जरूर नाहीं त्या देशांतून जेथें त्यांना मागणी आहे तेथें नेण्याचें त्यांना—हिंदुस्थानांत जितक्या पैशाची जेव्हां आणि जेथें जरूर लागेल तितका पैसा त्या वेळीं तेथें पुरवावा, येथपर्यंत इंडिया ऑफिसला भर घालण्याची स्वार्थी लोकांची मजल गेली. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे हिंदुस्थानासंबंधानें असा वाद पुढें आणण्यांत आला कीं, स्टेट सेक्रेटरीनें हिंदी रयतेचें नुकसान करून या स्वार्थी लोकांसाठीं बँकांचें थोडें बहुत काम केलें पाहिजे. अशा प्रकारच्या सूचना लंडन येथील कानड्याच्या अगर ऑस्ट्रेलियाच्या हायकमिशनरास किंवा साम्राज्याच्या राजधानींत असलेल्या दक्षिण आफ्रिकन

युनियनतर्फेंच्या प्रतिनिधींस केल्या तर किती हंशा उडून जाईल याची कोणाही तज्ज्ञ मनुष्याला सहज कल्पना होईल. इतकें असूनही इंडिया ऑफिसनें हें काम उत्साहानें आपल्या अंगावर घेतलें आहे. आणि आतां हिंदुस्थानच्या होमचार्जेसबद्दल जवळ जवळ एक कोटी साठ लक्ष पौंडांची सर्व रक्कम जरूरीपेक्षां जास्त नुकसान करून हिंदुस्थानांतून काढून घेतल्यावर थोड्याशा हिंदी देवघेवीच्या बँकांच्या व इतर लोकांच्या सांगण्यावरून हिंदी सरकारचा जितका पैसा तात्पुरत्या कामास आणण्याची त्यांची इच्छा असेल तितका सर्व त्या देशांतून काढून घेण्यास इंडिया ऑफिस बाह्यतः तयार झालें आहे. आणि अधिक आश्चर्य हें कीं, हिंदुस्थानांत सोन्या—चांदीच्या लगडी व नगद आणून खुल्या पेठेंत आपल्या पैशाची तरतूद लावून घेण्यास जितका खर्च बँकांना लागला असता त्यापेक्षां कमी खर्चांत त्या बँकांच्या वतीनें इंडिया ऑफिस हे पैशाचे व्यापार चालविण्यास तयार आहे ! हिंदी सरकारच्या नगद शिलकेंपैकीं सुमारें दोन कोटी पौंड शिल्लक लंडनांत असूनही इंडिया ऑफिस आपली ही पैशाची हिकमत कमी करण्याचीं चिन्हें दाखवीत नाहीं. उलट, जेव्हां कांहीं दिवसांमागें ( १९१२ च्या मार्च महिन्याच्या १९ व्या तारखेस ) हिंदुस्थानांतून सरकारी पैसा यापुढें काढण्याचें बंद करण्याची सल्ला स्टेट सेक्रेटरी मनांत आणील किंवा नाहीं, असा प्रश्न हाऊस ऑफ कामन्समध्यें कर्नल सी. ई. येट यानीं विचारला, तेव्हां अंडर सेक्रेटरी मि. सॅम्युअल मॉन्टेग यानीं, खरोखर लोकांना थक्क करून सोडणारा जबाब दिला कीं, “ हिंदुस्थानावरच्या आपल्या हुंड्यांची विक्री बंद केल्यास हिंदी व्यापारास अत्यंत नुकसानकारक धक्का बसून त्या व्यापारांत पडलेल्या लोकांची त्रेधा उडेल असा लॉर्ड

क्र्यू यांस पक्का भरंवसा आहे. " म्हणजे याचा अर्थ, जर स्टेट सेक्रेटरी बँकांचें काम सरकारी खर्चानें स्वतः न करतां त्यांचें त्यांना करूं देईल, ( कानडा, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका येथील बँकांना जसें खरोखर करावें लागतें ) तर हिंदी व्यापाराला अत्यंत नुकसानकारक धक्का बसेल ! अशा प्रकारचा जबाब म्हणजे निव्वळ थट्टा होय हें सांगण्याची जरूरी नाहीं.

हिंदुस्थानांतून हिंदी सरकारच्या भांडवलापैकीं लाखों रुपये लंडनांत आणण्याच्या इंडिया ऑफिसच्या या गैरशिस्त चालीसंबंधानें आणखी एक अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. त्याचा आतां थोड्या शब्दांत विचार करूं. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थान देश साधारणतः दुसऱ्या देशांपासून जितका माल विकत घेतो त्यापेक्षां फार अधिक माल दुसऱ्या देशांना विकीत असतो. याचा परिणाम असा होतो कीं, साधारणतः होमचार्जेसपेक्षां बऱ्याच जास्त पैशाचें त्या देशाला घेणें असून हें घेणें तो देश बहुतकरून नेहमीं नगदीनें हल्लींच्या दिवसांत सोन्याच्या रूपानें घेतो. जगांतील इतर सुधारलेल्या देशांप्रमाणें हिंदुस्थानाला सोन्याच्या पैशाची, सोन्याच्या दागदागिन्यांची आणि साधारण इतर सोन्याच्या वस्तूंची आवड उत्पन्न होत चालली आहे. म्हणून प्रत्येक वर्षीं बाहेरून पूर्वीपेक्षां अधिक सोनें हिंदुस्थानांत येतें. खास हिंदुस्थानच्या खाणींतून दर वर्षीं वीस लक्ष पौंडांवर सोनें पैदा होतें, परंतु हिंदुस्थानांत खुली टांकसाळ नसल्यानें हें सर्व सोनें पडताळण्यासाठीं इंग्लंडांत पाठवावें लागतें. हें निर्गत सोनें वजा करतां, मार्च तारीख ३१ सन १९१० रोजीं पुऱ्या होणाऱ्या पांच वर्षांत हिंदुस्थानांत खास सोनें सालीना जवळ जवळ एक कोटी सोळा लक्ष पौंडांचें आलें. गेल्या वर्षीं एक कोटी

शांयशीं लक्ष पौंडांचें आलें आणि बरसात चांगली होत गेल्यास हा आंकडा लवकरच वाढेल अशीं चिन्हें दिसत आहेत.

जगांत सोन्याची मुख्य पेठ लंडन आहे. असें असून जगांतील दुसऱ्या कोणत्याही मोठ्या राष्ट्रापेक्षां ग्रेट ब्रिटन आपला जगड्व्याळ व्यापार सोन्याच्या कमी शिलकेवर चालवीत आहे. लंडनच्या पैशाच्या पेठेंतील कांहीं लोकांना हिंदुस्थानच्या या प्रतिवर्षी वाढणाऱ्या सोन्याच्या मागणीमुळें बरीच काळजी उत्पन्न झाली आहे. लंडनमध्यें असा प्रश्न उपस्थित झाला आहे कीं, या मागणीला आळा कसा बसवावा ? प्रत्येक वेळीं स्टेट सेक्रेटरी हिंदुस्थानचा पैसा लंडनास जो आणतो त्यामुळें हिंदुस्थानच्या व्यापारी घेण्याची बाकी तात्पुरती कमी होते आणि म्हणून त्या वेळेपुरती त्या बाकीची व्यवस्था लावून टाकण्यास जें सोनें हिंदुस्थातांत यावयाचें त्यास विलंब लागतो. लंडनमधल्या कांहीं बँकवाल्यांचें व व्यापाऱ्यांचें यायोगानें काम भागतें आणि तेथें त्याची तारीफही होते. कारण लंडनचा सोन्याचा सांठा जर नेहमींपेक्षां जास्त लवकर कमी झाला तर लंडनमध्यें पैसा व सोनें यावें म्हणून इंग्लंडच्या बँकेला आपला कटमितीच्या व्याजाचा दर वाढविणें भाग आहे. परंतु लंडनचा कटमितीचा दर एकदम वाढणें म्हणजे उसनवार पुंजीवर चालणाऱ्या सर्व व्यापारावर म्हणजे, इंग्लंडच्या विस्तीर्ण व्यापारावर अधिक व्याजाचा बोजा लादणें. अशा स्थितींत इंडिया ऑफिसला या गैरशिस्त मार्गानें जाण्यास आग्रहानें सांगणारे व स्टेट सेक्रेटरी जो हिंदी सरकारचा पैसा लंडनास आणतो तें शहाणपणाचें करतो आणि या कृत्यामुळें लंडनच्या पैशाच्या पेंठेच्या गरजा काय आहेत हें तो चांगलें समजतो अशी त्याची स्तुति करणारे पुष्कळ भेटतात

ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे. आपण वाहून नेत असलेल्या दुसऱ्या कोणाच्या पैशाच्या लाखों रकमांवर त्याला कांहीं हक्क आहे किंवा नाहीं याची कोणी चौकशी करीत बसत नाहीं.

येथें अशी तक्रार येते कीं, हिंदुस्थानांतून हिंदी पैशापैकीं तीन कोटींपासून तीन कोटी पन्नास लक्ष पौंडांपर्यंत पैसा लंडनास नेऊन तितकेंच सोनें हिंदुस्थानांत आणण्याचें तात्पुरतें लांबणीवर टाकण्यास स्टेट सेक्रेटरीला कोणताही हक्क नाहीं. शिवाय अशा प्रकारचें धोरण नुसतें वेडेपणाचें ठरून थांबत नाहीं ( कारण, हिंदुस्थान केव्हांना केव्हां तरी आपलें हक्काचें सोनें घेतल्याशिवाय रहाणार नाहीं ), तर त्यायोगें हिंदुस्थानावर फार मोठा अन्याय होऊन आपल्या स्वतःच्या सुधारणेसाठीं ज्या भांडवलाची अत्यंत जरूर आहे त्याला तो देश मुकतो आणि त्या देशाचा कायदेशीर हक्क जें कांहीं ठराविक व्याज तें लुबाडलें जाऊन तेथील ज्या लाखों लोकांची श्रीमंती कांहीं वांयां जात नाहीं, आहे अशावर व्यर्थ कर मात्र बसतो. हे भयंकर आरोप आहेत; परंतु येवढ्यानेंही हे पुरे होत नाहींत.

सन १९१२ च्या मार्च महिन्याच्या ११ व्या तारखेस, हिंदी सरकारच्या जमेस इंडिया ऑफिसनें लंडन येथें नेमका किती पैसा ठेवला आहे यासंबंधानें हाऊस ऑफ कामन्समध्यें विचारणा झाली असतां, अंडर सेक्रेटरी मि. मॉंटेग यानीं जबाब दिला कीं, सोन्याचें प्रमाण राखण्यासाठीं जी ठेव जमली आहे ( सुमारें एक कोटी सत्तरलक्ष पौंड ) ती सोडून सन १९१२ च्या मार्च महिन्याच्या १२ तारखेस संध्याकाळीं लंडन येथें हिंदी सरकारच्या जमेस

असलेली प्रत्यक्ष शिल्लक १७९५३९९५ पौंड १८ शिलिंग ३ पेन्स होती. एवढ्या प्रचंड नगदी ठेवीची वाट काय झाली आहे ?

ह्या प्रश्नास सन १९१२ मार्च तारीख २२ रोजीं वरिष्ठ कायदे कौन्सिलांत अशा प्रकारचा जबाब देण्यांत आला.

( अ ) गेल्या दिसेंबरच्या ३१ तारखेस लंडन येथें "प्रसंती-" च्यां बँकांना कोणतीही हमी न घेतां ३७१५००० पौंड उसनवार दिले गेले.

( ब ) त्याच तारखेस तेथें " पसंती " च्या ऋणकोंना हमी घेऊन १०६५०००० पौंड उसनवार दिले होते.

कोणतीही हमी न देतां अडीच टक्क्यांनीं उसनवार घेतलेल्या हिंदी सरकारच्या पैशाचा फायदा घेणाऱ्या पसंतीच्या बँका ह्या होत्या:—

( १ ) लंडन आणि स्मिथ यूनिअन बँक (गव्हर्नर सर फेलिक्स शूस्टर, स्टेट सेक्रेटरीचे जमाखर्ची सल्लागार. )

( २ ) लंडन कौंटी आणि वेस्ट मिनिस्टर बँक.

( ३ ) इंग्लंडची नॅशनल आणि प्रॉव्हिन्शिअल बँक.

( ४ ) लंडन जॉइंट स्टॉक बँक.

( ५ ) लंडन सिटी आणि मिडलंड बँक.

( ६ ) ग्लिन, मिल्स, क्युरी आणि कंपनी.

( ७ ) बार्क्ले आणि कंपनी.

दुसरे " पसंतीचे ऋणको " ( म्हणजे लंडनचे सामायिक पुंजीवाले बँकर्सखेरीज दुसरे ) कोण आहेत याची अजूनपर्यंत लोकांना

माहिती नाहीं. या सुदैवी साकावरांना हिंदुस्थानच्या चालू नगदी शिलकेपैकीं सुमारें एक कोटी दहा लक्ष पौंड अडीच टक्क्यांपेक्षां किंचित् अधिक दरानें मिळाले आहेत. इकडे मुंबई इलाख्याची बँक आणि बंगालइलाखा बँक यांचा दर ७ टक्क्यांचा आहे !

हिंदी सरकारच्या पैशाच्या या अवाढव्य रकमा हिंदुस्थानांत मिळूं शकेल त्यापेक्षां फार कमी व्याजाच्या दरानें उसन्या देऊनही स्टेट सेक्रेटरीचें समाधान होत नाहीं. त्याबरोबरच त्यानें हिंदी सरकारासाठीं लंडनमध्यें तीन टक्क्यांपेक्षां किंचित् कमी दरानें पंचेचाळीस लक्ष पौंड उसने घेतले आहेत. कशाकरितां ? आणि या सर्व व्यवहाराचा अर्थ काय ?

राष्ट्रीय चौकशी होण्यालायक जर कोणता विषय असेल तर इंडिया ऑफिसाचीं हीं चमत्कारिक कृत्यें होत. राष्ट्र याचा काय निकाल लावील तें एक काळच दाखवूं शकेल. या मुकदम्याचें कोडें अविवरणीय दिसतें. फिर्यादीची बाजू असाधारणपणें मजबूत आहे. आतां आपण बचावाचे कांहीं साक्षीदार काय सांगतात तें पाहूं.

---

# भाग ५.

## हिंदुस्थानांतील बचावाचे साक्षीदार.

आरोपाचा पहिला भाग असा आहे कीं, सन १८९३ च्या जून महिन्यांत, लोकांना वाटेल तशीं चांदीचीं नाणीं पाडून घेण्याकरितां हिंदी टांकसाळी ज्या खुल्या होत्या त्या बंद करून, पुरेशी मौल्यवान् धातु टांकसाळींत आणून दिल्यावर वाटेल तितका पूर्ण

कायदेशीर चलनाचा पैसा पाडून घेण्याचा जो त्यांचा हक्क तो इंडिया ऑफिसनें नाहींसा केला. आणि सोन्याचीं नाणीं पाडून घेण्यासाठीं हिंदी टांकसाळी लोकांना खुल्या करून व हिंदुस्थानचीं पैशाच्या बाबींत जी पूर्वी स्थिति होती ती पुन्हां आणून देण्याकरितां या बाबतींत कांहीं उपाय योजणें तें इंडिया ऑफिसनें आज दिवस-पर्यंत केलें नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं, जुन्या मोहरा आणि पुतळ्या ग्रेटब्रिटननें अजीबात बंद करण्याच्या पूर्वी हिंदुस्थानचें जसें सोन्याचें चलन होतें तशा प्रकारच्या विशिष्ट सोन्याच्या चलनाचे फायदे जे त्या देशाला होते ते इंडिया ऑफि-सनें बुडविले इतकेंच नाहीं तर त्या देशाची सर्व साधारण पैशाची स्थिति कमजोर करून तेथें पैदा होत असलेलें स्वतःचें सर्व सोनें—सालीना वीस लक्ष पौंड—पडताळून पैसे पाडून घेण्यासाठीं लंडनास पाठविणें त्या देशाला भाग पाडलें. या एकंदर स्थितीचें पर्यवसान म्हणजे हल्लीं हिंदुस्थानाला अशा कांहीं, सरकारच्या मालकीच्या व स्वयंस्फूर्तीनें चालणाऱ्या कारखान्याची उणीव आहे, कीं तो कार-खाना नसेल तर पूर्वी खुलासा केल्याप्रमाणें किंमतींच्या किंवा पैशाच्या मर्यादा वस्तुस्थितीशीं आपोआप जुळणार नाहींत. आणि या उणिवीमुळें त्या देशांतील चलनाची "व्यवस्था" नेहमीं व्हाइटहॉल किंवा कलकत्ता येथील कोणी तरी अधिकाऱ्यानें ठेवणें भाग झालें आहे. या पीछेहाटी धोरणामुळें हिंदुस्थान देश चलनाच्या बाबींत मध्यकाळच्या संकटमय स्थितीपर्यंत मागें घसरला आहे.

जेव्हां हिंदी टांकसाळी प्रथम चांदीचीं नाणीं पाडून घेण्याकरितां बंद करण्यांत आल्या, तेव्हां या व्यवस्थेपासून कोणते परिणाम घडून येण्याचा संभव आहे हें स्पष्टपणें ध्यानांत आणलें नाहीं.

आणि लॉर्ड हर्शेल कमिटीच्या शिफारसीवरून जरी हिंदी सरकारानें हिंदी टांकसाळींतून एका रुपयास एक शिलिंग चार पेन्स सोनें घेऊन रुपये पाडून देण्याचें आपल्या अंगावर घेतलें व असें करून रुपयाची सोन्यांतली किंमत एकदम वाढूं नये म्हणून खबरदारी घेतली तरी इंडिया ऑफिसकडून अगर हिंदी सरकारकडून सोन्याचीं नाणीं वाटेल तेव्हां पाडून घेण्यासाठीं टांकसाळी खुल्या करण्याची सूचना पुढें आणली गेली नाहीं. ही सूचना पुढें करण्यांत आली ती अशा रीतीनें—

सन १८९८ सालीं स्टेट सेक्रेटरीनें १८९३ सालांत चांदीचीं नाणीं वाटेल त्याला पाडून घेण्यासाठीं हिंदी टांकसाळी बंद करण्याचें धोरण जें अंमलांत आणलें गेलें त्यासंबंधानें पुढें काय तजविजी करावयाच्या याचा रिपोर्ट करण्यासाठीं फार हुषार लोकांची एक कमिटी नेमली. या कमिटीचे अध्यक्ष सर हेन्री फौलर ( लॉर्ड वुलव्हर हॅम्प्टन ) हे होते. या कमिटीनें एकमतानें दुसऱ्या ज्या कांहीं गोष्टींची शिफारस केली त्यांत खालील गोष्टी होत्या:—

" आमचें मत ब्रिटिश सॉव्हरिन हिंदुस्थानांत कायदेशीर चलनी नाणें करावें असें आहे. रॉयल टांकसाळीच्या तीन ऑस्ट्रेलियन शाखांत असलेल्या कराशमदारावर लोकांना सोन्याचें नाणें अमर्याद पाडून घेण्यासाठीं हिंदी टांकसाळी याच वेळेस खुल्या कराव्या असेंही पण आम्हांला वाटतें. असें केल्यानें एकसारख्या शर्तींवर इंग्लंडांत आणि हिंदुस्थानांत सॉव्हरिन पाडला जाईल व चालेल. सोन्याचा निर्बंध आयातानिर्याततत्त्वांच्या धर्तीवर ठरावा. हिंदुस्थानांत सोन्याचें प्रमाण आणि सोन्याचें चलन पुरतेपणीं स्थापावें, या गोष्टीचा विचार

करून या तजविजी अंमलांत आणाव्या अशी आम्ही शिफारस करतों. "

खुल्या टांकसाळीचा अर्थ आणि तत्त्व काय हें आपल्याला आतां पूर्णपणें समजलें, त्याचप्रमाणें बिनचूक शब्दांत स्पष्ट तऱ्हेनें केलेली शिफारसही पण आपल्यापुढें आहे. हिंदी सरकाराला ही शिफारस मनापासून आवडली. सन १९०० च्या मार्च महिन्यांत कलकत्ता येथें खर्चाच्या अंदाजपत्रकावर जो वाद झाला त्यांत मि. ( आतां-सर ) क्लिंटन डॉकिन्स यानीं असें जाहीर केलें कीं,

" सोन्याचें नाणें पाडून घेण्यासाठीं रॉयल टांकसाळीची एक शाखा स्थापण्याचें ठरलें आहे. इंपीरिअल कॉइनेज अॅक्टाखालीं निघणाऱ्या जाहीरनाम्याच्या शर्ती ठरल्या असून मुंबईंत टांकसाळीची जागा आणि सरंजाम रॉयलमिंटच्या पसंतीस पडण्याचीच फक्त आम्ही वाट पहात आहोंत. नाणें पाडण्याच्या आधींच आपणासाठीं म्हैसूरांतून सोनें पैदा होऊन राहिलें आहे आणि ही पैदास सालीना पंधरापासून वीस हजार पौंडांनीं वाढून सोन्याच्या सांठ्यांत तितकी भर पडत जाईल अशी आम्हांला खात्री वाटत आहे. "

परंतु हिंदी सरकारचे हे नुसते मनांतले मांडे होते. आजादिवस-पर्यंत हिंदी टांकसाळी लोकांना वाटेल तशीं सोन्याचीं नाणीं पाडून घेण्यास खुल्या केल्या गेल्या नाहींत. आज दहा वर्षांवर हिंदी सर-कारचे बेत अशा विलक्षण रीतीनें कां ढांसळावे याचा सरकारी खुलासा पुढें आला नाहीं किंवा कोठें त्याचा उल्लेखही नाहीं. तथापि गेल्या बारा महिन्यांमध्यें वरचेवर या विषयावर जी टीका झाली

तिच्यामुळें जागे होऊन शेवटीं दोन सरकारी साक्षीदार पुढें आले आहेत. ते कोण व त्यांनीं काय पुरावा दिला तें पहाः—

यांपैकीं पहिले कलकत्ता येथील कस्टम कलेक्टर एच. एफ्. हॉवर्ड, आय. सी. एस्., गेल्या वर्षी कलकत्ता येथें प्रसिद्ध झालेल्या आपल्या " हिंदुस्थान आणि सोन्याचें प्रमाण " या पुस्तकांत मि. हॉवर्ड लिहितातः—

" कित्येक कायद्याच्या आणि किरकोळ अडचणींमुळें सोन्याच्या अनिर्बंध नाण्याकरितां हिंदी टांकसाळी खुल्या करण्याची सूचना १९०२ मध्यें तात्पुरती मागें टाकली गेली. याच वेळीं सोन्याची आयात खपाच्या बाहेर वाढून गेली आणि प्रमाण मानलेलें सॉव्हरिन नाणें पाडण्याची प्रत्यक्ष क्रिया हिंदुस्थानाला खर्चांत न पाडतां इंग्लंड व ऑस्ट्रेलिया येथें होत असल्याकारणानें खुल्या टांकसाळीची उणीव त्या वेळेपुरती तरी काल्पनिक स्वरूपाची होऊन बसली होती. ह्या प्रकरणाचा निकाल ( निकाल कोणता ? ही निकालाची गोष्ट लोकांच्या पहिल्याच प्रथम कानीं आली आहे. ) अखेरचाच झाला आहे असें म्हणतां येणार नाहीं, आणि व्हाइसरॉयच्या कौन्सिलच्या फडनिसानें नुकतेंच १९११ च्या मार्च महिन्यांत असें जाहीर केलें कीं, ह्या प्रश्नाची आणखी वाटाघाट करण्यांत येईल. "

व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे फडनीस सर गाय फ्लीटवुड वुइल्सन. सोन्याचीं नाणीं पाडून घेण्यासाठीं हिंदी टांकसाळी खुल्या कराव्या या सर विठ्ठलदास थॅकर्सीनीं केलेल्या सूचनेस १९१२ मार्च तारीख २२ रोजीं कलकत्त्यास जबाब देतांना म्हणाले कीं:—

" सोन्याचीं नाणीं वाटेल तशीं पाडून घेण्यासाठीं हिंदी टांकसाळी खुल्या कराव्या ह्या फौलरकमिटीच्या सूचनेला हिंदी सरकारानें मनापासून अनुमोदन दिलें असून ती सूचना अंमलांत आणण्याकरितां तजविजीही केल्या होत्या. परंतु १९०२ सालीं ही आमची तयारी कांहींशी एकदम संपुष्टांत आली. तद्विषयक बारीकसारीक बाबींत बराच ऊहापोह करण्याच्या काळजींत असतां कोलार येथील सोन्याच्या खाणींच्या एजंटानें तेथील सोनें इंग्लंडांत खपविण्यासंबंधानें आपली व्यवस्था करून टाकली. स्थानिक सोन्याच्या, स्थिर पुरवठ्याच्या अभावीं ही तजवीज अशीच पुढें चालू ठेवणें कितपत शहाणपणाचें होईल, यासंबंधानें त्या वेळच्या सरकाराला संशय वाटत होता आणि विलायतेंतील तिजोरीच्या अधिकाऱ्यांचा कल या मसलतीविरुद्ध सल्ला देण्याकडे होता. कारण त्यांना असें वाटत होतें कीं, हिंदुस्थानाला जेवढें सोनें लागेल तेवढें तेथें साधारण रीतींनें जसें यावयाचें तसें येत राहील, अशा रीतींनें १९०२ सालीं हा प्रश्न बाजूला ठेवला गेला. मला जोंपर्यंत माहिती आहे तोंपर्यंत त्या वेळीं याचीं ठराविक कारणें दिलीं नव्हतीं; परंतु आतां जीं कारणें थोडक्यांत सांगितलीं तींच पुढें आलीं होतीं. "

खुल्या टांकसाळीचें मार्मिक तत्त्व काय आहे हें या साक्षीदारांपैकीं कोणाला समजलें आहे असें दाखविणारा एक शब्दही या साक्षींत नाहीं हें विशेष ध्यानांत ठेविलें पाहिजे. एखाद्या चलनपद्धतीला चलनपद्धत केव्हां म्हणतां यावयाचें नाहीं ? या जुन्या ठराविक रीतींनें जर आपण या कोड्याचा उलगडा करूं लागलों तर त्याचें उत्तर खरोखर हें आहे कीं, जेव्हां त्या पद्धतींत खुल्या टांकसाळीची उणीव असते तेव्हां; तथापिसुद्धां इंडिया ऑफिस व

हिंदी सरकार सध्यांची जुनी घोंटाळ्याची पद्धत चालू ठेवण्यांत खुशाल समाधान मानून राहिलें आहे. त्याचीं कारणें हीं देण्यांत येतातः—

( १ ) हिंदी टांकसाळ जरी खुली केली तरी हिंदी सोनें त्या टांकसाळींत फारसें आणतां येणार नाहीं.

( २ ) हिंदुस्थानाला सोन्याच्या नाण्यांची गरज असेल तर दुसऱ्या कोणाच्या खर्चानें पाडलेलीं इंग्लिश अगर फ्रेंच किंवा जर्मन सोन्याचीं पाडलेलीं नाणीं हिंदुस्थान आणूं शकेल.

तर मग हिंदी सोन्याचें नाणें पाडण्यासाठीं हिंदुस्थानाला स्वतःची टांकसाळ देऊन विनाकारण त्रास करून घेण्यांत काय अर्थ आहे? हाच तत्त्ववाद सध्यांची इंग्लिश टांकसाळ बंद करून टाकण्यासंबंधानेंही लागेल हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. इंग्लंड खुद्द पाहिजे तेवढें सोनें बाहेरून सहज आणूं शकतें आणि तेथल्या तेथें जें अतिशय थोडें सोनें पैदा होतें—सालीना सुमारें तीन हजार पौंड—तें, पैसे पाडून घेण्यासाठीं जर्मनीस पाठवितां येईल.

हिंदी टांकसाळींसंबंधानें स्टेट सेक्रेटरींच्या मताच्या मंडनार्थ एवढेंच काय तें सर्व म्हणणें असेल तर या बाबतींत ग्रेटब्रिटनच्या इतिहासांत बऱ्याच गोष्टी अजून व्हावयाच्या आहेत हें स्पष्ट दिसून येईल. परंतु सध्यां तरी आणखी टीका करणें लांबणीवर टाकलें पाहिजे, कारण, सर गाय फ्लीटवुड वुइल्सनच्या आधारावर आपल्याला असें कळत आहे कीं, या सर्व विषयाचा विचार सध्यां मार्किस ऑफ क्रयू आणि त्यांचें कौन्सिल करीत आहे. शिवाय जर स्टेट सेक्रेटरींचा निकाल सोन्याच्या नाण्याकरितां हिंदी टांकसाळी ताबडतोब खुल्या कराव्य

असा लागला तर सर गाय फ्लीटवुड वुइल्सनच्याइतकें समाधान दुसऱ्या कोणालाही वाटणार नाहीं याचाही आपल्याला संतोष आहे.

आरोपाचा दुसरा भाग असा आहे कीं, इंडिया ऑफिसानें हिंदी कागदी चलन आणि सोन्याचें प्रमाण या दोन कारणांपासून सांठलेल्या ठेवींचे भाग हिंदुस्थानांतून लंडनास विनाकारण नेऊन, एखाद्या मोठ्या राजकीय उलटापालटीच्या प्रसंगीं, हिंदुस्थानाला कोणताही फायदा होणार नाहीं अशा रीतीनें ते भाग व्याजीं लाविले आहेत. यासंबंधांत हिंदुस्थानांतले पुष्टीकरणार्थ साक्षीदार सर ई. एन्. बेकर, व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे माजी फडनीस आणि सर गाय फ्लीटवुड वुइल्सन हलींचे फडनीस हे होत.

येथें हिंदी कागदी चलनाचें स्वरूप व कर्तव्य काय आहे याचा थोडासा खुलासा करणें अवश्य आहे. एके काळीं हिंदुस्थानांतील इलाख्यांच्या बँकांना दर्शनी नोटा काढण्याचा अधिकार होता, परंतु हा अधिकार १८६२ सालीं काढला जाऊन सरकारी खात्यामार्फत सरकारी दर्शनी कागदी चलन काढण्याची व्यवस्था केली. हें चलन किती रकमेपर्यंत काढावयाचें याची मर्यादा नसून कोणत्याही एखाद्या काळीं व्यवहारांत असलेल्या चलनी नोटांच्या सर्व रकमेइतकें सोनें, चांदी आणि हिंदी सरकारच्या अगर ब्रिटिश राज्याच्या हमी ठेविल्याच पाहिजेत असा कायदा आहे. साधारणपणें चलनांत असलेल्या कागदी चलनाची एकंदर रक्कम जवळजवळ पन्नास कोटी रुपयांच्या आंत बाहेर आहे. या चलनाला आधार म्हणून ठेवावयाच्या हमीची जास्तींत जास्ती मर्यादा चौदा कोटी रुपयांची ठरविली असून बाकीच्यापुरती सरकारच्या हातांत लगडी किंवा नगद असते.

सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवीचें स्वरूप कागदी चलनाच्या ठेवीच्या स्वरूपासारखेंच कांहीं अंशीं आहे. कारण सरकारी कागदी चलनाचा नगदी पैसा लोकांना निर्धास्तपणें मिळावा म्हणून कागदी चलनाची ठेव ठेविलेली असते आणि जगाच्या दृष्टीनें सरकारी चांदीच्या सर्व पैशाची सोन्यामधली किंमत जी आजमितीस आहे—म्हणजे एका रुपयास एक शिलिंग चार पेन्सांच्या आंत बाहे–रती लोकांना होतां होईलतों खात्रीबंद सोन्याच्य रूपांत मिळावी, ह्या हेतूनें ही सोन्याच्या प्रमाणाची ठेव उत्पन्न केली आहे. हिंदी कागदी चलनाच्या नोटा, साधारणपणें, नगद मिळण्याकरितां हिंदुस्थानांतील सरकारी तिजोऱ्यांत सादर करण्यांत येतात; परंतु ज्या परदेशच्या लोकांस हिंदुस्थानापासून पैसा घ्यावयाचा असतो ते हल्लीं सरासरी एका रुपयास एक शिलिंग चार पेन्स या मानानें सोन्याच्या रूपांत तो पैसा घेण्याचा विचार करतात. एका रुपयांतील चांदी फक्त नऊ पेन्स असते आणि या रुपयाची किंमत सॉव्हरीनच्या पंधराव्या हिश्शा-पर्यंत कायमची वाढविण्यासाठीं एक मोटी ठेव जमविलेली आहे. व्यापाराची बाकी जर हिंदुस्थानाकडे निघूं लागली तरीसुद्धां या ठेवीच्या मदतीनें व्यापारांत फिरून हिंदुस्थानचें घेणें निघण्याची वेळ येईपर्यंत त्या देशाचें बाहेरील सर्व कर्ज एका रुपयास एक शिलिंग चार पेन्सप्रमाणें ( या ठेवींतून ) फेडतां येईल. सोन्याच्या प्रमा-णाच्या ठेवीची एकंदर रक्कम हल्लीं एक कोटी नव्वद लक्ष पौंडांपेक्षां थोडी जास्त आहे. सरकारला जो रुपया पाडण्यासाठीं फक्त नऊ पेन्स किंवा दहा पेन्स खर्च पडतो तो लोकांना एक शिलिंग चार पेन्सांला विकून राहिलेल्या नफ्यांतून ही बहुतेक ठेव आरंभीं जमवि-लेली होती.

कागदी चलनाची ठेव हिंदुस्थानाशिवाय दुसरीकडे ठेवावी हें पुष्कळ वर्षेंपर्यंत कोणाच्या स्वप्नांतसुद्धां आलें नाहीं आणि मुख्यतः मौल्यवान् धातूशिवाय दुसऱ्या रूपांत ती ठेवावी असेंही कोणाला वाटलें नाहीं. त्याचप्रमाणें नवे रुपये पाडून राहिलेला नफाही हिंदुस्थानांतच आणि तोसुद्धां सोन्याच्या रूपांत ठेवावा असा सर्व-साधारण समज होता. परंतु खुल्या टांकसाळीशिवाय हिंदुस्थानांत स्थापिलेल्या विलक्षण चलनपद्धतीपासून याशिवाय दुसरे अद्भुत व अविचाराचे प्रकारांवर प्रकार उत्पन्न झाले आहेत. यांपैकीं मुख्य प्रकार हे होत.

( १ ) सावकार लोक आणि दुसरे लोक यांनीं पाहिजे तितका पैसा ज्या वेळेस आणि जसा ते मागतील त्या वेळेस तसा तो पुर-विण्याचा अगदीं नवा बोजा सरकारनें आपल्या अंगावर लादून घेतला.

( २ ) यामुळें हिंदुस्थानांत सोन्याचें प्रमाण व सोन्याचें चलन स्थापण्याचें सरकारचें स्वतःचें धोरण अंशतः सोडावें लागलें; कारण या धोरणाच्या विरुद्ध असलेल्या सावकार वगैरे लोकांनीं—आणि असे लोक पुष्कळ होते—आपल्याला पूर्ण किंमतीच्या ( म्हणजे सोन्याच्या ) नाण्यांऐवजीं सांकेतिक पैसा म्हणजे रुपये सरकारनें पुरवावे असा आग्रह धरला तर सरकार ते मुकाट्यानें पुरवीत असतें.

( ३ ) याचा परिणाम असा झाला कीं, ज्या विशेष कामासाठीं सरकारच्या या नगदी ठेवी आणि चलाऊ नगदी शिलकी योजल्या होत्या त्यांहून अगदीं भिन्न कामांकडे म्हणजे खानगी सावकार

आणि व्यापारी यांच्या फायद्याकडे या ठेवींचा आणि शिलकांचा उपयोग होऊं लागला.

( ४ ) तसेंच हिंदी सरकारच्या नेहमींच्या पैशाच्या व्यवहाराचा हिंदुस्थानांतील व हिंदुस्थानच्या बाहेरील धंदेवाईक सावकारांच्या सावकारी गरजांकडे सर्वथैव उपयोग झाला. या सावकारांपैकीं कांहींचा हिंदुस्थानाशीं वस्तुतः बिलकुल संबंध नाहीं.

या व्यवहाराच्या मंडनार्थ पहिला पुरावा मार्च १९०६ सालीं कलकत्त्यांत खर्चाच्या अंदाजपत्रकावर जें सर ई. एन्. बेकर यांचें भाषण झालें त्यांतून घेतला आहे. स्टेट सेक्रेटरी आपल्या स्वतःच्या गरजांपेक्षां कैक लाखांवर जो अवाढव्य पैसा हिंदी तिजोऱ्यांतून काढतो, तो कां काढतो याचा खुलासा करतांना हे फडनीस म्हणाले कीं, " हिंदुस्थानच्या निर्यात व्यापारासाठीं जो पुष्कळ पैसा लागतो तो पुरविण्याकारितां मुख्यत्वेंकरून हा पैसा काढावा लागला. " सर एडवर्ड बेकर आणखी पुढें असें म्हणाले:—

" ...... टांकसाळी बंद केल्यापासून, आणि सोन्याचें प्रमाण स्थापल्यापासून कौन्सिल हुंड्या व दुसऱ्याच्या नांवावर करून दिलेले कागद यांच्या विक्रीखेरीज, चलनी पैसा मिळविण्याचें फक्त एकच साधन जें व्यापाराला खुलें होतें तें हिंदुस्थानांत सोनें आणणें हें होय. सध्यां जशी स्थिति आहे त्याप्रमाणें सोन्याचें प्रमाण कार्यक्षम करण्यासाठीं जेव्हां चलनी ठेवी-मध्यें पुरेसा सोन्याचा सांठा सांठेल आणि जोंपर्यंत सोनें प्रत्यक्ष चलनांत बरेंचसें चालत नाहीं तोंपर्यंत हें साधन नुकसान-कारक होणार, कारण हिंदुस्थानांत अशा रीतीनें आणलेलें

सोनें नाण्याकरितां चांदी विकत घेण्यासाठीं ओघानें परत युरोपांत पाठवावें लागणार. हा प्रसंग टाळण्यासाठीं, व्यापाराची मागणी आपल्याच्यानें होतांहोईलतों पूर्णपणें भागावी म्हणून सरकारचें धोरण कौन्सिल हुंड्या मोकळेपणीं विकण्याचें आहे. या धोरणाचा नुकताच अंमलांत आणलेला एक प्रकार, ऑस्ट्रेलियांतील सोनें घेऊन तारेच्या योगानें हिंदुस्थानसरकारावर हुंड्या देण्याचा आहे. यायोगानें सोनें हिंदुस्थानांत न येतां परभारें लंडनांत जातें."

सन १९०५ च्या हिंदी कागदी चलनाच्या कायद्यांत हिंदी सरकाराला पैशाच्या देवघेवीचे जे चमत्कारिक प्रकार त्या वेळीं करावे लागत होते त्यांच्या पुष्ट्यर्थ फार लक्षांत ठेवण्यासारखे दोन फेरबदल करण्यांत आले; हिंदी कागदी चलन टिकावें म्हणून जी धातूची नगद काढून ठेविलेली असते तिचा कांहीं भाग इंग्लंडमध्यें ठेवण्याचा अखत्यार सरकाराला मिळाला; तसेंच ह्याच ठेवीचा कांहीं भाग इंग्लंडांत शहाजोग हमीवर व्याजीं लावण्याचा अधिकार सरकाराला मिळाला. या नव्या धोरणाचे "व्यावहारिक फायदे" काय आहेत यासंबंधानें सर एडवर्ड बेकर यांचें म्हणणें येणेंप्रमाणें होतें.

( १ ) सोनें लंडनांत ठेविलें म्हणजे त्याचें मुख्य काम जें चलनीनोटांचे पैसे खात्रीयुक्त मिळविण्याचें तें व्यावहारिकदृष्ट्या एका अंशानें अधिक कार्यक्षम होतें. जोंपर्यंत हिंदी चलनांत सोन्याचा जारीनें उपयोग होत नाहीं, तोंपर्यंत चलनी नोटवाल्यांना नोटांच्याऐवजीं जें पाहिजे असतें तें सॉव्हरिन नसून रुपये होत, आणि हे रुपये पाडण्यासाठीं ज्या चांदीच्या लगडी विकत घ्याव्या लागतात

त्या साधारणपणें या देशांत मिळत नसून फक्त युरोपमध्येंच मिळूं शकतात.

( २ ) या धोरणामुळें स्टेट सेक्रेटरीला प्रसंगाप्रमाणें लागेल तशी चांदी अत्यंत सत्वर आणि सोयीनें विकत घेतां येते आणि हिंदुस्थानांतून सोनें परत देशांतरीं पाठविण्याचा प्रसंग आल्यानें जी एक प्रकारची प्रसिद्धि व्हावयाची तीही पण अशा प्रकारच्या व्यवहारानें टळते. स्टेट सेक्रेटरीनें अशा रीतीनें खरेदी केलेली चांदी पहिल्यापासूनच ठेवीचा एक भाग आहे असें मानून चालावें अगर पसंत पडल्यास ती चांदी पहिल्यानें आपल्या तिजोरींतील शिलकांतून खरेदी करावी आणि नंतर चलनी संदुकींतून ह्या शिलका भरून काढाव्या. ही चलनी संदूक कौन्सिल हुंड्यांची विक्री करून अगर हिंदुस्थानांतून पैसा प्रत्यक्ष पाठवून भरून निघते.

( ३ ) शिवाय, स्टेट सेक्रेटरीच्या तिजोरींतील शिलका लवकर भरून काढण्याचे कामीं हें धोरण कांहीं कांहीं प्रसंगीं फार उपयोगीं पडण्यासारखें असतें. जर एखादे वेळीं त्याच्या चालू गरजा भागविण्यापुरती कौन्सिल हुंड्यांना मागणी नसेल तर आपल्या चलनी संदुकींतून कांहीं सोनें आपल्या तिजोरीच्या जमाखर्चांत त्याला घेतां येईल. त्याच वेळेस हिंदुस्थानांत, तिजोरींतून रुपये अगर सोनें काढून चलनी जमाखर्चांत ह्याचप्रमाणें आणलें म्हणजे झालें.

( ४ ) या उलट, कौन्सिल हुंड्या ज्या वेळेस व्यापारी मागणीला पुरेनाशा होतात त्या वेळेस या धोरणानें आपल्या तिजोरींतील शिलकांना एक प्रकारचा विसांवा मिळतो. अशा प्रसंगीं स्टेट सेक्रेटरीला विक्रीचा पैसा आपल्या चलनी संदुकींत आणतां येणें

शक्य असून त्यायोगानें तितक्याच पैशाइतके रुपये हिंदुस्थानांत सोडून देतां येतील, आणि हे रुपये हुंड्यांचा ऐवज देण्याच्या कामीं उपयोगीं पडतील.

( ५ ) सरतेशेवटीं, या धोरणाच्या योगानें सोन्याच्या ठेवीचा पैसा आल्याबरोबर ताबडतोब व्याजीं लावणें सुलभ होतें. हिंदुस्थानांत नाण्यांपासून नफा मिळाल्याबरोबर स्टेट सेक्रेटरीला वाटेल त्या वेळेस आपल्या चलनी संदुकींतून त्या नफ्याच्याइतकी रक्कम काढतां येऊन ती व्याजीं लावतां येते. हिंदुस्थानांतही तितक्याच रकमेपुरता जमाखर्च सोन्याच्या ठेवीच्या फंडांतून चलनीखात्यांत केला म्हणजे झालें.

" ही सर्व व्यवस्था, हिंदुस्थानांत आज कित्येक वर्षें अंमलात असलेल्या पद्धतीचा तर्कशास्त्राला अनुसरून व कायदेशीर परिणाम आहे. यायोगें चलनी ठेव आणि तिजोरींतील शिलका यांमध्यें परस्पर जमाखर्चाची आलटापालट करण्याची अत्यंत मुभा ठेविलेली असते, मात्र हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या चलनी संदुकींत असलेली, नाणें व लगडी यांची एकंदर रक्कम नेहमीं कायद्यानें घालून दिलेल्या मर्यादेपर्यंत राखलीच पाहिजे म्हणजे झालें. "

म्हणजे असेंही म्हणतां येईल कीं, तर्कशास्त्राला अनुसरून होत असलेली ही सर्व अपरिहार्य व्यवस्था प्रथमपासूनच चुकीचा मार्ग स्वीकारल्याचा, त्याच चुकीच्या मार्गानें पुढें जाण्याचा, आणि हट्टानें त्या चुकीच्या मार्गाचा नुकसानकारक शेवट करून घेण्याचा परिणाम आहे; मग या मार्गांत कितीही खांचखळगे व अनोळखीचे खंदक आले तरी बेहेत्तर आहे.

सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवीसंबंधानें, सन १८९८ सालच्या हिंदी करन्सी कमिटीनें अशी शिफारस केली कीं, ही ठेव कागदी चलनाच्या ठेवीपासून आणि नेहमींच्या तिजोरीच्या शिलकांपासून अगदीं अलग सोन्याच्या रूपांत ठेवावी. या शिफारशीकडे सर्वथैव दुर्लक्ष झालें आहे. हल्लीं सोन्याच्या प्रमाणाची ठेव खालीलप्रमाणें आहे.

इंग्लंडांत ठेविलेली सुमारें १७०००००० पौंड.
हिंदुस्थानांत असलेली सुमारें २०००००० पौंड.

इंग्लंडमध्यें ठेविलेल्या १७०००००० पौंडांपैकीं, सुमारें १६०००००० पौंड निरनिराळ्या ब्रिटिश व वसाहतींच्या ठेवीमध्यें घातले आहेत. ( यांत ४५०००००० पौंड मि. लॉइड जॉर्जच्या जमाखर्चाला टेंका म्हणून ब्रिटिश तिजोरीला उसने दिले आहेत. )

या ठेवीचा इतका मोठा भाग लंडनांत शहाजोग जमानतीवर जो उसनवार दिलेला आहे त्यास मुख्य हरकत सर अर्नेस्ट केबल यांनीं १९०५ च्या मार्च महिन्यांत कलकत्ता येथें खालीं लिहिल्याप्रमाणें केली आहे:—

" ज्या मुद्यासंबंधानें मी खात्री करूं इच्छित आहें, तो असा आहे कीं, राष्ट्रांराष्ट्रांची भानगड होऊन एखादा बिकट प्रसंग आला तर हिंदुस्थानांत सोन्याच्या लगडींचा सांठा असल्यानें आपलें मोठें रक्षण होणार आहे. अशा वेळेस आपल्या जामीनखतांची किंमत फार उतरून कदाचित् तीं आपल्याला विकणें भाग पडेल तर तोही प्रसंग टळेल. उलटपक्षीं, सोन्याची किंमत अशा आणीबाणीच्या

वेळीं नेहमीं वाढत असते. आपल्याला माहीत आहे कीं, इंग्लंडच्या बँकेंत असलेली सोन्याची ठेव जितकी असावयास पाहिजे त्याहून साधारणपणें कमी आहे; आणि ब्रिटिश साम्राज्य अपुऱ्या सोन्याच्या सांठ्यावर सर्व जगभर अतिशय मोठ्या व्यापारी भानगडी करून राहिलें आहे अशी समजूत झाली आहे. शिवाय हल्लीं ग्रेटब्रिटननें दुसऱ्या एका राष्ट्राशीं आपला संबंध जुळविला असल्याकारणानें राष्ट्रांराष्ट्रांच्या भानगडींत पडण्याचा अधिक धोका आहे म्हणून कन्सॉल्सची किंमत किफायतशीर भावानें येणें फार मुष्किलीचें होईल, असे प्रसंग येण्याचा बराच संभव आहे. फडनिशी बाबीसंबंधांत रशियाचें उदाहरण दाखविण्याचा हल्लींचा प्रसंग फारसा योग्य नाहीं हें मी जाणून आहें. परंतु एका मासिक पुस्तकांतील कांहींशा प्रख्यात लेखांवरून ठरवावयाचें असेल तर अशी खात्री होईल कीं, युरोपमधल्या बँकवाल्यांचा आणि सावकार लोकांचा रशियांतील प्रचंड सोन्याच्या नगदी ठेवींवर अमर्याद विश्वास आहे, म्हणून बरें आहे. नाहीं तर तेथील जमाखर्चाची पद्धत केव्हांच डळमळून गेली असती. या प्रचंड सोन्याच्या सांठ्याचा राजकीय व आर्थिकदृष्ट्या परिणाम अलौकिक झाला आहे असें म्हणतात. रशियाइतकें सोनें सांठविण्याचा प्रयत्न हिंदुस्थाननें करावा असें माझें बिलकुल म्हणणें नाहीं. परंतु रशियापासून जो धडा घ्यावयाचा तो हा कीं, कायदेशीर रीतीनें संचय केलेल्या लगडींच्या मोठ्या ठेवींचे फायदे असंख्य आहेत. हा प्रश्न इतक्या निकडीचा नाहीं, यासंबंधानें माझ्या नामदार बंधूंचें व माझें अगदीं एकमत आहे. परंतु या प्रश्नाचा विचार मात्र प्रमुखत्वानें केला पाहिजे. माझ्या नामदार बंधूपुढें मी एक अशी मूर्त सूचना ठेवतों कीं, "सोन्याच्या विशिष्ट ठेवी" पैकीं,

एक कोटीवरच्या शिलकेचा अर्धा भाग पसंतीच्या जामिनीवर आणि तो सुद्धां कदाचित् ब्रिटिश नसलेल्या जामिनीवर ठेवावा, आणि दुसरा अर्धा भाग सोन्याच्या लगडींमध्यें ठेवावा. या सूचनेवर नामदारसाहेब काय टीका करतात तें पाहूं या. ''

सन १९१२ मार्च तारीख २२ च्या वरिष्ठ कायदे कौन्सिलच्या बैठकींत कलकत्ता येथें सर विठ्ठलदास थॅकर्सी यांनीं याच हरकती सविस्तर फिरून मांडल्या होत्या. त्यांस सर गाय फ्लीटवुड वुइल्सन यांनीं दिलेल्या उत्तराचा मुख्य भाग येणेंप्रमाणें होताः—

" ज्या कार्यासाठीं ही ठेव उत्पन्न केली त्याकरितां ती वाटेल त्या वेळेस उपयोगीं पडण्याची पूर्ण जबाबदारी स्टेट सेक्रेटरीनें समजून उमजून पत्करली आहे. ''

होतां होईल तों हिंदुस्थानांत ही ठेव उपयोगीं पडण्याची जिम्मेवारी स्टेट सेक्रेटरीनें घेतली आहे; ही जिम्मेवारी फार जड जाईल यांत संशय नाहीं. तथापि ज्या अर्थी त्यानें आपल्या शिरावर ती घेतली आहे त्या अर्थी आतां त्यांतून तो कसा पार पडतो हें पाहिलें पाहिजे.

आमच्या आरोपाचा तिसरा भाग असा आहे कीं, इंडिया ऑफिसानें सावकारी आणि व्यापारी कामांमध्यें विनाकारण व चुकीनें पडून हिंदी सरकारच्या नगदी ठेवी आणि चालू शिलका हिंदुस्थानच्या लोकांचें प्रत्यक्ष नुकसान करून लंडनमध्यें खानगी कामांकडे लाविल्या आहेत. अशी स्थिति जगांतल्या कोणत्याही देशांत घडून आली नाहीं.

हिंदुस्थानांत किंवा हिंदुस्थानच्या बाहेर या भागाचें मंडन करणारे साक्षीदार आढळणें वस्तुतः अशक्यच आहे. सन १९१२ मार्च महिन्याच्या २२ तारखेस कलकत्ता येथें व्हाइसरॉयाच्या कौन्सिलमध्यें जो वादविवाद झाला, त्यांत " साधारण स्थितींत तिजोरींत मोठाल्या शिलका असणें चुकीचें आणि नुकसानकारक आहे " ही गोष्ट सर गाय फ्लीटवुड वुइल्सन यांनीं कबूल केली; परंतु इंडिया ऑफिसाच्या हातांत असलेली एक कोटी सत्तर लक्ष पौंडांची नगदी शिल्लक मोठी आहे किंवा नाहीं अगर ही स्थिति "साधारण" अथवा असाधारण आहे याचा विचार करण्याचें ह्या फडनिसांनीं मुकाट्यानें नाकारलें.

या आरोपाचें मंडन करणारे हिंदुस्थानांतले साक्षीदार येणेंप्रमाणें झाले. त्यांनी केलेल्या मंडनांत कांहीं तथ्य आहे किंवा नाहीं याचा संशयच आहे. हा मुद्दा पुढें येणार आहे. सध्यां आपण लंडन येथें अगर ब्रिटिश राज्यांत दुसरीकडे असणारे साक्षीदार या आरोपाच्या मंडनार्थ काय म्हणतात तें पाहूं.

---

## भाग ६.

### इंग्लंडमधले बचावाचे साक्षीदार.

लंडन येथील पैशाची पेठ सध्यां कोणत्या पेंचांत आहे हें कांहीं-अंशीं आपल्याला समजलें म्हणजे इंग्लंडमधल्या साक्षीदारांनीं आपल्या मंडनाची कोणती दिशा घेतली आहे ह्याचा अंदाज करणें अवघड

नाहीं. हिंदुस्थानच्या पैशाच्या होत असलेल्या या देवघेवीमुळें फार चांगले चांगले चलनशास्त्राचे प्रयोग घडून आले आहेत असें "फायन्यान्शिअल टाइम्स" मधला एक लेखक गंभीरपणें म्हणतो. हिंदुस्थानाच्या सोन्याच्या मागणीसंबंधानें या लेखकानें नुकतेंच म्हणजे १९१२ च्या मार्च महिन्यांत असें लिहिलें आहे कीं:—

"......इतक्या भयप्रद आणि घाबरविणाऱ्या स्थितीची चौकशी तिचे आणखी वाईट परिणाम घडून येण्यापूर्वी एखाद्या हुषार कमिशनकडून व्हावी याची खबरदारी लंडन शहरानें घेतली पाहिजे. आपल्या स्वतःच्या, आणि अप्रत्यक्षपणें आमच्या, चलनाचा विचार जो हिंदी सरकार करून राहिलें आहे त्यामुळें एखादी युरोपियन लढाई उत्पन्न झाल्यास या राष्ट्राला नगदी पैसा देण्याचें लवकरच बंद केलें पाहिजे असा धोका आहे. आपल्या बँकांच्या संरक्षणार्थ आणि आपला कटमितीचा व्याजाचा दर राखण्यासाठीं फार अवश्य असलेल्या सोन्याच्या प्रचंड रकमा आपण कायमच्या गमावून हिंदुस्थानांत सांठवूं देत आहोंत इतकेंच नव्हे तर आयात चांदीवर हल्लींची आयात जकात बसवून त्या चांदीचा वहात असलेला झरा जो हिंदी सरकारनें आटविला आहे त्यामुळें चीनशीं होत असलेल्या आमच्या सर्व देवघेवी तितक्यापुरत्या कमजोर होत आहेत.

लंडन येथील फडनिशीपत्र स्टेटिस्ट यानें जी वादाची दिशा घेतली होती, तीच हुबेहूब ही वरील दिशा होय. एप्रिल १९११ त या पत्रांत जे धास्तीकारक विशिष्ट उल्लेख आले त्यांचा थोडासा उल्लेख दुसऱ्या भागांत आलाच आहे. स्टेटिस्टपत्रांतील धडकी उत्पन्न करणाऱ्या वादाचें उत्तर पुरवणी—डीमध्यें दिलें आहे. तेव्हां येथें

एवढेंच सांगितलें म्हणजे बस्स होईल कीं, इंडिया ऑफिसला जागृत करण्याचे हे प्रयत्न जरी कोते आणि गैरवाजवी होत, तरी कल्पने-बाहेर त्यांनीं आपलें काम केलें. स्टेट सेक्रेटरी हिंदी तिजोऱ्यांतून जो फार वाढत्या प्रमाणावर पैसा काढीत होता तो लंडनमध्यें सर्वांना मनापासून आवडला, आणि हिंदुस्थानची सोन्याची मागणी फार जड होईल अशी जी भीति तेथील पैशाच्या पेठेला वाटत होती ती यायोगानें नाहींशी होऊन उघड उघड स्वस्थता झाली, असें त्यांना वाटलें.

स्टेटिस्टपत्राच्या एडिटराहून फार निराळ्या धर्तीचा साक्षीदार, केंब्रिजच्या किंग्ज कॉलेजचा प्रोफेसर जे. एम. किन्स हा होय. मि. किन्स यानें इंडिया ऑफिसमध्यें १९०६ पासून १९०८ पर्यंत नोकरी केली, तेव्हां आपल्या पूर्वीच्या अधिकारी मित्रांविषयीं त्याची अजूनपर्यंत सहानुभूति असावी ह्यानें फारसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. " एकानॉमिक जर्नल " च्या सप्टेंबर १९१० च्या अंकांत लिहितांना मि. किन्स म्हणतो कीं,

" सोन्याच्या प्रमाणाची ठेव वास्तविक किती असावी या वादग्रस्त प्रश्नासंबंधानें माझ्या मतें मि. वेब याचें म्हणणें बरोबर आहे. तें म्हणणें असें आहे कीं, ही ठेव बरीच वाढविली पाहिजे आणि हिंदी सरकारानें आपल्या धोरणाचा परिणाम फारच सुफलदायी होईल असा ग्रह करून या ठेवीचें उत्पन्न दुसऱ्या कामांकडे लावण्याची फारच घाई केली आहे. परंतु जेव्हां तो असें प्रतिपादन करतो कीं, ही ठेव सर्वथैव सोन्याच्या रूपांत असून ती मुख्यतः हिंदुस्थानांतच ठेवावी तेव्हां चलनपद्धतीचें खरें स्वरूप काय आहे आणि जगांतील पुष्कळ

देशांत चलनसुधारणेचा साधारण कल कोणीकडे आहे ह्या गोष्टी त्याच्या आणि त्याच्याबरोबर दुसऱ्या पुष्कळ टीकाकारांच्या— ज्यांचा प्रतिकार इंडिया ऑफिसनें शहाणपणानें केला आहे—ध्यानांत बरोबर येत नाहींत. टांकसाळी बंद केल्यानें आतां हिंदुस्थानांत सोन्याचें प्रमाण पूर्णपणें स्थापलें जाईल असें पुष्कळ ठिकाणीं १८९३ सालीं वाटलें होतें हें खरें आहे. हेंच आपलें अंतिमसाध्य असलें पाहिजे असें १८९८ पर्यंत हिंदी सरकारला वाटत होतें. परंतु त्या वेळेपासून हिंदुस्थानांत आणि दुसरीकडे जसजसा जास्त अनुभव येत चालला तसतसें सोन्याच्या मापांत सर्व देवघेवी करण्याची नवी चलनपद्धतिच चांगली असें सर्वांना स्पष्ट वाटलें. या पद्धतींत सरकारानें परदेशच्या देवघेवीवर आपली सत्ता ठेवून, देवघेवीचें कायमचें मुख्य साधन केलेले चांदीचे सांकेतिक रुपये अथवा नोटा या सोन्याच्या मानानें कांहीं ठराविक प्रमाणाजवळ आणून ठेविल्या आहेत. साधारणपणें माहीत असलेल्यापेक्षां जगांतील बरेच अधिक देश हल्लीं हीच पद्धत वाढत्या प्रमाणावर अंमलांत आणीत आहेत. आपली सोन्याची ठेव परदेशच्या व्यापारासाठींच फक्त राखून ठेवून ज्या बाहेरच्या मुख्य व्यापारी ठिकाणाशीं ह्या देशांचा निकट संबंध आहे त्या ठिकाणावर ह्यांच्या हुंड्या असतात, आणि अशा रीतींनें धातूच्या उपयोगांत ते काटकसर करतात. ही पद्धति पुरेशी सुरक्षित असून, काटकसरीच्या कामांत सोन्याच्या चलनपद्धतीपेक्षां बरीच श्रेष्ठ आहे. सन १९०० सालापासून ही पद्धत कमी अधिक प्रमाणानें बऱ्याच ठिकाणीं अंमलांत आली असून पैशाच्या क्रांतींत निश्चयात्मक प्रगति घडून आली आहे आणि पुढेंही ही पद्धति बरीच परिणामकारक होण्याचा संभव

आहे. हिंदुस्थानांत सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवींसंबंधानें जें सध्यांचें धोरण आहे त्याचे परीक्षक नुसत्या नांवावरून आपली अशी चुकीची समजूत करून घेतात कीं, या ठेवीच्या खास हेतूंपैकीं एक हेतु हिंदुस्थानांत सोनें सांठवून शेवटीं तेथें सोन्याचें प्रमाण पूर्णपणें स्थापावयाचें हा आहे. परंतु सोन्याच्या देवघेवीच्या प्रमाणाचें खरें स्वरूप ध्यानीं आणल्यावर हें स्पष्ट होईल कीं, देवघेव चालण्याकरितां जेथें ह्या ठेवींची जरूरी लागते तेथें म्हणजे लंडनांत ती ठेवावी, आणि जोंपर्यंत तिचा बराच मोठा भाग खेळत्या स्वरूपांत ठेविला जाईल, तोंपर्यंत मोठा फायदा होऊन व्याजाच्या दृष्टीनेंही नुकसान होणार नाहीं. पाडलेल्या रुपयांची ठेव लंडनांत ठेवणें जितकें वाजवी होईल तितकेंच वाजवी सोन्याची ठेव कलकत्त्यांत ठेवणें होईल. ''

या लेखांत लढाईच्या धोक्यासंबंधानें एक शब्दही नाहीं; तसेंच इंग्लंडमध्यें नगदी पैसा देण्याचें बंद केल्यावर ( ग्रेट ब्रिटनला पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांशीं एकाएकीं लढाईचा प्रसंग आल्यास नगदी पैसा देण्याचें खास बंद होणारच ) स्टेट सेक्रेटरी एक कोटी साठ लक्ष पौंडांची हमी कशी वसूल करणार याचाही पण खुलासा कोठें नाहीं, ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. तरी पण ती आपण अशीच सोडून देऊं. वाचणाराचें लक्ष सध्यां ज्या चमत्कारिक गोष्टीकडे वळवावयाचें आहे ती ही कीं, इंडिया ऑफिसच्या या जमाखर्ची पद्धतीमुळें पैशाच्या क्रांतींत निश्चयात्मक प्रगति घडून आली आहे अशी त्या पद्धतीची तारीफ केंब्रिजचा विद्वान् प्रोफेसर चाणाक्षपणानें करीत आहे. म्हणजे क्रांतिवृत्तांत रहाणारा एखादा गरीब मनुष्य आपल्यापेक्षां अधिक श्रीमान् असलेल्या पाश्चिमात्य

शेजाऱ्यांच्यासारखे कपडे वापरण्याची उत्कट इच्छा धरून, एखादा उसनवार जुना अंगरखा मिळवितो त्याप्रमाणेंच हें आहे. हा अंगरखा गचाळ व लहान असून अगदीं उतरून गेलेला आहे व शिवण उसवलेली असून अनेक जागीं मोठालीं भोंकें दृष्टीस पडत आहेत. ह्या सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या तरीपण श्रीमान् पाश्चात्य लोक वापरीत असलेल्या चांगल्या अंगरख्याशीं ह्या अंगरख्याचें कांहींसें साम्य आहे आणि यामुळें आपल्या गरीब मित्राला त्याचा अभिमान वाटत आहे. क्रांतिवृत्तांत रहाणारे कसेबसे कपडे घालणारे लोक आपल्या शेजाऱ्याच्या झोंकदार देखाव्यानें चकित होऊन अशाचप्रकारचे फाटून चिंध्या झालेले अंगरखे उसनवार घेतात आणि अशा तऱ्हेचा पोषाख केल्यावर ते इकडे तिकडे मिरवितात आणि एकमेकांच्या ऐटीची वाखाणणी करितात.

ह्या जुन्या अंगरख्यांचे, उघड उघड दोष दाखविणाऱ्या निर्दय परीक्षकांस हे प्रोफेसर गंभीरपणें जबाब देतातः—

" हे अंगरखे शिवणकलेच्या क्रांतीमधल्या निश्चयात्मक प्रगतीचे द्योतक आहेत. शिवणी फाटून गेल्याच्यायोगानें आंतल्या कित्येक खिशांत बाहेरून सहज हात घालतां येतो; पाठीवर भोंकें असल्यामुळें हवा उत्तम तऱ्हेनें आंत खेळते. " इत्यादि, इत्यादि.

" शिवाय, क्रांतिवृत्तांतील नेहमींपेक्षां बरेच जास्त लोक आतां हे अंगरखे वाढत्या प्रमाणावर वापरूं लागले आहेत. बाहेरदेशच्या लोकांपुढें आपण चांगलें दिसावें म्हणून ते हे अंगरखे घालतात आणि कोणी आजूबाजूला नाहीं असें पाहून, त्यांचे त्यांना ते परत करतात आणि काटकसर करतात. ही रीत त्यांना बरीच

चांगली दिसत असून ती काटकसरीच्या कामांत, पूर्ण आकाराच्या, अगदीं अलीकडच्या फॅशनच्या, चांगल्या शिवलेल्या स्वतःच्या अंगरख्यापेक्षां बरीच श्रेष्ठ आहे. "

ह्याप्रमाणें, प्रोफेसर मजकूर लिहितात. कित्येक लहान लहान व गरीब राष्ट्रें अशीं आहेत कीं, तीं सोन्याचें पूर्ण चलन चालू करण्यास असमर्थ असून आपल्याकडून होतां होईल तों थोडेंसें सोनें उसनवार घेऊन अगर त्याचा संचय करून आपलें काम भागवितात. अगदीं इंग्लंडप्रमाणें पहिल्या प्रतीचीं सोन्याचीं चलनें असणें त्यांना आवडतें, परंतु त्यांची सामग्री त्यांच्यापाशीं नसते. या कामांत होतां होईलतों हीं राष्ट्रें प्रयत्न करीत असतात. शिवाय, अशाप्रकारें बाहेरच्या देखाव्याचा प्रयत्न करीत असलेल्या राष्ट्रांची संख्या साधारणें माहीत असल्यापेक्षां जास्त आहे. परंतु ह्या त्यांच्या युक्त्यांना " नाण्याच्या क्रांतींतली निश्चयात्मक प्रगति " म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणें होय. हल्लीं हिंदुस्थान अगदीं इंग्लंडप्रमाणें योग्य चलनपद्धत स्थापण्यास समर्थ आहे, आणि ती स्थापण्याचा त्यानें निश्चयही केला आहे. प्रोफेसर किन्सच्या या वरकांती सूचना हिंदुस्थान स्वीकारील अशी कल्पना करणें म्हणजे चांगलें, वाईट आणि कसें बसें यांमधला भेद त्याला कळत नाहीं असें म्हणण्यासारखें आहे. पाहिल्याबरोबर सोन्याचें चलन काय आहे तें हिंदुस्थान जाणत असून असें चलन स्थापल्यापासून कोणते फायदे आहेत, तेही पण त्याला समजतात. आणि हिंदी लोकांनीं केवळ वस्त्वाभासावर समाधान मानून घेणें, आणि त्यांना थोडीशी थंडी लागल्यावर स्वतःच्या घरांत स्वतःच्या मालकीचा एखादा चांगला तयार अंगरखा असण्यापेक्षां लॉंबार्ड स्ट्रीटमधला कोणी 'रीत

इसम आपल्याला एखादा अंगरखा उसना देईल म्हणून त्याच्यावर अवलंबून राहणें, अधिक चांगलें आणि किफायतशीर होईल, अशा-प्रकारें प्रोफेसर किन्स आदिकरून लोकांनीं हिंदी लोकांचीं मनें वळविण्याचे प्रयत्न केले तरी ह्या उघड उघड नुकसानकारक सूचना ते पत्करतील असा यत्किंचितही संभव नाहीं.

ह्या पद्धतीचें मंडन करणारे आपले दुसरे साक्षीदार ओल्ड ब्रॉड स्ट्रीटमधले प्रसिद्ध बँकवाले व लगडीचा व्यापार करणारे मेसर्स सॅम्यु-अल मँटेग आणि कंपनी हे होत. ह्या सद्गृहस्थांनीं हिंदी चलनप्रकर-णांच्या इंडिया ऑफिसकडून होत असलेल्या व्यवस्थेची अनधिकार तरफदारी करण्याच्या उद्योगांत कां पडावें, हें समजणें कठिण आहे. आपल्या सोन्या–चांदीसंबंधांत दर आठवड्यास निघणाऱ्या मार्केट-सर्क्युलरच्या एका अलीकडच्या अंकांत त्यांनीं जीं विधानें केलीं आहेत त्यांवरून हें काम करण्याची त्यांची लायकी फारच थोडी आहे, असें दिसून येईल. हिंदुस्थानांत "टाइम्स ऑफ इंडिया"नें या विधानांस 'हेत्वाभास" आणि "चलनपद्धतीचे घोंटाळे" असें म्हटलें आहे. मेसर्स मँटेगनीं केलेल्या या विधानाचेंच प्रत्यक्ष काळजीपूर्वक परीक्षण केल्यास हें वर्णन किती बरोबर आहे तें ध्यानीं येईल.

यांनीं केलेलीं विलक्षण चुकीचीं विधानें अशीं आहेत : ( १ ) हिंदुस्थानच्या चलनी ठेवींच्या द्विधातु स्वरूपामुळें पंधरा रुपयांस एक सॉव्हरिन हें प्रमाण राखलें जातें आणि ( २ ) अत्यंत कमी खर्चानें लवकर वाढवितां येणारीं चांदीच्या रुपयासारखीं सांकेतिक नाणीं हिंदुस्थानांत असणें त्या देशाला फायद्याचें आहे. हीं विधानें बाजूला ठेवून आपण मेसर्स सॅम्युअल मँटेग यांचें १९११ सालांत घडून आलेल्या गोष्टींसंबंधाचें जानेवारी १९१२ चें "वार्षिक लगडीं-

विषयींचें पत्र'' पाहूं या. या पत्राच्या पहिल्या पुरवणींत हिंदी चलनपद्धतीचा विषय विशेषरीतीनें आला आहे. छापील दोन पानांच्या जागेंत वस्तुस्थितीच्या शक्य तितक्या चुका केल्याचें श्रेय या पुरवणीच्या लेखकाला दिलें पाहिजे. हिंदी चलनविषयावर लिहावयास आजपर्यंत धजलेल्या दुसऱ्या कोणत्याही पेढीवाल्यानें, लगडीच्या व्यापाऱ्यानें, हुषार सावकारानें अगर चलनविषयावरच्या लेखकानें इतक्या चुका केल्या नसतील. मेसर्स मॉंटेगच्या पत्रांतील खालील उताऱ्यांवरून आणि त्यांवर केलेल्या टीकेवरून ही अतिशयोक्ति नाहीं असें समजेलः—

" हिंदुस्थानांत सोन्याचें प्रमाण स्थापण्याचा प्रश्न आज वर्षभर लोकांपुढें बराच आला आहे. हें प्रमाण ताबडतोब स्थापावें असा तद्देशीय लोक जोरानें आग्रह करीत आहेत, परंतु हा आग्रह मुख्यतः तात्त्विक असून व्यावहारिक कारणें त्या आग्रहाला नाहींत ....."

" हिंदुस्थानांत आज गेल्या १२ वर्षेंपर्यंत किंवा जास्तच, सोन्याचें प्रमाण अंमलांत आहे आणि म्हणून तें ताबडतोब स्थापण्याविषयीं कोणाचा तात्त्विक किंवा अन्यप्रकारें आग्रह मुळींच नाहीं. खुली टांकसाळ, सोन्याचें विशिष्ट हिंदी नाणें, आणि हिंदुस्थानच्या नगदी ठेवी आणि शिलका हिंदुस्थानांतच असाव्या, यांबद्दल एकसारखी मागणी झाली आहे. परंतु हे प्रश्न अगदीं निराळे आहेत हें मेसर्स सॅम्युअल मॉंटेग आणि कंपनीला चांगलें माहीत असावयास पाहिजे.

चांदीच्या रुपयांचीं नाणींच फक्त पूर्वीपासून " हिंदुस्थानांतील नानाप्रकारच्या लोकांच्या परिपाठांतलीं आहेत हें ध्यानांत ठेविलें पाहिजे......"

मेसर्स सॅम्युअल मँटेग यांच्या दुर्दैवानें, आपला अवतार हिंदुस्थानांत होण्यापूर्वी चवदा किंवा पंधरा शतकेंपर्यंत तेथें सोन्याच्या मोहरा आणि सोन्याच्या पुतळ्या प्रचलित होत्या. वास्तविक आपणच १८५२ दिसेंबर तारीख २२ रोजीं काढलेल्या वटहुकुमानें हिंदुस्थानांतील सोन्याची मोहोर बंद केली. गेल्या शतकाच्या पहिल्या भागांत चलनांत व हिशेबांत मुख्य पैसा सोन्याच्या पुतळ्यांचा होता. ह्याच सोन्याच्या पुतळ्या सिलोन, मॉरिशिअस आणि केप ऑफ गुडहोप येथेंही चालत होत्या. सन १८०० सालांत न्यू साऊथ वेल्स येथें या पुतळीला कायदेशीर नाण्याचा छाप बसला. सोन्याच्या मोहरेसंबंधानें, ईस्ट इंडिया कंपनीनें १७५८ सालांत ही मोहर हिंदुस्थानांत पैशाचें प्रमाण करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याला फारसें यश आलें नाहीं. बंगालमध्यें १७७४ सालीं सोन्याच्या मोहरा पाडण्याचें ठरलें. आणि ही मोहर व्यापाराच्या कामाला उपयोगीं पडेल असें तेथील १८०३ च्या ४५ व्या कायद्यानें जाहीर केलें. सन १८५२ पर्यंत असेंच चाललें; त्या सालीं सोनें किंमतींत उतरत आहे अशी भीति पडून १८५३ जानेवारी तारीख १ पासून सरकारी तिजोऱ्यांत सोन्याच्या मोहरा भरण्याचा हक्क काढून घेतला. वर दिलेल्या वस्तुस्थितीवरून मेसर्स सॅम्युअल मँटेग यांची हकीकत कांहींशी चुकीची आहे असें दिसून येईल.

" या कारणाकरितां, केवळ तात्त्विक स्वरूपाचें एकच प्रमाण स्थापण्याच्याऐवजीं, हिंदी अधिकाऱ्यांनीं पाश्चिमात्य देशांशीं देवघेव स्थिर ठेवण्याचा व्यवहारिक हेतु आपल्यापुढें धरला आहे. "

यासंबंधानें आम्हाला संशय आहे ! हिंदुस्थानाला सोन्याकरितां खुली टांकसाळ, शिवाय सोन्याचें चलन, देऊन करन्सी कमिटीनें

केलेल्या शिफारसी अंमलांत आणण्याचा प्रयत्न हिंदी अधिकाऱ्यांनीं शेवटपर्यंत केला आहे. अजूनपर्यंत हे हेतु सफल झाले नाहींत, याचा दोष हिंदी अधिकाऱ्यांकडे नाहीं. आपल्या कायदेशीर गरजांपेक्षां दुप्पट पैसा हिंदुस्थानांतून काढून सोन्याचा प्रवाह त्या देशांत येण्याचा बंद करणारा स्टेट सेक्रेटरी मिळाल्यामुळें सोन्याचें चलन ( ज्याला मँटेग कंपनी तात्त्विक स्वरूपाचें एकेरी प्रमाण असें मानते ) स्थापण्याचें काम अर्थात् बऱ्याच दिरंगाईवर गेलें आहे.

"......शिवाय सध्यां सोनें मिळण्याजोगें आहे ही गोष्ट रहातेच. तिजोरीवर हल्लीं त्याला कोणतीच मागणी नाहीं, कारण दुसऱ्या सर्व देशांप्रमाणें, तिजोरींतून सोनें मिळण्याजोगें आहे असें एकदां माहीत पडल्यावर नोटा अधिक सोयीच्या असल्यामुळें त्याच पसंत केल्या जातात."

येथेंही फिरून चूकच ! खालीं दिलेल्या प्रांतांतून १९१०–११ सालीं सरकारी तिजोऱ्यांत जितकें सोनें आलें त्याहून किती अधिक सोनें त्या तिजोऱ्यांतून हिंदी मागण्या पुरविण्याकरितां दिलें गेलें तें सरकारी रिपोर्टवरून येणेंप्रमाणें दिसून येतेंः—

| | पौंड. |
|---|---|
| पंजाब व वायव्य प्रांत ... ... | २१७८००० |
| मद्रास ... ... ... ... | १४३७००० |
| मुंबई ( सिंध धरून ) ... ... | ११९२००० |
| संयुक्त प्रांत ... ... ... | ९३८००० |
| बंगाल ... ... ... ... | ७५४००० |
| ब्रह्मदेश ... ... ... ... | ५७८००० |
| मध्यप्रांत... ... ... ... | ७५००० |
| पूर्वबंगाल व आसाम ... ... | ३५००० |

हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत उपयोगासाठीं तिजोऱ्यांतून एकंदर ७१८७००० पौंड सोनें गेलें. अशी स्थिति असूनही मेसर्स. सॅम्युअल मॉंटेग म्हणतात कीं, सोन्याला " कोणतीच मागणी नाहीं " !

" ......हिंदी सरकारानें अंमलांत आणलेली व्यवस्था पुरेशी ठेव जमेपर्यंत तशींच चालविली तर सोन्याची ठेव जमण्याकरितां एखादें मोठें कर्ज काढण्याची पाळी टळेल. " ही गोष्ट खरी आहे. परंतु सोन्याची ठेव जमण्याकरितां एखादें मोठेंच काय पण वास्तविक कोणतेंही कर्ज काढण्याची सूचना करण्याचें हिंदुस्थानांतील अगर हिंदुस्थानच्या बाहेरील कोणत्याही जबाबदार अधिकाऱ्याच्या कधीं स्वप्नांतसुद्धां आलें नाहीं. सन १९०७ सालच्या आणीबाणीच्या प्रसंगीं सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवीचा नाहींसा झालेला भाग फिरून भरून काढण्यासाठीं पुरेसा पैसा चालू उत्पन्नांतून गुप्तपणें इंडिया ऑफिसानें नेला. इंडिया ऑफिसानें गतकालीं केलेली चूक दुरुस्त करण्यासाठीं हिंदुस्थानावर बोजा कां लादला जावा हें समजणें कठिण आहे. हिंदुस्थानावर गैरवाजवी बोजा बसवून व नंतर त्या बोजाचें उत्पन्न लोकांना कल्पनाही नसलेल्या कार्यांकडे गुप्तपणें लावून इंडिया ऑफिसाला वाटेल तें कार्य साधतां येईल. ही गोष्ट मेसर्स मॉंटेग यांच्याप्रमाणें आम्हालाही मंजूर आहे !

" उद्यां जर सोन्याचें प्रमाण स्थापलें गेलें तर रयतेच्या खिशांत त्यायोगानें एक पैसाही अधिक पडणार नाहीं; आणि श्रीमंत बनिया किंवा तद्देशीय सावकार यांच्या हितापेक्षां हिंदुस्थानच्या राज्यकर्त्यांना रयतेचें हित जास्त पाहिलें पाहिजे. "

मेसर्स मॉंटेग यांची दरिद्री हिंदी रयतेसंबंधाची ही कळकळ आणि तद्देशीय पेढीवाल्यांच्या हितासंबंधाची बेफिकिरी खरोखर काळजाला लागणारी आहे.

खरें पाहिलें तर, हिंदुस्थानांत आधींच पुष्कळ वर्षेपर्यंत सोन्याचें प्रमाण असून, रयतेची स्थितिही त्याबरोबर सुधारत आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील आणि ब्रिटिश राज्यांतील दोन्ही ठिकाणच्या पेढीवाल्यांचीही पण स्थिति सुधारत आहे.

मेसर्स मॉंटेग लिहितात, " जर सोन्याचा खप वाढविणें आणि चांदीच्या खपाला आळा घालणें इष्ट दिसेल " तर तें सर्व करितां येईल. ह्या एका " जर " शब्दामध्यें किती तरी पुरावा भरला आहे. हिंदुस्थानांत सोन्याच्या खपाला उत्तेजन देण्याचें धोरण सन १८९३ सालीं हिंदी टांकसाळी बंद झाल्यापासून सुरू होऊन १८९९ सालीं हिंदी करन्सी कमिटीचा रिपोर्ट ग्रहण झाल्यानंतर त्या धोरणाची आणखी बळकटी झाली आणि स्टेट सेक्रेटरींचें, हिंदी सरकारचें आणि हिंदुस्थानांतील सर्वसाधारण जनतेचें सरकारी रीतीनें जाहिर केलेलें तेंच धोरण अजूनपर्यंत कायम आहे असा पुष्कळ लोकांचा भरंवसा आहे. परंतु मेसर्स सॅम्युअल मॉंटेग आणि कंपनीच्या दृष्टीला हें धोरण सुरू करण्याची इष्टता म्हणजे अगदीं नवा व वादग्रस्त असा मुद्दा दिसतो व त्यांच्या मतें ह्या मुद्याची भवति न भवति अजून व्हावयाची आहे. मेसर्स मॉंटेग यांच्या पुष्कळ गैरसमजांपैकींच हा एक गैरसमज आहे.

हे साक्षीदार आपण येथें सोडून देऊं. हिंदी चलनी व जमाखर्ची विषयांच्या ज्ञानाचा बहाणा मेसर्स सॅम्युअल मॉंटेग आणि कंपनी

किती बाळगीत आहे यासंबंधानें हिंदुस्थानांतील एका पुढारी पत्रानें स्पष्टपणानें लिहिलें आहे. यासंबंधी " टाइम्स ऑफ इंडिया " ची झोंबणारी टीका वाचून पहावी.

मेसर्स सॅम्युअल मॉंटेग आणि कंपनीला सोडून आपण आतां आपला शेवटला साक्षीदार ना० ई. सॅम्युअल मॉंटेग एम्. पी. स्टेट सेक्रेटरीचे पार्लमेंटरी अंडर सेक्रेटरी याजकडे वळूं. ह्यानेंच हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयला स्टेट सेक्रेटरीचा " एजंट " असें म्हटलें होतें. हिंदी व इंग्लिश पत्रकारांनीं ह्याबद्दल त्याचा जोरदार निषेध केला आणि " हिंदी अस्वस्थता " या पुस्तकाचा कर्ता सर व्हॅलें-टाईन चिरोल यानें त्याला कडक वाक्प्रहार करून हा नवा अंडर सेक्रेटरी आपल्या विधानांत निष्काळजी आहे असा दोष आपल्या पुस्तकांत त्याच्या पदरीं बांधला.

हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयचे अधिकार नमूद करणाऱ्या काय-द्यांतील उतारे घेण्यांत मि. मॉंटेग निष्काळजी आहे असें जर म्हणावयाचें, तर हिंदुस्थानचे १९११–१२ सालचे जमाखर्च आणि खर्चाचे अंदाज यांच्या खुलाशाचें टांचण जें गेल्या जुलई महिन्यांत पार्लमेंटच्या माहितीसाठीं त्याच्या सहीनें निघालें आहे त्यासंबंधानें आपण काय म्हणावें ? या टांचणाच्या ९ व्या पानांत असें लिहिलें आहे:—

## " सोन्याच्या प्रमाणाची ठेव. "

" हिंदी करन्सी कमिटीनें १८९८–९९ सालीं केलेल्या शिफा-रशीवरून असें ठरलें कीं, तारीख १ सन १९०० पासून ( १ )

नव्या रुपयांच्या नाण्यांवरच्या ऐन नफ्याला जमाबंदींत न लेखतां तो नफा एका विशिष्ट ठेवीमध्यें ( सोन्याच्या प्रमाणाची ठेव ) ठेवून द्यावा. आणि ( २ ) ही ठेव मुख्यतः शहाजोग हमीवर ठेविली जाऊन व्याज जसजसें येईल तसतसें त्या ठेवींत जमा करावें. "

हिंदी करन्सी कमिटीनें ही अशा प्रकारची शिफारस कधींच केली नव्हती. उलट, हिंदी करन्सी कमिटीनें अशी शिफारस केली कीं, "रुपयांच्या नाण्यांवरचा नफा" विशिष्ट ठेव म्हणून सोन्याच्या रूपांत ठेवला जावा आणि कागदी चलनाच्या ठेवीशीं व तिजोरींतील चालू शिलकांशीं त्याचा अगदीं संबंध असूं नये...... "

ह्यावरून आपल्याला असें समजेल कीं, इंडिया ऑफिसचें वर्तन स्टेट सेक्रेटरींनें आपल्यास सल्ला देण्याकरतां मुद्दाम नेमलेल्या तज्ज्ञ कमिटीच्या शिफारशीच्या अगदीं विरुद्ध झालें आहे; इतकेंच नाहीं तर त्याच्या अंडर सेक्रेटरींनें सरकारी खुलाशाचें जें टांचण काढलें आहे तें वस्तुस्थितीचा धडधडीत विपर्यास करून इंडिया ऑफिसचें वर्तन अधिकाराला प्रत्यक्षपणें झुगारून देऊन झालेलें नसून तें अधिकाराबरहुकूमच झालें आहे असें भासवीत आहे.

खरोखर अशा प्रकारच्या निष्काळजीपणाला नुसत्या सरकारी दुरुस्ती व माफीच्या उच्चारापेक्षां कांहीं जास्त शिक्षा असली पाहिजे. परंतु नुसती सरकारी दुरुस्ती व माफीचा उच्चार या दोहोंपैकीं एकही अजूनपर्यंत पुढें येत नाहीं.

---

# भाग ७.

## समारोप.

" ......आपल्या चलनांतून सोनें काढून टाकण्याला कोणतीही सबब नसून हें कृत्य केवळ रानटी, वेडगळ आणि सृष्टिक्रमाविरुद्ध मानलें पाहिजे...... " ( मुंबई चेंबर ऑफ कॉमर्सनें फेब्रुवारी १८६४ सालीं व्हाइसरॉयला दिलेल्या मानपत्रांतील उतारा ).

( १ ) आमचा समारोप फार थोडा आहे. इंडिया ऑफिसच्या फडनिशी कमिटीवर खालील आरोप आहेत.

( १ ) हिंदी सरकारच्या नगदी शिलकांचा दुरुपयोग झाला आहे. ह्या शिलका एक कोटी पौंडांवर आहेत.

( २ ) हिंदुस्थानच्या सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवींच्या व कागदी चलनाच्या ठेवींच्या मोठाल्या भागांची गैरव्यवस्था झाली आहे. ह्या रकमा निदान एक कोटी पन्नास लक्ष पौंडांच्या आहेत.

( ३ ) कायदेशीर देवघेवींचा पैसा पाडून घेण्यासाठीं लागणारी धातु हिंदी टांकसाळींत देऊन वाटेल तितका पैसा पाडून घेण्याचा हिंदुस्थानचा जुना वतनी हक्क नाहींसा करून टाकण्यांत आला आहे. जगांतील प्रत्येक सुधारलेलें राष्ट्र या हक्काचा उपभोग घेत आहे.

लोकांना सोन्याचीं नाणीं अनिर्बंध पाडून घेण्यास, हिंदी टांकसाळी फिरून खुल्या करण्यास इंडिया ऑफिस कां चुकलें ? याचा कोणताच समाधानकारक खुलासा सरकारी आणि बिनसरकारी साक्षीदारांकडून

बिलकुल होत नाहीं. हिंदुस्थानाला लागेल तेवढें सोनें दुसरीकडे मिळूं शकेल म्हणून विलायतेंतील तिजोरीवरच्या अधिकाऱ्यांनीं या तजविजींविरुद्ध सल्ला दिली, हें जें प्रत्यक्ष घडून आलेल्या गोष्टींचें सर गाय फ्लीटवुडनें विवरण केलें तें सुद्धां लंगडें आणि अपूर्ण आहे. अशा प्रकारच्या खुलाशानें हिंदुस्थानच्या चलनपद्धतीचा मुख्य आणि अत्यंत अवश्यक कारखाना कां काढून टाकिला, या शंकेचें समाधान होत नाहीं. ग्रेट ब्रिटनमध्यें सालिना फक्त ३००० पौंड किंमतीचें सोनें उत्पन्न होत असून तेथें खुली टांकसाळ आहे, आणि हिंदुस्थानांत २२०००००० पौंडांवरही मौल्यवान् धातु प्रतिवर्षी पैदा होत असूनही तेथें खुली टांकसाळ नाहीं. याचा परिणाम मि. रॉबर्ट कॅम्बेल, हिंदुस्थानांतील नॅशनल बँकचे चेअरमन यांनीं लंडन येथील शेअरहोल्डरांच्या वार्षिक बैठकींत ता. १९ मार्च १९१२ रोजीं सांगितल्याप्रमाणें असा झाला आहे कीं, हिंदी खाणींना आपलें सोनें विलायतेंत लंडन शहरीं पडताळून शुद्ध करण्याच्या सोयीसाठीं पाठवावें लागतें. ती सोय मुंबईंत असली पाहिजे. शिवाय, सध्यांची हिंदी चलनपद्धत या नांवाला बिलकुल अपात्र आहे. ती नुसती एक सरकारकडून व्यवस्था होत असलेली तजवीज आहे; आणि तीही अशा प्रकारची कीं, तो प्रकार खुद्द ग्रेटब्रिटननें एक शतकामागें निषेधून नापसंत केला आहे. अशी स्थिति असल्यामुळेंही असमाधानकारक कृति अशीच पुढें चालविणें अक्षम्य होय. हिंदी टांकसाळींची स्थिति १८९३ पर्यंत जशी होती तशी आणून देऊन कायदेशीर देवघेवीचा पैसा—ह्या वेळेस सोन्याचा पैसा—अनिबंध रीतीनें पाडून घेण्यास त्या खुल्या केल्या पाहिजेत.

'हिंदुस्थानच्या नगदी ठेवींच्या ( सोन्याच्या प्रमाणाच्या आणि कागदी चलनाच्या ठेवींच्या ) दुरुपयोगासंबंधानें मंडन करणाऱ्या सर्व साक्षीदारांनीं अगदीं एकच बाजू घेतली आहे. ती ही कीं, जर व्यापारांत हिंदुस्थानच्या नांवावर बाकी निघाली तर ज्या कोणाला हिंदुस्थानच्या बाहेर पैसा पाठवावा लागेल त्यांना तो पैसा लंडन शहरीं जरूर भरला पाहिजे. या कारणाकरितां लंडन हेंच ठेव ठेवण्यास योग्य स्थळ आहे. आणखी असें आहे कीं, ज्या अर्थीं एक कोटी सत्तर लक्ष पौंड सोन्याच्या प्रमाणाची ठेव म्हणून प्रत्यक्ष धातूच्या रूपांत ठेवणें नुकसानकारक होईल, त्या अर्थीं उत्तम मार्ग म्हणजे ती चांगल्या हमीवर व्याजीं लावून व्याज कमवावयाचें. हिंदुस्थानांत दुष्काळ पडून व्यापार मंदावत जाईल तेव्हां लंडनवर काढलेल्या हिंदुस्थानच्या हुंड्या पटण्यासाठीं लागणारा पैसा ह्या हमी विकून नेहमीं मिळवितां येईल.

वादाच्या ह्या बाजूचा दोष सर अर्नेस्ट केबल यानें दृष्टोत्पत्तीस आणला आहे तो असाः— ( भाग ५ पहा ).

" मी ह्या मुद्यासंबंधानें खात्री करूं इच्छित आहे कीं, जर राष्ट्रांराष्ट्रांची भानगड पडून एखादा आणीबाणीचा प्रसंग आला तर हिंदुस्थानांत सोन्याच्या लगडींचा सांठा असल्यानें आपलें मोठें रक्षण होणार आहे. अशा वेळेस आपल्या जामीन खतांची (हमींची) किंमत फार उतरून त्याच वेळेस तीं कदाचित् आपल्याला विकणें भाग पडेल, तर तोही प्रसंग टळेल. ...... "

अगदीं बरोबर. इंडिया ऑफिसमधले तज्ज्ञ लोक आणि प्रोफेसर किन्ससारखे पंडित, जी गोष्ट ध्यानांत आणीत नाहींत, ती ही कीं,

हिंदुस्थानच्या चांदीच्या सांकेतिक चलनाचें ज्यांच्यांपासून रक्षण केलें पाहिजे असे दोन धोके शक्य आहेतः—

( १ ) अर्थशास्त्रदृष्ट्या धोका

( २ ) राजनीतिदृष्ट्या धोका

अर्थशास्त्रदृष्ट्या धोका म्हणजे हिंदुस्थानांत दुष्काळ पडून हिंदी व्यापाराचा नेहमींचा ओघ पालटेल आणि अशा स्थितींत ज्या लोकांना पैसा हिंदुस्थानांतून लंडनास पाठवावा लागेल त्यांच्या सोयीसाठीं हिंदुस्थानाला इंडिया ऑफिसावर हुंड्या काढाव्या लागण्याचा संभव. अशा वेळेस सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवीचा एखादा भाग लंडनांत ठेवणें (आणि पहिल्या दर्जाच्या हमींवर तेथें तो व्याजीं लावणें ) योग्य रक्षण होईल यांत शंका नाहीं. हिंदुस्थानचे लोक यासंबंधांत विरळाच संशय घेतील. परंतु या साक्षीदारांनीं नेहमीं हेंच रडगाणें कां गात बसावें ? दुसऱ्या धोक्याची म्हणजे राजनीतिदृष्ट्या धोक्याची वाट काय ?

प्रत्येक व्यक्तीनें मी स्वतः नियमाला अपवाद होईन अशी जरी आशा केली तरी " चांगल्या भरभक्कम केलेल्या उंदरांच्या बेताप्रमाणें माणसाचेही बेत वेळ आली म्हणजे फसावयाचेच. "

गलबतांचे मालक वाटेल तसल्या हवेंतून आणि वाटेल तसल्या धोक्यांतून दर आठवड्यास अमेरिका व युरोप यांमध्यें येरझार करणाऱ्या आपल्या गलबतांचा विमा उतरून त्यांच्या सुरक्षितपणाविषयीं काळजी वाहतात; आणि हल्लींच्या दिवसांत या प्रवासाचीं साधनें किती पूर्ण आणि बिनधोक झालीं आहेत, म्हणून वारंवार आपलें अभिनंदन करतात. नंतर एकदम एखादें " टिटॅनिक " जहाज

दूरदृष्टीला झुगारून देऊन आणि कल्पनाशक्तीला थक्क करून सोडून बुडून जातें; आणि हा अनर्थ किती अकस्मात् व भयंकर झाला म्हणून सर्व जग थरारून जातें.

हीच स्थिति राष्ट्राराष्ट्रांच्या राजनीतीची आहे. ब्रिटिश राज्यांतील कांहीं घरकोंबडे, शहरवासी, शांतता भक्त आणि भोजनभाऊ राजनीतिज्ञ, जीवितकलहांत ब्रिटन लोकांना पडावयास लावणारें, एखादें मोठें युरोपिअन युद्ध म्हणजे व्यावहारिक दृष्ट्या अशक्य गोष्ट असें सर्व साम्राज्याला सांगत फिरून त्यांचा विश्वास पटवीत असतां धुक्यांतून अस्पष्ट दिसत असलेल्या एखाद्या प्रचंड बर्फाच्या डोंगराप्रमाणें, एकदम एखादें राष्ट्राराष्ट्रांचें वावटळ उद्भवून आपण कोठें आहोत हें माहीत पडण्यापूर्वी लढाऊ जहाजें इकडे तिकडे खेपा घालूं लागतात, बँकेवर लोकांची धांव जाते, आणि आपण युद्धाच्या दारांत येऊन पोहोंचलों असें सर्व देशाला वाटूं लागते. कर्मधर्मसंयोगानें हा प्रसंग टळलाच तर तें आपल्या इष्ट ग्रहांचें फळ, त्यांत आपल्या स्वतःच्या हुषारीचें व असामान्य दूरदृष्टीचें कांहीं अंग नसणार. चोहोंकडे शांततेचें बोलणें चाललें असतांही अशाप्रकारचें भय प्रत्यक्ष उपस्थित झालें होतें हें त्या वेळच्या प्रत्येक इसमास माहीत आहे.

आणि हें भय नेहमीं आपल्याभोंवतीं असतें यासंबंधानें कोणालाही संशय वाटण्याचें कारण नाहीं. आणि हें भय नेहमीं असतें म्हणून तर आपण आपल्या देशाच्या संरक्षणाच्या साधनावर दर वर्षी अधिक अधिक पैसा खर्च करीत आहोंत.

येथें आपल्यापुढें असा प्रश्न ठेवूं कीं, युरोपखंडांतील एखाद्या बलाढ्य राष्ट्राशीं युद्ध करण्याचा जर इंग्लंडवर प्रसंग आला तर

तेथल्या फक्त तीन कोटींपासून चार कोटी पौंडांपर्यंत असणाऱ्या सोन्याच्या ठेवीची काय वाट होणार ? इंग्लंडमध्यें नगदी पैसा देण्याचें बंद करावें लागेल हें तर वस्तुतः खचित आहे. अडचणीं-च्या वेळीं लोकांना घरीं बसून खावयास प्रत्येकीं सरासरी पांच पौंडप्रमाणें पुरेल इतकाही धातूचा पैसा देशांत नाहीं. रॉयल युनायटेड सर्व्हिस इन्स्टिटयूशनमध्यें मार्च १९०८ सालीं माजी सर रॉबर्ट गिफीनच्या महत्वाच्या लेखांवर जो वादविवाद झाला त्या वेळीं कित्येक वक्त्यांनीं, अव्वल दर्जाचें युद्ध जुंपल्यास नगदी पैसा देण्याचें बंद करणें अपरिहार्य होईल अशी आपली खात्री व्यक्त केली. सर फेलिक्स शूस्टर म्हणाले कीं, इंग्लंड आपल्या शत्रूंकडे सोनें खास जाऊं देणार नाहीं. ( प्रोफेसर अँड्रीडच्या इंग्लंडच्या बँकेच्या इतिहासाची प्रस्तावना ) याच गोष्टीमुळें पैसा देण्याचें कांहीं अंशीं बंद ठेवावें लागेल.

अशा संकटसमयीं हिंदुस्थानच्या सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवींची काय वाट होणार ? अशा वेळीं हिंदुस्थानांतील प्रत्येक इसमाला, कीं ज्याचें भांडवल राजधानीच्या शहरीं असेल, त्याला जो जो सॉव्हरिन बचत राहूं शकेल तो तो तेथें पाठवून त्या भांड-वलाला दुजोरा आणण्याचें भाग पडेल. इंडिया ऑफिसवर एकदम एक कोटी पौंडांपर्यंतची मागणी येणें अगदीं शक्य आहे. परंतु इंडिया ऑफिसला आपल्या हुंड्यांना खरीददार कोठून मिळणार ? नगदी पैसा कसा मिळवितां येणार ? आणि अशा वेळीं इंडिया ऑफिसला तावडतोब प्रसंगाला पाठ देतां आली नाहीं, तर ज्यांची कोणाची अत्यंत टंचाई होईल त्यांना आपल्या विक्रीच्या प्रत्येक रुपयाबद्दल एक शिलिंग साडेतीन पेन्स अगर एक शिलिंग

तीन पेन्स घेणें भाग पडणार नाहीं काय ? कोणी कोणी तर आपलीं चांदीचीं नाणीं प्रत्येकीं एक शिलिंग दोन पेन्सांस देईल हें खास. खरोखर युद्धाच्या पहिल्या झटक्याबरोबर रुपया धडाक्यानें नऊ पेन्सांवर येऊन पडेल. लंडन येथील हिंदी सोन्याच्या ठेवीची जी एवढी वाखाणणी होत असते तिचें काय होणार ? अशी स्थिति आपल्या पुढें असतांना हिंदी ठेव लंडनांत हमीवर ठेवण्याचा काय फायदा ? म्हणजे ज्या आणीबाणीच्या प्रसंगीं हिंदुस्थानचें दिवाळें निघूं नये म्हणून ह्या ठेवीची अत्यंत गरज लागावयाची त्या प्रसंगीं ती कुचकामाची होणार.

तेव्हां ही गोष्ट निर्विवाद दिसते कीं, हिंदुस्थानची सोन्याच्या प्रमाणाची ठेव वस्तुतः सर्व लंडनांत नेऊन व तेथें ती हमीवर व्याजीं लावून स्टेट सेक्रेटरी जाणूनबुजून हिंदुस्थानाला धोक्यांत टाकीत आहे. ह्या धोक्यापासून त्या देशाचें रक्षण करणें त्याचें पहिलें कर्तव्य आहे.

हिंदी सरकारच्या नगदी शिलकांच्या दुरुपयोगासंबंधानें योग्य मंडन करण्याचा कोणींही प्रयत्न केला नाहीं. टिकेल असें मंडन करणें शक्य आहे किंवा नाहीं याचाच संशय आहे. जगांतील कोणत्याही सरकारी अधिकाऱ्यानें एक कोटी ऐशीं लक्ष पौंडांइतकी नगदी शिल्लक ठेविलेली नाहीं. आणि स्टेट सेक्रेटरीनें अशा स्वरूपाची अवाढव्य शिल्लक जमवून ( यापैकीं बहुतेक शिलकेची त्याला कायदेशीर जरूरी नसतांना ) आपल्यावर गैरव्यवस्थेचा व हिंदुस्थानाचा अन्याय केल्याचा आरोप आणून घेतला आहे. हे आरोप खोडून काढणें त्याला अतिशय जड जाईल. सन १९१२ फेब्रु-

वारी तारीख १२ रोजीं मुंबईस भरलेल्या एका सभेंत सर जेम्स बिग्वी–ज्याला मुंबई बँकेचा मेंदु म्हणतात–यानें केलेल्या भाषणाचा उतारा खालीं दिला आहे. त्यावरून फुगलेल्या नगदी शिलका आणि विनाकारण लादलेले भारी कर यांच्या अनेक परिणामांपैकीं एकाची कल्पना कांहींशी होईल.

" ...... इलाख्याच्या बँका व लोक यांच्यामध्यें असलेल्या संबंधाच्या एका बाजूचा उल्लेख करणें, मला वाटतें, अयोग्य होणार नाहीं. सर्व हिंदुस्थानभर व्याजबट्ट्याचा व्यवहार ठराविक बँकदराच्या पायावर विस्तृत रीतींनें उभारला गेला आहे. हा खाजगी व्याजाचा दर बँकदराच्या बरोबर नेमका असेल अगर यापेक्षां थोडा जास्त अगर थोडा कमी असेल, परंतु पाया बँकदराचा आहे, हें तुम्हांला माहीत आहे. तुम्हांला हेंही ठाऊक आहे कीं ज्याप्रमाणें एक ऋतु संपल्यावर दुसरा त्याच्या मागें नियमितपणानें यावयाचाच त्याप्रमाणें बँकदर बरसातीच्या दिवसांत जो अगदीं खालच्या सीमेवर असतो तो हिंवाळ्याच्या आणि उन्हाळ्याच्या दिवसांत अगदीं वरच्या मर्यादेपर्यंत चढतो. ही वरची मर्यादा ७ टक्क्यांपासून ९ टक्क्यांपर्यंत असून, गेल्या बऱ्याच वर्षांत ९ टक्के हीच अखेरची मर्यादा आहे. हिंदुस्थानच्या परिस्थितींत बँकदराची ह्याप्रमाणें नियमित चढउतार व्हावी हें अपरिहार्य आहे, परंतु मी विचारतों कीं, इतक्या अखेरपर्यंत गति जाऊन विशेषतः हा दर इतक्या वरच्या मर्यादेपर्यंत नेहमीं जाणें हेंही अपरिहार्यच आहे काय ? मला वाटतें नाहीं. हा दर वर चढण्यास मुख्य कारण म्हणजे सरकार पुष्कळ पैसा पैशाच्या पेठेंतून काढून तिजोरीच्या भुयारांत कुलूपबंद करून ठेवीत आहे हें आहे. ह्या पैशाचा बराच

भाग कौन्सिल हुंड्यांची खरेदी केल्यानेंच फक्त मोकळा होतो—म्हणजे जेव्हां लोक आपलें उत्पन्न देशांतरीं पाठविण्यासाठीं स्वखुषीनें विकतील किंवा, पुष्कळ वेळां घडून येतें त्याप्रमाणें, जबर व्याजाच्या निकडीमुळें त्यांना तें विकणें भाग पडेल तेव्हांच तो पैसा बाहेर यावयाचा.

ही आपत्ति येथेंही संपत नाहीं. परंतु आम्हीं जेवढी हकीकत दिली आहे तेवढ्यावरूनच हिंदुस्थानच्या जमाखर्चाच्या व चलनाच्या इंडिया ऑफिसकडून होत असलेल्या व्यवस्थेचें सामान्य स्वरूप आणि परिणाम काय आहेत ते सर्व निःपक्षपाती विद्यार्थ्यांना आपआपल्याशीं ठरवितां येईल.

आणि या सर्व प्रकरणाचा निवाडा काय ? हा प्रश्न आम्ही आतां जे कोणी इंग्लंडच्या सुकीर्तीची काळजी वाहून ती सुकीर्ति परंपरेनें निष्कलंक चालावी अशी इच्छा धरतात त्या सर्वांच्या मनोदेवतेवर सोडतों.

खंड दुसरा
समाप्त.

# खंड तिसरा.

## ( हिंदुस्थानाकरितां सोनें. )

## भाग ८.

### हिंदी करन्सी कमिटीचा रिपोर्ट अंमलांत आणण्याचीं कारणें.

( १ ) हिंदी करन्सी कमिटीनें ( अध्यक्ष सर फौलर ) स्टेट सेक्रेटरीपाशीं हिंदुस्थानाला सोन्याचें चलन व सोन्याचें प्रमाण देण्यासंबंधाची शिफारस करून आज १२ वर्षें झालीं. तेव्हां आतां ही शिफारस किती अंमलांत आणली गेली आहे आणि हिंदुस्थानच्या सोन्याचें प्रमाण असलेल्या चलनपद्धतीचा अत्यंत महत्वाचा कारखाना ( टांकसाळ ) पूर्णतेस आणण्यासाठीं आणखी कोणत्या तजविजींची जरूर आहे याची चौकशी करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

( २ ) हिंदी करन्सी कमिटीनें केलेल्या शिफारशींचे मुख्य मुद्दे थोडक्यांत खालीलप्रमाणें देतां येतील:—

( अ ) जरूर वाटल्यास सरकारनें सोन्याच्याऐवजीं रुपये देण्याचें तसेंच चालवावें, परंतु चलनांत सोन्याचें प्रमाण ( हिस्सा )

लोकांच्या गरजांपेक्षां जास्त जाईपर्यंत नवे रुपये पाडले जाऊं नयेत. ( कलम ६०. )

( ब ) रॉयल मिंटच्या तीन ऑस्ट्रेलियन शाखांच्या धर्तीवर हिंदी टांकसाळी सोन्याचीं नाणीं अनिर्बंध रीतीनें पाडून घेण्यास खुल्या कराव्या. ( कलम ५४. )

( क ) दर रुपयास एक शिलिंग चार पेन्सप्रमाणें हिंदुस्थानांत ब्रिटिश सॉव्हरिन कायदेशीर देण्याघेण्याचें चलनी नाणें करावें. ( कलम ५४ व ६६ )

( ड ) हिंदी सरकारनें पुरेशी सोन्याची ठेव जमविल्यावर आणि तिजोऱ्यांतून सोनें मिळण्यासारखें असेपर्यंत आपलें हिंदुस्थानांतलें देणें हिंदुस्थानांत सोन्याच्या नाण्यांत द्यावें. ( कलम ५९. )

( इ ) रुपयांच्या नाण्यांवर राहिलेला नफा जमाबंदींत जमा करूं नये अगर हिंदी सरकारच्या नेहमींच्या शिलकेंत गिणूं नये, परंतु तो विशिष्ट ठेव म्हणून, सोन्याच्या रूपांत आणि कागदी चलनाच्या ठेवीपासून व नेहमींच्या तिजोरींतील शिलकांपासून अगदीं अलग असा ठेवावा. ( कलम ६०. )

( फ ) वर सांगितल्याप्रमाणें सोन्याच्या प्रमाणाची व चलनाची कार्यक्षम स्थापना लवकर व्हावी म्हणून हिंदी सरकारनें आपले उपाय एकसारखे चालू ठेवून नेटानें काटकसर करावी आणि आपलें सोन्याचें देणें वाढूं देऊं नये. ( कलम ७०. )

( ३ ) या शिफारशींवर मि. ई. ए. हॅम्ब्रो, मि. रॉबर्ट कँबेल, मि. एफ्. सी. ली. मार्शांट, सर वुइल्यम हॉलंड, सर आल्फ्रेड डेंट, सर चार्लस क्रॉस्थवेट, सर फ्रॅन्सीस मोवॅट, सर जॉन म्यूर, सर डेव्हिड

बार्बर, लॉर्ड बाल्फोर ऑफ बर्ले आणि सर हेन्री फौलर यांच्या सह्या होत्या. या अत्यंत महत्वाच्या विषयावर योग्य सल्ला देण्याला हे सर्व गृहस्थ चांगले लायक आहेत.

( ४ ) या सल्ल्याचें काय झालें ? हिंदी करन्सी कमिटीच्या शिफारशी अंमलांत आणण्याकरितां कोणत्या तजविजी योजल्या ? ह्या शिफारशी ज्या वेळेस हिंदी सरकारपाशीं पोहोंचल्या, त्या वेळेस खरोखर त्यांना त्या मनापासून आवडून त्या लागलीच अंमलांत आणण्याची त्यांनीं तयारी चालविली; तथापि हिंदुस्थानांतील कांहीं व्यापारी मंडळींनीं सरकारला हें काम लांबणीवर टाकण्याचा बराच आग्रह केला. त्यांनीं अशी तक्रार केली कीं, सॉव्हरिन कायदेशीर देवघेवीचें नाणें केल्यानें, सोनें खेंचून आणण्यासाठीं रुपयास दिलेल्या एकसत्तास्वरूपापासून होणाऱ्या फायद्यांना सरकारास मुकावें लागेल. सॉव्हरिन कायदेशीर देवघेवीचें नाणें केल्याबरोबर तो आटून जाऊन समुद्रावरील पावसाप्रमाणें नाहींसा होईल; म्हणजे धीरे धीरे सोनें सांठावयाचें तें बंद होऊन सरकारावर आपल्यास लागणारें सोनें उसनवार घेण्याची पाळी येणार. सुदैवानें या तत्त्वबोधानें सरकार अडून राहिलें नाहीं. सन १८९९ सप्टेंबर तारीख १५ रोजीं, सोनें हिंदुस्थानांत कायदेशीर चलन करून टाकलें आणि थोड्या महिन्यानंतर म्हणजे १९०० च्या मार्च महिन्यांत सर क्लिंटन डॉकीन्स यांनीं असें बोलून दाखविलें कीं:—

“ सोन्याचीं नाणीं पाडण्यासाठीं रॉयल मिंटची एक शाखा स्थापण्याचें ठरलें आहे. इंपीरिअल कॉयनेज ॲक्टाखालीं निघणाऱ्या जाहीरनाम्याच्या शर्थी नक्की झाल्या असून मुंबईंतील मिंटची

जागा व यंत्रसामग्री यासंबंधानें रॉयल मिंटनें आपलें समाधान करून घेण्याचीच आम्ही आतां वाट पहात आहोंत ...... नाणीं पाड-ण्याला सुरुवात होण्याचे आधींच म्हैसुराहून सोनें येऊन राहिलें आहे, आणि आपल्या सोन्याच्या सांठ्यांत प्रतिवर्षी तेथून पंधरा लक्षांपासून वीस लक्ष पौंडांची भर येऊन पडेल अशी आम्हांला खात्री वाटते. "

( ५ ) काय कारण असेल तें असो, परंतु वर उल्लेख केलेल्या अर्थाचा जाहीरनामा केव्हांही काढण्यांत आला नाहीं. किंवा सरकारनें मेहेरबानी करून या विलक्षण हयगयीचा खुलासाही कधीं केला नाहीं. आजपर्यंत हिंदुस्थान, सोनें पैदा होत असलेला देश असूनही आणि ग्रेट ब्रिटनच्या खालोखाल, साम्राज्याचा फार संपन्न व बलाढ्य भाग असू-नही, तो सोन्याचें अनिर्बंध नाणें पाडून घेण्यास लागणाऱ्या टांकसाळी-शिवाय राहिला आहे. हें त्यांतल्या त्यांत अधिक चमत्कारिक आहे. कारण, लोकांना मौल्यवान् धातूचा कायदेशीर देवघेवीचा पैसा वाटेल त्या वेळेस पाडून घेतां येईल अशी खुली टांकसाळ म्हणजे प्रत्येक चलनपद्धतरूपी चक्राचा एक मध्यवर्ती व महत्वाचा कांटा असून तशी टांकसाळ नसेल तर देशांतील चलनव्यवस्थेला पद्धत हें नांव क्वचितच शोभेल.

( ६ ) हिंदी सरकारानें हिंदुस्थानांत सोन्याचें प्रमाण स्थापण्या-साठीं अवश्य लागणाऱ्या आरंभींच्या तजविजी करण्यांत टंगळमंगळ दाखविली नाहीं, हें जरी खरें आहे तरी त्याचें पुढचें वर्तन विलक्षण धरसोडीचें झालें आहे. उदाहरणार्थ, सर हेन्री फौलरच्या कमिटीची अशी सूचना होती कीं, सरकारनें पुरेसें सोनें जमविल्याबरोबर त्यांनीं हिंदुस्थानांत आपलें देणें रुपयांच्याऐवजीं सोन्यांत देण्यास आरंभ

करावा. ही सूचना उत्तम असून पूर्ण व्यावहारिक होती. आपल्या कागदी चलनाच्या ठेवीमध्यें वाटत होतें त्यापेक्षां लवकर सोनें जमत आहे असें पाहून सरकार या सूचनेप्रमाणें करावयास लागलें, इतकेंच नव्हे तर या सूचनेपलीकडे जाऊं लागलें. कांहीं कांहीं पोस्ट-ऑफिसांतून जुन्या पद्धतीस चिकटून राहणाऱ्या हिंदी लोकांच्या हातांत सोनें देण्याचे, तसेंच युरोपिअन दुकानदारांकडून व्यापाराच्या कामांनिमित्त उत्तरहिंदुस्थानांत पाठविलेल्या चलनी नोटांच्या मोबदला ( योग्य नोटीस न देतां ) सोन्याच्या मोठाल्या रकमा देण्याचे व आणखी असेच प्रयत्न होऊं लागले. अर्थात् लागलीच या प्रयत्नांच्या विरुद्ध ओरड होऊन लोक त्यांचा निषेध करूं लागले. परंतु याचा परिणाम मात्र अतिशय वाईट झाला. त्या वेळीं चलनांत सोनें जारीनें उपयोगांत आणण्याची सर्व आशा स्पष्टपणें सोडून त्याऐवजीं सोन्याच्या चलनाची एकंदर मसलत सर्वस्वी लयाला नाहीं तरी बऱ्याच घोंटाळ्यांत पाडणारें चांदीचीं नाणीं काढण्याचें धोरण सरकार स्वीकारूं लागलें. हिंदुस्थानांतील व्यापाराला पैसा पुरविण्याचे कामीं बँकवाल्यांनीं सरकारपेक्षां आपल्या स्वतःच्या प्रयत्नांवर फार अधिक अवलंबून असलें पाहिजे, असें एकापाठीमागून एक आलेले फडनीस जोरानें प्रतिपादित असतां सुद्धां स्टेट सेक्रेटरी सरकारी न्यायीं धोरणापासून अगदीं घसरला, आणि त्यानें एक नवी शक्कल पत्करून त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेविलें. ही शक्कल अशी होती कीं, जो कोणी लंडनांत इंडिया ऑफिसाजवळ सोनें आणून देऊन त्याऐवजीं कलकत्ता, मुंबई किंवा मद्रास येथें रुपये मागेल त्याला, ते रुपये वाटतील तितके आणि लागतील तसे घेण्याचा पूर्ण हक्क आहे ! म्हणजे स्टेट सेक्रेटरीच्या दुसऱ्या अनेक कर्तव्यांपैकीं, हिंदुस्थानच्या

सर्व व्यापाराला तेव्हांच्या तेव्हांच पैसा पुरविण्याचेंही एक कर्तव्य होऊन बसलें. आणि तेंसुद्धां स्टेट सेक्रेटरीच्या इच्छेप्रमाणें नव्हे, अगर त्याला सल्ला देण्याकरितां मुद्दाम बसलेल्या तज्ज्ञलोकांच्या कमिटीनें केलेल्या शिफारशीप्रमाणेंही नव्हे; तर अशा रीतीनें कीं, कांहीं युरोपिअन व्यापाऱ्यांच्या मोठाल्या हिताकडे व त्यांच्या गरजांकडे लक्ष देणाऱ्या बँकांना व उदिमांच्या पेढ्यांना त्या वेळच्या आपल्या स्वतःच्या फायद्यासाठीं एखाद्या विशिष्ट पिकाला पैसा पुरविण्यास अत्यंत सोयीचें पडावें ! कॅनडा व ऑस्ट्रेलिया येथील सरकारी टांकसाळी व नगदी शिलका तेथल्या बँकवाल्यांच्या स्वाधीन एकदम करण्यासंबंधीं अशाच प्रकारचा तारेनें हुकूम गेला असता तर त्या त्या देशांच्या हायकमिशनर्सनीं काय जबाब दिले असते तें ऐकण्यासारखें झालें असतें. या विपरीत कल्पनेचें आश्चर्य वाटेल खरें, परंतु इतकें असूनही अखेरीस तिचाच जय झाला; आणि त्याप्रमाणें, सन १९०० सालीं सर क्लिंटन डॉकीन्स यानें यासंबंधांत जोरदार भाषण केलें असतांही, लाखों पौंडांची नवी चांदी विकत घेतली जाऊन तिचीं नाणीं पडत गेलीं. इतकी कीं, सन १९०५ तें १९०७ सालीं ही स्थिति शिखराला पोंहोचून चार कोटी वीस लक्ष पौंड किंमतीचे नवे रुपये हिंदी लोकांवर येऊन धडकले—जगाच्या इतिहासांत केव्हांही इतकें भारी चांदीचें नाणें पाडलें गेलें नव्हतें. आणि तेंसुद्धां सोन्याचें चलन स्थापण्याकरितां आपल्याला बांधून घेतलेल्या सरकाराकडून !

( ७ ) परंतु या कर्माबद्दल हिंदी सरकारला व त्यांच्या नव्या फडनिशी सल्लागारांना लवकरच प्रायश्चित्त मिळालें. पाश्चिमात्य देशांत त्या वेळीं ( पदार्थांच्या ) किंमतींना जो ऊत येत होता तशाच

प्रकारचा दुष्टोत्पत्तीस येईल इतका ऊत हिंदुस्थानांतही येऊन असंख्य गरीब लोकांचे हाल झाले व खुद्द सरकारला आपल्या अतिशय गरीब नोकरांना फार मोठ्या प्रमाणावर " महागाई भत्ता " द्यावा लागला. किंमतींना नुसता ऊत येण्यानेंच थांबलें नाहीं; तर हिंदुस्थानांत १९०७ सालीं पिकांमध्यें कमतरता पडून व्यापाराला जो धक्का बसला आणि त्याच सालीं संयुक्त संस्थानांमध्यें पैशाची जी तारंबळ तडाली, त्या सर्वांच्या योगें मेहनत करून ठरविलेली, रुपयाची एक शिलिंग चार पेन्स किंमतही ढांसळली आणि ऐशीं लक्ष पौंड किंमतीचें नाणें सरकारमार्फत हिंदुस्थानच्या लोकांच्या नगदी शिलकांतून परत युरोपच्या बाजारपेठांत—तेंही मंदगतीनें—जाऊन त्या पैशाचा अतिरेक कमी झाला.

( ८ ) हिंदी सरकारानें ( अ ) अतोनात मोठ्या प्रमाणावर नवे रुपये पाडले, ( ब ) धीरें धीरें व नेटानें सोन्याचीं नाणीं चलनांत आणण्यास हयगय केली आणि ( क ) सोन्याचीं नाणीं हिंदुस्थानांत अनिर्बंध पाडून घेण्यास खुली टांकसाळ उभारण्यास तें चुकलें. हिंदी करन्सी कमिटीच्या विशिष्ट शिफारशी अशा रीतीनें झुगारून दिल्या गेल्या आहेत. दुर्दैवेंकरून हिंदी सरकार एवढ्यानेंच थांबलें नाहीं. सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवींपैकीं दहा लक्ष पौंडांवर रकमेचा रेल्वे उभारण्याकडे उपयोग झाला आहे. म्हणजे या ठेवीची चांदींत मिसळ करून टाकिली आहे. या ठेवीचा बराच भाग आणि तसेंच कागदी चलनाच्या ठेवीचा बराच भाग, हिंदुस्थानांतून लंडनास मुकाट्यानें जाऊं दिले आहेत. आणि तेथें हे भाग " पसंतीच्या बँकांना " व " सोनेरी किनोरीच्या जामीनखतावर " व्याजीं लावून जिरवून टाकिले आहेत. आणि सरतेशेवटीं स्टेट सेक्रेटरींनें

हिंदी तिजोऱ्यांवर काढलेल्या विलक्षण मोठ्या हुंड्यांचा ऐवज मुकाट्यानें दिला जात आहे. हीं कृत्यें करून हिंदी सरकारानें अशा प्रकारच्या चलनपद्धतीचा अंगीकार करून ती अमलांत आणण्यास मदत केली आहे कीं, ती पद्धत सर हेन्री फौलर व त्यांच्या तज्ज्ञ लोकांच्या कमिटीनें एक वर्षभर काळजीपूर्वक चौकशी करून, विचारयुक्त केलेल्या शिफारशीच्या मुद्याच्या तपशिलांशीं धडधडीत विरुद्ध आहे.

( ९ ) हिंदी करन्सी कमिटीनें दिलेल्या सल्ल्याचें आपण फिरून एकदां बारकाईनें पृथक्करण केलें तर आपल्याला असें आढळून येईल कीं, हिंदुस्थानांत मुख्य चलन सोन्याचें करण्यासंबंधाची शिफारस प्रधान आहे; व हें सोन्याचें चलन नुसत्या राष्ट्राराष्ट्रांच्या देवघेवींची विल्हेवाट लावण्यापुरतेंच नसून देशांतील चलनपद्धतींचें मुख्य साधन व्हावें, असें कीं, त्याच्या साहाय्यानें मोठमोठाले व्यापारी व शेटसावकार आपला धंदा चालवून आपल्या चालू गरजा भागवूं शकतील. जेव्हां नामांकित फडनीस, बँकवाले, व्यापारी, सरकारी अधिकारी आणि हिंदी सरकारचे माजी सभासद अशा स्वरूपाची सल्ला एक दिलानें देतात, तेव्हां खालील गोष्टींसंबंधानें त्यांचें पूर्ण समाधान झालें आहे असेंच गृहीत धरलें पाहिजे.

( अ ) हिंदुस्थानांतील पुष्कळ लोकांना सोन्याचीं नाणीं आवडून ते त्यांचा उपयोग करतील.

( ब ) चलनाचें मुख्य साधन या दृष्टीनें सोन्याचीं नाणीं चांदीच्या नाण्यांपेक्षां अगर दुसऱ्या कोणत्याही धातूच्या चलनापेक्षां अधिक चांगलीं आहेत.

( क ) खुली टांकसाळ, आणि युरोप, व अमेरिका येथील सोन्याच्या चलनांच्या पद्धति, या नमुन्यांवरच हिंदुस्थानची चलनपद्धत ठरविली पाहिजे.

( ड ) हिंदुस्थानाला सोन्याचें चलन तसेंच सोन्याचें प्रमाण स्थापण्याकरितां जगांत पुरेसें सोनें मिळण्याजोगें आहे.

पैशासंबंधाच्या या सिद्ध गोष्टी निर्विवाद असल्याकारणानें यांच्या आधारावर केलेल्या शिफारशी सर्वतोपरी मजबूत असल्या पाहिजेत हें उघड आहे. वास्तविक हिंदी करन्सी कमिटीनें बसून प्रथम १८९९ च्या जुलई महिन्यांत केलेल्या शिफारशी त्या वेळीं जितक्या योग्य होत्या तितक्याच त्या आजही आहेत ही गोष्ट फार थोडे लोक नाकबूल करतील.

( १० ) आतां जर आपण कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर स्टेट सेक्रेटरीनें व हिंदी सरकारनें ज्या निरनिराळ्या तजविजी योजल्या त्यांच्याकडे वळलों आणि त्यांचा व्यवहारिक नतिजा लक्षपूर्वक पाहिला तर आपल्याला ताबडतोब दिसेल कीं, हा परिणाम एकाच स्वरूपाचा झाला आहे. म्हणजेः–

( अ ) सोन्याचीं नाणीं अनिर्बंध पाडून घेण्यासाठीं हिंदुस्थानांत खुली टांकसाळ स्थापण्यांत आली नाहीं. याचा अर्थ असा कीं हिंदुस्थानांत गेल्या अठरा वर्षांत पैदा झालेल्या सोन्याचा–म्हणजे तीन कोटि वीस लक्ष पौंड सोन्याचा – ह्या देशांत कायदेशीर देवघेवीचा पैसा पाडतां आला नाहीं म्हणून तें दुसरीकडे पाठवावें लागून हिंदुस्थानांत तें सोनें या दृष्टीनें नाहींसें झालें आहे.

( ब ) सरकारचें हिंदुस्थानांतलें देणें सोन्याच्या नाण्यांत फेडून सोन्याच्या नाण्याच्या फायद्याची लोकांना ओळख करून देऊन सोनें चलनांत आणण्याचें धोरण सोडलें गेलें; याचा अर्थ हा कीं लोकांची सोन्याची आवड वाढविण्याच्या उत्तम साधनाचा अव्हेर झाला. अर्थात् हिंदुस्थानाच्या या मौल्यवान् धातूच्या मागणीची वाढ एकंदर मानानें मंद होऊन, लोकांना सोन्याचा उपयोग जास्त मोकळेपणानें करण्यास उत्तेजन मिळालें असतें तर जितकें सोनें हिंदुस्थानांत आलें असतें तितकें सोनें आलें नाहीं, व यामुळें हिंदुस्थानचें नुकसान झालें आहे.

( क ) चांदीच्या नाण्याला हिंदी टांकसाळी बंद केल्यानंतर हिंदुस्थानच्या इतिहासांत कोणत्याही तीन वर्षांच्या अवधींत नाणें पाडलें नाहीं इतकें नाणें पाडलें गेलें; आणि यामुळें कमीजास्ती मानानें तितक्याच पुरता सोन्याच्या आयातीवर जोराचा दाब बसला. म्हणजे, अधिक किंमतीच्या पिंवळ्या धातूच्याऐवजीं किंमतींत उतरणाऱ्या पांढऱ्या धातूचा उपयोग करण्यास लोकांना जारीनें उत्तेजन मिळालें, इतकेंच नव्हे तर त्याबरोबर हिंदुस्थान देश पांच कोटी पौंडांवर सोन्याच्या नाण्याला मुकला.

( ड ) चांदीच्या असामान्य नाण्यावरचा नफा हिंदुस्थानांत सोन्याच्या रूपांत ठेविला जावा अशी जी कमिटीची शिफारस होती त्याविरुद्ध आपलें वर्तन ठरवून सरकारनें हिंदुस्थानांत एक कोटी नव्वद लक्ष किंवा दोन कोटी पौंड सोनें आणावें लागलें असतें तें स्वतःच टाळलें आहे. एवढ्यानेंच झालें नाहीं. सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवींपैकीं सुमारें एक कोटी ऐशीं लक्ष पौंड लंडनांत

नेऊन सरकारनें त्या वेळेपुरतें हिंदुस्थानचें व्यापारी घेणें एवढ्या रकमेनें कमी केलें आणि असें करून हिंदुस्थानास एक कोटी ऐशीं लक्ष पौंड सोनें मिळालें असतें, व वास्तविक जें मिळावयास पाहिजे होतें, तें मधल्यामध्यें अडविलें.

( ई ) त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या कागदी चलनाच्या ( हें चलन फक्त हिंदुस्थानांतच चालत असून ह्याचे पैसेही हिंदुस्थानांतच मिळण्यासारखे असतात ) ठेवीपैकीं साठ लक्ष पौंड हिंदी तिजोऱ्यांतून काढून लंडन येथें स्टेट सेक्रेटरीच्या तिजोरींत नेल्याच्या योगानें सरकारनें हिंदुस्थानचे व्यापारी घेणें फिरून अडवून हिंदुस्थानचें साठ लक्ष पौंड सोन्याचें आणखी जास्त नुकसान केलें आहे.

( फ ) आणि सरते शेवटीं हिंदी तिजोऱ्यांतील नगदी शिलकांतून आपल्या कायदेशीर गरजांपेक्षां फार जास्त रकमा दर आठवड्यास काढून त्या आपल्या लंडनच्या तिजोरींतील फुगलेल्या नगदी शिलकेंत नेल्यानें, स्टेट सेक्रेटरीनें हिंदुस्थानच्या व्यापारी घेण्याची नेहमींप्रमाणें जी व्यवस्था झाली असती तिच्यांत नुकसानकारक रीतीनें हात घातला आहे, आणि हिंदुस्थानांत साहजिक येणारा सोन्याचा प्रवाह अडवून तो कमी केला आहे.

( ११ ) तेव्हां हें स्पष्ट आहे कीं, हिंदी करन्सी कमिटीनें सर्व स्थितीचा अत्यंत काळजीपूर्वक विचार करून हिंदुस्थानच्या सोन्यासंबंधानें एकदिलानें शिफारशी केल्या, आणि स्टेट सेक्रेटरीनें व हिंदी सरकारनें तितकेंच एकदिल होऊन चलनाची व्यवस्था अशा रीतीनें चालविली आहे कीं, त्यामुळें सोनें पैदा होत असलेल्या

ह्या देशांत सोन्याच्या संग्रहाला व बाहेरून येणाऱ्या प्रवाहाला हरकत होऊन तो अडला जात आहे किंवा निदान लांबणीवर पडत आहे.

( १२ ) हिंदी सरकारच्या तर्फेनें येथें इतकें सांगितलें पाहिजे कीं, ह्या देशांत सोन्याचीं नाणीं अनिर्बंध पाडून घेण्यासाठीं खुली टांकसाळ स्थापिली नाहीं, या एका गोष्टीशिवाय, राष्ट्राच्या चलन-व्यवस्थेच्या या अपयशाचे कामांत ज्या ज्या गोष्टी करण्यांत आल्या त्यांपैकीं प्रत्येक गोष्ट पुष्कळ वादविवाद आणि शहानिशा होऊन झाली आहे. एकापाठीमागून एक आलेल्या फडनिसांनीं सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवींत चांदी घुसडण्याचीं, तसेंच ती ठेव लंडनांत नेण्याचीं आणि ती ब्रिटिश व वसाहतींच्या हमीवर व्याजीं लावण्याचीं वगैरे गोष्टींचीं कारणें नमूद करून त्यांपैकीं कांहीं कांहीं बरींच सविस्तर मांडलीं आहेत. परंतु ज्या धोरणानें आणि मूलभूत तत्त्वांनीं सरकार शेवटपर्यंत बांधलें गेलें होतें त्यांची व्यावहारिक बाजू या कारणांवरून कोठेंच दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. ही बाजू म्हणजे ब्रिटिश राज्य, स्वतंत्र ब्रिटिश वसाहती आणि जगांतील इतर सुधारलेले देश यथील सोन्याच्या प्रमाणाच्या पद्धतींच्या धर्तीवर हिंदुस्थानांत सोन्याचें प्रमाण व सोन्याचें चलन जारीनें स्थापण्यासंबंधाची.

( १३ ) परंतु येथें असा प्रश्न उद्भवतो कीं, हिंदी सरकारनें ह्या दशांतील लोकांना वाटेल तितकें सोनें ठेवण्यास अगर बाहेरून आणण्यास प्रतिबंध करण्याची इच्छा कां धरावी? हिंदी सरकारची अंतस्थ रचनाच अशी आहे कीं, त्यांनीं या बाबतींत अमुक एक गोष्ट करण्याचें ठरविलें आहे असें त्यांचे फडनीस जें कधीं कधीं सांगतात

तसा प्रकार नसून स्टेट सेक्रेटरीच्या सल्ल्याप्रमाणेंच त्याना वागणें भाग आहे, आणि हा स्टेट सेक्रेटरी सातांसमुद्रांपलीकडे अगदीं निराळ्या परिस्थितींत बसून, कधीं कधीं, जागेवर असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांपेक्षां निराळ्या दृष्टीनें हिंदुस्थानास लागणाऱ्या अवश्य गोष्टींचा विचार करतो. ह्या एका अपरिहार्य कारणाशिवाय हिंदीसरकारनें या बाबतींत आपणांला इतकें मूर्ख बनवून कां घ्यावें याचा उलगडा खरोखर होत नाहीं.

( १४ ) परंतु इतकें असूनही, कोणी असें आग्रहानें विचारील कीं, हिंदुस्थानच्या चलनपद्धतींतील रोगावर बसलेल्या चिकित्सकांच्या कमिटीनें एकमतानें त्या रोगावर ठरविलेला एकच उपाय म्हणजे सोनें. तेंच स्टेट सेक्रेटरीनें आपल्या ताब्यांतील देशाला न देण्याची इच्छा कां धरावी ? स्टेट सेक्रेटरीनें इतकें अवगुणी धोरण जाणूनबुजून विचारपूर्वक योजून त्याची व्यवस्थित रीतीनें अंमलबजावणी केली असेल हें विश्वसनीय दिसत नाहीं. कांहीं असले तरी हें उघड आहे कीं, सरकार जें हिंदी चलनाची व्यवस्था लावून राहिलें आहे त्याचें व्यवहारदृष्ट्या पर्यवसान म्हणजे आधींच सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानच्या या मौल्यवान् धातूच्या प्राप्तीमध्यें एकसारखे अडथळे आले आहेत. आणि या धातूच्या मोठमोठ्या रकमांवरच हिंदुस्थानच्या चलनाचा तरणोपाय प्रत्यक्ष अवलंबून होता. या घोंटाळ्याचा अर्थ काय ?

( १५ ) याचा अर्थ इतकाच कीं, हिंदी चलनपद्धति ब्रिटिश राज्य आणि जगांतील इतर मोठालीं राष्ट्रें येथील चलनपद्धतीच्या बरोबर आणून ठेवण्यानें बडे बडे व्यापारी व शेटसावकार

यांच्या कांहीं तात्पुरतिक गैरसोयी होतात. आणि याचा परिणाम असा झाला आहे कीं, ज्यांचा ज्यांचा म्हणून स्टेट सेक्रेटरीशीं व्यवहार आहे ( विशेषतः लंडनचा सराफकट्टा ) त्यांच्या त्यांच्या मागण्या पुरविण्यांत, स्टेट सेक्रेटरीनें जीं मूलभूत तत्त्वें हिंदुस्थानची नवी सोन्याची चलनपद्धति रचण्यांत अंगिकारिलीं पाहिजे होतीं, तीं त्यानें सोडून दिलीं आहेत.

( १६ ) पंधरा रुपयाइतकें भारी किंमतीचें सोन्याचें अपरिचित नाणें हिंदुस्थानचा अगदीं अशिक्षित असलेला जनसमुदाय प्रथमतः कांहींशा साशंक नजरेनें स्वीकारील हें सहाजिक होतें. दुर्दैवानें कांहीं चांगल्या शिक्षित अँग्लो-इंडियन लोकांनींही हिंदुस्थानांत येणाऱ्या सॉव्हरिनांविषयीं असाच अविश्वास दाखविला. अर्थात् हा अविश्वास ह्या सुंदर नाण्याच्या हेतूसंबंधानें अगर किमतीसंबंधानें नसून हिंदुस्थानच्या अंतस्थ व्यापाराच्या गरजांच्या मानानें हीं नाणीं टिकतील किंवा नाहीं यासंबंधाचा होता. अशा स्थितींत एका बाजूनें साशंकता व दुसऱ्या बाजूनें सुस्तपणा—कधीं कधीं जारीचा प्रतिकार—हींच कारणें—हें खरें आहे कीं निर्जीव कारणें, तरी पण कारणें—हिंदी सरकाराला सोनें चलनांत आणण्यासंबंधाची आपली खटपट कमी करण्यास सांपडलीं.

( १७ ) सोन्याचीं नाणीं अनिर्बंध पाडून घेण्यासाठीं मुंबईंत खुली टांकसाळ स्थापण्याचा हिंदीसरकारचा विचार स्टेट सेक्रेटरीला रहित करून टाकण्याला कोणतीं कारणें उपस्थित झालीं याचा खुलासा, लंडन शहरांत स्टेट सेक्रेटरीची पैशाची परिस्थिति जी आहे तिच्यानें होण्याचा संभव आहे. कारण जो कारखाना हिंदुस्थानांत उभा-

रला असतां आपलें सोनें कायदेशीर देवघेवीचा पैसा पाडून घेण्या-करितां युरोपांत पाठविण्याचा खर्च वांचेल. त्या कारखान्याला हिंदुस्थानांतले सोन्याचे खाणीवाले आडकाठी करण्याचा संभव कमी हें उघड आहे, तर मग आडकाठी होणार कोणाकडून ? मुंबईंत खुली टांकसाळ स्थापल्यानें लंडन येथील लगडीचे व्यापारी व शेटसावकार यांचेंच काय तें थोडेंसें नुकसान होण्याचा संभव आहे. तेव्हां यांच्या आग्रहानें तर स्टेट सेक्रेटरीला भीड पडली नसेल ? येथें एक महत्वाची गोष्ट ध्यानीं आणली पाहिजे. थोड्याच दिवसांपूर्वी लंडन येथील लगडीचा व्यापार करणाऱ्या एका दुकानानें—मेसर्स सॅम्युअल मॉंटेग आणि कंपनी यांच्या दुकानानें—एक राक्षसी सूचना प्रसिद्ध केली कीं, हिंदीसरकारनें सर्व आयात सोन्यावर एकजात जकात बसवावी. जगाच्या आरंभापासून अशा प्रकारची जकात कधींही व कोठेंही बसली गेली नसेल हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तर मग अशा प्रकारची सूचना लंडन येथूनच कां सुटावी ?

( १८ ) अशी गोष्ट आहे कीं, स्टेट सेक्रेटरीचें जें मुख्य ठिकाण आहे तेंच जगांतील एका अत्यंत अद्भुत, बँक, सावकार, व पतीवर सर्व जगांत व्यवहार करणाऱ्या संस्थेचेंही आहे. लंडन शहरांत मेहनती, साहसी व निष्कलंक सच्चेशाही सावकार आज पिढ्यान्‌पिढ्या आहेत. तसेंच तेथील सरकार नेकी व समदृष्टि या गुणांत निखालस पहिलें असून त्यांच्यापासून प्रजेला राजकीय बाबतींत पराकाष्टेचा सुरक्षितपणा आणि पूर्ण स्वातंत्र्य हीं मिळत आहेत. अशा सावकारांना अशा सरकारचें पाठबळ असल्यामुळें लंडन शहरचा सराफा जगांतील सर्व सराफ्यामध्यें अजूनपर्यंत अतिशय मोटा आहे. प्रत्येक राष्ट्राच्या बँकेचा व्यवहार लंडन शहरांत आहे. प्रत्येक

राष्ट्र पुंजीकरितां लंडन शहराकडे धांव घेतें. तसेंच पैशाच्या बाबतींत प्रत्येक राष्ट्र लंडनपासूनच सल्ला व माहिती घेतें. आणि सर्व राष्ट्रें अशा प्रकारें लंडनचीं कारस्थानें ईर्षेनें व कौतुकानें लेखतात. आणि या गोष्टीला कारणही तसेंच आहे. कारण, हें आश्चर्य वाटेल कीं, लंडन शहरचे स्थानिक व इतर राष्ट्रांशीं असलेले पैशाचे व्यवहार युरोप व अमेरिका येथील कोणत्याही शहरचे नाहींत इतके विस्तृत प्रमाणावर असूनही हीं अवाढव्य पैशाचीं कामें जगांतील कोणत्याही देशांत दृष्टीस पडणार नाहींत इतक्या छोट्याशा सोन्याच्या ठेवीवर चाललीं आहेत !

( १९ ) स्टेट सेक्रेटरीला सल्ला देणारी फडनीस–कमिटी संयुक्त पुंजीवर व्यापार करणाऱ्या व इतर बँकेचे व्यवहार करणाऱ्या लोकांच्या संगतींत असून नेहमीं लंडनच्या सराफ्यांतील पैशाच्या धुरांत वावरत असते. अशा स्थितींत हिंदुस्थानच्या चलनपद्धतीच्या प्रश्नासंबंधानें, या मोठ्या शहरांतील कांहीं फडनीस, शेटसावकार व लगडींचे व्यापारी यांच्याप्रमाणेंच स्टेट सेक्रेटरीच्या बुद्धीचा कल नकळत व्हावा यांत विशेष नवल नाहीं. ह्या लोकांच्या दृष्टीनें, जगांतील सोन्याच्या मुख्य पेठेंत सोनें आणून तेथें विशेष तज्ज्ञ लोकांकडून शक्य तितक्या काटकसरीनें त्या सोन्याचा कारभार केला जावा, ही गोष्ट, हिंदुस्थानांत एखादी सरकारी टांकसाळ उभारून तेथें लोकांना वाटेल त्या वेळेस तें सोनें नेऊन, पडताळून बिनखर्चानें त्याचें कायदेशीर देवघेवीचें चलन (नाणें) पाडून देण्यापेक्षां अधिक फायदेशीर आहे. आणि या कारणामुळें हिंदुस्थानांत अजून खुली टांकसाळ नाहीं. परंतु एका गलतीपासून दुसरी गलती कशी होते ती पहा. खुल्या टांकसाळीच्या ( इतर सुधारलेल्या देशांत

असल्याप्रमाणें ) अभावीं लोकांना लागेल तसा धातूंचा पैसा पुरविण्याची कांहीं तरी तजवीज केलीच पाहिजे. म्हणून स्टेट सेक्रेटरीनें ब्रिटिश सॉव्हरिन हें हिंदुस्थानांत कायदेशीर देण्याघेण्याचें नाणें आहे असें फर्माविलें, परंतु त्याबरोबरच लोकांना सोन्याच्या बदला मागतील तेव्हां आणि मागतील तशीं चांदीचीं सांकेतिक नाणीं पाडून देण्याचें अंगावर घेऊन आपल्या चलनपद्धतीच्या धोरणाचा उद्देश नाहींसा केला. जगांतील कोणत्याही प्राचीन किंवा अर्वाचीन सरकारानें असा कारभार करण्याचें कधीं मनांतसुद्धां आणलें नसेल, परंतु स्टेट सेक्रेटरी तो कारभार आनंदानें अंगावर घेऊन लंडन शहरांत एक प्रमुख सावकार व चांदीचा खरीददार बनला.

( २० ) तथापि स्टेट सेक्रेटरीच्या हिंदी चलनासंबंधाच्या अनेक महत्कृत्यांपैकीं हा फक्त एकच मासला होय. अलीकडील पैशाच्या व बँकेच्या व्यवहाराचें मुख्य तत्त्व म्हणजे त्या पैशाशीं आणि बँकेशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांना किफायतशीर होतील अशा शर्तींवर पैसा सांठवून तो पुरवावयाचा. म्हणून कोणत्याही प्रकारचा यत्किंचितही दाब अगर ताबा नसतांना क्रोडो गणती सरकारी पैशाची देवघेव करणारा एखादा सरकारी अधिकारी लंडन येथील पैशाच्या पेठेंत सर्वांचा चांगला दोस्त बनावा यांत नवल नाहीं. अशा स्थितींत सोन्याच्या प्रमाणाच्या व कागदी चलनाच्या मोठमोठाल्या ठेवी नुसत्या हातांत असल्यावर व्याजाचें नुकसान होईल म्हणून स्टेट सेक्रेटरीला कोणी आग्रहानें सांगितलें तर तें अगदीं साहजिक आहे. तर मग ह्या ठेवी हिंदुस्थानांत कां ठेवा ? त्यांपैकीं कांहीं पैसा लंडनांत आणून तेथें तो अव्वल दर्जाच्या ब्रिटिश व वसाहतींच्या

हमीवर व्याजीं कां न लावा ? एखाद्या मनुष्यापाशीं आपल्या खेडे-गांवांतल्या घराच्या रक्षणासाठीं एखादें आग विझविण्याचें एंजिन असून भाड्याच्या फायद्याकरितां आपल्या शहरांतील मित्राला तें एंजिन भाड्यानें देण्याचा त्याला जर कोणीं सल्ला दिला तर त्याच्याच-सारखी हिंदुस्थानच्या ठेवीसंबंधाची वरील सूचना होती. तरीसुद्धां स्टेट सेक्रेटरीला हा व्यवहार हिंदुस्थानच्या फायद्याचा आहे असें वाटलें. आणि हल्लीं वस्तुतः सोन्याच्या प्रमाणाची सर्व ठेव व कागदी चलनाच्या ठेवीचा बराच भाग अशा रीतीनें व्याजीं लावला गेला आहे कीं, एखाद्या भयंकर राष्ट्रीय संकटसमयीं या ठेवींचे उद्देश बरेच नष्ट होण्याचा संभव आहे. या ठेवींचीच अशा रीतीनें विल्हे-वाट लावून भागलें नाहीं. नुकतेंच स्टेट सेक्रेटरींनें हिंदी तिजोऱ्यांतून असणाऱ्या नगदी शिलकांवर हात चालवून त्यासुद्धां लंडनास नेल्या आहेत आणि एवढ्या सर्व पैशाची वाजवीं गरज नसतां तो " पसं-तीच्या " बँकांना आणि पैशाच्या दुकानांना व्याजीं दिला आहे. आतां यापुढें स्टेट सेक्रेटरीची ही पैशाची देवघेव कोठें थांबणार आहे याचा अंदाज करणें अशक्य आहे.

( २१ ) इकडे इंडिया ऑफिस पैशाच्या राज्यांत अशा प्रकारच्या, लोकांना भयभीत करून टाकणाऱ्या भराऱ्या मारीत असतां, नुसत्या इंग्लंडमध्येंच नव्हे तर युरोप व अमेरिका येथेंही लोकांना दिवसें-दिवस असें वाटूं लागलें आहे कीं, लंडन येथील पैशाच्या पेठेंत सोन्याच्या ठेवी विलक्षण कमी प्रमाणावर असल्यामुळें फार भयंकर अदृश्य धोका उत्पन्न झाला आहे. आजमितीस ग्रेट ब्रिटन येथील निरनिराळ्या बँकांतून धातूच्या खास ठेवी किती आहेत हें नक्की कोणालाच माहीत नाहीं, परंतु जिच्यावर सर्व देश मुख्यतः अवलं-

बून आहे ती इंग्लंडच्या बँकेंतील ठेव चालू कर्जांच्या मानानें आज पुष्कळ दिवस फारच अपुरी आहे. तीस वर्षांमागें त्या वेळच्या प्रमुख अर्थशास्त्रवेत्त्यांनीं एकंदर स्थिति किती भयंकर होती याचा इषारा राज्याला दिला होता. त्या वेळेपासून आजपर्यंत विलायतेंतील व बाहेरचे लेखक, व्यापारी, बँकवाले, वर्तमानपत्रकर्ते आणि निरनिराळ्या राजकीय मतांचे पुढारी या सर्वांनीं इतकी अवाढव्य जगभर उभारलेली पतीची इमारत धातूच्या इतक्या लहानशा जोखमीच्या पायावर तोलून ठेविल्यानें किती धोक्याचें झालें आहे हें ओळखून त्याची चर्चा केली आहे. जरी पूर्वीं आलेले, पैशासंबंधाचे, त्रेधा उडवून टाकणारे आणीबाणीचे प्रसंग फिरून येतील हें खरें आहे, तरी, जितका धोका राष्ट्रीय कुरापती व राष्ट्राराष्ट्रांच्या व्यवहाराला होणारा प्रतिबंध यांच्यामुळें उद्भवणाऱ्या भयंकर राजकीय त्रासापासून आहे तितका धोका अर्थशास्त्रदृष्ट्या नाहीं. एखादें मोठें युरोपिअन युद्ध शक्यतेच्या टापूबाहेरचें बिलकुल नाहीं. प्रसंगविशेषीं एका गालांत मारल्यावर दुसरा गाल तोंडांत मारणाराच्या पुढें करावयाचा हें जसें साधारण मनुष्य स्वभावाला धरून आहे तसेंच प्रसंगोपात् दोन हात करणेंही आहे; आणि असें आहे म्हणून बरें आहे, नाहीं तर, फार थोड्या अवकाशांत आपण इतके दुर्बळ व काड्यामोडच्याचा अवतार बनून जाऊं कीं, आपल्या दरवाज्यावर मारा करणारें पहिलें बलवान् राष्ट्र आपला चेंदामेंदा करून टाकील. तेव्हां ही गोष्ट आपण ओळखून प्रतिवर्षीं जे सात कोटी पौंड आरमार आणि फौज यांप्रीत्यर्थ खर्च करीत आहोंत तें अगदीं बरोबर आहे. शिवाय सर्व राष्ट्रांच्या आपआपसांतील तहासंबंधाच्या नुकत्याच मांडलेल्या सूचनांचा युरोपमधल्या अत्यंत लढवय्या राष्ट्रानें ज्या रीतीनें

स्वीकार केला त्या रीतीवरून जर आपण अंदाज बांधला तर आपल्याला यापुढें पूर्वीपेक्षांही जास्त सढळ हातानें लढाऊ गलबतें बांधावीं लागतील. आणि हें सर्व वस्तुस्थितीला अनुसरून व साहजिक आहे. युद्धाच्या कामाला शरीरबल व लढाऊ सामुग्री यांची उभारणी व पूर्णता जितकी अवश्य आहे तितकीच पैशाची तयारीही पण आहे. असें असूनही दुर्दैवानें आपल्या साम्राज्यबचावाच्या ह्या बाबींकडे आपले राजनीतिज्ञ एकसारखें दुर्लक्ष करीत आहेत. लंडन शहरचे बँकवाले व व्यापारी ( जे आपलें स्वतःचें काम उत्तम रीतीनें जाणतात असें मानतां येईल ) यांच्या पैशाच्या धोरणाचा कित्ता गिरवून ब्रिटिश सरकार कोणत्याही प्रकारच्या कोणत्याही कार्यासाठीं सोन्याच्या ठेवी राखीत नाहीं. ट्रस्टी आणि पोस्टऑफिस सेव्हिंग बँकांच्या प्रीत्यर्थ( कर्ज २५००००००० पौंडांवर )-ही राखीत नाहीं, किंवा सर्व साम्राज्याचें संरक्षण ज्यांच्यावर अवलंबून आहे त्या आरमार आणि फौजेप्रीत्यर्थही कांहीं ठेव ठेवीत नाहीं. खरोखर सरकारापाशीं आपल्या स्वतःचे राज्यकारभार चालविण्यासाठीं आपल्या बँकांतून पुरेशी तयार नगद कधींच नसते. हुंड्यांवर हुंड्या आणि हंगामी कर्ज काढूनच सरकार दररोज आपलें काम भागवीत असतें. ब्रिटिश चॅन्सेलर ऑफ धी एक्स्चेकर यानें काढलेले " मला तुमचें देणें आहे " असे कागद हल्लीं एक कोटि तीस लक्ष पौंडांवर गेले आहेत.

( २२ ) येथें प्रथम इंग्लंडच्या बँकेची सोन्याची ठेव इतर कांहीं छोट्या मोठ्या राष्ट्रांच्या सोन्याच्या ठेवींच्या मानानें किती कमती आहे तें सांगणें आणि नंतर इंग्लंडच्या ठेवीच्या अपुरेपणासंबंधानें तज्ज्ञ लोकांची कांहीं कांहीं मतें नमूद करणें बरें पडेल. खालील

आंकडे जगांतील कांहीं प्रमुख देशांतील तिजोऱ्यांतून व राष्ट्रीय बँकांतून सन १९११ च्या दिसेंबर तारीख ३१ रोजीं असलेल्या सोन्याच्या ठेवींचे आहेत.

| | पौंड. |
|---|---|
| संयुक्त संस्थानें ... ... | २६३२५१००० |
| फ्रान्स ... ... ... | १३११७७००० |
| रशिया ... ... ... | १३०४७६००० |
| ऑस्ट्रिया ... ... ... | ५५०२३००० |
| इताली ... ... ... | ४८३६३००० |
| आर्जेंटिना ... ... ... | ३७०३३००० |
| जर्मनी ... ... ... | ३३०५२००० |
| ऑस्ट्रेलेशिया ... ... | ३१८२०००० |
| इंग्लंड ... ... ... | ३१३५६००० |

आजमितीस इंग्लंडच्या बँकेचें सोन्याचें भांडवल सुमारें ४०००००० पौंड असून युरोपखंडांतील इतर देशांतील ह्या मौल्यवान् धातूचीं भांडवलेंही कांहींशीं ह्याच्यापेक्षां जास्त आहेत. इंग्लंडच्या बँकेचा हा आंकडा जरी लंडन येथील मोठाल्या बँकवाल्यांच्या सचोटीवर व राष्ट्राचे हितसंबंध राखून शांतता ठेवण्याचे ब्रिटिश सरकारच्या अंगांत असलेल्या सामर्थ्यावर लोकांचा विश्वास किती आहे ह्याची साश्चर्य साक्ष देत आहे; तरी त्याबरोबरच तो आंकडा एखादे वेळेस हा विश्वास बराच उडाल्यावर अगर पतीला जबरदस्त धोका बसल्यावर किती मोठें संकट येऊन पडेल याविषयीं लोकांच्या मनांत दांडगी भीति उत्पन्न करीत आहे.

गेल्या कांहीं वर्षांत अनेक प्रसंगीं इंग्लंडची पैशाच्या बाबतींत जी भयंकर तारंबळ उडाली होती त्या वेळीं फ्रान्सच्या बँकेनें लंडनास कांहीं कोटी पौंड सोनें पाठवून ते प्रसंग वांचविले आहेत आणि इंग्लंडला मदत केली आहे हें आपण विसरतां कामा नये. युरोपखंडांतील आपले मित्र नेहमींच आपल्या मदतीला अशा रीतीनें येतील असें नाहीं. मदत करण्याच्या ऐवजीं हे लोक तटस्थ राहिले अगर आपले शत्रु बनले तर कोणता प्रसंग गुजरेल ?

( २३ ) गेल्या शतकाच्या आरंभीं जेव्हां नेपोलिअननें ब्रिटिश राज्य हाणून पाडण्याचा प्रयत्न केला त्या वेळीं त्यानें जे उपाय योजले त्या अनेक उपायांत ग्रेट ब्रिटनांतून लगडीचा सांठा रिकामा करण्याचा कावेबाज प्रयत्न हा एक होता. त्या वेळच्या दिवसांत आपला मोलाचा पतीचा व्यवहार वाजवीपेक्षां भयंकर वाढला होता असा विचार करून नेपोलिअननें या नाजूक भागावर शक्य त्या मार्गानें मारा देण्याचें ठरविलें; आणि म्हणून ज्या एकंदर तजविजी त्यानें योजल्या त्यांत बर्लिन व मिलन डिक्री या होत्या. पुढें हे त्याचे बेत फिसकटले ते कांहीं त्याच्या कल्पनांमध्यें कांहीं चूक होती म्हणून नव्हेत, तर आम्हांला त्रास देण्याकरितां त्यानें योजलेल्या तजविजी अंमलांत आणण्यामध्यें त्याला कैक अडचणी आल्या म्हणून. नेपोलिअनला कधीं कल्पनाही नसेल इतक्या अपरिमेय मोठ्या प्रमाणावर आपली पत आज वाढली आहे व ती वाढ राष्ट्राराष्ट्रांच्या खटपटींत नाजूक झाली आहे. तेव्हां अशा स्थितींत ग्रेट ब्रिटनसारख्या अव्वल दर्जाच्या राष्ट्राजवळ अत्यंत अल्प सोन्याची ठेव असल्यामुळें हा देश हल्लीं मोठ्या धोक्यांत पडत चालला नाहीं काय ?

( २४ ) सर्व अधिकारी माणसें या प्रश्नाचें होकारार्थीच उत्तर देतील, नकारार्थी कोणीही देणार नाहीं. नुकत्याच म्हणजे ता. १४ मार्च १९११ रोजीं भरलेल्या ब्रिटिश राज्यांतील असोशिएटेड चेम्बर्स ऑफ कॉमर्सच्या बैठकींत इंग्लंडच्या सोन्याच्या ठेवींच्या अपुरतेपणावर वाद झाला त्यांत एका वक्त्यानें ( मि. जे. हॉवेल ब्रिस्टल ) सभासदांना असें सुचविलें कीं,

" ...... हा प्रश्न कांहीं नवा नाहीं. ४५ वर्षे याचा वाद होऊन असोशिएटेड चेम्बर्सनीं १५ ठराव पास केले आहेत, पार्लमेंटला तीन विनंति अर्ज व दोघां चॅन्सेलर ऑफ दी एक्स्चेकरांना दोन अर्ज पाठविले आहेत ...... "

" ...... देशांतील सोन्याच्या ठेवी पुरेशा आहेत किंवा नाहींत, आणि नसतील तर कोणते उपाय सुचवितां येतील याचा विचार करण्यासाठीं ...... " १९०८ सालीं लंडन चेम्बर ऑफ कॉमर्सच्या कौन्सिलनें एक फार हुषार लोकांची विशिष्ट कमिटी नेमली. एक वर्षभर वाटाघाट करून कमिटीनें आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला. त्यांत

" ...... ह्या देशांतील सोन्याच्या ठेवी वाढविणें इष्ट " असल्याबद्दल एकमतानें त्यांनीं आपला अभिप्राय दिला, आणि बऱ्याच जणांनीं ही स्थिति सुधारण्याच्या हेतूनें कांहीं विशिष्ट सूचना केल्या. नफानुकसानीचा संबंध असलेल्या लोकांमध्यें अजून या सूचनांचा वाद होत आहे. मध्यंतरीं ब्रिटिश राज्यांतील असोशिएटेड चेम्बर्स ऑफ कामर्सनीं वरील बैठकींत खालील ठराव एकमतानें पास केला.

" ही असोसिएशन १९०६ च्या मार्च महिन्यांत सोन्याच्या ठेवीसंबंधानें पसार झालेला ठराव खालील शब्दांत फिरून पास करीत आहेः—संयुक्त राज्यांतील सोन्याच्या ठेवीचा नेहमींचा अपुरतेपणा सर्वांच्या लक्षांत आला असून सरकारचें लक्ष ताबडतोब त्याकडे गेलें पाहिजे. "

सरकारनें या स्थितीचें भय आधींच जाणलें नव्हतें अशांतला प्रकार नाहीं. कारण, १९०६ च्या जुलई महिन्यांत बँकवाल्यांच्या एका मेजवानीचे प्रसंगीं, चॅन्सेलर ऑफ दी एक्सचेकर असतांना, मि. ॲस्किथ म्हणाले कीं, " सोन्याच्या ठेवींचा हा प्रश्न फार कठिण असून त्याचें महत्त्व वाढत आहे आणि माझेंही लक्ष या वेळीं तिकडे अत्यंत वेधून राहिलें आहे. ...... "

याच वेळीं बँकवाल्यांच्या दुसऱ्या एका मेजवानीचे प्रसंगीं माजी लॉर्ड गॉस्चेन यांनीं सांगितलें कीं,

" ...... आपल्याला कर्ज प्रचंड झालें असून आपल्याजवळ असलेलें सोन्याचें भांडवल दुसऱ्या कोणत्याही देशांपेक्षां कमी आहे. ही स्थिति समाधानकारक नाहीं. ...... " इतकें एकमत असूनही अजूनपर्यंत प्रत्यक्ष कांहीं करण्यांत आलें नाहीं. मि. एडगर क्रॅमंड यानें गेल्या वर्षीं मँचेस्टर येथें व थोड्या महिन्यांपूर्वीं फिरून लंडन येथें " युद्धाचे प्रसंगीं आमच्या सोन्याच्या ठेवी " या विषयावर जोरदार भाषणें केलीं आहेत. त्या वेळीं त्यानें हजारों उदाहरणें देऊन असें सप्रमाण सिद्ध केलें आहे कीं, एखाद्या बलाढ्य शत्रूनें आपल्यावर हल्ला करण्याची तयारी करून त्याच वेळेस सोन्याच्या मोठमोठ्या रकमा लंडनांतून काढून घेण्याचा सपाटा लावला तर

केवळ पैशाचा घोंटाळाच जरी नाहीं तरी आपली फार भयंकर त्रेधा उडेल हें खास. या वादांत कांहीं तथ्य आहे असें " टाइम्स " नें कबूल केलें. प्रोफेसर फॉक्सवेलचें असें मत आहे कीं, बिना रूपांतरांच्या चलनाशिवाय आपण एखाद्या अव्वल दर्जाच्या युद्धांत टिकूं अशी कोणत्याही प्रकारें खात्री नाहीं. १९०८ सालांत रॉयल युनायटेड सर्व्हिस इन्स्टिटच्यूशनमध्यें या विषयावर महत्त्वाचा वाद झाला. सर रॉबर्ट गिफिन यानें लिहिलेल्या एका भारदस्त लेखाचा विचार चालला असतां—

" कित्येक वक्त्यांनीं आपली अशी खात्री व्यक्त केली कीं, एखादें अव्वल दर्जाचें युद्ध जुंपल्याबरोबर नगदी पैसा देण्याचें बंद करणें अपरिहार्य होईल; व सर फेलिक्स शूस्टर म्हणाले कीं, आपण शत्रूकडे सोनें पाठविण्याचें खचित बंद करूं आणि यायोगानेंच नगदी पैसा देण्याचें कांहीं अंशीं बंद होईल. ...... "

( २५ ) या सर्व वादाची गोळाबेरीज अशी आहे:—जोंपर्यंत विलायतेंतील व बाहेरचें राजकीय वातावरण निरभ्र आहे, तोंपर्यंत इंग्लंडच्या बँकेची हल्लींची सोन्याची ठेव जरी व्यावहारिकदृष्ट्या चालू गरजांच्या कामाला पुरेशी आहे, तरी प्रत्येक तज्ज्ञाचें मत असें आहे कीं, ही सुरक्षितपणाची मर्यादा फार आकुंचित असून सोन्याची ठेव ताबडतोब वाढविली पाहिजे. व्यापाराचा अतिरेक झाल्यामुळें व मालाच्या वाढत्या किंमतीपासून एखादें अर्थशास्त्रदृष्ट्या वावटळ उत्पन्न झालें तर ग्रेट ब्रिटन सोन्याच्या भांडवलानें इतका नागवण्याचा संभव आहे कीं, बाहेरच्या बँकांतून मदत आणणें जरूर पडेल, असा विचार करून पुष्कळ लोकांचें मत असें झालें आहे कीं, संकट-

समयाकरितां राखून ठेविलेली मूल्यवान् धातूंची ठेव बरीच वाढविली पाहिजे आणि सरकारानें आपली स्वतःची सोन्याची ठेव राजकीय व व्यापारी कामांप्रीत्यर्थ सांठवून ( जशी दुसऱ्या राष्ट्रांजवळ आहे ) या सुधारणेच्या मदतीस आलें पाहिजे, व ही ठेव इंग्लंडची बँक व ब्रिटिश राज्यांतील दुसऱ्या कांहीं मोठ्या बँकांतून असलेल्या ठेवीं-पासून अगदीं अलग असावी. आणि शेवटीं एखाद्या मोठ्या राष्ट्रानें राजकीय कारणांसाठीं आपल्या सोन्याच्या भांडवलावर एकदम हल्ला केल्यास सध्यांची ग्रेट ब्रिटनची सोन्याची ठेव फार कमी असल्यामुळें आपलें राष्ट्र भयंकर धोक्यांत येऊन पडेल अशी कांहीं लोकांची तक्रार आहे, आणि वरिष्ठ हुद्यांच्या पुष्कळ तज्ज्ञ लोकांचें असें म्हणणें आहे कीं, ग्रेट ब्रिटनवर दुर्दैवानें जर एखाद्या अव्वल दर्जाच्या युरोपिअन राष्ट्राशीं युद्धाचा प्रसंग ओढवला तर चोवीस तासांचे आंत आपली बहुतेक सोन्याची ठेव नाहींशी होण्याचा संभव आहे; नगदी पैसे देण्याचें कदाचित् बंद पडेल, व पैशाच्या बाबतींत राष्ट्राचें इतकें नुकसान होईल कीं, त्याची पांचावर धारण बसेल; आणि हें नुकसान लहान पायावर उभारलेल्या मोठ्या पतीचें फळ होय. याशिवाय युद्धाच्या मामुली खर्चाचा बोजा दडपून टाकील तो वेगळाच. आणि हा सर्व परिणाम सर्वथैव अपुऱ्या मानल्या गेलेल्या सोन्याच्या ठेवीवर आपण मूर्खपणानें भिस्त ठेवतों त्याचा.

( २६ ) इंग्लंडच्या बँकेंतून प्रत्येक वेळेस जाणाऱ्या येणाऱ्या नगदीवर व धातूंच्या लगडींवर लंडनची पैशाची पेठच केवळ नव्हे तर जगांतील पैशाच्या सर्व पेठा इतक्या बारकाईनें कां नजर ठेवतात, हें वरील गोष्टींवरून स्पष्ट होईल. लंडन हें सोन्याच्या धातूचा मुख्य सांठा असून त्याजकडे पैशाच्या अडचणीच्या वेळीं प्रत्येक राष्ट्र प्रथम

धांव घेतें. यामुळें इंग्लंडच्या बँकेच्या रोजच्या स्थितीकडे सर्व जगाचे डोळे लागून रहातात. शांततेच्या वेळीं इंग्लंडच्या बँकेंतून सोनें माफक प्रमाणानें नेहमीं मिळूं शकतें. त्याचप्रमाणें शांततेच्या काळांत, नुसता व्याजाचा दर वाढविल्याबरोबर युरोप व अमेरिका येथून इंग्लंडच्या बँकेंत सोनें नेंहमीं येऊंही शकतें. इंग्लंडचे व्यापारी लोक नेहमीं जो उसनवार पैसा काढतात त्यावर त्यांना अधिक व्याज द्यावें लागल्यानें ही व्याज वाढविण्याची युक्ति ह्या व्यापारांना तेव्हांच जाणवते. तरी पण सर्व वर्षभर इंग्लिश भांडवल किती कमी खर्चानें मिळूं शकतें याचा विचार केला असतां व्यापारी लोकांना हें अधिक व्याज देण्यास परवडतें; आणि पुष्कळ लोकांच्या मतें राष्ट्रांराष्ट्रांची गुंतागुंत होऊन ग्रेट ब्रिटन एखाद्या युरोपिअन युद्धांत पडण्याचा संभव फार दूरचा असल्यामुळें, अशाप्रकारचें एखादें युद्ध उद्भवल्यावर पत सर्व बाजूनें ढांसळून लोकांची पांचावर धारण बसण्याचा प्रसंग जरी केवळ कानाडोळा करण्यासारखा नाहीं तरी तसाच दूरचा आहे असें व्यापारी लोक मानतात.

( २७ ) आणि इतकें असूनही आपल्यापुढें ही भीति आहे ती आहेच. फार तर काय, पण नुकत्याच घडून आलेल्या गोष्टींनीं, पुष्कळ लोक समजतात त्यापेक्षां कदाचित् हा प्रसंग जास्त लवकर येईल असा आपल्याला इषारा दिला आहे. आणि म्हणून जेव्हां जेव्हां इंग्लंडच्या बँकेंतून मोठमोठाल्या रकमा एकाएकीं काढल्या जातात त्या त्यावेळेस लंडनच्या पैशाच्या पेठेला एक प्रकारचा उमाळा येत असतो. एखाद्या अर्ध्या कोटीची किंवा अशीच एखादी रक्कम अमेरिका किंवा युरोपखंडांत गेल्यानें हाकाक होईल अशांतला भाग नाहीं. परंतु हिंदुस्थानांतून ही मागणी आली तर गोष्ट

अगदीं निराळी आहे. कारण, राष्ट्रांराष्ट्रांच्या परस्पर कर्जाची विल्हे-वाट लावण्यासाठीं सोनें लंडनांतून पश्चिमेकडील इतर राजधानींत जसें जातें तसें तें साधारणतः युरोपास व अमेरिकेस इंग्लंडचें जें कर्ज असेल त्याच्या फेडीसाठीं परत लंडनांत येतें; परंतु हिंदुस्थानची गोष्ट अशी आहे कीं, व्यापारांत त्या देशाचें साधारणतः घेणें असतें ( या घेण्याची मर्यादा लहान नसून तें प्रसंगोपात् तीन, चार किंवा पांच कोटी पौंडांपर्यंत सुद्धां सालींना जाण्याचा संभव आहे ); आणि यामुळें जें सोनें लंडनांतून हिंदुस्थानांत येईल तें परत पुन्हां लंडनांत जाण्याचा संभव फारच कमी.

( २८ ) लंडनची पैशाची पेठ सर्व जगांत अतिशय मोठा व्यापार अत्यंत अल्प सोन्याच्या पायावर तोलून धरीत असते. तेव्हां अशा स्थितींत हिंदुस्थान इंग्लंडच्या अल्प भांडवलांतून या मौल्यवान् धातूच्या क्रोडो रकमा एकसारख्या काढूं लागण्याच्या संभवामुळें या पेठेला कायमची धास्ती वाटत आहे. लंडनच्या फडनिसांनीं एक कारण-परंपरा लावून—ही कारणपरंपरा समजण्यास कठीण नाहीं—असें ठरविलें आहे कीं, ग्रेट ब्रिटनच्या पैशाची स्थिरता राखणें ही गोष्ट हिंदुस्थानची सोन्याची मागणी पुरविण्यापेक्षां फार अधिक महत्त्वाची असल्यामुळें हिंदुस्थानच्या यासंबंधाच्या गरजा लंडनच्या पैशाच्या पेठेच्या अडचणीपुढें नेहमीं गौण मानल्या पाहिजेत. लंडनांतून प्रत्यक्ष काढल्याशिवाय जर हिंदुस्थानाला लागेल तें सोनें मिळूं शकेल—म्हणजे उदाहरणार्थ ऑस्ट्रेलियांतून अगर ईजिप्तांतून—तर लंडनला त्याचा अधिकच आनंद आहे. जर हिंदुस्थानाला लंडनांतूनच सोनें पाहिजे तर लंडनची पैशाची पेठ, सोय झाल्यास, ती मागणी पुरविण्याचा प्रयत्न करील. परंतु लाखों पौंड सोनें एकदम

काढून नेतां उपयोगाचें नाहीं; कारण त्यापासून फारच त्रास होईल. हिंदुस्थानानें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, लंडनच्या पेठेच्या गरजांचा विचार प्रथम झाला पाहिजे; आणि साम्राज्यांतील पैशाच्या नदीचा नेमस्तपणा ज्यांच्या हातांत आहे त्यांच्या उपकारांची फेड पूर्णपणें झाल्यावरच हिंदी लोकांच्या गरजांचा विचार करतां येईल.

( २९ ) अशा प्रकारच्या वरकांती योग्य दिसणाऱ्या तत्त्वांवर लंडनच्या पैशाच्या पेठेंतील लोक हिंदुस्थानच्या पैशाचा खेळ करीत आहेत. वरून वाजवी दिसणाऱ्या ह्याच विचारांचा परिणाम इंडिया ऑफिसाच्या फडनिशी कमिटीवर व स्टेट सेक्रेटरीवरही व्हावा ह्याचेंही आपल्याला आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. अशाच प्रकारचीं दुसरीं कारणें लावून—यांपैकीं कांहींचा उल्लेख वर केलाच आहे—ह्या लोकांनीं हिंदुस्थानाला सोन्याचीं नाणीं अनिर्बंध पाडून घेण्यासाठीं खुली टांकसाळ देण्याचें नाकारलें आहे; व हिंदुस्थानच्या लोकांना सोन्याचा अधिक उपयोग करण्यास ते उत्तेजन देत नाहींत; हिंदुस्थानची सोन्याच्या प्रमाणाची ठेव व कागदी चलनाची ठेव लंडनास नेतात; आणि साधारणतः लंडनांतून सोनें हिंदुस्थानांत येण्याचें होतां होईल तों बंद करण्यासाठीं मनांत येईल ती प्रत्येक फडनिशी शक्कल लढवून खास हिंदीसरकारच्या संदुकींतील पैसाही लंडनांत नेण्यास कमी करीत नाहींत.

( ३० ) अशा प्रकारचें धोरण प्रत्यक्ष जाणूनबुजून अमलांत आलें आहे हें अगदीं उघड आहे. मार्च १९१० सालांत हिंदी खर्चाच्या अंदाजपत्रकावर जो वादविवाद झाला त्यांत सर गाय फ्लीटवुड वुइल्सन म्हणाले कीं:—

" या सर्व गोष्टींचा विचार करतांना इंग्लंडच्या लोकांचें मत टाकून देतां उपयोगाचें नाहीं. माझ्या स्वतःसंबंधानें, हिंदी पैशाचा विचार हिंदी दृष्टीनें व्हावा अशी माझी मनापासून इच्छा असून मी तसें करीनही; परंतु इंग्लंड व हिंदुस्थान यांचे सामायिक हितसंबंध एकमेकांपासून अलग अलग करण्याचा प्रयत्न करणें अगर विलायतेंतील पेठेवर हिंदुस्थान किती अवलंबून आहे हें ध्यानीं न आणणें यापेक्षां माझ्या मतें दुसरी अधिक चुकीची गोष्ट नाहीं. ....."

त्याच वेळीं मि. भेस्टन यांचें भाषण याहीपेक्षां साफ होतें. ते म्हणालेः—

" जगांतील मुख्य सोन्याच्या पेठेला धक्का बसण्याचें भय उत्पन्न झालें अगर सोनें आटण्याची किंवा आटलें आहे असें भासण्याची धास्ती उत्पन्न झाली तर आपल्याला फार सावधगिरीनें वागलें पाहिजे. रात्रीच्या पाठीमागून जसा दिवस यावयाचाच तितक्या खात्रीनें याचा परिणाम उलट हिंदुस्थानच्या पैशावर व्हावयाचाच..."

" टाइम्स ऑफ इंडिया " च्या १९१० मार्च ता. १२ अंकांत खालील मजकूर होताः—

" लंडन टाईम्स " ला असें समजतें कीं, हिंदी सरकार सोनें हिंदुस्थानांत येऊन देण्याची अत्यंत खटपट करीत आहे आणि याकरितां हिंदी बँकांनीं इजिप्त व ऑस्ट्रेलिया येथें सोनें खरेदी करून लंडनला आणलें तर त्याबद्दला त्यांना १६ पेन्सप्रमाणें हिंदुस्थानांत चलन देण्यास सुद्धां तें सरकार तयार आहे... "

थोड्या दिवसांनंतर या विधानाला जबाब मिळाला, तो सरकारच्या प्रेरणेनेंच दिलेला असावा हें उघड दिसत होतें.

" सरकार हिंदुस्थानांत सोनें येऊं न देण्याची आपल्याकडून अत्यंत खटपट करीत आहे, हें विधान सध्यांची पैशाची स्थिति बरोबर दाखवीत नाहीं. उलट सोनें हिंदुस्थानांत यावें याचा हिंदी सरकाराला नेहमीं आनंदच आहे हें सांगण्याची गरज नाहीं. हिंदी सरकार सोनें इकडे येण्याचें बंद करण्याचा कधींच विचार करणार नाहीं, परंतु लंडन येथील व्यवहारावर त्याचा बिलकुल ताबा नाहीं..."

यावरून हें अगदीं उघड आहे कीं, ( १ ) लंडन येथील लोक कधीं कधीं हिंदी सरकारच्या विचारांच्या विरुद्ध वागतात आणि ( २ ) तसेंच जें सोनें हिंदुस्थानाला घेण्याचा हक्क आहे तेंसुद्धां तेथें जाऊं नये अशा तऱ्हेची खटपट लंडन येथील पैशाच्या पेठें-तील लोक कधीं कधीं मुद्दाम करीत असतात.

० ० ० ० ० ० ०

( ३३ ) हिंदुस्थानच्या पैशाच्या अडचणींचा येथपर्यंत विचार केल्यावर मनांत प्रथम असा प्रश्न उद्भवतो कीं, इंग्लंडच्या सोन्याच्या ठेवींवर जो जगभर पतीचा डोलारा तोलून धरला गेला आहे, त्याच्या मानानें त्या ठेवी जर उघड उघड अपुऱ्या आहेत तर स्टेट सेक्रे-टरीनें हिंदुस्थानच्या सोन्याच्या प्रमाणाच्या व कागदी चलनाच्या ठेवींपैकीं, दोन कोटी चाळीस लक्ष पौंडांची त्यांत भर घालून या रचनेचा नाजूकपणा कां वाढविला ? आधींच डळमळणाऱ्या पायावर हा न झेंपणारा बोजा त्यानें कां लादला ? हें आहे तरी काय ? आपल्या खेडेगांवांतील मित्रानें स्वतःचें आग विझविण्याचें एंजिन शहरांतील एखाद्या दुकानाला भाड्यानें दिल्यावर त्याच्या खेडेगांवांतील आवडत्या घरालाच

जर आग लागली तर त्याची फजिती होणार; याहीपेक्षा जास्त फजिती इंग्लंडशीं युद्ध करण्यास कोणी उभा राहिल्यावर, स्टेट सेक्रेटरीची या स्थितींत होणार. कारण, धास्तीनें लुल्या पडलेल्या पैशाच्या पेठेंत व नगदी पैसा देण्याचें बंद झाल्यामुळें कदाचित् तेथें साटेंलोटें करण्याची पाळी आल्यावर, स्टेट सेक्रेटरी एक कोटी अगर दीड कोटी पौंड किंमतीचे ऐरिश लँड स्टॉक, ट्रान्सवॉल वॉर लोन्स, ब्रिटिश कन्सॉल्स इत्यादि कागद विकण्याचा यत्न करील ! अशा वेळीं हिंदुस्थानांतील प्रत्येक युरोपिअन बँक व व्यापारी पेढी बचत राहिलेले पैसे विलायतेस पाठवून तेथील आपली स्थिति मजबूत करूं लागेल. हिंदी सरकारला स्टेट सेक्रेटरीपासून पैसा—कदाचित् पैशाच्या फार मोठ्या रकमा—काढणें भाग पडेल. आणि इंडिया ऑफिस प्रत्येक मागणी—मग ती कितीही मोठी असो—ताबडतोब पुरविण्यास समर्थ असेल तर ठीक; नाहीं तर लोकांचा विश्वास उडून धडाक्यासरशी रुपयाची किंमत त्यांत असलेल्या चांदीवर येऊन ठेपेल—म्हणजे कदाचित् अशा आणीबाणीच्या प्रसंगीं सात पेन्स अगर आठ पेन्सांवर फार जाणार नाहीं. म्हणजे विलायतेस युद्धाचें संकट उत्पन्न होऊन शिवाय, लंडन येथील सोन्याची ठेव अपुरी असल्यामुळें पैशाचा घोंटाळा होणार आणि अशा स्थितींत साम्राज्यावर हिंदुस्थानांतील पैशाच्या आणीबाणीच्या प्रसंगाचा भयंकर बोजा येऊन पडणार आणि या बोजानें लोकांना व सरकारला दोघांना चांगलाच चट्टा बसणार. पुष्कळ लोकांचें नुकसान होऊन तें भरून काढण्याला कांहीं उपायही रहाणार नाहीं.

( ३४ ) या स्थितीपासून रक्षण होण्यास काय करतां येण्यासारखें आहे ? ह्या बाबतींत लंडन चेम्बर ऑफ कॉमर्सच्या सोन्याच्या ठेवीसंबंधानें विचार करण्याकरितां नेमलेल्या कमिटीनें ( जिचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. ) कांहीं विशिष्ट शिफारसी केल्या आहेत.

( १ ) इंग्लंडच्या बँकेनें सरकारच्या कर्जासाठीं व जमानतींसाठीं काढलेले कागद—ज्यांना साधारणपणें भरंवशाचे कागद म्हणतात— एकंदर रकमेच्या मानानें जास्त असल्यानें कमी केले पाहिजेत.

( २ ) ट्रस्टी व पोस्ट ऑफिस सेव्हिंग बँकांतून ज्या अमानत ठेवी ठेविलेल्या असतात त्यांच्या जोखिमीसाठीं सोन्याची चांगलीशी ठेव राखलेली असावी.

( ३ ) इंग्लंडच्या बँकेचें लगडीचें जें खातें आहे तें वाढविल्यास हिंदीसरकारच्या ठेवीशिवाय इतर ठिकाणीं असलेल्या सोन्याच्या ठेवी एकत्र जमविण्यास तें एक साधन होईल. ही ठिकाणें म्हणजेः—

( अ ) इंग्लंडची बँक धरून ब्रिटिश राज्यांतील सर्व बँका. आपल्या जरूरीच्या भांडवलापेक्षां जास्त असलेल्या आपल्या जिम्मेवारीप्रीत्यर्थ घेतलेल्या सोन्याच्या ठेवींपैकीं जितकें सोनें त्या ठरवितील तितकें त्यांनीं लगडी—खात्यांत अमानत ठेवावें.

( ब ) स्कॉच व ऐरिश बँका. ह्यांनीं तर सन १८४५ च्या ॲक्टाखालीं काढलेल्या कागदांपैकीं फाजिल कागदांप्रीत्यर्थ जें फाजिल सोनें त्यांच्यापाशीं असतें तें सर्व अगर त्यापैकीं कांहीं भाग लगडी—खात्यांत ठेवावा.

( क ) नॅशनल डेट कमिशनर्स आणि पोस्टमास्तर जनरल ह्यांनीं ट्रस्टी सेव्हिंग बँक आणि पोस्ट ऑफिस सेव्हिंग बँक ह्यांच्या एकंदर जिम्मेवारीप्रीत्यर्थ जितकें सोनें राखून ठेवणें कमिटीनें ठरविलें असेल तितकें सोनें लगडी—खात्यांत ठेवावें.

( ४ ) जे लोक किंवा कंपन्या ब्रिटिश राज्यांत बँकेचें काम करीत असतील त्यांपैकीं ज्यांच्या चालू आणि अनामत खात्यांतील जिम्मेवाऱ्या एक कोटी पौंडांवर असतील त्यांनीं महिन्यांतून एकदां आणि इतर बँकांनीं तीन महिन्यांतून एकदां आपल्या स्थितीचें एक कोष्टक तयार करावें. त्यांत आठवड्याच्या शिल्लकपत्रकांवरून मागच्या महिन्याचे अगर मागच्या तीन महिन्यांचे देण्याघेण्याचे सरासरीचे आंकडे दाखविले असावेत व खालील रकमा निरनिराळ्या दाखविल्या जाव्या:—

( अ ) चालू, अमानत आणि इतर खात्यांतील जिम्मेवाऱ्या.

( ब ) चलनांत असलेल्या नोटांवरच्या जिम्मेवाऱ्या.

( क ) हुंड्या स्वीकारल्याबद्दलच्या जिम्मेवाऱ्या.

( ड ) सोन्याचीं व इतर नाणीं आणि सोन्याच्या लगडी.

( इ ) इंग्लंडच्या बँकेच्या नोटा आणि तिजकडे असलेली घेण्याची शिल्लक.

( फ ) देवघेवीची वजावाट करणाऱ्या आडत्यांकडे असलेली शिल्लक.

आणि या कोष्टकाची एक नक्कल जेथें ते लोक अगर कंपन्या आपलें काम करीत असतील तेथें सर्वांना दिसेल अशा ठळक जागेवर ठेवावी.

( ५ ) मागच्या वर्षाच्या प्रत्येक आठवड्यास बँकवाल्यांच्या एकंदर शिलका किती होत्या हें दाखविणारें एक वार्षिक पत्रक इंग्लंडच्या बँकेनें तयार करावें हें इष्ट आहे.

या सूचना ज्यांचा ज्यांचा म्हणून त्यांच्याशीं हितसंबंध आहे त्या सर्वांवर म्हणजे सरकारवर, इंग्लंडच्या बँकेवर आणि ब्रिटिश राज्यांतील इतर बँकांवर जास्त बोजे घालूं पहातात. मात्र त्या अमलांत आणल्या तर एकंदर स्थिति सुधारतील खास; परंतु ज्या बाबतींत स्वतःचें अनेक बाजूंनीं नुकसान होण्याचा संभव अशा बाबतींत लंडनच्या पैशाच्या पेठेंतील लोकांना कायद्याच्या मदतीशिवाय ह्या सर्व गोष्टी एकसमयतेनें व एकमतानें करावयास लावतां येतील किंवा नाहीं याचा संशय आहे. आणि याच पैशाच्या पेठेचे पुष्कळ दिवसांपासून फार ऋणकरी असलेल्या सरकारच्या अंगींही असली कायद्याची मदत देण्याचें धैर्य असेल कीं नाहीं याचाही पण संशय आहे.

( ३५ ) सुदैवानें हें इष्टकार्य सिद्धीस जाण्यास दुसरा एक अत्यंत कार्यक्षम असा उपाय आहे व हा उपाय हिंदुस्थान व इंग्लंड दोघांनाही फायदेशीर आहे. हा उपाय म्हणजे हिंदुस्थानच्या लोकांनीं आपल्या सरकारास आणि स्टेट सेक्रेटरी यांस हिंदी करन्सी कमिटीनें केलेल्या शिफारसींप्रमाणें चालण्यास आग्रह करावयाचा. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे हिंदी टांकसाळी सोन्याचीं नाणीं पाडून घेण्यास खुल्या कराव्या. सर्वांना आवडेल असें हिंदी सोन्याचें चलन स्थापावें, आणि ज्या ठेवी देशाच्या बाहेर न्यावयास कधींच नको होत्या त्या, सोन्याच्या रूपांत हिंदुस्थानांत ठेवाव्या. या धोरणानें दर आठवड्यास पांच लक्ष पौंड सोनें नेमानें

लंडनच्या बाहेर काढलें जाण्याचा संभव असेल; परंतु अशा रीतीनें हिंदुस्थानाला सोनें मिळाल्यानें त्याचा फायदा होईल. आणि सोनें लंडनच्या बाहेर काढलें गेल्यानें त्याचेंही पण कल्याणच आहे. लंडनच्या पैशाच्या पेठेंतील लोकांना हा उपाय क्वचितच रुचेल हा भाग वेगळा. हिंदुस्थानानें नेमानें लंडनांतून काढलेल्या सोन्याची जागा भरून काढण्यास तेथील लोकांना बहुतकरून विशिष्ट तजविजी योजाव्या लागतील; परंतु यामुळें जनतेनें आज फार काळपर्यंत हयगय केलेल्या स्थितीकडे विलायतेंत लक्ष वेधेल. त्याच वेळीं इकडे सोन्याचें दुसरें एक चलन व सोन्याची दुसरी एक ठेव साम्राज्यामध्यें तयार होत राहून या चलनपद्धतीनें हिंदुस्थानच्या रुपयाची किंमत घेण्याची शक्ति कायमची खात्रीबंद होईल. इतकेंच नाहीं तर त्याबरोबर सार्वभौम संकटाचे वेळीं साम्राज्याची बाजू चांगल्या तऱ्हेनें राखिली जाईल.

० ० ० ० ० ० ०

( ३९ ) गेल्या कांहीं वर्षांत पैदा झालेल्या नव्या सोन्यापैकीं कांहीं सोन्याची काय व्यवस्था झाली आहे हें सांगण्यासारखें आहे. जगांतील कांहीं मुख्य मुख्य बँकांतून व बँकांप्रमाणें उपयोग होत असलेल्या तिजोऱ्यांतून असलेले सोन्याच्या रकमेचे आंकडे खालीं दिले आहेत. त्यांवरून एक महत्वाची गोष्ट ध्यानीं येईल. ( हे आंकडे १९११ जानेवारी ता. २१ च्या स्टॅटिस्टवरून घेतलेले आहेत. ):—

| देश. | सोन्याचें भांडवल. | | |
|---|---|---|---|
| | डिसेंबर ३१ १९७० | डिसेंबर ३१ १९१० | वाढलेलें भांडवल. |
| संयुक्त संस्थानांतील तिजोरी | १०२०३८००० | २३३४३७८०० | १३१३९९००० |
| रशिया, सरकारी बँक व तिजोरी | ७५५४०००० | १३०४७६००० | ५४९३६००० |
| फ्रान्स | ९३६००००० | १३११७७००० | ३७५७७००० |
| अर्जेंटिना कॅंजाडि कान्व्हर्स | ६२७२००० | ३७०३३००० | ३०७६१००० |
| इटाली, नॅशनल बँक | १२००८००० | ३८०६०००० | २६०५२००० |
| ब्रॅझील, कॅंजाडी कानव्हर्स | ० | १९०००००० | १९०००००० |
| ऑस्ट्रिया | ३८६२४००० | ५५०२३००० | १६३९९००० |
| जपान | ६८६४००० | २४१९२००० | १७३२८००० |
| जर्मनी | २४०८४००० | ३३०५२००० | ८९६८००० |
| संयुक्त संस्थानें नॅशनल बँका | २१५१२००० | २९८०४००० | ८२९२००० |
| इटाली इतर बँका | ४०९२००० | १०३०८००० | ६२१६००० |
| हॉलंड | ४८७७००० | १०३९८००० | ५५२१००० |
| बेल्जम | २८४३००० | ८२५२००० | ५४०९००० |
| ऑस्ट्रेलेशिया | २६४२०००० | ३१८२०००० | ५४००००० |
| रोमानिया | १५९२००० | ४७५६००० | ३१६४००० |
| इंग्लंडची बँक | २८५४१००० | ६१३५६००० | २८१५००० |

यावरून असें दिसेल कीं, वस्तुतः प्रत्येक राष्ट्राजवळ नवें सोनें ग्रेटब्रिटनपेक्षां अधिक आहे.

( ४० ) एकंदर स्थिति कशी आहे हें आतां स्पष्ट झालें आहे. हल्लींच्या दिवसांत पूर्वीं कोणत्याही काळांत नव्हतें इतकें सोनें मिळण्याजोगें आहे व नवीन पैदाही होत आहे. परंतु लंडन येथील पैशाच्या पेठेंतील लोक आपल्या मोठ्या नांवावर व—शांततेच्या काळांत—सोनें

आपल्याकडे आकर्षून घेण्याच्या आपल्या दांडग्या शक्तीवर भिस्त ठेवून, नवें पैदा होत असलेलें बहुतेक सर्व सोनें आपल्या हातांतून जाऊं देतात; आणि आपल्याजवळ अधिक भांडवल ठेवण्यास द्रव्य खर्च करण्याचें ते पसंत करीत नाहींत. त्यांचा खरोखर असा समज असतो कीं, जास्त ठेव ठेवल्यानें व्याजाचें जें नुकसान होणार, त्यामुळें जगांत अति स्वस्त शर्तींवर भांडवल पुरविण्याच्या आपल्या ख्यातीला धक्का बसणार. शांततेच्या काळांत थोडी ठेव ठेवण्याचें धोरण बिनधोक्याचें असतें हें सर्वांना उघडपणें कबूल आहे, (खरोखर, जगांत सगळीकडे शांतता नांदण्याची, तसेंच पैशाच्या सर्व जबाबदाऱ्या योग्य रीतीनें पार पाडण्याची कोणी जर खात्री देईल—म्हणजे असा सोन्याचा दिवस जवळ कोठें दिसूं लागेल—तर सोन्याच्या ठेवी मुळींच काढून टाकण्यास हरकत नाहीं. रानटी स्थितींतून आपण किती सुधारलों आहोंत त्याचें ह्या ठेवी म्हणजे एक माप आहे.) परंतु स्थानिक व राष्ट्रांराष्ट्रांमध्यें, व्यापारांत एखादा आणीबाणीचा प्रसंग आला अगर राजकीय लाट उसळली तर सोन्याची छोटी ठेव ठेविल्यानें पैशाच्या बाबतींत संकट येण्याचा धोका आहे. आणि ज्याअर्थी या दोन गोष्टी केव्हांच घडून येणार नाहींत इतक्या पायरीपर्यंत जगाची प्रगति मुळींच झालेली नाहीं, त्याअर्थी आपल्या जबाबदाऱ्या आणि प्रत्यक्ष असलेली व्यापारी व राजकीय स्थिति यांच्या मानानें हल्लीं आपण जितक्या सोन्याच्या ठेवींवर विसंबून आहोंत त्यापेक्षां अधिक सोन्याची ठेव ठेवणें आपलें कर्तव्य आहे.

(४१) आणखी एका गोष्टीचा विचार करावयाचा असून ती गोष्ट कदाचित् सर्वांत महत्वाची आहे. सोनें अलीकडे हलकें हलकें

परंतु एकसारखें किंमतींत उतरत आहे. ह्या गोष्टीचा उल्लेख आधींच केला आहे. मालाच्या किंमती वाढल्यानें ठराविक रोजमुरा कमावविणाऱ्यांवर व विशेषतः अलीकडच्या कारखान्यांतील अगदीं कनिष्ट प्रतीच्या कामकऱ्यांवर (म्हणजे प्रत्येक राष्ट्राच्या—हिंदुस्थान धरून —लोकसंख्येच्या तीन चतुर्थांशावर ) अत्यंत घोर अन्याय होण्याचा संभव आहे. हें दूर करणें सरकारचें पहिलें कर्तव्य असावयास पाहिजे. ही स्थिति सुधारण्यास फक्त एकच उपाय दिसत आहे. तो म्हटला म्हणजे दागदागिने वगैरे कलाकौशल्याच्या कामांमध्यें आणि चलनी कामांमध्यें दोहोंमध्यें, सोन्याचा खप शक्य त्या मार्गानें वाढविणें. स्टेट सेक्रेटरींनें कित्येक वर्षीं एकसारखी हिंदुस्थानांत क्रोडोंवर क्रोडों चांदीचीं नाणीं पाडलीं आहेत, त्याप्रमाणें हीं नाणीं पाडण्यास आणखी उत्तेजन देऊन सोन्याच्या पैशाच्या खपांत काटकसर करणें व त्यास प्रतिबंध घालणें म्हणजे नुसतें जगांत असलेला धातूचा पैसा फुगवून मालाच्या किमतींच्या वाढीला जोर देणें होय. या वाढीला आळा घालणें न्याय, उपयुक्तता व सुराज्यव्यवस्था यांपैकीं प्रत्येक दृष्टीनें सरकारचें पहिलें कर्तव्य आहे.

( ४२ ) हा विषय आतां पूर्णपणें मांडला गेला आहे. आतां फक्त ज्या आधारांवर हिंदुस्थानांत सोन्याचें चलन स्थापण्याची तक्रार करण्यांत आली आहे, ते आधार फिरून संक्षेपानें सांगणें राहिलें आहे. मुख्य पैशाचें चलन या दृष्टीनें, जशी चांदी, कवड्यांहून श्रेष्ठ असते तसें सोनें चांदीहून उघड उघड श्रेष्ठ आहे. जें काय पाहिजे आहे तें विक्रीचें साधन असें कीं, त्याची कार्यक्षमता बहुतेक सर्वत्र मानली जावी; किंमतींचें माप, असें कीं त्याची स्थिरता शक्य तितक्या पूर्णतेस पोहोंचली

असावी. आज घेतलेला पैसा कालांतरानें परत करण्याचें प्रमाण असें कीं, जें ऋणको व धनको दोघांनाही समाधानकारक होईल; किंमतीचें साहित्य असें कीं, त्याच्यावर इंग्लंडची बँक किंवा युरोप व अमेरिका येथील सरकार यांच्याइतक्या खात्रीनें शेतकरी, कारखानदार अगर व्यापार यांचा व्यक्तिशः भरंवसा बसेल. या कित्येक कार्यासाठीं इतर कोणत्याही धातूपेक्षां सोनें जास्त लायक आहे. शिवाय, सोनें दिसण्यांत श्रेष्ठ आणि इकडे तिकडे सहज नेतां येण्याजोगें आहे हें सर्वांना माहीत आहे. हिंदुस्थानच्या लोकसंख्येपैकीं जो बराच मोठा शेतकरी वर्ग आहे त्याला न झेंपण्याइतकी सॉव्हरिनची अगर अर्ध्या सॉव्हरिनची किंमत भारी आहे अशी तक्रार कोणीं केली तर त्याला उत्तर हें आहे कीं, खुद्द ब्रिटिश राज्यापेक्षां हिंदुस्थानांतील लोक आपल्या गरजांकरितां सोन्याच्या नाण्यांचा उपयोग करण्याला बहुतकरून जास्त लायख आहेत. हिंदुस्थानची लोकसंख्या एकतीस कोटी पन्नास लक्ष असून त्या देशाचा अंतस्थ व बाहेरचा व्यापार सर्व स्वतंत्र ब्रिटिश वसाहतींच्या एकंदर व्यापारापेक्षां जास्त मोठा आहे. अशा देशाला, साम्राज्यांतील एकंदर धन, अधिकार व महत्व यांच्या पावपटीच्या कसालाही आज पुष्कळ दिवस न टिकलेल्या व किमतींत भयंकर उतरलेल्या धातूच्या बनविलेल्या दुय्यमप्रतीच्या चलनावर अतःपर ठेवतां कामा नये.

( ४३ ) खुली टांकसाळ ही पहिली तजवीज होय. अलीकडील चलनपद्धतींत खुल्या टांकसाळीचा कसा उपयोग आहे हें सांगितल्यास बरें पडेल. किमतींच्या सर्वसाधारण मर्यादेचा संबंध चलनांत असलेल्या पैशाच्या एकंदर रकमेशीं आहे. (पाश्चिमात्य राष्ट्रांत पतीचा व्यवहार फार मोठ्या प्रमाणावर वाढल्यानें हा संबंध बराच नाहींसा

झाला आहे ही गोष्ट वेगळी) जर अ देशांत मालाच्या किंमती साधारण मानानें कमी असतील तर इतर देशांतील—ब, क, ड देशांतील—लोकांना अ देशांतील माल विकत घ्यावासा वाटतो. याचा अर्थ अ देशांत सोनें घेऊन तेथील टांकसाळीमार्फत त्याचा कायदेशिर देण्याघेण्याचा पैसा पडतो. परंतु अदेशांत पैशाची मागणी वाढून पैसा येत चालला म्हणजे तेथील मालाच्या किमती वाढतील; कदाचित् त्या इतक्या वाढतील कीं, ब, क, ड देशांना अ देशांतील बाजारांत आपला माल विक्रीसाठीं पाठविण्याचा फायदा लवकर दिसूं लागेल. अशा व्यवहारांनीं व्यापारांत बहुतकरून अ देशाला देणें होतें व हें देणें अ देशांतून लगडी व नगद जेथें त्यांचा अधिक फायदेशीर उपयोग करतां येईल अशा भागांत पाठवून फेडलें जातें. ज्या तत्त्वावर लगडी व नगद चलनाच्या कामासाठीं इकडे तिकडे जाते आणि मालाच्या किमतीच्या राष्ट्रांराष्ट्रांमधल्या मर्यादा एकमेकांशीं जुळतात, तीं तत्त्वें अशा व्यवहारानें साधारणपणें व्यक्त होतात. हें ध्यानीं आणिलें पाहिजे कीं, फक्त खुल्या टांकसाळींच्या योगानेंच लोकांना मौल्यवान् धातूचा कायदेशीर देवघेवीचा पैसा पाडून घेणें शक्य आहे. म्हणून एका बाजूनें राष्ट्राराष्ट्रांमधल्या मालाच्या किमतीच्या मर्यादा व दुसऱ्या बाजूनें जनतेच्या गरजांच्या मानानें असलेली चलनांतलि पैशाची एकंदर रक्कम यांचा जगड्व्याळ तोल आपोआप राखणारें यंत्र खुली टांकसाळ हें होय.

( ४४ ) खुल्या टांकसाळीचा हा महत्त्वाचा कारखाना असल्याशिवाय जगांतील निरनिराळ्या देशांच्या चलनपद्धति व तेथील मालाच्या किमतींच्या सर्वसाधारण मर्यादा यांची तडजोड त्वरित व लोकांच्या मागण्यांना आडकाठी आल्याशिवाय लागणार नाहीं. खुली

टांकसाळ नसेल तर चलनाच्या रकमेंत भर टाकणें अथवा ती कमी करणें या गोष्टी बुद्ध्या एखाद्या सरकारी खात्याकडून कराव्या लागतात. अशा स्थितींत जास्त पैसा पुरविण्यासबंधानें अगर पेठेंतून पैसा काढून घेण्यासंबंधानें ( आणि असें करून अप्रत्यक्षपणें किमतींच्या मर्यादेंत ढवळाढवळ करण्यासंबंधानें ) सरकारला नेहमीं कोणा तरी हितसंबंधीं लोकांकडून आग्रह होत असतो. याचा परिणाम नुसतें भांडण व विलंब होऊन थांबत नाहीं, तर ज्यांना सरकारचे हे पैसा अधिक करण्याचे अगर कमी करण्याचे व्यवहार नीट समजत नाहींत, किंवा आवडत नाहींत अगर मान्य होत नाहींत, त्यांच्याकडून हरहमेषा सरकारवर प्रतिकूल टीका व्हावयाचीच, मग सरकारनें हें काम कितीही मनःपूर्वक करण्याचा प्रयत्न केला तरी त्याचें कांहीं नाहीं. " सरकारकडून व्यवस्था होत असलेल्या चलनपद्धतींतील दोष इतके महशूर आहेत व लोकांना इतके सर्वत्र कळून चुकले आहेत कीं, हल्लींच्या दिवसांत जगांतील कोणतेंही मोठें राष्ट्र आठवड्याच्या आठवड्यास चलनाच्या पैशाच्या एकंदर रकमेंत किती भर टाकावयाची अगर किती रक्कम चलनांतून काढून घ्यावयाची ह्या गोष्टी आपल्या हातांत ठेवण्याचा प्रयत्न करीत नाहीं; परंतु जगांतील सर्व राष्ट्रें कायदेशीर व पूर्ण किमतीचें देवघेवीचें नाणें अनिर्बंध पाडून घेण्यासाठीं खुल्या टांकसाळी स्थापून जनतेच्या मागण्यावर या टांकसाळींचा व्यवहार अवलंबून ठेवतात. चीन शिवायकरून जगांत हिंदुस्थान हा एकच मोठा देश असा आहे कीं, तेथील चलनाची व्यवस्था अजूनपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांच्या हातांत ठेविलेली आहे. मध्यगापासून आजपर्यंत या पद्धतीसारखें दुसरें उदाहरण आपल्याला आढळणार नाहीं.

(४५) खुली टांकसाळ स्थापल्यावर पुढची तजवीज म्हटली म्हणजे हिंदी चलनासंबंधानें स्टेट सेक्रेटरीच्या कामाची मर्यादा बरोबर आंखून द्यावयाची. ब्रिटिश साम्राज्यांतील इतर सर्व भागांप्रमाणें हिंदुस्थानाला ( आणि बाहेरच्या पुष्कळ राष्ट्रांनाही म्हणतां येईल ) ग्रेटब्रिटन जें भांडवल व जे कामगार पुरवितें त्यांबद्दल तो देश वर्षाच्या वर्षास ग्रेट-ब्रिटनचा ऋणकरी असतो. याकरितां हिंदुस्थानाला खर्चाप्रीत्यर्थ जी रक्कम द्यावी लागते ती सरासरी वर्षाची एक कोटी साठ लक्ष पौंड असते. चांदीचीं नाणीं अनिर्बंध पाडून घेण्यासाठीं जेव्हां हिंदी टांक-साळी खुल्या होत्या आणि जेव्हां लोकांना लागतील तितके रुपये नुसती चांदी आणवून टांकसाळअधिकाऱ्यांकडून तिचें कायदेशीर चलन करून घेतल्यानें मिळत असत, त्या वेळेस स्टेट सेक्रे-टरीला, आपल्या हुंड्या लोकांना चांदी खरेदी करून हिंदुस्थानांत आणण्यास जो खर्च लागेल त्याच्यापेक्षां किंचित् कमी किमतींत विकून हे एक कोटी साठ लक्ष पौंड मिळविणें सोयीचें होतें. स्टेट सेक्रेटरीला रुपये विकून जी किंमत मिळे, ती जगांतील पेठे-मधून असलेल्या, चांदीच्या सोन्यांतील किमतीवर रोज अवलंबून असे. चांदी विकत घेऊन तिचा एखाद्या हिंदी टांकसाळींत रुपया पाडून घेण्यास जो खर्च लागेल त्यापेक्षां अर्थात् स्टेट सेक्रेटरीच्या रुपयाबद्दल जास्त किंमत कोणी देणार नाहीं. अशी स्थिति असल्यानें स्टेट सेक्रेटरीनें हिंदी तिजोऱ्यांवर काढलेल्या आपल्या हुंड्या सार्व-जनिक लिलांवानें विकणेंच शहाणपणाचें असे. ह्याप्रमाणें आठवड्या-च्या आठवड्यास स्टेट सेक्रेटरीला आपल्या रुपयांची होतां होईल तों चांगली किंमत येई.

( ४६ ) १८९३ सालीं चांदीचीं नाणीं अनिर्बंध पाडून घेण्यास हिंदी टांकसाळी बंद केल्यावर कौन्सिल हुंड्यांच्या आठवड्याच्या लिलांवांचें कांहीं कारण राहिलें नाहीं. त्या वर्षापासून स्टेट सेक्रेटरी-पासून विकत घेतल्याशिवाय कोणालाही नवे रुपये अगर कोणतेच रुपये मिळत नाहींसे झाले. म्हणजे स्टेट सेक्रेटरीला वाट-तील तितके रुपये विकून तो चाहील ती त्यांची किंमत मिळूं लागली आणि तो मक्तेवाला बनला. तो आपल्या रुपयाची किंमत एक शिलिंग चार पेन्स, अगर एक शिलिंग सहा पेन्स किंवा दोन शिलिंगसुद्धां लावो, लोकांना शेवटीं, तो मागेल ती किंमत देणें भाग पडे. असें असूनही—संवयीचा जोर इतका असतो—स्टेट सेक्रेटरी दर आठवड्यास लिलांवास काढलेल्या रुप-यांचीं टेंडरें बोलावण्याचें काम आज दिवसपर्यंत तसेंच चालवीत आहे; आणि हिंदुस्थानांत सॉव्हरिन पाठविण्याचा त्रास व खर्च ज्याअर्थीं त्याच्या विक्रीमुळें वांचतो ( हिंदुस्थानांत सॉव्हरिन १५ रुपयांबरोबर कायदेशीर रीतीनें चालतो ), त्याअर्थीं कांहीं कांहीं लोकांकडून त्याच्या ह्या कृतीची हटकून वाखाणणी होते. विशेषतः जास्त वाखाणणी होते याचें कारण हें कीं, तो वर्षांतून पुष्कळ दिवस मोठ्या मेहेरबानीनें आणि बिलकुल गरज नसतां निष्कारण लोकांना हिंदुस्थानांत सॉव्हरिन पाठविण्याला जो खर्च लागणार त्यापेक्षां कमी किमतींत आपले रुपये विकतो ! एवढ्यानेंच झालें नाहीं. हिंदुस्थानसरकारनें स्टेट सेक्रेटरीच्या हातांत खर्चासाठीं ठेवलेल्या २४ क्रोड रुपयांचा फन्ना उडवून व विलायतेच्या कर्जाच्या फेडीसाठीं एक कोटी साठ लक्ष पौंड अशा रीतीनें वसूल करूनही त्याचें भागत नाहीं. कौन्सिल हुंड्यांची

विक्री पुढें न थांबवितां, रुपयांचीं टेंडरें दर आठवड्याच्या आठवड्यास तो स्वीकारीत जातो. हें त्याचें काम अमर्याद चालत असतें आणि बहुतकरून सोन्याच्या नगदींत जी चांदीच्या किंमतीची मर्यादा असते त्याच्याही खालोखाल भावानें ही त्याची विक्री चालते आणि असें करून लंडनांत त्यानें अलीकडे आपल्याला कोणताच कायदेशीर उपयोग नाहीं अशी नगद शिल्लक इतकी जमविली आहे कीं, या त्याच्या कृत्याला सर्वत्र नांवें ठेविलीं जात आहेत.

( ४७ ) सरकारकडून व्यवस्था होत असलेल्या चलनपद्धतीसंबंधानें घडून आलेली ही कालदृष्ट्या चूक आणि त्याबरोबर होत असलेले अपरिहार्य अन्याय आतां वास्तविक बंद केले पाहिजेत. हिंदुस्थानच्या बाहेरच्या कर्जाची तडजोड कानडा व ऑस्ट्रेलियाप्रमाणेंच केली पाहिजे. म्हणजे मुख्य मुख्य बँकांच्यामार्फत ही तडजोड होऊन हिंदी टांकसाळींच्या कामाशीं त्याचा कांहीं एक संबंध असतां उपयोगी नाहीं. हिंदुस्थानच्या लगडीच्या व नगदीच्या आयातनिर्यातीवर स्टेट सेक्रेटरीनें अगर हिंदीसरकारनें यत्किंतही आपला ताबा ठेवण्याचा प्रयत्न करतां कामा नये. हे व्यवहार स्वाभाविकपणें होत राहून जगांतील व्यापाराच्या स्वाभाविक चढउतराबरहुकूम लोकांना जशा गरजा लागतील त्यांच्या मानानेंच फक्त ते चालले पाहिजेत.

( ४८ ) कानडाचें एकंदर सरकारी कर्ज ९४१३२६०९ पौंड असून त्यांपैकीं ५२९००९०२ पौंड लंडनांत भरावयाचे असतात. लंडनांत भरावयाच्या कर्जाचें सालीना व्याज १८६७३७० पौंड मार्च ३१ सन १९१० रोजीं होतें. मॉन्ट्रीलची बँक यासंबंधांत तथील सरकारचे एजंट असून हें व्याज ती बँक भरते. ऑस्ट्रे-

लियाचें एकंदर सरकारी कर्ज २५१७७३५३३ पौंड असून त्यांपैकीं १८९४१००३६ पौंड लंडनांत भरावयाचे असतात. या रकमेवरचें व्याज सालीना सरासरी ९०००००० पौंड असतें. हें व्याज कसें दिलें जातें? कॉमनवेल्थचा हाय कमिशनर ह्या व्याजाचे भाग पाडून दर आठवड्यास त्यांचे लिलांव करीत बसत नाहीं; आणि लिलावांत अखेरची बोली करणारांना लंडनांत त्याला मिळणाऱ्या सॉव्हरिनच्या बदल्यांत ऑस्ट्रेलियाच्या तिजोऱ्यांवर ऑस्ट्रेलियांत सॉव्हरिन मिळण्यासाठीं हुंड्या देत बसत नाहीं. त्याची व्यवस्था साधी व व्यावहारिक असते. लंडन कौंटी आणि वेस्टमिनिस्टरच्या बँकेशीं व इंग्लंड व ऑस्ट्रेलिया येथें मुख्य ऑफिस व शाखा असलेल्या दुसऱ्या बँकांशीं व्यवस्था असून त्या बँका ज्यांना कोणाला व्याज घ्यावयाचा हक्क असेल त्यांना वर्षांतून दोनदां जसें लागेल तसें ते देतात.

( ४९ ) अशा रीतीनें अर्थशास्त्राचीं न्यायाचीं तत्त्वें अमलांत येत असलेलीं आपण पहातों. हींच तत्त्वें हिंदुस्थानालाही अतःपर अवश्य लागू केलीं पाहिजेत. म्हणजे सोन्याचीं नाणीं अनिर्बंध पाडून घेण्यासाठीं टांकसाळी खुल्या केल्या पाहिजेत. सोन्याचें चलन तसेंच सोन्याचें प्रमाण स्थापलें पाहिजे; आणि सरकारानें चलनाच्या कामांत बिलकुल हात घालण्याचा प्रयत्न करतां कामा नये. हिंदुस्थानांत कित्येक मोठ्या उत्तम व्यवस्थेशीर बँका आहेत; हिंदुस्थानांतील तिजोऱ्यांतून चोवीस कोटी रुपये बँकांना देऊन त्यांच्या बदल्यांत एक कोटी साठ लक्ष पौंड लंडनांत भरण्याचें काम त्यांच्याकडे सोंपविणें वाजवी होणार आहे. हिंदी सरकारचें, पौंडांतील नवें कर्जही वाटल्यास ह्या बँकांकडून घेण्याची व्यवस्था

लावितां येईल आणि त्यांच्या मार्फतच ह्या कर्जाचें व्याज वर्षाचे वर्षास देतां येईल. येथें एक फार महत्त्वाचा मुद्दा ध्यानांत आणला पाहिजे. विलायतेंतील खर्चाकरितां ( होमचार्जेस ) वार्षिक रक्कम भरावयाची ती एकदां मंजुरी मिळून नक्की ठरल्यावर, मग सरकार-करितां म्हणून आणखी जास्त रक्कम हिंदुस्थानांतून लंडनांत पाठवितां कामा नये. व्यापारांत हिंदुस्थानचें जें घेणें असतें त्याची अखेर व्यवस्था जगांतील बाकीच्या देशांप्रमाणेंच बरोबर लाविली पाहिजे म्हणजे लगडी व नगद मुख्यत्वेंकरून हिंदुस्थानांत पाठवून ही व्यवस्था लागली पाहिजे.

( ५० ) वर सांगितलेलें धोरण अमलांत आणतांना, नाण्यां-करितां लागणारें सोनें विकत घेण्यासाठीं रुपये वितळून त्यांची विल्हेवाट करावयास नको. हिंदुस्थानचीं चांदीचीं नाणीं हल्लींप्रमाणें नुसतीं सांकेतिक स्वरूपाचीं राहून एक रुपया सॉव्हरिनच्या एक-पंधरांशाबरोबर राहील. हिंदुस्थानांत सोन्याच्या आयातीवर व चलनावर कोणतीही आडकाठी ठेविली नाहीं तर कदाचित् कांहीं वर्षेंपावेतों या सांकेतिक नाण्यांच्या नव्या पुरवठ्यांची जरूरी लागणार नाहीं. आणि मोहरा, पुतळ्यासारखीं विशिष्ट हिंदी नाणीं पाडण्या-साठीं हिंदुस्थानच्या खुल्या टांकसाळींत सिद्धता केल्यास हा परिणाम विशेष रीतीनें घडून येण्याचा संभव आहे. व्यापारी घेण्याप्रीत्यर्थ स्वाभाविकपणें जें सोनें हिंदुस्थानांत येईल तेवढें तेथील सोन्याचें चलन उभारण्यास हजार हिश्शांनीं अगदीं पुरें होईल.

( ५१ ) हिंदी करन्सी कमिटीच्या रिपोर्टाप्रमाणें व्यवस्था केल्यास हिंदुस्थानांत सोन्याचा प्रवाह एकसारखा, कदाचित् आठव-

ड्याचें पांच लक्ष पौंड या मानानें येत राहील हें तात्काल मंजूर केलें पाहिजे. शिवाय, या सोन्यापैकीं बराच भाग लंडनांतून काढला जाण्याचा संभव आहे. परंतु लंडनच्या पैशाच्या पेठेनें कांहीं केलें तरी पूर्वेकडे वहाणाऱ्या प्रवाहाला कायमचा बांध बसणार नाहीं. जोंपर्यंत ब्रिटिश राज्यव्यवस्था, ब्रिटिश साहस, अर्थशास्त्राच्या बाबतींत ब्रिटिश कित्ता, आणि ब्रिटिश अभिमान या गोष्टी हिंदुस्थानांत औद्योगिक, सामाजिक, व राजकीय प्रगतीला एकसारखें प्रोत्साहन देत रहातील तोंपर्यंत ह्या देशाच्या प्रचंड आणि नेहमीं वाढत्या व्यापारांत जें त्याचें देणें असतें तें फेडण्यासाठीं, आणि चलन, अलंकार व कलाकौशल्य इत्यादि कामांकरितां त्या देशाच्या नेहमीं वाढत्या मागण्या भागविण्यासाठीं, सोन्याच्या जास्त जास्त मोठ्या रकमा हिंदुस्थानाला द्याव्या लागतील. गेल्या कांहीं वर्षांच्या गैरशिस्त क्रमाच्या योगानें ही अपरिहार्य गोष्ट नुसती तात्पुरतिक लांबली आहे इतकेंच. सोन्याच्या प्रमाणाची ठेव आतां राहिली नाहीं. कागदी चलनाची ठेव फार थोडी राहिली आहे आणि हिंदुस्थानांतून लंडनास वाहून नेण्यास हिंदी तिजोऱ्यांतून फालतू नगदही वस्तुतः मुळींच राहिली नाहीं, तेव्हां अशा स्थितींत इतके दिवस मागें लागलेल्या ( वृथा ) भीतीनें अखेरीस जगांतील अत्यंत मोठ्या पैशाच्या पेठेला गांठलें आहे. ही भीति म्हणजे हिंदुस्थानांत यावयाचा एकसारखा व नेहमीं वाढता सोन्याचा प्रवाह. पाश्चिमात्य फडनिसांना लवकरच निःसंशय कळून चुकेल कीं, ही मौल्यवान् धातू हिंदुस्थानांत स्वाभाविकपणें जाण्याची भीति अखेरीस नुसती स्वप्नवत् असून " स्टॅटिस्ट "चा कल्पक एडिटर व दुसरे कांहीं अर्थ-

शास्त्रनिपुण लोक या गोष्टीचा आपल्याला जितका बाऊ दाखवितात तशी स्थिति मुळींच नाहीं.

( ५२ ) शेवटीं, हिंदी करन्सी कमिटीचा रिपोर्ट तात्काल अमलांत आणल्यास आणि ह्या देशांत पूर्ण किमतीचें, कायदेशीर देवघेवीचें सोन्याचें चलन ताबडतोब स्थापल्यास जे अनेक फायदे होतील ते आतां थोडक्यांत येणेंप्रमाणें आहेत:—

## हिंदुस्थानास होणारे फायदे.

( १ ) सोन्याचीं नाणीं अनिर्बंध पाडून घेण्यास हिंदी टांकसाळी खुल्या केल्या आणि सोन्याचें चलन दररोजच्या उपयोगांत आणलें म्हणजे दिसण्यांत व इकडे तिकडे नेण्याआणण्याच्या कामांत चांदीपेक्षां फार श्रेष्ठ असें पैशाचें साधन हिंदुस्थानास मिळणार आहे. शिवाय, चांगल्या धातूच्या पैशाच्या अंगीं जे गुण आहेत ते सर्व उत्तम रीतीनें दृष्टीस पडून त्याबरोबर हिंदुस्थान देश चलनाच्या बाबतींत पश्चिमेकडील सर्वांत सुधारलेल्या राष्ट्रांच्या पायरीवर येऊन पोहोंचेल.

( २ ) हिंदुस्थानचें चांदीचें चलन अगदीं स्थिर पायावर कायमचें येऊन तें किमतींत भयंकर उतरण्याचा व एकाएकीं ढांसळण्याचा संभव रहाणार नाहीं, आणि सर्व दर्जाच्या लोकांचें होणारें नुकसान व सरकारला येणाऱ्या मनस्वी अडचणीही मिटतील.

( ३ ) हिंदुस्थानचा पैशाचा जोम जगाच्या दृष्टीनें अत्यंत वाढेल. द्रव्य उत्पन्न होण्यास ज्या गोष्टी प्रधान असतात त्यांपैकीं भांडवल एक आहे. सोन्याच्या चलनाच्या योगानें हिंदुस्थानास हल्लींपेक्षां फार जास्त अनुकूल शर्तींवर भांडवल मिळेल. शिवाय, सोन्या-

च्या चलनामुळें लोकांचा विश्वास वाढून अर्थशास्त्रदृष्ट्या प्रत्येक बाजूनें त्यांची अभिवृद्धि होण्यास हें चलन अतिशय प्रबलतेनें कारणीभूत होईल.

## ग्रेटब्रिटनास होणारे फायदे.

( १ ) लंडनाहून हिंदुस्थानांत सोनें एकसारखें सतत येऊं लागलें म्हणजे आपल्या स्वतःच्या सोन्याच्या ठेवींची—खानगीं व सरकारी ठेवींची— स्थिति भयंकर नाहीं तरी किती पराकाष्ठेची असमाधानकारक झाली आहे याकडे ब्रिटिश राज्यांतील लोकांचें लक्ष जाईल.

( २ ) या ठेवी वाढवून त्यांची उभारणी निःसंशय मजबूत करावीच लागणार, आणि असें झालें म्हणजे राजधानींतील व्यापारी व राजकीय सामर्थ्य वाढून सर्व राज्यांत द्रव्यसाधनांची सुधारणा होईल.

( ३ ) हिंदुस्थानच्या चलनांत व ठेवींत बरेंच सोन्याचें भांडवल पडून त्याचें सामर्थ्यही बरेंच वाढणार आहे आणि त्याबरोबर अखिल साम्राज्यांतील द्रव्यसाधनांचीही वाढ होईल.

## दुसरे फायदे.

( १ ) जगांतील खाणींतून सोन्याची पैदास अद्वितीय मोठी होत असून त्याबरोबर सर्वत्र या मौल्यवान् धातूची किंमत खालावत आहे. मालाच्या किमती सर्वत्र वाढत आहेत आणि प्रत्येक राष्ट्रांत फार मोठा वर्ग जो ठराविक रोजमुरा मिळविणारांचा असतो त्याची यामुळें निराशा व हाल होत आहेत, अत्यंत कंगाल लोकांच्या ठिकाणींही निराशा व हे हाल वास्तविक सुधारणेचे दुष्ट

परिणाम असून प्रत्येक सरकारचें व प्रत्येक विचारी पुरुषाचें ह्या स्थितीला कांहीं उपाय धुंडण्याचा प्रयत्न करणें हें निकडीचें कर्तव्य आहे, या गोष्टींचा वर उल्लेख आलाच आहे. जरी कांहीं सरकारांनीं या स्थितीची चौकशी करण्याच्या तजविजी आधींच केल्या आहेत तरी मध्यंतरीं ब्रिटिश राज्यांत मजूर लोकांचे फार भयंकर संप झाले आहेत आणि युरोपच्या कित्येक भागांत अन्नाच्या महागाईमुळें दंगे घडून आले आहेत. लोकसमुदायाच्या या भयंकर खळबळी किमतींत उतरत असलेल्या चलनामुळेंच सर्वथैव उठल्या असें म्हणणें जरी चुकीचें होईल तरी पैशाच्या विकत घेण्याच्या शक्तीमध्यें हल्लीं होत असलेल्या कमतरतेमुळें एकंदर स्थिति दुःखमय होऊन विकोपास गेली आहे यांत संशय नाहीं. हिंदुस्थानाकरितां येथें घालून दिलेली चलनपद्धति अंमलांत आणल्यास नुसती ग्रेटब्रिटनकरितां सोन्याची मागणी अधिक होऊनच थांबणार नाहीं तर हिंदुस्थानांत सोनें एकसारखें येत राहून कांहीं अंशानें त्याचा खपही होईल. सोन्याच्या या वाढत्या मागण्यामुळें धातूची किंमत वाढल्यावांचून रहावयाची नाहीं आणि असें झालें म्हणजे हिंदुस्थानांत तसेंच युरोपांत हल्लीं होत असलेली मालाच्या किमतींची वाढ बहुतकरून थांबून पूर्वेकडील व पश्चिमेकडील सर्व देशांना हायसें वाटेल.

( ५३ ) सर हेनरी फौलरच्या तज्ज्ञ कमिटीनें १९०८ सालीं केलेल्या शिफारसी इतःपर कां अंमलांत आणाव्या याचीं हीं उत्तम कारणें असून तीं स्थानिक, साम्राज्याला लागूं पडणारीं, व सर्वव्यापकही आहेत. हिंदुस्थानानें या कामांत पुढाकार घ्यावयाचा आहे.

# भाग १.

## आजपर्यंत केलेली प्रगति.

पाठीमागच्या भागांत दिलेली हकीकत ऑक्टोबर १९११ सालीं टांचणरूपानें कराची चेम्बर ऑफ कॉमर्सपुढें मांडली होती व त्याबरोबर असें सुचविण्यांत आलें होतें कीं, काढलेल्या सिद्धांतांशीं जर चेम्बर्सचें मत जुळलें तर हिंदी करन्सी कमिटीनें केलेल्या शिफारसी अंमलांत आणण्याच्या तजविजी ताबडतोब कराव्या. आणखी असें सुचविलें होतें कीं, होतां होईलतों कायदा करून ह्या शिफारसी अमलांत आणाव्या. इंडियन कॉयनेज ॲक्टाच्या दुरुस्तीच्या बिलाचा मसुदाही पुढें मांडण्यांत आला होता.

कराची चेम्बर ऑफ कॉमर्सपुढें ही हकीकत मांडल्यावर त्यांनीं दुसऱ्या इंडियन चेम्बर्स ऑफ कॉमर्सना खालील विनंतिपत्र लिहिलें:—

" गेल्या बारा वर्षांत हिंदी चलनपद्धति कशी चालविली आहे हें दाखवून व १८९८–९९ च्या हिंदी करन्सी कमिटीनें केलेल्या शिफारसी ( ज्या स्टेट सेक्रेटरीनें व हिंदुस्थानसरकारनें कबूल केल्या होत्या ) आतां सर्वतोपरी अमलांत आणण्याचा आग्रह करून आमच्या चेअरमननें केलेल्या टांचणाचा विचार माझी कमिटी हल्लीं करीत आहे.

" माझ्या कमिटीनें या प्रकरणाचा काळजीपूर्वक विचार करून असें ठरविलें आहे कीं, हिंदुस्थानांत सोन्याचें चलन स्थापण्यासंबं-

धाच्या तसेंच तेथें सोन्याचें प्रमाण घालून देण्यासंबंधाच्या सर हेनरी फौलरनें १८९८–९९ सालीं केलेल्या शिफारसींना आतांपर्यंत स्टेट सेक्रेटरीनें दिलें आहे त्यापेक्षां अधिक महत्त्व देऊन त्या व्यवहारांत आणण्याचा काळ येऊन ठेपला आहे.

" हे उद्देश खालील गोष्टी केल्यानें उत्तम साध्य होतील असें माझ्या कमिटीचें मत आहे:—

( १ ) सोन्याचें नाणें अनिर्बंध पाडून घेण्यासाठीं हिंदी टांकसाळी लोकांना खुल्या करून,

( २ ) स्टेट सेक्रेटरीच्या हिंदी तिजोऱ्यांवरील सालींना हुंड्या त्याच्या वार्षिक बजेटाच्या आंकड्यावर ( सरासरी १६०००००० पौंड ) जाऊं न देऊन,

( ३ ) चलनांत सोन्याचें प्रमाण लोकांच्या गरजांपेक्षां जास्त होईपर्यंत नवे रुपये पाडण्याचें बंद करून, आणि

( ४ ) सर हेनरी फौलरच्या कमिटीनें सुचविल्याप्रमाणें शक्य त्या मार्गानें सोन्याच्या नाण्यांच्या खपास उत्तेजन देऊन.

" याशिवाय, सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवींचा बराच मोठा भाग सध्यां हिंदुस्थानांत सोन्याच्या रूपांत ठेविला पाहिजे हें जें मत माझ्या कमिटीनें हिंदुस्थानसरकारला डिसेंबर १९०३ सालीं कळविलें होतें तें तिचें मत अजून कायम आहे.

" वरील विचार तुमच्या चेंबरपुढें ठेवून तिचें मत त्यांच्याशीं कितपत जुळतें तें विचारण्यास मला सांगितलें आहे; आणि इंडियन करन्सी कमिटीच्या शिफारसी पूर्णपणें स्वीकारल्या जाव्या या उद्दे-

शानें हिंदुस्थानसरकारास एक समायिक अर्ज करण्यास आपण तयार व्हाल किंवा कसें हेंही तुम्हीं कळवावें. "

प्रमुख हिंदी चेंबर्स ऑफ कॉमर्सनीं दिलेल्या उत्तरांचा गोषवारा खालीलप्रमाणें देतां येईलः—

मुंबई चेंबर्स ऑफ कॉमर्सकडून आलेलें उत्तर.

" तुमचे प्रश्न फडानिशी सब-कमिटीपुढें ठेविले जाऊन त्यांचा विचार जनरल कमिटीनें तपशीलवार केला आहे, व मला खालील उत्तर देण्यास कळविलें आहेः—

" ( १ ) हिंदी टांकसाळी लोकांना सोन्याचीं नाणीं अनिर्बंध पाडून घेण्यासाठीं खुल्या कराव्या हें माझ्याही कमिटीला मान्य आहे. आतां सोनें टांकसाळींत अप्रतिबंध येईल किंवा कसें हा प्रश्न आहे. त्याचा निकाल कालांतरानेंच लागणार आहे.

" ( २ ) दुसऱ्या सूचनेसंबंधानें जरी माझ्या कमिटीचें अगदीं एकमत नाहीं तरी ही सूचना सामान्यपणें पसंत आहे. आपल्या व्यापाराला पैसा पुरविण्याच्या हेतूनें ही सूचना महिन्याच्या महिन्यास ठराविक रकमेपुरत्या हुंड्या काढून अमलांत आणली जावी अगर दुसरी कांहीं तजवीज योजावी. याचा विचार काळजीपूर्वक झाला पाहिजे. आणि सरकारास अशा प्रकारची शिफारस करण्यापूर्वीं कांहीं तरी व्यावहारिक मसलत योजून ती सामान्यपणें पसंत झाली पाहिजे.

" ( ३ ) ही सूचना माझ्या कमिटीला मान्य नाहीं. परंतु सोन्याचीं नाणीं जसजशीं चलनांत येतील तसतशीं चांदीचीं नवीं नाणीं आपोआप कमी होतील.

" ( ४ ) हें म्हणणें माझ्या कमिटीला मंजूर आहे, परंतु या-संबंधांत केलेल्या सूचनेबरोबर कोणत्या तजविजी केल्या पाहिजेत त्यांच्याही संबंधाची विशिष्ट शिफारस पुढें मांडली पाहिजे.

" सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवीचा बराच मोठा भाग सध्यां हिंदुस्थानांत सोन्याच्या रूपांत ठेवण्याच्या प्रश्नासंबंधानें थोडासा मतभेद आहे. तथापि हें मंजूर आहे कीं, लंडनास ही ठेव नेली आहे तींत आतां आणखी भर घालूं नये, आणि नाण्यांवर यापुढें जो नफा राहील तो हिंदुस्थानांत सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवीकडे लावावा. आणखी असेंही वाटतें कीं, सध्यांच्या ठेवीचा कांहीं भाग या देशांत प्रत्यक्ष सोन्याच्या रूपांत ठेवून तिची एकंदर रक्कम किंवा बराच भाग या ठेवीच्या खात्यास हिंदुस्थानांतच जमा करून ठेवावा. "

बर्मा ( रंगून ) चेंबर्स ऑफ कॉमर्सकडून आलेलें उत्तर.

" गेल्या महिन्याच्या २५ तारखेच्या आपल्या पत्रावरून मला आपल्यास असें कळवावयास सांगितलें आहे कीं, या विषयावर हिंदी चेंबर्सच्या समायिक अर्जांत सामील होण्यास या चेंबर्सची कमिटी राजी आहे.

" मध्यंतरीं मि. वेबच्या टांचणाच्या अर्धा डझन नकला कृपा करून पाठवाल तर फार उपकार होतील. "

ट्युटीकोरीन चेंबर्सकडून आलेलें उत्तर.

" तारीख २५ ऑक्टोबर १९११ च्या नंबर ५८० च्या पत्रावरून मी आपल्यास नम्रपणें कळवितों कीं, आपल्या कमिटीच्या विचाराशीं या चेंबर्सचें मत एकंदरींत जुळतें, व ही चेंबर्स हिंदुस्थानसरकारास या विषयावर एक समायिक अर्ज करण्यास तयार आहे. "

उत्तरहिंदुस्थानचेंबरकडून आलेलें उत्तर.

" आपलें तारीख ९ ऑक्टोबर सन १९११ चें पत्र व त्यासोबत हिंदी चलनाच्या प्रश्नासंबंधानें व सध्यांची स्थिति सुधारण्याविषयीं कांहीं विशेष सूचना पुढें मांडलेले नामदार मि. एम्. डी. पी. वेब, सी. आय. ई. यांनीं तयार केलेलें एक टांचण, ( ज्यांत हिंदी चलनाच्या प्रश्नाची चर्चा केली असून सध्यांची स्थिति सुधारण्याविषयीं कांहीं विशिष्ट सूचना पुढें मांडल्या आहेत ) अशीं पोहोंचलीं. त्यासंबंधानें आपल्यास लिहिण्यांत येत आहे कीं:—

" मि. वेब यांनीं केलेल्या ( अ ) सोन्याचीं नाणीं अनिर्बंध पाडून घेण्यासाठीं हिंदी टांकसाळी लोकांना खुल्या करण्यासंबंधाच्या, ( ब ) हिंदी तिजोऱ्यांवर काढलेल्या स्टेट सेक्रेटरीच्या वार्षिक हुंड्यांवर दाब ठेवण्यासंबंधाच्या आणि ( क ) नवे रुपये पाडणें बंद करण्यासंबंधाच्या सूचनांच्या पुष्टीकरणार्थ हिंदुस्थानचे हितसंबंध ध्यानांत घेऊन बरेंच लिहिण्यासारखें आहे, असें आमच्या कमिटीला वाटत आहे. तथापि या अत्यंत नाजूक व घोंटाळ्याच्या विषयावर यापेक्षां अधिक ठाम मत दर्शविण्यास ही कमिटी सध्यां तयार नाहीं.

" तथापि खालील उद्देशाच्या कोणत्याही अर्जास पाठबळ देण्यास ही कमिटी तयार आहे:—

" ( १ ) शक्य त्या उपायांनीं लोकांची सोन्याच्या नाण्यांची आवड वाढविणें.

" ( २ ) सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवीचा अधिक भाग हिंदुस्थानांत सोन्याच्या रूपांत ठेवण्याचें तत्त्व मान्य करणें.

" ( ३ ) चांदीच्या नाण्यांवरील नफा म्हणजे सोन्याच्या ठेवीचा कांहीं भाग सोन्याच्या रूपांत व्याजीं लावणें. तुमच्या चेंब-

रनें तयार केलेल्या बिलाच्या प्रत्यक्ष तरतुदींचा विचार बाजूस ठेवून वरिष्ठ कायदे कौन्सिलाला एकंदर चलनाच्या प्रश्नाचा उहापोह करण्यास लावण्याच्या उद्देशानें तें बिल त्या कौन्सिलपुढें मांडण्याच्या तुमच्या चेंबरच्या प्रयत्नांत सामील होण्यापर्यंतही माझ्या कमिटीची मजल जात आहे. माझ्या कमिटीच्या मतें या ऊहापोहापासून फायदाच होणार आहे. ''

सॉव्हरिन पाडून घेण्यासाठीं मुंबईची टांकसाळ लोकांना खुली करणें इष्ट आहे. असें पंजाब ( दिल्ली ) चेंबर ऑफ कॉमर्सचेंही मत झालें. परंतु दुसऱ्या सुचविलेल्या सुधारणांना पाठबळ देण्याचें तिनें नाकारलें. आणि बंगाल व मद्रास चेंबर्सनीं या कामांत हात घालण्याचें बिलकुल नाकारलें. बंगाल चेंबरनें दिलेला जाब विशेष ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. त्या चेंबरच्या कमिटीनें असें लिहिलें कीं, " कलकत्त्यांतील लोकांचा साधारण कल सोन्याचें चलन स्थापण्याकडे सर्वस्वी नाहीं. आणि या कलाला आमची सहानुभूति आहे. आमच्या मतें हल्लींची चलनपद्धत सुरळीत व समाधानकारक चालली असून तींत ढवळाढवळ करण्यासंबंधाची शिफारस करण्यास आम्ही तयार होणार नाहीं....... ''

कराची चेंबर ऑफ कॉमर्सच्या चेअरमननें तारीख २६ मार्च १९१२ रोजीं केलेल्या वार्षिक भाषणाच्या अखेरीस यासंबंधांत त्या चेंबरनें काय काय केलें त्याचा गोषवारा दिला; आणि हिंदुस्थानांतील पुष्कळ रहिवाशांच्या दृष्टीनें यासंबंधांत साधारण परिस्थिति कशी आहे हें थोडक्यांत सांगितलें तें असें:—

" आणि आतां मी दुसऱ्या—व कदाचित् सर्वांत महत्वाच्या—विषयाकडे वळतों. हा विषय म्हटला म्हणजे हिंदुस्थानच्या चल-

नाची वाढ आणि हिंदुस्थानच्या पैशाची व्यवस्था. हिंदुस्थानांत म्हणजे ब्रिटिश साम्राज्यछत्राखालील सर्वांत मोठा, श्रीमंत, आणि बलवान् भाग आहे त्यांत अत्यंत लहान वसाहतीच्या तोडीचें तरी निदान चलन असावें असा भरंवसा जाणून आम्हीं हिंदी करन्सी कमिटीचा १८९८ सालचा रिपोर्ट व्यवहारिकदृष्ट्या व एकदिलानें मंजूर केला जावा म्हणून आपले प्रयत्न चालविले आहेत. मुंबई, व बर्मा, उत्तर हिंदुस्थान, ट्युटीकोरीन, आाणि पंजाब येथील चेंबर्स ऑफ कॉमर्सनीं आमच्या पत्रांस सहानुभूतीचीं उत्तरें दिलीं असून आम्हांला त्यांनीं मदत करण्याचें अभिवचन दिलें आहे. फक्त मद्रास व बंगाल—हा चमत्कारिक योग म्हणावयाचा—येथील चेंबर्सना वाटतें कीं, हिंदुस्थानची चलनपद्धति पूर्णतेस पोहोंचली असून तींत जास्त सुधारणा करावयाची उरली नाहीं. यासंबंधांत काय करावयाचें तें पुढील कमिटी करीलच म्हणून मला त्यासंबंधानें कांहीं सांगण्याची अवश्यकता नाहीं. तथापि, दुसऱ्या ज्या कांहीं महत्वाच्या बाबी आहेत त्यांकडे आपलें विशेष लक्ष जावें अशी माझी उत्कट इच्छा आहे.

" कांहीं दिवसांपूर्वी मी एक फार उत्तम लहानसें पुस्तक वाचीत होतों. हें पुस्तक " टाईम्स"चा ( लंडन ) लंडनमधला एडिटर मि. हार्टूले वुइदर्स यानें केलें असून त्याचें नांव " पैसा म्हणजे काय " हें होतें. यांत लंडनच्या पैशाच्या पेठेचे कारभार सांगितले असून ते तज्ज्ञानें व साधारण मनुष्यानेंही वाचण्यासारखे आहेत. सातव्या भागांत मि. वुइदर्स यानें लंडन शहरांतील पैसा उसनवार देण्याचे अतिशय मोठे व्यवहार सांगितले आहेत. ग्रंथकर्त्यानें मोठमोठ्या धनकोंमध्यें " हिंदी सरकारच्या प्रतिनिधींना "

सामील केलें आहे याचें तुम्हांला आश्चर्य वाटेल. कदाचित् तुम्हांला वाटलें असेल कीं, स्टेट सेक्रेटरीचें काम पार्लमेंटच्या अधिकाराखालीं हिंदुस्थानसरकारचें धोरण ठरविणें आणिराज्यव्यवस्था संभाळणें यासंबंधानेंच आहे. दुसऱ्या पुष्कळ लोकांनाही असेंच वाटत आहे. हेंच त्याचें काम आहे आणि असलें पाहिजे यांत संशय नाहीं. परंतु गेल्या कांहीं वर्षांत त्याच्या कामाची मर्यादा फार पुढें गेली असून हल्लीं तो लंडनच्या पैशाच्या पेठेंत सर्वांत पराक्रमी पुरुष होऊन बसला आहे, आणि मि. वुइदर्स यानें कळविल्याप्रमाणें तेथें त्याची अत्यंत मोठ्या धनकोंमध्यें गणना झाली आहे. वृद्ध मॉलियरच्या शब्दांत " याला ही नसती उठाठेव कोणी सांगितली आहे ?" असा प्रश्न आपण करूंया. हिंदुस्थानांतील प्रत्येक चेंबर ऑफ कॉमर्सनें हा प्रश्न आपल्यापुढें ठेविला पाहिजे आणि पार्लमेंटही याची चौकशी करील अशी मला आशा वाटत आहे. तुम्ही ही गोष्ट ध्यानांत ठेवा कीं, लंडन ही कांहीं लहान पेठ नव्हे, आणि तेथील मुख्य सावकारांमध्यें आपली गणना करून घेणें म्हणजे जगांत मुख्य सावकार बनणें आहे. हिंदुस्थानासंबंधानें स्टेट सेक्रेटरीचें हेंच कर्तव्य आहे काय ?

" या सर्वांचा काय अर्थ आहे हें तुम्हांला अर्थात् माहीत आहे. याचा अर्थ असा आहे कीं, लंडन येथील पैशाचे व्यापारी अतिशय थोड्या सोन्याच्या भांडवलावर अत्यंत मोठा व्यापार करितात. याचा परिणाम असा झाला आहे कीं, या मौल्यवान् धातूची एखादी एकाएकीं मागणी उत्पन्न होऊन आपला छोटेखानी खजिना रिकामा होईल आणि लोकांना उसनवार देण्याच्या पैशाचें व्याज वाढविणें आपल्यास भाग पडेल आणि यामुळें आपण आपल्या प्रतिस्पर्ध्यापेक्षां

कमी सवलतीचे सावकार बनूं अशी त्यांना कायमची भीति असते. ही गैरसोय टाळण्यासाठीं आपलें भांडवल वांचविण्याच्या कायद्यानें जितक्या सवलती ठेविल्या आहेत त्या सर्वांचा ते उपयोग करतात. व्यापारांत हिंदुस्थानचें देणें देण्यासाठीं आणि हिंदी लोकांच्या मागण्या पुरविण्यासाठीं जें सोनें मामुली रीतीनें हिंदुस्थानांत जावयाचें तें जाऊं न देण्यापर्यंत सुद्धां यांची मजल जाते. वाटेल तसा उपयोग करून घेण्यासाठीं स्टेट सेक्रेटरी त्यांच्या हातांत चांगला सांपडला आहे. अर्थशास्त्राचीं खरीं तत्वें झुगारून देऊन त्यांच्या सांगण्यावरून तो हिंदुस्थानांतून आपल्या कागदी चलनाला आश्रा म्हणून ठेविलेल्या नगदी ठेवींपैकीं, ( हें चलन फक्त हिंदुस्थानांतच चालत असून त्याचा पैसाही पण हिंदुस्थानांतच मिळत असतो. ) ऐशीं लक्ष पौंड सोनें काढून घेऊनच थांबत नाहीं, तर आपल्या चालू शिलकांपैकीं आपल्या तिजोऱ्यांतून एक कोटी वीस लक्ष पौंड व आपल्या सोन्यांच्या प्रमाणाच्या ठेवीपैकीं एक कोटी सत्तर लक्ष पौंडांवर रकमाही हिंदुस्थानांतून काढून घेतो. स्टेट सेक्रेटरी एवढा मोठा नांवाजलेला सावकार कां बनला आहे याचा खुलासा या गोष्टीनें होतो. जो सरकारी अधिकारी दुसऱ्या कोणाच्या पैशापैकीं तीन कोटी पन्नास लक्ष पौंड आपल्या हातांत वापरील तो कोणत्याही पैशाच्या पेठेंत—लंडनांतसुद्धां—उघड उघड महत्वाचा सावकार बनेल. परंतु हिंदुस्थानचा स्वतःचा पैसा हा जो इंग्लंडांत जातो, त्याबद्दल या गोष्टीस बळी पडणाऱ्या आपणांला काय वाटावें ? मी नम्रपणें सांगतों कीं, हा सर्व व्यवहार इंडिया ऑफिसाला अत्यंत लांछनास्पद आहे. मी याहीपेक्षां पुढें जाऊन बिनदिक्कत आणि विचार करून म्हणतों कीं, जर एखादा खासगी

नोकर आपल्या मालकाच्या नगदीचा इंडिया ऑफिसानें या देशांतील नगदी शिलका व पैशाच्या ठेवी यांचा जसा दुरुपयोग केला आहे तसा दुरुपयोग करूं लागेल तर दुसरें कांहीं कडक शासन झालें नाहीं तरी निदान तो आपला बदलौकिक व बडतर्फी करून घेतल्याखेरीज रहाणार नाहीं.

" ही स्थिति आणखी दुप्पट भयप्रद झाली आहे, कारण ब्रिटिश राज्यांतील नगदी ठेवी उघड उघड अपुरत्या आहेत, इतकेंच नाहीं तर ग्रेटब्रिटनच्या पैशाचे आज अशा रीतींचे व्यवहार चालले आहेत कीं, पुष्कळ लोकांचा विश्वास बराच ढांसळला आहे. " डुबत फंडाची " अफरातफर करून व सरकारचा रोजचा कारभार मोठमोठ्या रकमांचें हंगामी कर्ज काढून चालविणें ही रीत कांहीं विचारी फडनिसांनीं वाखाणणी करण्यासारखी नाहीं. हीं हंगामी इंग्लिश फडनिसाचीं देणीं एक कोटी तीस लक्ष पौंडांपर्यंत पोहोंचलीं आहेत. सरकारी फडनिशीपद्धतीमध्यें केवढा हा विरोध ! एकीकडे पहावें तर मि. लॉइड जॉर्ज लंडनच्या पैशाच्या पेठेवर एक कोटी तीस लक्ष पौंड कर्ज काढतो आणि दुसरीकडे पहावें तर सर गाय फ्लीटवुडपाशीं हिंदी तिजोऱ्यांतून पैशाचा इतका अतिरेक झाला आहे कीं, कांहीं फारशी गैरसोय न होतां दुसऱ्याला कर्जाऊ देण्यासाठीं त्याच्याजवळ एक कोटि वीस लक्ष पौंड फालतू रहातात ! पण मी असा प्रश्न विचारतों कीं—आणि हा प्रश्न या विषयाचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक इसमाला सुचलाच पाहिजे—हिंदुस्थानच्या लोकांवर इतका कर कां लादला जावा ? आणि त्यांतून मोठमोठ्या फालतू रकमा लंडनांत नेऊन तेथें मि. लॉइड जॉर्जच्या अयोग्य फडनिशीपद्धतींची अर्थात् अप्रत्यक्षपणें संपादणूक करण्यासाठीं लोकांना उसनवार कां दिल्या जाव्या ?

आणि ही पद्धत कशी तर बसल्याउठल्या कर्ज काढावयाचें आणि " डुबत फंडाची " मुळींच फिकीर करावयाची नाहीं ! जर हिंदुस्थान सरकारपाशीं दुसऱ्याला देण्यासाठीं फालतू शिल्लक रहाते तर ती लंडनांत नेऊन तेथील पैशाच्या पेठेंत फारकरून बऱ्याच कमी व्याजावर गुप्तपणें उसनवार न देतां हिंदुस्थानच्या लोकांच्या हातां-तच ती ठेविली पाहिजे.

" याशिवाय, आणखी एक वाद आहे ! तुम्हांला माहीत आहे कीं, जगांतील सोन्याची पैदास हल्लीं फार विलक्षण प्रमाणावर येऊन पोहोंचली आहे. त्यामुळें सोनें सर्वत्र किमतींत उतरत आहे—म्हणजे मालाच्या किंमती चढत आहेत—आणि म्हणून मजुरांचे भयंकर संप उद्भवून ते वाढत आहेत. जी पद्धति, अशी स्थिति अस-तांना, हिंदुस्थानांत सोन्याचा मामुली प्रवाह जाऊं न देतां त्यास अडथळा करते, त्या पद्धतीला कोणी शहाणपणाची पद्धत म्हणेल काय ? परंतु अशा पद्धतीला हल्लीं इंडिया ऑफिस मनापासून मदत करून राहिलें आहे. "

याच वादाचा कांहीं नक्की विचार करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोंत. तर आतां या विषयावर झालेल्या विचारापासून कोणकोणते सिद्धांत निघाले आहेत ते आपण एकत्र करूं.

खंड तिसरा
समाप्त.

# खंड चवथा.

## पेंचाचा उलगडा.

## भाग १०.

### ब्रिटनच्या मजबुतीचा पाया.

स्टेट सेक्रेटरीनें आपल्या मोठ्या हुद्याच्या जोरावर ज्या फर्डानिशी धोरणाला नुकतेंच पाठबळ दिलें त्याचा विचार करतांना आम्हीं असें ठरविलें कीं—( १ ) लंडनांत नेण्यास नगदी फालतू शिलका राहाव्या म्हणून हिंदुस्थानच्या लोकांवर वाजवीपेक्षां, फाजील कर लादले आहेत व ( २ ) सोन्याच्या प्रमाणाची ठेव वस्तुतः सर्व लंडनास नेऊन तेथें युद्धाच्या प्रसंगीं विकतां न येण्याजोग्या हमींवर व्याजीं लाविली आहे आणि पूर्वेकडील आपल्या ताब्यांतील देशांतील पैशाची स्थिति धोक्यांत आणून टाकली आहे. ह्या दोन्ही गोष्टींचा उद्देश, लंडनाहून हिंदुस्थानांत जो स्वाभाविकपणें सोन्याचा प्रवाह जावयाचा तो बंद करण्याचा आहे. आतां ह्या दोन गोष्टी नीतीला कितपत अनुसरून होतील ह्या प्रश्नाचा विचार अगदीं अलगच आहे. तो जरी बाजूला ठेविला तरी सुद्धां हें धोरण अयोग्य व निरर्थक ठरतें. कारण, कांहीं काळपर्यंत हें धोरण कितीही सफल झालें तरी अखेरीस हिंदीसरकार-

च्या तिजोऱ्यांतील निरनिराळ्या नगदी ठेवी व सालोसालच्या चालू नगदी शिलका ( ज्यांच्यावर स्टेट सेक्रेटरीनें वाटेल तशा मनमुराद हुंड्या काढल्या आहेत ) रसातळास गेल्याबरोबर तें अपयशी झालेंच पाहिजे. हें विलक्षण दावें पूर्ण ताणलें गेल्यावर स्टेट सेक्रेटरीला, इंग्लंडमध्यें जितक्या खर्चापुरतें त्याचें पौंडांच्या रूपांत घेणें असेल तितक्यापुरताच पैसा हिंदुस्थानांतून काढण्याचें जें त्याचें नेहमींचें व मामुली कर्तव्य तेंच शेवटीं अमलांत आणणें भाग आहे. मध्यंतरीं सॉव्हरिन एकसारखे वाढत्या प्रमाणावर हिंदुस्थानांत येऊन सोन्याचीं नाणीं चलनी पैसा या दृष्टानें लोकांना धीरे धीरे परंतु खात्रीनें जास्त आवडूं लागतील; आणि चांदीच्या चलनाची जी वास्तविक व अपरिहार्य पायरी—नुसतें सांकेतिक नाणें आणि सॉव्हरिनचें किंवा हिंदुस्थानांत यापुढें जें कायदेशीर देवघेवीचें सोन्याचें नाणें केलें जाईल त्याचे धातुरूपी भाग—त्या पायरीवर तें चलन हलकें हलकें येऊन पडेल.

सॉव्हरिनच्या सर्वसाधारण विकत घेण्याच्या शक्तीवर होणाऱ्या परिणामाचा दूरदृष्टीनें विचार केला तर लंडनच्या पैशाच्या पेठेला सोन्याची आणखी जास्त काटकसर करण्याच्या कामांत मदत करण्याचे इंडिया ऑफिसचे जे नुकते प्रयत्न झाले आहेत, ते कोत्या दृष्टीचे व अयोग्य होते असें माहीत पडेल. कारण सोन्याचा खप बंद करणें म्हणजे व्यापाराच्या कामाला व पतीच्या व्यवहाराला आणखी जास्त सोनें पुरविणें होय. यापलीकडे कांहीं नाहीं. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ह्या धोरणानें सोन्याच्या किंमतीला आणखी अधिक कमीपणा येण्यास ( मालाच्या किंमती वाढण्यास ) प्रत्यक्ष उत्तेजन मिळालें, आणि परिणाम असा झाला कीं, रोजमुऱ्यासंबंधानें अधिक

भांडणें, मजुरांच्या अधिक तक्रारी, संप आणि अर्थशास्त्रदृष्ट्या अधिक नुकसान यांचें कदाचित् नकळत पण बहुतकरून समजूनउमजून बीं पेरलें गेलें. सोन्याच्या काटकसरीच्या धोरणाचे विशिष्ट परिणाम अर्थात् बरोबर संगतवार सांगतां येण्यासारखे नाहींत, परंतु अशा धोरणाचा कल व अर्थशास्त्रदृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या परिणाम यांचा जर आजामितीस अंदाज बांधला तर त्यांसंबंधानें खचित कोणालाही संशयाला जागा रहाणार नाहीं.

मग अशा स्थितींत काय करावें ? लंडन येथील कटमितीच्या व्याजाचा दर वाढूं नये, आणि अशा रीतीनें ब्रिटनच्या व्यापाराचें व्याजाच्या जास्त बोजापासून रक्षण व्हावें, या दोन दृष्टींनीं हिंदुस्थानांत सोनें येऊं न देणें हें जर अनिष्ट किंवा अयोग्य होईल म्हणावें तर याला दुसरी तोड काय आहे ? दुसरी तोड आरंभींच्या भागांत स्पष्ट दाखविली आहे. ही तोड म्हणजे सोन्याच्या खपाला उत्तेजन देणें. ठराविक रोजमुरा मिळविणारांचे वास्तविक रोजमुरे ( सर्वसाधारण मालाच्या किंमती वाढल्यामुळें ) धीरे धीरे कमी होतात आणि कारखान्यांच्या मालकांचे वास्तविक नफे ( पैशाच्या पेठेची नेहमीं चलती असल्यामुळें ) धीरे धीरे वाढत जातात. या दोन वर्गांतील कायमच्या लढ्यामुळें हलीं ब्रिटनची औद्योगिक व सामाजिक प्रगति धोक्यांत येऊन पडली आहे. ह्या गोंधळून टाकणाऱ्या स्थितीचें आद्यकारण सोन्याची हलींची विलक्षण व प्रतिवर्षी वाढणारी पैदास होय. ह्या स्थितीला उपाय म्हणजे ह्या मौल्यवान् धातूचा उपयोग व खप वाढवावयाचा. सोन्याच्या अधिक खपाच्या किरकोळ मार्गांचा विचार दुसऱ्या भागांत आलाच आहे; परंतु मुख्य आणि अत्यंत खात्रीचा उपाय म्हणजे हिंदुस्थानच्या लोकांना

चलनाच्या कामाकरितां व दागदागिन्यांकरितां सोनें अधिक उपयोगांत आणण्यास प्रत्यक्ष उत्तेजन द्यावयाचें. उपाय आपल्या समोर आहे; त्याचें चीज करणें फक्त निश्चयावर व कालावर अवलंबून आहे.

पहिल्यानें सोन्याचीं नाणीं अनिर्बंध पाडून देण्यास हिंदी टांकसाळी खुल्या कराव्या. सॉव्हरिनखेरीज विशिष्ट प्रकारचीं हिंदी सोन्याचीं नाणीं असावींत व लोकांच्या मागणीवरून तीं वाटतील तशीं पाडून दिलीं जावीं. संरकारी अधिकाऱ्यांच्या हातांत चांदीच्या सांकेतिक नाण्याचा पूर्ण मक्ता असल्यानें त्यांला त्या नाण्याची अमुकच किंमत आली पाहिजे हें ठरवितां येतें. अशा स्थितींत तो अधिकारी त्या नाण्यांचा लिलांव करतो. हा असमंजसपणा व ही चूक अतःपर बंद केली पाहिजे आणि हिंदुस्थानच्या होम चार्जेसची व्यवस्था प्रमुख बँकांमार्फत लाविली जाऊन जी रक्कम पाठवावयाची ती स्टेट सेक्रेटरीच्या वार्षिक बजेटापेक्षां यत्किंचित्‌ही जास्त असूं नये. हिंदी सरकारच्या खर्चानें खासगी व्यापाऱ्यांना पैसा पुरविण्याचें हल्लींचें विलक्षण काम अशा रीतीनें इंडिया ऑफिसच्या हातांतून बिलकुल काढून घेतल्यावर जगांतील सर्व बँकांना सर्व स्थितींत व्यापाराच्या गरजांप्रमाणें हल्लीं जशा लगडी व नगद इकडे तिकडे पाठवाव्या लागतात, त्याप्रमाणें व्यापारांत जें हिंदुस्थानचें घेणें असतें त्याच्या फेडीसाठीं बँकांना व लोकांना हिंदुस्थानांत सोनें किंवा सॉव्हरिन वक्तशीर पाठविणें भाग पडेल. हिंदुस्थानसरकारापाशीं नेहमींपेक्षां जास्त मोठ्या नगदी शिलका रहातील तर त्या शिलका हिंदुस्थानसरकार ठरवील त्या प्रकारच्या हमींवर व व्याजाच्या दरांवर हिंदुस्थानांत "पसंतीच्या ऋणकों"ना उसनवार देऊन हिंदुस्थानचा व्यापार वाढविण्याकडे त्यांचा उपयोग करावा.

या फार जरूर असलेल्या सुधारणांचा व्यावहारिक परिणाम असा होईल कीं, हिंदुस्थानांत सोन्याची मागणी वाढेल आणि यामुळें लंडनांतून दर आठवड्याला कदाचित् पांच लक्ष पौंड सोनें बिनचुक इकडे येईल. अशा प्रमाणानें सोनें इकडे आल्यानें लंडनच्या पैशाच्या पेठेंत पहिल्या एक दोन महिने निःसंशय खळबळ होईल, आणि ही पूर्वेकडीलही नवी मागणी भागविण्यासाठीं युरोप व अमेरिका यांना आपल्या वांट्याचे सोन्याचे हिस्से देण्यास लावण्याच्या विशेष तजविजी योजणें भाग पडेल. हिंदुस्थानांत सोनें असें सतत आल्यानें कटमितीच्या व्याजाच्या दरांत जो फेरबदल होणार त्यांत अखेरीस लंडनचें किंवा ब्रिटिश राज्याचें कोणाचेंच नुकसान होणार नाहीं. पहिल्या एका भागांत सांगितलें आहे कीं, आपल्या सोन्याच्या ठेवींचा मोठेपणा हा खरोखर आपण रानटी स्थितींतून किती सुधारलों आहोंत हें दाखविणारें साधन आहे. पतीच्या किंमतीचीही पण तीच गोष्ट आहे. आपल्या सोन्याच्या ठेवींच्या मोठेपणावरच निव्वळ ही किंमत निश्चित होत नाहीं किंवा नुसत्या आपल्या तात्कालिक ऐहिक संपत्तीच्या मोठ्या आंकड्यावरही ती ठरत नाहीं. तर त्यांत सचोटीसंबंधाची आपली ख्याति, आपला उद्योग, आपली काटकसर आणि आपली कामाची हातोटी यांचेंही अंग असतें. अर्थात् लंडन शहरच्या बँकवाल्यांच्या व व्यापाऱ्यांच्या अंगीं जगाला चकित करून टाकण्याइतका धंदा आपल्याकडे खेंचण्याचें जें सामर्थ्य आहे आणि त्याबरोबरच सर्व जगांत त्यांच्या कांहीं प्रतिस्पर्ध्यांपेक्षां जास्त अनुकूल अशा शर्तींवर ते जो व्यवहार करूं शकताहेत, त्याचीं कारणें सर्वस्वि त्यांच्या दृश्य साधनांवर अवलंबून नाहींत. जगांत दुसऱ्या कोणत्याही राज्यकारभाराच्या किंवा व्यापाराच्या अगर भरभराटीच्या ठिकाणीं क्वचित् दृष्टीस पडतील असे जे

गुण म्हणजे नेकी, सुरक्षितता, खात्री आणि मजबुती लंडन शहरीं वसत आहेत, त्यांच्या जगभर ख्यातीचे हे परिणाम आहेत. लंडनचे व्यापारी, शेटसावकार आणि बँकवाले ही आपली ख्याति कायम ठेवल्याखेरीज खचित रहाणार नाहींत, मग तेथील साधारण कटमितीच्या व्याजाची मर्यादा तीन टक्क्यांजवळ असो अगर पांच टक्क्यांजवळ असो. जर जगांतील सोन्याच्या पैदाशीच्या अपूर्व स्थितीमुळें लंडनमधील बँकेचा दर पांच टक्क्यांचा करावा लागलाच तर पॅरिस, बर्लिन आणि न्यूयॉर्क येथें कटमितीच्या व्याजाचा दर तसाच किंवा जास्तही ठेवणें भाग पडेल हें खचित आहे. आणि व्याजाच्या दरांची यामुळें अपरिहार्य फेरबदल होऊन फिरून जी व्यवस्था होणार त्यांत ग्रेटब्रिटन आपलें हल्लीं असलेलें वर्चस्व खास ठेवील.

अशाप्रकारें कटमितीचे व व्याजाचे चालू दर कायमचे वाढले म्हणजे सर्व " सोनेरी किनोरीचीं " जामीनखतें ( आणि अशाच प्रकारचे दुसरे पुष्कळ शहाजोग हमींचे कागद ) ह्यांची किंमत आणखी जास्त उतरण्याचा संभव आहे. परंतु असा कांहीं जास्त उतार अपरिहार्यच आहे. मालांच्या वाढत्या किंमतींमुळें माल पैदा करणारे, इकडे तिकडे नेआण करणारे, त्याची वांटणी करणारे आणि शेटसावकार या सर्वांच्या साहसाला उत्तेजन मिळून बाजारांत जी हितकारक परिस्थिति उत्पन्न होईल, ती या सर्वांना वाढता नफा मिळवून दिल्याखेरीज रहाणार नाहीं. आणि या इतक्या व्यवहारापासून जास्त फायदा होत गेल्यावर ठराविक व्याज देणारीं बिचारीं सरकारी कर्जखतें आणि दुसरीं जामीनखतें, ज्यांच्यापाशीं व्याजीं लावण्यास फालतू भांडवल आहे, त्यांच्या, मर्जीतून दरसाल अधिक अधिक उतरलीं पाहिजेत. तथापि, या बाबतींत जोंपर्यंत हल्लींची सोन्याची

विलक्षण पैदास कमी होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत तोंपर्यंत पैशाच्या किंमतींत एकंदर होणाऱ्या कमतरतेंत हे कागद नुसते सामील होतील इतकेंच. जे लोक आपली पुंजी आपल्या स्वतःच्या धंद्यांत प्रत्यक्ष घालतात त्यांची नुकसानी वाढत्या किंमतींच्या दिवसांत साधारणपणें मालाची पैदास करणाऱ्या भांडवलवाल्यांना जो अधिक नफा रहातो व त्यांची जी भरभराट होते त्यानें भरून येणार आहे. एकंदर मानानें जे थोडेसे लोक आपला पैसा व्याजीं लावण्याकरितां सर्वथैव ठराविक व्याजाचा दर देणाऱ्या सरकारी कर्जरोख्यांवर व जामीनखतांवर अवलंबून असतात, त्यांचें फार नुकसान होण्याचा संभव आहे. यासंबंधांत विकत घेण्याच्या शक्तींत एकसारखा कमी कमी होत जाणारा ठराविक रोजमुरा कमावून जे आपलें रोज पोट भरतात, अशा लाखों धडपड करणाऱ्या लोकांची जितकी वाईट स्थिति होईल, तितकी वाईट स्थिति थोड्या पैसेवाल्या लोकांची ( यांत अर्थात् पुष्कळ आळशी आणि निरुद्योगी श्रीमंत येतात ) होणार नाहीं. थोड्याशा श्रीमंतवर्गाच्या रक्षणासाठीं लाखों लोकांचें नुकसान करणारा उपाय फायदेशीर किंवा योग्य क्वचितच म्हणतां येईल. अशा उपायाचे खरे परिणाम सर्वांस समजल्यावर राजकीय पाठबळही त्याला मिळणार नाहीं. उलटपक्षीं, या पुस्तकांत प्रतिपादलेलें धोरण आपल्यासमोर आहे. जो थोडासा वर्ग सॉव्हरिनची किंमत हल्लीं कमी होत असल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या अडचणी सोसण्यास दुसऱ्या कोणत्याही वर्गापेक्षां अधिक समर्थ आहे. अशा मूठभर निरुद्योगी व व्याजखाऊ वर्गाचें कदाचित् थोडेंसें नुकसान करून काबाडकष्ट करणाऱ्या बहुजनसमाजाला वांचविणें हें तें धोरण होय.

ब्रिटनला आतां जो मोठा पेंच पडला आहे तो विचाराला पटेल अशा रीतीनें उकलण्याचा एवढाच काय तो उपाय आहे. तो जगांतील प्रत्येक व्यक्तीला मान्य होईल असें मानणें मूर्खपणाचें आहे. तथापि, ह्या अडचणींतून बाहेर पडण्याला आजपर्यंत दुसरे जे कांहीं मार्ग सुचविले गेले असतील त्या सर्वांपेक्षां हा उपाय एकंदरींत अखेरीस कमी नुकसानकारक होईल ह्यांत तिळमात्र संशय नाहीं, असें मी म्हणतों. आमच्याजवळ सोन्याचा संग्रह आहे, आणि तो दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीकडे कानाडोळा करून आम्हांला स्वस्थ बसतां येणार नाहीं आणि जर कदाचित् तसे बसलोंच तर आमच्या अज्ञपणाचा आणि हेळसांडीचा परिणाम भोगल्यावांचून सुटकाच नाहीं.

परंतु साम्राज्याच्या मोठेपणाला अनुरूप अशी एकादी क्लप्ति एकमतानें ठरवीपर्यंत हा सोन्याचा पूर वाढतच जाणार आणि त्याच्यापुढें आमचे सर्व प्रयत्न निष्फळ होऊन आमच्या सामाजिक व राजकीय सत्तेचा पायाच ढांसळण्याची भीति पुढें येऊन उभी रहणार. पुढील दहा वर्षांत जगांतील सोन्यांत एक अब्ज पौंडांची भर पडेल, आणि त्याच्या पुढल्या दशकांत आणखी एक अब्ज असाच क्रम चालावयाचा. मागें एकदां प्रलयकाळीं पाण्याचा पूर आला होता असें आम्ही बायबलांत वाचतों. पण त्या पुरानें प्राणिमात्रांचा निकाल झटपट लावला; म्हणून आडमार्गाला लागलेल्या मनुष्यमात्राला ती ज़लद व दयार्द्रच शिक्षा म्हणावयाची. कारण, ह्या सोन्याच्या पुराची नुसती यथार्थ कल्पना मनांत आणिल्यास त्यापेक्षां अधिक यातना होतील. सोन्यानाण्याची किंमत घटल्यानें ज्यांच्या संचित पुंजीचें नुकसान होतें अशा संसारांतील जीवनकलहांत पिछाडीला राह-

णाऱ्या अल्पसंख्याक लक्षाधीशांना सुचिन्ह वाटणार नाहीं हें खरेंच; परंतु जेमतेम उपासमार टाळणाऱ्या एककोटी तीसलक्ष लोकांसुद्धां जी बहुसंख्याक दरिद्री प्रजा आहे तिची मालाच्या किंमती अशाच वाढत राहिल्या तर जीवनार्थकलहांतील हल्लींची दुःखद स्थिति नुसतीच कायम होईल एवढेंच नव्हे तर ती कष्टतर होत जाईल, आणि अखेरीस त्यांतल्यात्यांत जे अगदींच विपन्न स्थितींत असतील त्यांचा नाश होईल.

हें स्थित्यंतर क्रमाक्रमानें होऊं लागलें असून सोन्याची किंमत घटल्याचा अनिष्ट पूर्वपरिणाम आतांच अनुभवास येऊं लागला आहे. हल्लीं व्यापाराची वाढ होत आहे म्हणून सट्टेवाले, भांडवलवाले, पेढीवाले, वाहतुके व्यापारी, मजुरांचे धनी आणि स्वतः मजूर देखील हर्षभरित झाले आहेत. मालाची किंमत चढली म्हणजे प्रथमतः कांहीं काळपावेतों उद्योगधंद्याला असेंच चलन मिळतें. आणि उद्योगधंदे वाढले व व्यापारही वाढूं लागला म्हणजे अर्थात् अधिक नफा आणि सर्वत्र किंमतींत उतरलेल्या नाण्याची रेचरेल ! पण नाण्यांची संख्या वाढली ह्या आनंदाच्या भरांत ह्या नाण्यांची सापेक्ष किंमत कमी झाल्याची कोणाला दादही नसते. मूर्खांना ह्या घटोत्कची मायेच्या बाजारांत व्यवहार करणें मोठें सुखदायक वाटतें. पण अखेरीस भ्रमनिरास होतो; डोळ्यांवरची धुंदी जाते, आशेचा भंग होतो, आणि निराशामय अंधकार पसरतो. नंतर ज्यांचें वार्षिक उत्पन्न नियत आहे त्यांना आपली स्थिति सुधारण्याविषयीं केलेल्या आपल्या प्रयत्नांची निष्फलता दिसून येते. मग विचारशून्य कनिष्ठ वर्गांतील लोक आधींच मेटाकुटीस आलेल्या वरिष्ठ वर्गावर सूड उगविण्यासाठीं अपूर्व आवेशानें उलटतात. संपावर संप, बेसुमार सट्टे

बाजी संकटाची हूल, आणि पैशाच्या पेठेंत आणीबाणीचे प्रसंग ह्यांचें साम्राज्य सुरू होतें. सोन्याचा हा पूर अडथळा न होतां तसाच वाढत राहिल्यास ज्या बंधनांनीं समाजांत एकी व सुव्यवस्था राहते तीं बंधनें विस्कळित होऊन अखेरीस सर्व पाश्चात्य सुधारणा अशा खोल खड्ड्यांत जाऊन पडेल कीं, तेथून तिला वर काढण्याला कित्येक शतकें लागतील.

आपणावर कोणतें संकट येण्याचा संभव आहे ह्याचें कांहींसें ज्ञान झाल्यावर त्याचा परिहार करण्याचा शास्त्रज्ञ व देशभक्त प्रयत्न करतील असें मानणें वावगें होईल काय ? आमच्या शेतांत जर फाजील पाण्याचा पूर लोटला तर त्याचें आस्तित्वच नाकबूल केल्यानें कांहीं आमच्या जमिनींतील पाणी झिरपून जाऊन जमीन सुधारत नाहीं, तर त्यांतून अधिक झालेलें पाणी काढून दिल्यानेंच ती सुधारते त्याचप्रमाणें हल्लीं जो आपल्यावर सोन्याचा पूर लोटत आहे, याकडे डोळेझांक केल्यानें कांहीं आपली सामाजिक व आर्थिक सुस्थिति कायम राहणार नाहीं, तर त्याकरितां फाजील सोन्याला वाट काढून दिली पाहिजे किंवा तळघर दाखविलें पाहिजे. असें केलें तरच तें सोनें पुढें सर्व मानवजातीच्या उपयोगीं पडेल.

व्यापाराकरितां अथवा राजकीय कारणाकरितां सोन्याच्या गंगाजळी ठेवी ठेऊन, आणि हिंदुस्थानाकडे सोन्याचा ओघ वळवून, ब्रिटिश साम्राज्यांत ठिकठिकाणीं असल्या तळघरांची व वाटांची योजना करतां येण्याजोगी आहे. नुसता हिंदुस्थानाकडे पाट फोडल्यानेंच जर हा पूर ओसरला नाहीं तर आपल्या ताब्यांतील उष्ण कटिबंधांतील इतर देशांतही सोन्याची ही मेहेरनजर केली पाहिजे. ब्रिटनला पडलेल्या पेंचावर तोड हीच आहे. तिचा उपयोग करणें ग्रेट ब्रिटनकडे आहे.

**खंड चवथा समाप्त.**

# पुरवणी (१).

## सोन्याच्या चलनास हिंदुस्थान पात्र आहे काय ?

" स्टेटिस्ट "ला दिलेला खालील जबाब तारीख २५ मे सन १९११ च्या " टाइम्स ऑफ इंडिया " पत्रांत छापला आहे.

" हिंदुस्थानसरकारनें चांदीवर बसविलेल्या नव्या करासंबंधानें आपली नापसंती दर्शवितांना स्टेटिस्ट पत्रानें एक वर्षामागें जोराची गडबड उडवून दिली होती. त्या वेळेस ह्या पत्रानें सरकारला शिव्याशाप देऊन चांदी खालावेल, चीनच्या देवघेवींत भयंकर फूट पडेल, हिंदुस्थानच्या परदेशी व्यापारास फार मोठा धक्का बसेल, आणि चोहोंकडे राजकीय असंतोष माजून अखेरीस सर्व प्रकारें भयंकर अनर्थ कोसळतील अशीं भाकितें केलीं होतीं. लोकांना ह्यासंबंधानें हसूं आलें. स्टेटिस्टनें केलेल्या ह्या ओरडींत हिंदुस्थानचे लोक क्वचितच सामील झाले, किंवा त्यानें केलेल्या वेड्यावांकड्या भाकितांवर क्वचितच विश्वास ठेविला. कारण, प्रत्येकास माहीत आहे कीं, पुढें घडून आलेल्या गोष्टींनीं हीं भाकितें व ही ओरड सर्वस्वी अगदीं खोटीं ठरलीं आहेत. तथापि चांदीवरच्या कराच्या प्रश्नासंबंधांत आपला कसा फजितवाडा झाला याची बिलकुल लाज न धरतां जमाखर्चाच्या कामांत निपुण (?) असलेल्या या पत्रानें हिंदी चलनविषयाकडे आपले लक्ष फिरून वळवून आतां सरकारनें हिंदुस्थानाकरितां वेगळें व विशिष्ट प्रकारचें सोन्याचें चलन स्थापण्याची

तजवीज करावी अशा प्रकारच्या सर विठ्ठलदास थॅकर्सी यांनीं नुकत्याच केलेल्या विनंतीच्या विषयावर आपले पोक्त विचार जगापुढें मांडले आहेत.

" एकंदर विषयावरील स्टेटिस्टच्या अभिप्रायाचा गोषवारा दोन शब्दांत देतां येईल—' निव्वळ वेडेपणा '– सर विठ्ठलदास थॅकर्सी एखाद्या मार्च महिन्यांतल्या सशाप्रमाणें वेडा आहे. आणि या प्रश्नाचा ऊहापोह इंडिया ऑफिसच्या संगनमतानें लावूं असें जें फडनिसांनीं दिलेलें वचन त्यासंबंधानें स्टेटिस्ट पत्राचें मत असें आहे कीं, " या वचनामुळें सर गाय फ्लीटवुड वुइल्सन यांनीं आपल्याला आपल्या जागेस अयोग्य असें निःसंशय ठरवून घेतलें आहे. त्यांची अयोग्यता ठरविण्यास यापेक्षां जास्त खात्रीयुक्त पुरावा सांपडणें कठिण आहे. " ( स्टेटिस्ट, तारीख १५, एप्रिल १९११ ) अशा प्रकारच्या जोरदार स्पष्टवक्तेपणाचीं कारणें जाणण्याची जिज्ञासा एखाद्या वाचकास उत्पन्न होऊन हिंदुस्थानांत सोन्याचें चलन नसावें या प्रश्नाची चर्चा असलेले स्टेटिस्टचे चार डौलदार लेख वाचून काढण्याची ताकद त्याच्या अंगीं जर असेल तर त्याला स्टेटिस्ट पत्राचा मथितार्थ पुढील प्रमाणें असल्याचें कळून येईल.

( अ ) ' हिंदुस्थान देश पृथ्वीवरील अत्यंत कंगाल भागापैकीं एक आहे. '

( ब ) 'या कारणासाठीं त्या देशाला सोन्याचें नाणें फारच महाग, उधळेपणाचें, अवजड व गैरसोयीचें पडून तो एक " अनर्थकारक चैनीचा प्रकार " होईल. '

( क ) हिंदुस्थानांत सोन्याचें चलन स्थापल्यास चांदीला आणखी धक्का बसून गरीब लोकांच्या सांठविलेल्या चांदीचें थोडेंबहुत नुक-

सान होणार आणि यायोगानें ' दारिद्र्य वाढून असंतोष भयंकरपणें माजून रहाणार. '

" आपण नापसंत केलेलें धोरण हिंदुस्थानसरकार हट्टानें चालवीत आहे म्हणून असंतोष व बंडाचा उपक्रम माजून राहील असें अवडंबर करून या स्टेटिस्ट पत्रानें जीं वर दिलेलीं भाकितें केलीं आहेत, त्यांवरून त्या पत्रानें एक वर्षांपूर्वी केलेल्या बंडाच्या बागुलबोवाचें स्मरण होतें. कायद्याच्या एका कलमाच्या सपाट्याबरोबर—म्हणजे नुसता चांदीवरचा आयात कर आणखी शेंकडा १५ नें किंवा अशाच कोणत्या तरी प्रमाणानें वाढवून—संचित चांदीच्या मालकांना होणाऱ्या अन्यायाचा सर्व धोका एकदम निघून जाईल ही गोष्ट स्टेटिस्ट पत्राच्या ध्यानीं आली नाहीं हा चमत्कार म्हणावयाचा. सोन्याचा पैशाहूनही अधिक गैरसोयीचा व अवजड पांढऱ्या धातूचा पैसा आज कित्येक शतकें जे लोक वापरून राहिले आहेत त्यांच्यावर सोन्याच्या पैसा फारच गैरसोयीचा " आणि फारच अवजड " आहे, ह्या स्टेटिस्ट पत्राच्या वादाचा फारसा परिणाम होण्याचा संभव नाहीं. तथापि हा मुद्दा व सोन्याच्या चलनाच्या " उधळेपणाचा " व " महागाईचा "ही मुद्दा जोरानें पुढें मांडण्यासाठीं इंग्लंडमध्यें हुंड्या व बँकनोटाच काय त्या खऱ्या चलनांत असल्यामुळें तेथें सॉव्हरिन " फार कमी उपयोगांत आहेत " अशी कबुली देण्यास स्टेटिस्ट पत्र मागेंपुढें पहात नाहीं. हीच स्थिति संयुक्त संस्थानांची, फ्रान्सची, जर्मनीची व ह्यांसारख्या इतर देशांची. आमच्या टीकाकाराच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे जगांतील प्रमुख राष्ट्रांना सोन्याचे मोठे संचय करून ठेवणें " भाग पडते " हें खरें आहे; परंतु स्टेटिस्ट पत्राचा सवाल असा आहे कीं, " हिंदुस्थानासारख्या अत्यंत कंगाल

देशांवर " सोनें लादण्यास हें कारण झालें कीं काय ? वस्तुस्थिति पाहिली तर इंग्लंडमधल्या सोन्याच्या ठेवी दुसऱ्या कोणत्याही मोठ्या राष्ट्रापेक्षां लहान आहेत, हें जरी खरें आहे तरी त्याबरोबर इंग्लंड-मध्यें युरोपांतल्या किंवा अमेरिकेंतल्या दुसऱ्या कोणत्याही सोन्याचा उपयोग करीत असलेल्या देशापेक्षां सोन्याचा पैसा अधिक उपयोगांत येतो. जगावरील मुख्य देशांमधल्या कांहींच्या तिजोऱ्यांतून आणि राष्ट्रीय बँकांतून गेल्या वर्षाच्या डिसेंबर ११ ला खालीलप्रमाणें सोन्याच्या ठेवी होत्याः—

| | पौंड. |
|---|---|
| संयुक्त संस्थानें ... ... ... | २६३२४१००० |
| फ्रान्स ... ... ... | १३११७७००० |
| रशिया ... ... ... | १३०४७६००० |
| ऑस्ट्रिया ... ... ... | ५५०२३००० |
| इटली ... ... ... | ४८३६३००० |
| अर्जेंटिना ... ... ... | ३७०३३००० |
| जर्मनी ... ... ... | ३३०५२००० |
| ऑस्ट्रेलेशिया ... ... ... | ३१३५६००० |
| इंग्लंड ... ... ... | ३१३५६००० |

यावरून असें दिसेल कीं, स्टेटिस्टच्या या महागाई व उधळेपणा, गैरसोय व अवजडपणा या 'पणांच्या' वादाला जग फारसें महत्व देत नाहीं. मग आपणच तें कां द्यावें ? आपल्या ताब्यांतील देशाच्या अत्यंत कंगाल अवस्थेचा आपले फडनिशी पंडित वारंवार उल्लेख करतात व त्यांतून कांहीं चीड आणण्यासारखे असतात. हे उल्लेख

पहातां पाश्चिमात्य राष्ट्रांतील जे हजारों लोक दारिद्य, घाणेरडेपणा व खालावलेली स्थिति यांत नेहमीं रहात असतात, त्यांची आंकडेवार माहिती देऊन ह्या उल्लेखांना प्रत्युत्तर देण्यास एखाद्याचें मनांत येईल. तथापि ( मला १९०३ व १९०९ सालीं मॉन्ट्रील व सिड्नेे येथील चेम्बर्स ऑफ कॉमर्सच्या सभांच्या प्रतिनिधींना जसा सांगण्याचा प्रसंग आला होता त्याप्रमाणें ), ब्रिटिश राज्य सोडून हिंदुस्थानचा परदेशी व्यापार ब्रिटिश साम्राज्याच्या दुसऱ्या कोणत्याही भागापेक्षां फारच मोठा आहे ह्या गोष्टीची तरी तूर्त आठवण स्टेटिस्ट पत्राला करून दिल्यास बरें पडेल, आणि शिवाय, हिंदुस्थानचा एकंदर व्यापार—अंतस्थ व परदेशी—ध्यानांत घेतां असें आढळेल कीं, ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहती, ताब्यांतील मुलूख व अन्य प्रदेश ह्या सर्वांच्या एकंदर व्यापारापेक्षां हा व्यापार मोठा आहे. जगांतील अत्यंत कंगाल देशांसंबंधानें इतकें सांगितलें म्हणजे पुरें आहे.

चलनाच्या बाबतींत हिंदुस्थानानें जगांतील प्रमुख राष्ट्रांच्या तोडीस कां न यावें यासंबंधानें स्टेटिस्टचें आतांपर्यंतचें म्हणणें फारसें समाधानकारक नाहीं. म्हणून आपण आतां आपल्या टीकाकाराच्या वादांतील एखादा मार्मिक मुद्दा चुकून राहिला असल्यास स्टेटिस्ट पत्राकडे फिरून वळूं या. हा राहिलेला मुद्दा कदाचित् आपल्याला स्टेटिस्ट पत्राच्या गेल्या महिन्याच्या १५ तारखेच्या अंकांत सांपडेल. या अंकांत असें सांगितलें आहे कीं, "हिंदुस्थानांत सोन्याचें चलन प्रचारांत आणल्यास नुसतें हिंदुस्थानचेंच अतिशय नुकसान होऊन रहाणार नाहीं तर, बाकीच्या देशांना सुद्धां ही एक फार भयंकर बाब होऊन बसेल " वाहवा ! वाहवा ! आणखी यापुढें स्टेटिस्टचें म्हणणें काय आहे तें आपल्याला पाहिलें पाहिजे. " गेल्या वर्षीं हिंदुस्थानांत

व्यापाराच्या कामासाठीं, दागदागिन्यांसाठीं व संचयासाठीं, अंदाजें एक कोटी ऐंशीं लक्ष पौंड सोनें आलें. हाच क्रम पुढें चालून चलनाच्या कामासाठीं हिंदुस्थानांत सोन्यावर सोनें येऊं लागलें तर युरोप व अमेरिका येथील पैशाच्या पेठांवर याचा काय परिणाम होईल ? " यांत वादाची नवीनच दिशा आली आहे. शेवटीं येथें आपल्याला स्टेटिस्टच्या फिकिरीचें खरें कारण आढळून आलें कीं काय ? स्टेटिस्ट पत्र आणखी पुढें काय लिहितें तें आपण पाहूं या. " दुसऱ्या देशांच्या हिताकडे पहाणें हिंदसरकारला भाग नाहीं ही गोष्ट आम्हांला कबूल आहे. तरीपण, हिंदसरकारला अधिकार ब्रिटिश राज्यापासून प्राप्त होत असल्यामुळें त्या राज्याचें नुकसान होईल अशी कोणतीही गोष्ट हिंदुस्थानच्या खरोखर फायद्याची असल्याशिवाय हिंदसरकारानें करूं नये. परंतु जें धोरण अंमलांत आणल्यास हिंदुस्थान नाणीं, व्यापार, दागदागिने आणि संचय या कामासाठीं प्रतिवर्षीं पांच कोटींपासून कदाचित् दहा कोटी पौंडपर्यंत सोनें जिरवून टाकील असें धोरण हिंदसरकार स्वीकारील तर ब्रिटिशराज्याचें उघड उघड नुकसान होईल. "

" हिंदी सोन्याचें चलन स्थापण्याची सर विठ्ठलदास थॅकर्सीनीं जी सूचना केली होती, त्यासंबंधानें स्टेटिस्ट पत्रानें केलेल्या या सर्व गडबडीचा खुलासा आतां आपल्यासमोर आला आहे. सत्य बाहेर आल्यावांचून रहात नाहीं—स्टेटिस्ट पत्राच्या कॉलमांमधून सुद्धां तें बाहेर पडतें.—सोनें फार " महागाईचें " आणि " अवजड " होईल हें जें किळसवाणें ढोंग करण्यास लंडनचें फडनिशी पत्र प्रवृत्त झालें आहे, तें हिंदुस्थानच्या ३१ कोटी ५० लक्ष लोकांच्या कल्याणाकरितां नाहीं, तर गरीब, कंगाल हिंदुस्थान, श्रीमंत, बलाढ्य इंग्लंड-

पासून सोन्याची चकाकणारी पिंवळी धातु हिसकावून घेईल ह्या भीतीनें प्रवृत्त झालें आहे; आणि हें सोनें किती हिसकावून घेईल तर सोन्याच्या प्रचंड ठेवी असलेल्या मोठ्या लंडनशहरास क्षुल्लक गैरसोय होईल इतकेंच ! आतां आपण स्टेटिस्टला काय म्हणावें ? आपण आपल्याला निदान खऱ्या वस्तुस्थितीसंबंधानें फसवून घेऊं नये. हिंदुस्थान सोनें अधिकाधिक जिरवूं लागेल ही पोरकट भीति नुसत्या एक दोन वर्तमानपत्रांनाच नाहीं. कांहीं दिवसांमागें मी एका प्रख्यात अँग्लो-इंडियन बँकवाल्याशीं ह्याच विषयावर बोलत होतों, व त्यानें आपले विचार गुप्त मुळींच ठेविले नाहींत. त्याचें म्हणणें पडलें कीं, माझ्या हातांत जर सत्ता येईल तर मी असा कायदा करीन कीं, हिंदुस्थानच्या लोकांना या कायद्यानें यापुढें आपल्याजवळचे सॉव्हरिन एखाद्या बँकेंत ( मला वाटतें त्याची स्वतःची बँक या कामाकरितां तो पसंत करील ! ) आणून ठेविल्याशिवाय एकही सॉव्हरिन हातांत खेळवितां येऊं नये. याखेरीज कांहीं आठवड्यांमागें लंडन येथें भरलेल्या एका प्रमुख देवघेवीच्या बँकेच्या सभेमध्यें अध्यक्षांनीं अशी आशा दर्शविली कीं, हिंदुस्थान जर सोनें आणवूं लागलें तर जगांतील सोन्याची पैदास फार वाढेल. ( आणि तीसुद्धां ही पैदास हल्लीं इतक्या विलक्षण प्रमाणावर चढली असूनही कीं, सर्वत्र सोन्याची किंमत जोरानें कमी होत आहे. ) स्टेटसेक्रेटरीला सुद्धां याच भीतीच्या रोगानें पछाडलें आहे, आणि त्यानें आपलीं वार्षिक खर्चाचीं अंदाजपत्रकें रद्दी समजून गेल्या दोन वर्षांत हिंदुस्थानच्या तिजोऱ्यांतून आपल्या लंडनमधल्या बँकवाल्यांच्या खिशांत आपल्या मूळच्या अंदाजीगरजांपेक्षां एक कोटी ऐशीं लक्ष पौंड जास्त आणले आहेत, आणि असें करून, हिंदुस्था-

नांत साहजिकपणें जो सोन्याचा प्रवाह आला असता तो त्यानें होतां होईल तों बंद केला आहे. आणि याचा परिणाम असा झाला कीं, आपल्या सोन्याच्या प्रमाणाच्या ठेवींतील सर्व सोनें वस्तुतः हिंदुस्थानांतून नाहींसें झालें आहे, इतकेंच नाहीं तर आपल्या कागदी चलनाच्या ठेवींपैकीं सुद्धां—हें चलन फक्त हिंदुस्थानांतच चालत असून त्याचा पैसाही हिंदुस्थानांतच मिळतो—साठ लक्ष पौंडांवर सोनें लंडनास लगबगीनें नेऊन तेथें किंमत उतरत असलेल्या कन्सॉल्स-मध्यें अडकाविलें आहे, आणि यामुळें लंडनच्या पैशाच्या पेठेची नरीच सोय झाली आहे. सरकारनें हिंदुस्थानांत येणाऱ्या सोन्यावर कडक कर बसवावा अशी आतां अगदीं अलीकडे एक जुलुमाची सूचना करण्यांत आली आहे. हा कर जगाला आरंभ झाल्यापासून कोणाच्या स्वप्नांतही आला नसेल, मग तो बसविण्याचें बाजूलाच राहिलें.

"सर विठलदास थॅकरसी, सर गाय फ्लीटवुड वुइल्सन आणि लंडनांत सध्यां असलेल्या सोन्याच्या अपुऱ्या ठेवींपासून साम्राज्याला होणारा धोका जाणणारे सर्व लोक आतां जोराची हांकाटी करून हल्लींची लाजिरवाणी वस्तुस्थिति बंद करण्याबद्दल आग्रह धरतील अशी आशा आहे. लंडनच्या पैशाच्या पेठेनें आज फार दिवसांपासून हिंदुस्थानाचें खेळणें करून टाकलें आहे. चांदीवरचा लोकांचा विश्वास उडाला आहे व किंमत उतरलेल्या कृत्रिम रुपयावरचा तर त्याहीपेक्षां उडाला आहे. आपल्या चलनपद्धतीच्या घडामोडीचे प्रयोग होत रहावेत अशी त्यांची आतां यापुढें इच्छा नाहीं. ब्रिटिश साम्राज्याच्या इतर सर्वांत सुधारलेल्या भागांतून ज्या प्रकारचें चलन आहे त्याच प्रकारचें चलन आपल्या देशांत असावें अशी आतां त्यांची

मागणी आहे. त्यांना सोन्याचें चलन पाहिजे असून ब्रिटिश राज्या-इतकेच ते ह्या पूर्ण सुधारलेल्या पैशाच्या साधनाला खचित पात्र आहेत, आणि कानडा, ऑस्ट्रेलिया अथवा दक्षिण आफ्रिका यांपेक्षां तर फारच जास्त पात्र आहेत. शिवाय, इतर मुलुखांपेक्षां हिंदुस्थान फारच श्रीमान् असल्याकारणानें सोन्याच्या चलनाच्या पायावर तो देश आपली चलन पद्धत सहज उभारूं शकेल. हा पाया हिंदुस्थानांत आधींच घातला गेला असून तो सिद्धीस गेला आहे. सर्व सुधारलेलें जग ह्या पायाची तारीफ करीत आहे. आणि पाश्चात्य पैशाच्या पेठांना जें भयंकर सामर्थ्य आलें आहे त्यांच्या निरंतरच्या दास्यापासून आपल्याला सोडवील असा हाच काय तो पाया आहे. सुदैवानें हलींपेक्षां जास्त योग्य वेळ या कामाकरितां कधीं आली नव्हती; एकीकडून हिंदुस्थानची भरभराट वाढत आहे; आणि दुसरीकडून जगांतील खाणींतून सोन्याची पैदास इतक्या प्रचंड प्रमाणावर गेली आहे कीं, ( कॅलिफोर्निया व ऑस्ट्रेलिया येथील सोन्याच्या खाणी सांपडल्यावर जितकी पैदास होती त्याच्या तिपटीहून जास्त पैदास हलींची आहे. ) सोन्याच्या किंमतींत ध्यानांत येण्याइतका कमीपणा आला आहे—म्हणजे सर्व जगभर जिनसांच्या सोन्यांतील किंमती भयंकर चढल्या आहेत—अशा स्थितींत शक्य त्या मार्गानें सोन्याच्या आणखी जास्त उपयोगास व खपास उत्तेजन देणें हेंच साम्राज्यसरकारचें कर्तव्य आहे. तर, सर विठ्ठलदास ! तुम्ही आतां अशीच पुढें तक्रार चालवा. वेळ तुम्हांला अनुकूल आहे आणि आपल्या हिंदुस्थानावर ज्यांची प्रीति आहे त्या सर्वांचें तुम्हांला पाठबळ आहे. मुंबई चेंबर ऑफ कॉमर्सनें यासंबंधानें जो रागाचा निषेध केला तो अगदीं उघडउघड व शुद्ध सत्याचा केला. मुंबईचे व्यापारी लोक अजूनपर्यंत त्याच

मताचे आहेत यांत संशय नाहीं. दुसऱ्या प्रसिद्ध व्यापारी मंडळ्या खास याच मताच्या आहेत. शिवाय, देशभर लोकांना दिवसानुदिवस सॉव्हरिन अधिक आवडूं लागले आहेत. उत्पन्नाच्या विक्रीसाठीं हजारों सॉव्हरिन उत्तर हिंदुस्थानांत पाठविले जात आहेत. पुष्कळ अनोळखींच्या व एकीकडच्या ठिकाणीं सॉव्हरिन चलनांत असलेले आढळतात, आणि साऱ्याच्या रूपानें सरकारपाशीं ते परत येतात; म्हणजे असें सिद्ध होतें कीं, बऱ्याच लोकांना ते पसंत पडूं लागले आहेत. बादशहा हिंदुस्थानांत येणार आहेत, त्या प्रसंगीं जर त्यांनीं प्रसिद्ध सोन्याच्या मोहोरा फिरून पाडण्याचा हुकूम दिला तर गेल्या कांहीं वर्षांत या मोठ्या देशानें अर्थशास्त्रदृष्ट्या केलेली विलक्षण प्रगति ते जाणून आहेत हें दाखविण्यास यासारखी दुसरी गोष्ट होणार नाहीं. पंचम जॉर्जची नवी मोहोर अगदीं ब्रिटिश सॉव्हरिन-इतकीच वजनदार व सुरेख होईल. जर एखादें याहून लहान सोन्याचें नाणेंही लागल, तर नवीन सोन्याच्या मोहोरेच्या अगदीं बरोबर अर्ध्या किंमतीची पंचम जॉर्जची पुतळीही पाडतां येईल. पुतळी फिरून चालूं केली तर दक्षिण हिंदुस्थानांत ती फारच लोकप्रिय होईल यांत संशय नाहीं. ह्याप्रमाणें हिंदी सोन्याचें चलन शक्य असून त्यायोगें हिंदुस्थानांतील गतकालच्या पैशाच्या पद्धतीची लोकांना प्रत्यक्ष व चांगल्या तऱ्हेनें आठवण होईल आणि त्याबरोबर आपली अर्थशास्त्रदृष्ट्या व राजकीयदृष्ट्या मजबुती अत्यंत वाढून प्रसंगानुसार सर्व साम्राज्याची शक्तीही वाढेल. तेव्हां अशा स्थितींत लंडनच्या संयुक्त पुंजीच्या बँकवाल्यांनीं या विषयाचा याच दृष्टीनें विचार करावा अशी आशा गैरवाजवी होईल काय ? ”

## ताजा कलम.

स्टेटिस्ट पत्रानें यासंबंधांत आपलें मत नुकतेंच बदललें आहे ही भूषणाची गोष्ट आहे. या पत्राच्या मार्च तारीख ३० सन १९१२ च्या अंकांत पान ६७१ मध्यें खालील मजकूर आला आहेः—

"......हिंदुस्थानांतील सुखवस्तु वर्गाच्या लोकांचें चलनासंबंधाचें मत लवकर लवकर बदलत चाललें आहे यांत आतां मुळींच संशय नाहीं. तसेंच सर्व युरोप, अमेरिकाभर सोनें चांदीपेक्षां फार श्रेष्ठ आहे ही जशी समज झाली आहे, त्याचप्रमाणें आतां हिंदुस्थानांतील सुखवस्तु लोकांचीही पण समज होऊं लागली आहे. अशी स्थिति असल्यावर इंग्लंडच्या बँकेंतून जशीं जेव्हां सोन्याचीं नाणीं लागतील तशीं व त्या वेळेस काढून घेण्याऐवजीं हिंदुस्थाननें आपलीं स्वतःचीं नाणीं कां पाडूं नयेत याविषयीं आतां कांहीं सबब राहिली नाहीं...... "

ही गोष्ट अगदीं बरोबर आहे. हिंदुस्थानाला सोन्याचें चलन पूर्ववत् देणें किती इष्ट आहे, यासंबंधानें आपले विचार स्टेटिस्टनें फिरून तपासल्यावर आतां अन्य ठिकाणींही लोकांचे ग्रह याचप्रमाणें बदलतील अशी आशा करण्यास बरीच जागा आहे. शेवटीं शकुन चांगला लागला म्हणावयाचा !

# पुरवणी ( २ ).

## सोन्याचें नाणें चांगलें कीं चांदीचें नाणें चांगलें ?

हिंदुस्थान फार श्रीमान् व बलाढ्य देश आहे. खरोखर, इंग्लंड देश वगळून ब्रिटिश साम्राज्याचा सर्वांत श्रीमंत व सध्यांच्या व्यवस्थेंत सर्वांत जोरदार भाग हिंदुस्थान देश आहे. हिंदुस्थानची लोकसंख्या एकतीस कोटी पन्नास लक्ष असून, लोक उद्योगी, शांत व काटकसर करणारे आहेत; देशांत पाणी चोहोंकडे चांगलें असून जमीन सुपीक आहे; वनस्पती व प्राणी यांच्या वाढीला हवाही फार चांगली आहे; अशा परिस्थितींत साम्राज्याच्या इतर कोणत्याही भागापेक्षां—ग्रेटब्रिटन सोडून—हिंदुस्थानचा व्यापार फार अधिक असावा ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हिंदुस्थानचा एकंदर व्यापार—अंतस्थ व बाहेरचा—ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व स्वतंत्र वसाहतींच्या एकंदर व्यापारापेक्षां बराच अधिक आहे, यासंबंधानें संशयाला जागा विरळाच राहील.

हिंदुस्थानचें कल्याण व्हावें अशी ज्यांची इच्छा असेल, विशेषतः ज्यांची जन्मभूमि हिंदुस्थान असून जे तेथें रहातात व तेथील अनेक फायदे जाणतात आणि त्या देशाचा आकार, संपत्ति, व महत्व यांच्या मानानें साजेल अशी जागा त्या देशास साम्राज्य-कौन्सिलांमध्यें मिळावी म्हणून खटपट करण्याची चिंता ज्या लोकांना आहे त्यांना असें वाटेल कीं, त्या देशाची प्रत्येक बाजूनें—सामाजिक, अर्थशास्त्रदृष्ट्या व राजकीय परिस्थिति उत्तम प्रकारची असावी.

आणि या सर्व उत्तम परिस्थितीमध्यें उत्तम चलनपद्धत व उत्तम चलनी नाणें हीं अर्थात् आलींच पाहिजेत.

यासंबंधांत हिंदुस्थानाला उत्तम चलनपद्धत कोणती व उत्तम चलनी नाणें कोणतें हें आपण कसें ठरवावयाचें? दोन मार्ग आपल्याला खुले आहेतः—एक आपण स्वतः प्रयोग करून पहावयाचा किंवा दुसऱ्या राष्ट्रांच्या प्रयोगांचा फायदा घ्यावयाचा. कोणत्याही धोक्याशिवाय अगर कांहीं खर्च न लागतां आणि फार कमी त्रासानें आपण जर दुसऱ्या मार्गाचा फायदा घेऊं शकूं, तर अशा स्थितींत पहिला मार्ग स्वीकारा अशी सूचना कोणी करणार नाहीं. साम्राज्याच्या इतर मुख्य भागांनीं आणि जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं आपल्या चलनसाधनांसंबंधांत व चलनपद्धतीसंबंधांत काय काय केलें आहे हें आपण पाहून हिंदुस्थानसारख्या संपन्न, बलाढ्य, व जोरानें सुधारणाऱ्या देशास कोणतीं चलनसाधनें व कोणती चलनपद्धत उत्तम हें ठरवूं या.

जगामध्यें उत्तम चलनपद्धत कोणती? म्हणजे उदाहरणार्थ, इंग्लंडची उत्तम, किंवा हिंदुस्थानची उत्तम, अगर पर्शियाची किंवा चीनची उत्तम? जगांत चलनाचीं उत्तम साधनें कोणतीं? तांब्याचीं किंवा, चांदीचीं अगर सोन्याचीं? सरकारकडून व्यवस्था होत असलेली, म्हणजे जेथें पैशाचा पुरवठा सरकारच्या इच्छेवर अवलंबून असतो अशी चलनपद्धत चांगली, किंवा खुल्या अनिर्बंध टांकसाळीची म्हणजे जेथें पैशाचा पुरवठा लोकांच्या मागण्यांवर व गरजांवर अवलंबून असतो अशी चलनपद्धत चांगली? राष्ट्राचीं मुख्य चलनसाधनें होण्यास सोन्याचीं नाणीं अधिक पात्र किंवा चांदीचीं

नाणीं अधिक पात्र ? जगांतील प्रमुख देशांमध्यें आपली गणना करूं इच्छिणाऱ्या राष्ट्रानें या प्रश्नांचीं बिनचूक उत्तरें ठरविणें अवश्य आहे.

जगाला या प्रश्नांच्या उत्तरांसंबंधांत संशयाला जागा नाहीं. सर्व मोठमोठ्या राष्ट्रांच्या अनुभवानें ही गोष्ट निःसंशय सिद्ध झाली आहे कीं, खालील तीन गोष्टी जींत आहेत तीच चलनपद्धत उत्तम.

( १ ) मुख्य चलनसाधनें सोन्याचीं नाणीं असून या नाण्यांचे अंश चांदीचे, निकल धातूचे आणि तांब्याचे असतात.

( २ ) अनिर्बंध व अमर्याद सोन्याचीं नाणीं पाडून घेण्यास सरकारी कारखाने ऊर्फ टांकसाळी लोकांना वाटेल त्या वेळेस व वाटेल तसा उपयोग करून घेण्यासाठीं खुल्या असतात.

( ३ ) सरकारी खात्यास चलनांत हात घालण्यास व ढवळाढवळ करण्यास अत्यंत कमी वाव मिळतो.

ग्रेट ब्रिटननें व सर्व स्वतंत्र वसाहतींनीं हीच पद्धत अंमलांत आणली आहे. यूरोप व अमेरिका येथील मुख्य राष्ट्रें याच पद्धतीनें चालतात. तात्पर्य, सर्व सुधारलेल्या जगाला हीच पद्धति पसंत झाली आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या पद्धतीप्रमाणें दररोजच्या उपयोगास पडण्यासाठीं, मोठ्या लहान सर्व किंमतींच्या जिनसांच्या देवघेवीला व व्यवहाराला, तसेंच श्रीमंतगरीब सर्व दर्जांच्या लोकांच्या गरजा भागू शकतील अशीं चलनी साधनें सुरू करणें अवश्य झालें आहे. उदाहरणार्थ, अगदीं खालच्या दर्जाच्या लोकांसाठीं व फार लहान किंमतीच्या व्यवहारांसाठीं तांब्याचीं व निकलचीं नाणीं फार उपयोगीं पडतात; सर्व राष्ट्रांतील बऱ्याच लोकांकरितां आणि त्यांच्या

बहुतेक कामांकरितां चांदीचीं तशींच निकलचीं व तांब्याचीं नाणीं नेहमीं उपयोगांत येतात. सुस्थितींतील लोकांना सोन्याचीं नाणीं फार कार्यक्षम असून सोयीचीं असतात; आणि श्रीमान् लोकांसाठीं —मोठमोठे व्यापारी, आणि राष्ट्रांराष्ट्रांमधला घाऊक व्यापार करणारे —जगांतील सर्वांत पुढें गेलेलीं राष्ट्रें कागदी पैसा ( सोन्यांत किंमत ठरविलेला आणि वाटेलतेव्हां सोन्याचा पैसा मोबदला मिळणारा ) उपयोगांत आणतात.

परंतु सर्वांत सुधारलेल्या देशांनीं अमलांत आणलेल्या चलनपद्धतींचें व चलनसाधनांचें नुसतें वर्णन देऊन आपलें काम भागणार नाहीं; ही पद्धत व हीं साधनें कां अमलांत आणिलीं गेलीं आहेत हें समजणें अवश्य आहे; विशेषतः ह्या कारणासाठीं अवश्य आहे कीं, हिंदुस्थानची हल्लींची चलनपद्धति व चलनसाधनें हीं कांहीं मानवी प्राण्यानें आजपर्यंत काढलेल्या पद्धतींमध्यें व साधनांमध्यें उत्तम आहेत असें कोणी म्हणणार नाहीं. उलट ग्रेट ब्रिटननें एक शतकामागें त्याज्य केलेल्या पद्धतींमुळें—अशा पद्धतींमुळें कीं, जी हिंदुस्थानांत अमलांत आणल्याकारणानें चलनाच्या व्यवस्थेच्यासंबंधांत तो देश पर्शिया व चीनसारख्या देशांच्या पायरीवर आला आहे—हिंदुस्थानचा हल्लीं घोंटाळा होऊन राहिला आहे.

प्रथम आपल्या चलनसाधनांकडे लक्ष देऊं. जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं आपलें मुख्य चलनाचें साधन सोन्याचेंच कां केलें आहे ? ह्या प्रश्नाच्या उत्तरासाठीं आपण अशी चौकशी केली पाहिजे कीं, पैशाचीं कामें कोणतीं आहेत व त्याचे उपयोग काय आहेत ? याचें उत्तर सोपें आहे. पैशाचें पहिलें मुख्य काम विकत घेण्याचें. विकत

घेण्याचें मुख्य साधन पैसा आहे. ऐहिक सृष्टींतील आपणास लागणारा प्रत्येक पदार्थ आपण पैशानें मिळवूं शकतों व मिळवितों. पैशाकडे ही कामगिरी कशी आली ह्याची चौकशी येथें करीत बसण्याचें कारण नाहीं. पैशाखेरीज सध्यांच्या काळीं आपलें एक पाऊलही पुढें पडणार नाहीं. ह्यासंबंधांत सोनें चांदीपेक्षां अधिक चोख रीतीनें काम करतें हेंही उघड आहे. तें अधिक जड व सुंदर असून त्याला चांदीपेक्षां मागणीही अधिक आहे. शिवाय जगांतील सर्व प्रमुख राष्ट्रांनीं आपलीं मुख्य चलनाचीं साधनें सोन्याचीं केलीं आहेत. आणि ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, सोन्याचीं नाणीं व विशेषतः ब्रिटिश सॉव्हरिन हीं दुसऱ्या एखाद्या धातूच्या नाण्यांपेक्षां फार दूरवर चलनांत येतात. सारांश, सर्व जगाला अशी खात्री वाटत आहे कीं, राष्ट्राच्या मुख्य विकत घेण्याच्या साधनासाठीं चांदीपेक्षां सोनें फार अधिक चांगलें आहे; एवढ्याचकरितां कीं, आजपर्यंत शोधून काढलेल्या दुसऱ्या एखाद्या स्वरूपाच्या नाण्यापेक्षां सोन्याच्या नाण्यानें माल अधिक मिळून कामेंही अधिक होतात, आणि पृथ्वीवरील पुष्कळ देशांत अशी स्थिति आहे. तेव्हां हें स्पष्ट आहे कीं, जर मुख्य चलनसाधनासंबंधांत ग्रेट ब्रिटन व वसाहती, जपान आणि जगांतील प्रमुख राष्ट्रें ह्यांच्याबरोबर येण्याची हिंदुस्थानचीं इच्छा असेल—आणि हिंदुस्थानाला अशी बरोबरी केलीच पाहिजे,—तर सोन्याचें चलन फिरून स्थापण्याविषयीं त्यानें आग्रह धरला पाहिजे होता.

नाण्याचें दुसरें काम म्हणजे विकत घेण्याच्या शक्तीचा सांठा किंवा खजिना हें होय. इंग्लंडमध्यें आणि खरोखर जगांतील बहुतेक अत्यंत सुधारलेल्या देशांत पैशाच्या मुख्य ठेवी चांदीच्या रूपांत

नसून सर्वांशीं सोन्याच्या रूपांत ठेविलेल्या असतात. इंग्लंडच्या बँकेची ठेवही सोन्यामध्यें ठेविलेली आहे. त्याचप्रमाणें अमेरिका, रशिया, फ्रान्स, इटाली, जपान, ऑस्ट्रिया व इतर देश येथील पैशाच्या मुख्य ठेवी सोन्यांत आहेत. थोड्या दिवसांपूर्वींपर्यंत ग्रेट ब्रिटन, फ्रान्स व दुसरे देश येथील लोक आपला नगद संचय आपल्या घरांत कुलूप बंद करून ठेवीत असत. युद्धाच्या प्रसंगामुळें यूरोपच्या आग्नेयीकडील लोक हल्लीं असेंच करीत आहेत. हिंदुस्थानांत बहुतेक लोकांना लिहितां वाचतां येत नाहीं, गांवागांवांत अंतर बरेंच असतें, व चांगल्या विश्वासू बँका एकंदरीच्या मानानें फार थोड्या आहेत. या गोष्टींमुळें पुष्कळ लोकांना विकत घेण्याच्या शक्तीचा—नाण्याचा—संग्रह आपल्याच ताब्यांत ठेवणें सोईचें व समाधानकारक वाटतें. देशाची सुधारणा जोरानें होत चालल्यानें, ज्ञानाच्या प्रसारानें, व्यवस्था राखण्याच्या व न्याय देण्याच्या सरकारच्या सामर्थ्यावरील विश्वास वाढत असल्यानें, आणि प्रतिवर्षीं वाढणाऱ्या हिंदी बँकांच्या साहसानें पैशाच्या शिलकी आपआपल्याजवळ ठेवण्याची ही जुनी चाल हलके हलके नाहींशी होत चालली आहे. हल्लीं हिंदी सरकार प्रमुखत्वानें पैशाचा सांठा करून राहिलें आहे. कागदी चलनाची ठेव व सोन्याच्या प्रमाणाची ठेव ( ज्या आज ६००००००० पौंडांवर गेल्या आहेत ) ह्या वगळून हिंदुस्थानसरकार नेहमीं आपल्या तिजोऱ्यांतून दोन कोटी पौंडांवर नगदी शिल्लक सांठवून ठेवतें. कशाकरितां हें कोणालाही कळत नाहीं. ही प्रचंड शिल्लक काढून तिचा सांठा करून ठेविल्यानें व्यापाराला सर्व खानगी शिलकांपेक्षां जास्त गैरसोय होते. सरकारी संचयाचा हा प्रश्न बाजूला ठेवून, चांदीची ठेव सोन्याच्या ठेवीइतकी

चांगली आहे अशी कल्पना थोडा वेळ सुद्धां कोणी करणार नाहीं.

सन १८९३ सालीं टांकसाळी बंद केल्यापासून पुढील सालीं, हिंदुस्थानांतील लोकांना आपल्या खानगी चांदीच्या संचयासंबंधांत एक धडा मिळाला आहे. नाणीं पाडलेल्या चांदीची विकत घेण्याची शक्ति व विनानाणीं पाडलेल्या चांदीची विकत घेण्याची शक्ति ह्यामध्यें फारकत झाल्याकारणानें बऱ्याच अतिशय कंगाल व अशिक्षित लोकांच्या संचयाचें नुकसान झालें. किंमतींत उतरत जाणाऱ्या नऊ पेन्सांबरोबरीच्या चांदीच्या वर्तुलाकृति तुकड्यांच्या ठेवी ठेवून ( चांगले पूर्ण किंमतीचे सोन्याचे सॉव्हरिन सहज मिळत असतांना ) आणखी जास्त धोका उत्पन्न करावयाचा म्हणजे मूर्खपणाची कमाल होणार आहे. हिंदुस्थानच्या पैशाच्या ठेवी यापुढें जगांतील इतर ठेवी ज्या धातूच्या रूपांत आहेत त्याच रूपांत म्हणजे सोन्याच्या रूपांत असल्या पाहिजेत. खालीं जगांतील प्रमुख देशांची यादी दिलेली असून पूर्वी असलेल्या सोन्याच्या ठेवींत गेल्या दहा वर्षांत त्या देशांतील सरकारांनीं व बँकांनीं आणखी जास्त सोनें घालून सरासरीनें किती भर टाकली आहे हें दाखविलें आहेः—

| **देशांचीं नांवें.** | **ठेवींत भर पौंड.** |
|---|---|
| ऑस्ट्रेलिया ... ... ... | ५००७००० |
| बेल्जम ... ... ... | ५०००००० |
| हॉलंड ... ... ... | ५०००००० |
| जर्मनी ... ... ... | ९०००००० |
| ऑस्ट्रिया ... ... ... | १६०००००० |
| जपान ... ... ... | १७०००००० |
| ब्रेझिल ... ... ... | १९०००००० |

| | |
|---|---|
| अर्जेंटिना ... ... .. | ३००००००० |
| इटाली ... ... ... | ३२०००००० |
| फ्रान्स ... ... ... | ३७०००००० |
| राशिया ... ... ... | ५५०००००० |
| संयुक्त संस्थानें ( अमेरिका ) ... ... | १४०००००० |

[ **टीपः**—इंग्लंडनें गेल्या दहा वर्षांत आपल्या सोन्याच्या ठेवींत वस्तुतः कांहींच भर टाकली नाहीं. ]

ह्या देशांपैकीं कोणत्याही देशास विकत घेण्याच्या शक्तीची ठेव ह्या नात्यानें चांदी सोन्याइतकी चांगली आहे असें वाटत नाहीं.

विकत घेण्याचीं साधनें, ठेवी आणि विकत घेण्याची शक्ति यांशिवाय पैशाचीं आणखी कामें आहेत. पैसा हा आपलें किंमती मोजण्याचें माप असून आज घेतलेला पैसा कालांतरानें किती द्याव-याचा तें ठरविण्याचें प्रमाणही आहे. वस्तूंच्या किंमतींची तुलना पैशा-च्या योगानें आपणास करतां येते जसें, तांदूळ या भावाचे आहेत, तुपाचा भाव इतका आहे, मीठ इतकें मिळतें वगैरे. चांदी किंवा सोनें किंमती मोजण्याचें पूर्ण साधन केव्हांही होत नाहीं; कारण दोघांची किंमत स्थिर नाहीं. हल्लीं वस्तुस्थिति अशी आहे कीं, चांदी व सोनें दोन्ही किंमतींत उतरत आहेत. म्हणजे इतर सर्व पदार्थांच्या किंमती ( पैशांत मोजलेल्या किंमती ) सर्व जगभर वाढत आहेत.

इंग्लंडमध्यें सन १९०१ ते १९०५ पासून किंमती कशा चढल्या आहेत ते आंकडे एकॉनामिस्ट पत्रानें दिलेले खालीं दिले आहेत.

| | किंमत. |
|---|---|
| मूळ आंकडा ( १९०१-१९०५ ) सरासरीनें ... | १००. |
| १९११ च्या पाहिल्या तीन महिन्यांत ... ... | ११५ |
| १९११ च्या तिसऱ्या तीन महिन्यांत ... ... | ११५½ |
| १९११ च्या डिसेंबर अखेर ... ... ... | ११७ |
| जून १९१२ ... ... ... ... ... | १२३ |
| डिसेंबर १९१२ ... ... ... ... ... | १२५ |

हिंदुस्थानांत किंमती याहीपेक्षां जास्त चढलेल्या पहाण्यांत आल्या आहेत. किंमतींची ही सर्वसाधारण वाढ ( या वाढीबरोबर सोन्याची पैदासही फार अवाढव्य झाली आहे—सालीना १००००००० पौंड जवळ जवळ—म्हणजे जगाच्या इतिहासांत आजपर्यंत इतकी पैदास झाली नव्हती ) म्हणजे ठराविक रोजमुरा मिळविणारांचें-विशेषतः अत्यंत कंगाल लोकांचें-भयंकर दुर्दैव. ह्यास एकच सुचणारा उपाय म्हणजे किंमतीच्या वाढीची प्रतिकार करण्यासाठीं **मजुरी वाढविणें** आणि सर्व जगभर ( हिंदुस्थान धरून ) किंमती आणखी जास्त वाढूं नयेत म्हणून सोन्याचा खप आणखी जास्त वाढविणें. तेव्हां येथें आपल्याला असें दिसून येईल कीं, पैशाच्या कामासाठीं चांदीपेक्षां सोन्याच्या नाण्यास व खपास उत्तेजन देणें अधिक चांगलें हल्लीं जगभर पसरत चाललेल्या सोन्याच्या आधींच असामान्य झालेल्या नाण्यांत चांदीच्या अवाढव्य नाण्यांची भर घालून जगावरील धातूच्या पैशाचा पुरवठा वाढविणें ( आणि त्याबरोबर किंमतीच्या मर्यादा वाढवून लोकांवर अन्याय करणें ) म्हणजे केवळ आपल्या किंमतीच्या मापांत कमपेशी करणें

व सध्यांच्या सामाजिक व आर्थिक अडचणींत आणखी भर घालणें होय.

आज दिलेला पैसा कालांतरानें फेडण्याचें प्रमाण व साधन हें जें पैशाचें कार्य आहे, त्यासंबंधानें सर्वांना माहीत आहे कीं, जगांतील अत्यंत मोठ्या पैशाच्या पेठा—लंडन, पॅरिस, न्यूयॉर्क, बर्लिन इत्यादि–जे ऋणको आपलें कर्ज चांदींत फेडण्यास इच्छितात त्यांना उसनवार पैसा देणार नाहींत. आज दिलेला पैसा कालांतरानें फेडण्याचें जगन्मान्य प्रमाण व साधन म्हणजे फक्त सोन्याचा पैसा आहे. ह्यासंबंधांत जगांतील प्रत्येक देशाला–हिंदुस्थान धरून–सोन्याची श्रेष्ठता मान्य करणें भाग पडलें आहे. हिंदुस्थानचा पाठीराखा ग्रेट ब्रिटन असूनही हा देश आपल्या कमी सुधारलेल्या लोकांपासून फक्त चांदीचाच पैसा उसना घेण्यास व त्याची फेड त्याच रूपांत करण्यास समर्थ आहे. आज दिलेला पैसा कालांतरानें चांदीच्या रूपांत परत घेण्यास दुसरा कोणताही देश राजी होणार नाहीं. सर्व जगाचें जें आज ठाम मत झालें आहे कीं, आज दिलेला पैसा कालांतरानें फेडण्याचें प्रमाण या नात्यानें चांदीच्या पैशापेक्षां सोन्याचा पैसा अधिक चांगला असतो. याचीं कारणें व किंमतींचें माप विकत घेण्याच्या शक्तीचा सांठा व जगांतील मुख्य विकत घेण्याचें साधन या नात्यानें सोन्याचाच सर्वत्र उपयोग केला जात आहे. याचीं **कारणें** हीं दोन्हीं अगदीं एकच आहेत. तीं हीं कीं, सोनें अधिक **मोहक** असून लोकांना वाटतें कीं, चांदीपेक्षां किंवा इतर दुसऱ्या धातूपेक्षां सोन्याच्या किंमतींत **फेरबदल थोडा होतो.** आणि म्हणून परिणाम असा झाला आहे कीं, जगांतील सर्वांत सुधारलेल्या राष्ट्रांनीं कैक काळापर्यंत नानाप्रकारचे प्रयोग करून, आपलें

धातूंच्या पैशाचें मुख्य साधन चांदीपेक्षां सोन्याचेंच करण्याचें विलें आहे.

हाच किता गिरवून थोडयाच पिढ्यांत पूर्वीप्रमाणें हिंदुस्थान आपल्या रोजच्या व्यवहारांत सोन्याच्या पैशाचा अधिक उपयोग करील काय ? का फक्त साम्राज्याच्या मोठ्या भागाची योग्यताच मिळवून रहाणार ? व जगांतील हा एकटाच मोठा देश या नाण्याचे बाबतींत अजूनपर्यंत गतयुगांतल्या खालच्या दर्जाच्या पैशाच्या साधनाला चिकटून रहाणार ?

या प्रश्नाला फक्त एकच उत्तर संभवनीय आहे. तें हें कीं, हिंदुस्थानाला सोन्याचेंच चलन पाहिजे आणि तेंसुद्धां जितकें लवकर मिळेल तितकें चांगलें.

उत्तम पैशाचीं साधनें व उत्तम चलनपद्धत असण्यासंबंधाच्या या देशाच्या महत्वाकांक्षेला हिंदुस्थानसरकारची पूर्ण सहानुभूति आहे, ही फार समाधानाची गोष्ट आहे. सन १९१२-१३ चा जमाखर्ची खर्डा पुढें मांडतांना सर गाय फ्लीटवुड वुइल्सन यांनीं हिंदुस्थानांत सॉव्हरिन लोकांना चकित करून टाकतील इतके आले आहेत, व आपल्याला चांदीचीं नवीन नाणीं पाडण्याची जरूरी नाहीं, याबद्दल आपलें समाधान व्यक्त केलें. शिवाय त्यांनीं अशी खात्री दर्शविली कीं, इतके सगळे सॉव्हरिन लोक नुसते सांठवून ठेवणार नाहींत अगर वितळून टाकणार नाहींत. परंतु लोक जसजसे या नाण्यांशीं अधिकाधिक परिचित होत जातील तसतसे शहाजोग चलन या नात्यानें त्यांचा अधिकाधिक उपयोग करतील. हिंदुस्थानच्या लोकांच्या चांगल्या समजुतीवरील व शुद्ध महत्वाकांक्षेवरील फडनीससाहेबांचा हा विश्वास वस्तुस्थितीनें पूर्ण खरा ठरला आहे. हल्लीं उत्तर,

पश्चिम आणि दक्षिण हिंदुस्थानांत सोन्याचीं नाणीं वाटेल तशीं खेळत आहेत. या प्रगतींत पूर्वहिंदुस्थानही लवकरच सामील होईल.

---

# पुरवणी ( ३ ).

## सोन्याच्या प्रमाणाची ठेव.

तारीख ३० जून १९१३ रोजीं हिंदुस्थानांत व इंग्लंडांत असलेली सोन्याच्या प्रमाणाची ठेव २२६८६३७६ पौंड असून ती खालीलप्रमाणें गुंतविलेली आहे:—

| | पौंड. |
|---|---|
| ( १ ) हिंदुस्थानांत चांदीच्या रूपानें ( १ पौंड = १५ रुपये )........ | ४०००००० |
| ( २ ) इंग्लंडच्या बँकेंत राखून ठेवलेलें सोनें | १७३०००० |
| ( ३ ) नोटिसा देऊन ताबडतोब परत घेतां येईल अशी स्टेट सेक्रेटरीनें ठेविलेली नगद | १०१५२९० |
| ( ४ ) ब्रिटिश व कलोनिअल सरकारांच्या हमीवर व लंडन कॉर्पोरेशनकरितां काढलेले बाँड ( ३१ मार्च १९१३ पर्यंत ).. | १४२०९९५० |
| ( ५ ) ३१ मार्चच्यापुढें ब्रिटिश व कलोनिअल सरकारांच्या हमीवर काढलेले बाँड .. | १७३११३६ |
| एकंदर बेरीज... | २२६८६३७६ |